# सत्र ५ : घटक १

# आंतरराष्ट्रीय राजकारण

# स्वरूप आणि व्याप्ती


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ आणि व्याख्या

१.२.२ आंतराष्ट्रीय राजकारणांचे स्वरूप

१.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती

१.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे दृष्टीकोन

१.२.४.१ आंतरराष्ट्रीय राजकारणांतील आदर्शवादी दृष्टीकोन

१.२.४.२ आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी दृष्टीकोन

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


**१.० उद्दिष्ट्ये :**

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व समजावून घेता येईल.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी सिद्धांत स्पष्ट करता येईल.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी सिद्धांत स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक : (Introduction)

आज संपूर्ण जगाचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील संबंधाचे क्षेत्र ही व्यापक बनले आहे. आधुनिक काळात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेमुळे संचार माध्यमांच्या तसेच विज्ञान क्षेत्राच्या क्रांतीमुळे पूर्वी अतिशय दूरची वाटणारी राष्ट्रे आता अगदी जवळची वाटू लागली आहेत. ज्याप्रमाणे व्यक्तीला आपल्याला आवडो न आवडो समाजापासून अलग न राहता समाजातच रहावे लागते. त्याप्रमाणे प्रत्येक राष्ट्राला आंतरराष्ट्रीय समुहातच रहावे लागते. प्रत्येक राष्ट्राला विकासासाठी किंवा अत्यावश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी इतर राष्ट्रांशी संबंध ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक असे विभिन्न प्रकारचे संबंध प्रस्थापित होऊ लागले आहेत. राज्यांचे हे संबंध दोन प्रकारचे असू शकतात. उदा. मित्रत्वाचे व शत्रूत्वाचे संबंध मित्रत्वाच्या संबंधात परस्पर सहकार्य व मदतीची भावना असते. या संबंधांना गैर राजकीय संबंध (Non-Political Relations) असे ही म्हणतात. परंतु राज्यांचे संबंध अनेक वेळा बिघडतात. त्यांच्यात संघर्ष किंवा युद्धस्थिती निर्माण होते. अशा वेळी त्यांच्यात शत्रूत्वाचे संबंध निर्माण होतात. अशा संबंधांना शक्तीसंबंध (Power Relations) असे म्हणतात.

आंतरराष्ट्रीय संबंध ही प्रक्रिया गतिशील असल्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यासाला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण विचारात घेताना आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व तसेच आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे आदर्शवादी दृष्टीकोन आणि वास्तववादी दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक आहे.

## १.२ विषय-विवेचन : (Presentation of Subject matter)

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय संबंध हा एक स्वतंत्र विषय म्हणून विकसित झाला आहे. ग्रीक विचारवंत किंवा प्राचीन भारतीय विचारवंत यांनी एका राज्याशी दुसऱ्या राज्याचे संबंध कसे असावेत याचा चर्चा केली आहे. मॅकियाव्हॅलीने धर्म, नीती आणि राजकारण यांना एक दुसऱ्यापासून अलग करून राजाने कसे वागावे या संबंधी उपदेश केलेला आहे. विसाव्या-शतकाच्या प्रसंगी इ.स. १९०० मध्ये पॉल एस् रिश यांनी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर सर्वप्रथम एक पुस्तक लिहून जगाचे लक्ष या विषयाकडे वेधून घेतले. पॉल रिश यांनी त्यावेळी अमेरिकेतील विसकान्सिन विद्यापीठात या विषयावर पहिले भाषण दिले तेव्हापासून या विषयाचा राज्यशास्त्रांतर्गत एक स्वतंत्र अभ्यास विषय म्हणून प्रारंभ झाला. पहिल्या महायुद्धानंतर या विषयाच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

इ.स. १९१९ मध्ये वेल्स येथील विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय शिकविण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर अनेक विद्यापीठात प्रस्तुत विषय शिकविण्यास प्रारंभ झाल्यापासून या विषयाचे महत्त्व आणि उपयुक्तता जगाला समजली असली तरी 'आंतरराष्ट्रीय' हा शब्दप्रयोग जेरेमी बेंथॅम यांनी १८व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच १७८९ मध्ये सर्वप्रथम केला आहे. आज आंतरराष्ट्रीय संबंध केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता ते परस्परात आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय, लष्करीबाबत संबंधांचे जाळे विणले गेले आहे.

केनेथ थॉम्पसन यांच्या मते या विषयाचा विसाव्या शतकात जो विकास झाला तो चार अवस्थांमधून

झाला. २०व्या शतकाच्या प्रारंभी म्हणजेच पहिल्या महायुद्धाच्या पूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययन पद्धतीवर इतिहास तज्ञांचा प्रभाव होता. या काळात या विषयाच्या अभ्यासामध्ये ऐतिहासिक घटना क्रमावर जास्त भर होता. तत्कालिन राष्ट्रीय घडामोडींचा फारसा विचार केला जात नसे. या क्षेत्रातील माहितीचे संकलन विश्लेषण करून या विषयामध्ये काही सिद्धांत मांडण्याचे ही प्रयत्न या काळात झालेले आहेत. पहिल्या महायुद्धानंतर दुसरी अवस्था सुरू झाली. या अवस्थेमध्ये तत्कालिन राजकीय घडामोडींचा अभ्यास करण्यात येऊ लागला. पण यामुळेच भूतकालीन घटनाकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले. दोन महायुद्धा दरम्यानचा कालखंड आणि दुसऱ्या महायुद्धानंतर ही काही काळापर्यंत तिसरी अवस्था होती. पहिल्या महायुद्धाच्या भयानक विध्वंसकारी अनुभवानंतर पुढील काळात युद्ध टाळून शांतता टिकविण्याची निकट सर्वांनाच वाटू लागली. अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या पुढाकाराने १४ कलमी कार्यक्रमावर राष्ट्रसंघाची (League of Nations) स्थापना झाली जगामध्ये चिरकालीन शांतता टिकविण्याच्या हेतून निर्माण करण्यात आलेली ती पहिलीच आंतरराष्ट्रीय संघटना होती. या काळातील विचारवंत या संघटनेच्या कार्याबाबत आशावादी होते. परंतु काही कारणास्तव राष्ट्रसंघ शांतता टिकविण्यामध्ये अयशस्वी झाला आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा भडका उडाला. त्यामुळे विचारवंतांना नैतिक आणि सुधारणावादी दृष्टीकोन स्वीकारण्याची आवश्यकता वाटू लागली. यातूनच प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाचा वास्तववादी दृष्टीकोन उदयास आला. वास्तववादी दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला १९५० नंतर सैद्धांतिक बैठक देण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीचा वापर होऊ लागला. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाच्या अभ्यासाचे स्वरूपच बदलून गेले. त्यातूनच या विषयाच्या अभ्यासाला नवे स्वरूप प्राप्त झाले.

### १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ :

आंतरराष्ट्रीय राजकारण ही सतत बदलणारी प्रक्रिया आहे. आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभाव पाडण्याची, नियंत्रण ठेवण्याची कला, तसेच सत्तासंबंध प्रस्थापित करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकारण होय. प्रत्येक राष्ट्र-राज्य हे सार्वभौम आहे. प्रत्येक राष्ट्राला आपले धोरण ठरविण्याचे स्वातंत्र्य असते. सार्वभौम व सत्तासंबंध राष्ट्राच्या परस्परातील संबंधास आंतरराष्ट्रीय संबंध म्हणतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, ''ज्या प्रक्रियाद्वारे विभिन्न राज्ये आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाची आखणी इतर राज्यांच्या राष्ट्रीय हितसंबंधाशी करीत असतात त्या प्रक्रियांना आंतरराष्ट्रीय संबंध म्हणतात.''

अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संज्ञा अनेकदा एकाच अर्थाने वापरल्या आहेत. पण या दोन्हीमध्ये फरक असून आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती व्यापक आहे. त्यामध्ये जगातील सर्व गट आणि लोकांमधील संबंधाचा समावेश होतो. तर आंतरराष्ट्रीय राजकारण ही संज्ञा सुरुवातीला संकुचित अर्थाने वापरण्यात येत असे. त्यामध्ये केवळ राजनय आणि राज्य व इतर राजकीय घटकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यात येत असे. आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती आंतरराष्ट्रीय राजकारणापेक्षा व्यापक असून त्यात सर्व प्रकारचे राष्ट्राराष्ट्रामधील, राष्ट्रगटामधील अधिकृत आणि अनाधिकृत संबंधाचा अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पांचा अर्थ लक्षात घेतल्यास राष्ट्रीय हित संबंध सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने ''एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर टाकलेला

प्रभाव म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.'' या अर्थाने आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास शक्ती, सत्ता, संघर्ष, सहकार्य अशा राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित असतो. तर आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्राराष्ट्रामधील राजकीय विचार, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अशा प्रकारच्या संबंधाचा समावेश होतो. हेरॉल्ड आणि मागरिट स्प्राऊट यांच्या मते आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राष्ट्रीय पातळीवरील सर्व प्रकारच्या मानवी वर्तणुकीचा तसेच राष्ट्रीय सीमांच्या पलीकडील मानवी वर्तनावर होणाऱ्या प्रभावाचा अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय संबंधात राजकीय संबंध हेच सर्वात महत्त्वाचे संबंध असल्यामुळे व त्या संबंधावरच इतर सर्व संबंध आधारित असल्यामुळे दोन्ही संज्ञामध्ये फरक राहिला नाही.

### १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ :

काही प्रमुख राजकीय विचारवंतांनी आपापल्या दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याख्या केली आहे त्या पुढीलप्रमाणे -

१) पामर आणि परकिन्स यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्रांच्या शासन पद्धतीचा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील अभ्यास होय.''

२) हॅन्स जे मॉर्गेथॉ यांच्या मते, ''राष्ट्राराष्ट्रातील सत्तेसाठी चाललेला संघर्ष आणि सत्तेचा वापर म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

३) केनेथ डब्ल्यू थॉम्पसन यांच्या मते, ''राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंध बिघडविण्यास किंवा सुधारण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती आणि संस्था यांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

४) चार्ल्स स्लायचर यांच्या मते, ''राष्ट्राराष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा जो अभ्यास असतो त्यास आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात.''

५) फेलीक्स ग्रॉस : ''आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास म्हणजे राष्ट्रांच्या विदेशनीतीचा अभ्यास होय.''

६) क्विन्सी राईट यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे आपल्या कुशल व्युहरचनेचा विचारपूर्वक उपयोग करून जगातील प्रमुख राष्ट्रावर किंवा राष्ट्रगटांवर प्रभाव निर्माण किंवा त्यांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे म्हणून कोणाच्याही विरोधाची भीती न बाळगता आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्याची कला होय''

७) फेडल फोर्ड आणि लिंकन यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राज्याच्या धोरणातील परिवर्तनशील सत्तासंबधांच्या पद्धतीमध्ये घडून येणाऱ्या क्रिया आणि प्रतिक्रिया होत.''

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतला असता असे आढळून येते की, आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक ज्ञानाची अशी स्वतंत्र आंतरशाखा आहे की जिच्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा क्रिया-प्रतिक्रियांचा आणि त्यासंबंधीच्या निर्णयाचा व कृतींचा अभ्यास करता येतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न : १**

१) 'आंतरराष्ट्रीय' हा शब्द प्रयोग प्रथम कोणी केला?

२) 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर पहिले पुस्तक कोणी लिहिले ?

३) पामर आणि परकिन्स यांनी केलेली आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याख्या सांगा?

४) अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी कोणत्या योजनेच्या आधारे राष्ट्रसंघ या संघटनेची स्थापना केली?

५) आंतरराष्ट्रीय राजकारणात कशासाठी सतत संघर्ष असतो?

६) आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा कोणी मानले आहे.

७) राष्ट्राराष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास होय असे कोणी म्हटले आहे?

८) वास्तववादी दृष्टीकोन कोणी मांडला?

## १.२.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप : (Nature of International Politics)

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप व्यापक बनले आहे. पूर्वीच्या काळी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे मुख्यत्वे करून कुटनीती आणि सैनिकी स्वरूपाचे होते. त्या काळी राज्ये स्वयंपूर्ण होती. राज्याराज्यातील आंतर ही एक समस्या होती. पारंपारिक राजकारण हे प्रामुख्याने नगर प्रशासनाशी संबंधित होते. राज्य आणि प्रशासन हे त्यांचे महत्त्वाचे क्षेत्र होते. राज्यात सार्वभौम सत्ता हा राज्याचा प्राण असल्यामुळे राज्यात सार्वभौम सत्तेचे अस्तित्व नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारण हा आंतरराष्ट्रीय संबंधाचा एक अविभाज्य घटक म्हणून अभ्यासला जात आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी पुढील मुद्यांचा उहापोह करणे अधिक उचित ठरेल.

**१) आंतरराष्ट्रीय राजकारण एक सामाजिक शास्त्र :**

कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून ओळखण्यासाठी निश्चित साधनसामग्री, शुद्ध संशोधन पद्धती आणि सर्वमान्य सिद्धांत या तीन गोष्टींची आवश्यकता आहे. भौतिक शास्त्राप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणात निरीक्षण, परिक्षण आणि प्रयोग करून निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष काढता येत नाही. कारण आंतरराष्ट्रीय राजकारण हे सामाजिक शास्त्र आहे. त्याचा संबंध मानवी वर्तनाशी आणि व्यवहाराशी येतो. त्याचप्रमाणे मानवी वर्तन हे अनिश्चित, चंचल, परिवर्तनशील सतत बदलत असते. त्यामुळे मानवी वर्तनाबद्दल अचूक सिद्धांत मांडणे कठीण असते. शास्त्र होण्यासाठी शास्त्रीय अभ्यास ही महत्त्वाची कसोटी आहे. शास्त्रातील निष्कर्ष हे तंतोतंत आणि बिनचूक असतात. शास्त्र म्हणजे एखाद्या विषयाची मांडणी करणे होय. आंतरराष्ट्रीय राजकारणात शास्त्रशुद्ध पद्धतीने अचूक निष्कर्ष काढले जात नसले तरी निष्कर्ष आणि परिक्षण करून वास्तववादी स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात.

आंतरराष्ट्रीय राजकारणास शास्त्र म्हणता येईल काय? याबद्दल विचारवंतामध्ये एक मत नाही के. डब्ल्यू थॉम्पसन, हॉफमन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणास शास्त्र म्हणता येणार नाही असे म्हटले आहे. क्विन्सी राईट यांनी भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय राजकारणाला शास्त्र म्हणून संबोधण्यात येईल. अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाला शास्त्रीय स्वरूप येऊ लागले असे ग्रेसन कर्क यांचे मत आहे.

**२) आंतरराष्ट्रीय राजकारण – एक स्वतंत्र अभ्यास विषय :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक ज्ञान शाखा किंवा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय म्हणून ओळखला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर या विषयाला अंतर्गत राजकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण असे दुहेरी स्वरूप प्राप्त झाले आहे. क्विन्सी राईट, कॉपर, सी.ए. डब्ल्यू, मेनिंग, मॉर्गेंथॉ या विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचा एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून उल्लेख केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना कार्यकारण संबंध स्पष्ट केले जातात. विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रे परस्परांशी कोणत्या पद्धतीने संबंध ठेवतात, कोणते व्यवहार करतात या संबंधीचा अभ्यास केला जातो. हॅन्स जे मॉर्गेंथॉ, स्नायडर, रिचर्ड सी, चार्ल्स मेकलेलॅन्ड, फ्रेड स्लायडरमन या विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला स्वतंत्र दर्जा आणि महत्त्व देण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. महेंद्रकुमार यांनी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयास पाहिजे तेवढ्या प्रमाणात स्वतंत्र विषयाचा दर्जा प्राप्त झालेला नसला तरी भविष्य काळात स्वतंत्र अभ्यास विषयाचा दर्जा प्राप्त करण्याचे प्रयत्न चालू असल्याचे म्हटले आहे.

**३) आंतरराष्ट्रीय राजकारण – एक कला आणि तत्त्वज्ञान आहे :**

क्विन्सी राईट यांच्या मते, प्रत्येक ज्ञान शाखा ही सुरुवातीस एक कौशल्य म्हणून प्रकट होते. नंतर त्याचे रूपांतर तत्त्वज्ञानात होऊन त्यांचे शास्त्र बनण्याचा प्रयत्न होत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या कुशलतेने तह केले जातात. किंवा राजनयाची आखणी केली जाते किंवा ज्या पद्धतीने राजकारणी वा मुत्सद्दी आपले म्हणणे मांडतात आणि ते पटवून देतात त्यावरून आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला आहे असे लक्षात येते. योग्य प्रशासन, राजनय, वाटाघाटी, प्रशिक्षण संशोधन इ. गोष्टींचा समावेश कला या संज्ञेत होतो.

क्विन्सी राईट यांच्या मते, राजकीय नेते आपल्या राजनय कौशल्याद्वारे विशिष्ट तत्त्वज्ञानाची मांडणी करून एक तत्त्वज्ञान निर्माण करतात. आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची निर्मिती आणि विकास एक तत्वज्ञान या भूमिकेतून झाला आहे. अनेक राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचे जाळे आणि राजकीय आंतरक्रिया निर्माण होत असतात. या सर्व राजकीय संबंधाचा अभ्यास तात्त्विक पद्धतीने करण्याचा प्रारंभ २०व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच झाला. आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला असल्याने तिने आपले अस्तित्व तत्वज्ञानाच्या आधारे जोपासले आहे. उदा. हिटलर आणि मुसेलिनी यांनी सत्ता काबीज करताना आपले स्वतंत्र असे नाझी आणि फॅसिस्ट तत्त्वज्ञान उभे केले.

**४) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आंतरशास्त्रीय स्वरूप :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचा अभ्यास आंतरशास्त्रीय झाला आहे. सध्या कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास स्वतंत्रपणे केला जाऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध अर्थशास्त्र, इतिहास समाजशास्त्र, भूगोल, आंतरराष्ट्रीय कायदा, तत्त्वज्ञान या सामाजिक शास्त्रांशी येतो. या सामाजिक

शास्त्रांची मदत घ्यावी लागते. आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या घटनांचे स्वरूप समजण्यासाठी त्यांचा विचार करावा लागतो.

**५) संघर्ष आणि समन्वयाचे शास्त्र :**

आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयात संघर्षाचा जसा अभ्यास केला जातो. तसाच सहकार्याचा ही अभ्यास होत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रात मैत्रीचे किंवा शत्रूत्वाचे असे संबंध असू शकतात. मैत्रीपूर्ण संबंधात परस्पर सहकार्य देवाण-घेवाण, सामंजस्य इ. गोष्टी अभिप्रेत असतात. तर शत्रूत्वाच्या संबंधात मतभेद, संघर्ष, युद्ध, आक्रमण, इत्यादी गोष्टी अभिप्रेत असतात. उदा. भारत-चीन संबंध सुरुवातीला मैत्रीचे होते. इ.स. १९६२ मध्ये चीनने आक्रमण केल्यानंतर संबंध बिघडले. २०१४ मध्ये भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राष्ट्रांना भेटी देऊन मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध वाढविण्यास सुरुवात केली आहे.

**आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरूप :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात वेगवेगळ्या कालखंडात परिवर्तन झालेले आढळते. प्राचीन काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे आजच्या इतके व्यापाक नव्हते. विज्ञान प्रगती, लोकसंख्येची वाढ, राज्याचे परस्परवालंबित्व, अण्वस्त्रांची निर्मिती, आणि आंतरराष्ट्रीय संघटनांच्या निर्मितीमुळे या विषयाच्या स्वरूपात बदल झालेला आहे. दोन दशकापूर्वी जगात विमाने, रणगाडे, पाणबुड्या, अण्वस्त्रे नव्हती. त्यावेळी असा विचार व्यक्त केला जात असे की, आता जगातील युद्धावस्था संपली आहे. या शांततेच्या काळात आध्यात्मिक चिंतनाला प्रारंभ व्हावा. परंतु ही शांततेची स्थिती फार काळ टिकली नाही. राष्ट्राराष्ट्रात शस्त्रस्पर्धा सुरू झाली, औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. कच्चा माल प्राप्त करणे आणि तयार माल विकण्यासाठी बाजारपेठ व वसाहती जिंकण्याची मोठ्या राष्ट्रात स्पर्धा सुरू झाली. त्यातूनच साम्राज्यवाद व वसाहतवादाची निर्मिती झाली.

टी.व्ही. कॉलीजार्व्ही यांनी असे म्हटले आहे की, सद्यकालीन आंतरराष्ट्रीय संबंधात पुनर्रचना होत आहे. राष्ट्र-राज्याच्या जुन्या कल्पना जावून नवीन राजकीय धोरण पुढे येत आहे. साम्राज्यवाद संपुष्टात येऊन वसाहतीला स्वातंत्र्य मिळत आहे. राष्ट्रराज्ये संघीय शासनाचे स्वरूप धारण करीत आहेत. राज्यांची अर्थव्यवस्था बदलत आहे. राज्ये स्वेच्छेने किंवा सक्तीने क्षेत्रीय संघटनात संमिलीत होत आहेत. त्यामुळे जागतिक संघर्ष अधिक व्यापक झाले आहेत. भुतकाळापेक्षा जास्त संहार करण्याची प्रवृत्ती आज आढळून येत आहे. तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ही बदलत आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात पुढील अनेक कारणामुळे बदल घडून येत आहेत.

**१) नवीन सार्वभौम राज्यांचा उदय :**

विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत जागतिक राजकारण म्हणजे युरोपियन सत्तेचे राजकारण समजले जात असे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात एका नव्या युगाची सुरुवात झाली. साम्राज्यवाद वसाहतवादाचा अंत झपाट्याने होऊ लागला. त्यामुळे जागतिक राजकारणाचे केंद्र म्हणून युरोपचे महत्त्व संपुष्टात येऊ लागले. त्यांचे

क्षेत्र अधिकाधिक विस्तृत होऊ लागले. इ.स. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या ५१ होती. ती आता १९२ झाली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात दोन-चार निवडक राज्यांच्या हालचालींचे केंद्र असे त्याचे स्वरूप न राहता बहुराज्यीय हितसंबंधांना प्राधान्य देणारे केंद्र असे झाले म्हणजेच नवीन राज्यांच्या उदयामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

**२) लोकतांत्रिक शासनाचा उदय :**

राजकीय प्रक्रियांचे लोकशाहीकरण झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचे द्विध्रुवीकरण झाले. परराष्ट्र धोरण ठरविताना लोकमताचा आदर होऊ लागला. पूर्वी परराष्ट्र धोरणात भाग घेणाऱ्या व्यक्तीची संख्या फारच थोडी होती. परंतु आज धोरण निश्चितीमध्ये जनतेचा सहभाग वाढल्यामुळे परराष्ट्र धोरणाचे लोकशाहीकरण झाले. म्हणूनच नवोदित राज्यांच्या उदयामुळे सर्वसाधारण जनतेला परराष्ट्र धोरणात आपले स्थान प्राप्त करण्याची संधी मिळाली. आजचे जागतिक राजकारण हे भूतकालीन जागतिक राजकारणापेक्षा निश्चित बदलले आहे. प्रत्येक राष्ट्राला जनमताचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. १९६३ साली भारताने 'व्हाईस ऑफ अमेरिकाचे' ट्रान्समिटर बसविण्याचे ठरविले होते. परंतु भारतीय जनतेच्या विरोधामुळे सरकारला हे धोरण बदलावे लागले. व्हिएतनाम, कोरिया, क्युबा, इराक, जर्मनी, अफगाणिस्तान या राष्ट्रांच्या संदर्भात अमेरिकेला लोकमताचा कौल विचारात घेऊनच आपले धोरण ठरवावे लागेल. यावरून आजच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप लोकतंत्रात्मक झाल्याचे दिसून येते.

**३) वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक प्रगती :**

अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात वाफेचे इंजिन यांनी जागतिक राजकारणावर बराच प्रभाव पडला होता. परंतु २० व्या शतकातील वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीमुळे युद्धतंत्रात आमुलाग्र परिवर्तन होऊन त्यांचा जागतिक राजकारणावर फार मोठा परिणाम झाला. अण्वस्त्रामुळे जागतिक राजकारणाचे स्वरूप पूर्ण बदलले आहे. यामध्ये पाणबुड्या, गतिमान जेट विमाने, आंतरखंडीय क्षेपणास्त्रे यांच्या निर्मितीमुळे ठराविक वेळी, ठराविक ठिकाणी या क्षेत्राचा उपयोग करता येतो. मानवाने चंद्र आणि मंगळ या ग्रहावर केलेले पदार्पण हे मानव जातीला अभिमान वाटेल अशीच प्रगती आहे पण या प्रगतीत विनाश करण्याचे सामर्थ्य ही आहेच. या विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले आहे.

**४) आंतरराष्ट्रीय संघटनांचा उदय :**

पहिल्या महायुद्धानंतर सुरू झालेली शांतता स्थापण्याची चळवळ व दुसऱ्या महायुद्धानंतर त्यास मिळालेली गती यामुळे शांतता प्रस्थापित करणे हे प्रत्येक राष्ट्राच्या विदेश नीतीचे प्रमुख उद्दिष्ट बनले. पूर्वी शांतता प्रस्थापित करणे हा राज्याचा उद्देश नव्हता. राष्ट्रीय हिताचे संरक्षण राज्ये युद्धाच्या मार्गाने करीत असत. म्हणून आजचे आंतरराष्ट्रीय राजकारण हे केवळ परस्पर विरोधी हितसंबंधाचा संघर्ष नव्हे तर राष्ट्रीय हित व शांततेसाठी चालू असलेला प्रयत्न आहे.

राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय न्यायालय, विश्व बँक, जागतिक व्यापारी संघटना (WTO) नाटो, सेंटो, वार्सा, युरोपियन कॉमन मार्केट, अमेरिकन कॉमन मार्केट इ. संघटनांनी आंतरराष्ट्रीय हित संबंध जोपासण्यासाठी

महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि मानवतावादी धोरण राबविण्याच्या दृष्टीने युनो आणि अन्य संघटना यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवी दिशा मिळाली.

**५) विचार प्रणाली परिवर्तन :**

इ.स. १९१७ मध्ये रशियात क्रांती होऊन साम्यवादी व्यवस्था स्थिर झाली. जर्मनीने नाझीझम, इटलीने फॅसिझम या सारख्या विचारप्रणालीला प्रोत्साहन दिले. हीच परिस्थिती दुसऱ्या महायुद्धाला कारणीभूत ठरली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका महासत्ता म्हणून जागतिक राजकारणात उदयास आली आणि विचारप्रणालीच्या नवीन संघर्षास सुरुवात झाली. लोकशाही विरुद्ध हुकूमशाही असा सत्ता संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे जगाची विभागणी दोन गटात होऊन जागतिक राजकारणात द्विध्रुवीकरण झाले.

**६) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नवीन शास्त्रीय व सैद्धांतिक पद्धतीनुसार अध्ययन :**

सुरुवातीच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टीकोनातून होत होता. आज वर्तनवादाच्या दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला जातो. वर्तनवाद्यांनी समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र यांच्या आधारे या अभ्यासाचे नवीन दृष्टीकोन शोधून काढले. उदा. व्यवस्थात्मक दृष्टीकोनाचा सिद्धांत, खेळ सिद्धांत, निर्णय-निर्माण सिद्धांत, संचार सिद्धांत, पर्यावरणात्मक सिद्धांत इत्यादी.

**७) साम्यवादाची पिछेहाट :**

दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या शीतयुद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला विशिष्ट स्वरूप दिले. मिखाईल गोर्वाचेव्ह यांनी रशियन अर्थव्यवस्था सावरावयाची असेल तर खुली अर्थव्यवस्था स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही हे ओळखून त्यांनी रशियाला आर्थिक संकटातून वाचवण्यासाठी पुनर्रचना व खुलेपणाचे धोरण जाहीर केले. गोर्वाचेव्ह यांच्या या नवीन धोरणाचे वारे साम्यवादी राष्ट्रात ही वाहू लागल्यानंतर त्यात आमुलाग्र बदल घडून आले. साम्यवादी सोव्हिएत संघराज्य ३१ डिसेंबर १९९१ रोजी संपुष्टात येवून संघराज्याचे विघटन झाले. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाचा परिणाम साम्यवादी राष्ट्रावर होऊन पूर्व युरोपीय साम्यवादी, एकाधिकारशाही संपुष्टात आले. पोलंड, रुमानिया, हंगेरी आदी साम्यवादी राष्ट्रांना लोकशाही पद्धतीचा पर्याय अधिक परिणामकारक वाटला. यातूनच नव्याने शांततेचे वारे वाहू लागले. या सर्व घटनांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडला.

**८) लष्करी सत्तेतील बदल :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या नवीन स्वरूपामुळे लष्करी सत्तेत बदल झाला. युद्ध म्हणजे केवळ लढणे नसून संपूर्ण विनाश घडविणे असे असल्यामुळे प्रत्यक्ष युद्ध करण्यापेक्षा फक्त विध्वंसक युद्ध साहित्याची निर्मिती करणे हे प्रतिष्ठेचे बनले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात लष्करी श्रेष्ठत्व प्राप्त करणे हे प्रमुख ध्येय मानले जाते. सोव्हिएत रशियाचे विघटन होऊनही रशियाकडे असलेल्या अण्वस्त्रधारी युद्ध साहित्यामुळे त्यांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात आहे. या विचारांशी संबंधीत दुसरी एक महत्त्वाची बाजू म्हणजे नवीन

शस्त्रास्त्राविरुद्ध संरक्षण करण्यात आलेली असमर्थता होय. आज युद्धातील विजय ही संकल्पनाच पूर्णपणे अर्थहीन ठरलेली आहे. कारण अणूयुद्ध म्हणजे परस्परांचा नाश होय. अणुयुगामुळेच राष्ट्रांचे परराष्ट्रीय धोरण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे.

**९) तेलाच्या राजनयाचा परिणाम :**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारणावर तेलाच्या राजनयाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. तेल उत्पादक अरब राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तेलाची गरज आणि महत्त्व ओळखून तेलाच्या किंमती वाढविल्या दरम्यान इंग्लंड, अमेरिका, रशिया या राष्ट्रांनी तेल उत्पादक राष्ट्रांवर नियंत्रण ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

१९६० साली तेल निर्यात करणाऱ्या राष्ट्रांमध्ये ओपेक (OPEC) ही संघटना स्थापन केली. तेलाच्या किंमती ठरविण्याचे कार्य ओपेक (OPEC) कडून होऊ लागले. १९७३ साली सुरू झालेल्या अरब-इस्त्राईल युद्धापासून आंतरराष्ट्रीय राजकारणात तेलाचा अस्त्र म्हणून खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. जगातील खनिज तेलाचा मोठा साठा असलेला देश म्हणून लिबीयाला ओळखले जाते. लिबीयाचे अध्यक्ष मोहम्मद गद्दाली तेल विहिरी आणि तेल धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून पाश्च्यात्य तेल कंपन्याकडून होणारी लूट थांबविली होती. त्यामुळे गद्दाली यांच्या विरोधात अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन, आदींनी सरळ-सरळ युद्ध पुकारले होते. अशा प्रकारे तेलाच्या राजनयाच्या अभ्यासाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात आजच्या काळात अनेक बदल झाले आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) जागतिक राजकारणात सत्तेचे द्विध्रुवीकरण कसे झाले?

२) दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप का बदलले?

३) जगाला युद्धापासून वाचविण्यासाठी आदर्शवाद्यांनी कोणता मार्ग सांगितला?

४) आंतरराष्ट्रीय राजकारणातून साम्यवादाची पिछेहाट कशी झाली?

५) आंतरराष्ट्रीय राजकारणातून १९४५ नंतर साम्राज्यवाद आणि वसाहतवादाचा अस्त कसा झाला?

### १.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती (International Politics) :

आंतरराष्ट्रीय राजकारण हा एक नवीन आणि स्वतंत्र अभ्यास विषय असून ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती निश्चित झालेली नाही. आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयामध्ये मुख्यतः राष्ट्र-राज्य व्यवस्था आणि या राष्ट्र राज्यांतर्गत राजकीय संबंधाचा अभ्यास होतो. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडणारे इतर घटक, गट आणि संघटना यांचा ही अभ्यास या विषयामध्ये होतो. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप गतिशील बदलणारे असल्यामुळे या विषयाच्या व्याप्ती बाबत सुस्पष्ट सर्वमान्य अशी संकल्पना नाही.

आंतरराष्ट्रीय राजकारणाला जेव्हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय म्हणून मान्यता प्राप्त झाली. तेव्हा क्वाऊस नोर, ग्रेसन किर्क, ई. एल. वुडवर्ड इ. विचारवंतांनी या विषयाचे स्वरूप आणि व्याप्ती याविषयी विचार व्यक्त केले.

ग्रेसन किर्क यांच्या मते अमेरिकेतील एका परराष्ट्र संबंधविषयक आयोगाने १९४७ साली आपल्या अहवालात या विषयांतर्गत पाच विषयांचा समावेश केला.

१) राज्य पद्धतीचे स्वरुप व कार्य.

२) राष्ट्र सत्तेवर प्रभाव टाकणारे घटक.

३) बड्या राष्ट्रांचे स्थान आणि परराष्ट्र धोरण.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाचा आधुनिक इतिहास.

५) स्थिर स्वरुपाच्या विश्वव्यवस्थेच्या निर्मिती संबंधाची प्रक्रिया.

६) ऐतिहासिक घटना तसेच वर्तमानकालीन घटनांचा अभ्यास.

याशिवाय चार्ल्स स्लायचर, पामर आणि परकिन्स, हॅन्स जे मॉर्गेंथॉ, रॉबर्ट स्ट्राऊस मेनिंग, जॉर्ज केतन, लासवेल, हॉलमन इ. विचारवंताच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती मोठी असून या विषयाला स्वतंत्र दर्जा व महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास :**

एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशी असलेल्या संबंधाचा अभ्यास प्रस्तुत विषयात प्रामुख्याने होत असतो. हे संबंध जसे-मैत्रीचे असतात तसे ते शत्रूत्वाचे ही असतात. मैत्रीच्या संबंधात सहकार्य, औद्योगिक क्षेत्रातील देवाण-घेवाण इ. मुद्यांचा अभ्यास करावा लागतो. मैत्रीचे संबंध असतील तर ते आणखी चांगले कसे होतील. हे पहावे लागते. याच्या उलट शत्रूत्वाचे संबंध असतील तर ते का आहेत. त्याचा पूर्व इतिहास काय? त्यातून निर्माण झालेले युद्धासारखे प्रश्न, आक्रमणे, शस्त्रीकरण इ. चा अभ्यास करावा लागतो. प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र सार्वभौम असले तरी ते राष्ट्र आपले राजकीय जीवन स्वतंत्रपणे जगू शकत नाही. हे ही सत्य आहे. याचा ही अभ्यास यात करावा लागतो.

**२) राष्ट्राराष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचे अध्ययन :**

राज्याची परराष्ट्र धोरणे हा आंतरराष्ट्रीय संबंध ठरविणारा महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या मुत्सद्यांच्या, राजकीय विचारवंतांच्या प्रेरणातून परराष्ट्र धोरण आकाराला येत असते. देशाचा इतिहास, परंपरा, संस्कृती, मुल्ये या घटकांचा ही प्रभाव परराष्ट्र धोरणाच्या जडणघडणीत होत असतो. उदा. भारताचे पंचशील तत्त्वे आणि अलिप्ततावादी धोरण, आधुनिक काळात वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन या संसूचन साधनांचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर होत असतो. एखाद्या देशाच्या परराष्ट्र धोरणाचा प्रभाव दुसऱ्या राष्ट्रांवर पडत असतो. याचा ही अभ्यास आंतरराष्ट्रीय

राजकारणात करावा लागतो.

**३) आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास :**

२० व्या शतकामध्ये जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र व सार्वभौम झाली. अशा राष्ट्रांनी आपल्या सीमा उल्लंघन करुन बाहेरील राज्यांशी जे संबंध प्रस्थापित केलेले असतात. त्यांचा ही या विषयात अभ्यास केला जातो. सार्वभौम राष्ट्रातील संबंध प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात.

अ) सत्तेवर आधारित असलेले संघर्षपूर्ण संबंध, उदा. भारत-पाकिस्तान, अमेरिका-इराण, अरब-इस्त्राईल राष्ट्रे.

ब) सहकार्यातून संबंध आणि आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी किंवा निशस्त्रीकरणाच्या हेतूने अमेरिका, रशिया या बड्या राष्ट्रांना इतर राष्ट्रांनी दिलेले सहकार्य.

**४) आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिक पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवर कार्यरत असलेल्या विविध संस्था आणि संघटनांचा देखील अभ्यास करावा लागतो. या संघटनामध्ये युनो, नाटो, सार्क, जी-७, जी-१५, ओपेक, जागतिक व्यापारी संघटना, राष्ट्रकुल अशा संघटनांचा अभ्यास यात केला जातो. या संघटनामध्ये राज्य किंवा राष्ट्र हा प्रमुख घटक असतो. दोन पेक्षा अधिक राष्ट्रातील संबंध कायम करण्याची जबाबदारी या संघटनेवर असते या संघटना जगाचे भवितव्य ठरविण्याचे काम करतात.

**५) विचारप्रणालींचा अभ्यास :**

विचारप्रणाली ही एक मुल्यव्यवस्था असते. राजकीय व्यवस्था, त्या व्यवस्थेचे प्रमुख ध्येय आणि उद्दिष्टे व ती प्रत्यक्षात कशा पद्धतीने आणता येतील या संबंधीची ही वैचारिक चौकट असते. नाझीझम, फॅसिझम यांनी जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले. साम्यवाद, भांडवलशाही, लोकशाही अशा विचारप्रणाली परस्पर विरोधी आहेत. साम्राज्यवाद वसाहतवाद यांची समाप्ती झालेली असली तरी त्यांची जागा नववसाहतवादाने घेतली आहे. याचा ही अभ्यास या विषयात केला जातो. राष्ट्रीय हितसंबंधाच्या अध्ययनाला आंतरराष्ट्रीय राजकारणात अतिशय महत्त्व आहे. जागतिक पातळीवरील राजकारण, राष्ट्रीय हित या संकल्पनेभोवती फिरत असते. हॅन्स जे. मॉर्गेंथॉ यांच्या मते, ''राष्ट्रीय हित हे जागतिक राजकारणाचे अंतिम आणि निर्णायक तत्त्व आहे.'' कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवूनच आखले जाते. जोसेफ फ्रँकेल म्हणतात, ''राष्ट्रीय हित ही परराष्ट्र धोरणातील मुलभूत धारणा होय.'' इ.चा अभ्यास यात केला जातो.

**६) आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्ष:**

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्तेसाठी चाललेला सत्तासंघर्ष होय. प्रत्येक राष्ट्राला आपल्या शक्तीचा वापर करणे अपरिहार्य असते. त्यामुळे सत्ता ही प्रतिष्ठेने, आग्रहाने, प्रथेने, परंपरेने, भीती दाखवून आणि

दहशतीने, आर्थिक दडपणाने किंवा प्रत्यक्ष बळाचा वापर करून मिळविली जाते. त्यातून एक प्रकारचा सत्तासंघर्ष निर्माण होतो. उदा. - अरब स्टेट संघर्ष, व्हिएतनाम संघर्ष, युक्रेन संघर्ष ह्या सर्व राष्ट्राराष्ट्रातील सत्तासंघर्षाचे परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणात अभ्यासले जातात.

**७) राजनयाचा अभ्यास :**

आपल्या राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्यात वृद्धी करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. त्याचबरोबर राष्ट्राला शांतता आणि युद्धापासून बचाव करणे, या तत्त्वाला देखील विशेष महत्त्व दिले जाते. कोणत्याही राष्ट्राला शांततेच्या मार्गाने विदेशनितीची उद्दिष्टये राजनयाद्वारे साध्य करून आंतरराष्ट्रीय संबंध अधिक विकसित करता येतात. युद्ध आणि परस्पर संघर्ष टाळण्यासाठी सुरुवातीपासूनच राजनयाचा वापर होत आला आहे. म्हणून याचा ही अभ्यास यात केला पाहिजे.

**८) नियंत्रक व्यवस्थेचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राजयाच्या अनिर्बंध व्यवहारावर नियंत्रण ठेवणाऱ्या काही व्यवस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. यापैकी प्रमुख म्हणजे सामुहिक सुरक्षा व्यवस्था होय. सामुहिक सुरक्षा व्यवस्थेमुळे केणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्रावर आक्रमण करणे शक्य होत नाही. याशिवाय महाशक्तीच्या प्रभावानेसुद्धा काही राज्यावर अप्रत्यक्ष नियंत्रणे प्रस्थापित होत असल्याने या महाशक्तीच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**९) आंतरराष्ट्रीय नियम/कायदे :**

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे अस्तित्वच मुळी केंद्रीय सत्तेचा अभाव असलेला आंतरराष्ट्रीय समाज असल्यामुळे राष्ट्राराष्ट्रांनी परस्पर संबंधाबाबतच्या काही नियमांना मान्यता दिली आहे. यांनाच आंतरराष्ट्रीय कायदे म्हणतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय इ. चा अभ्यास या विषयात अपेक्षित आहे.

**१०) राष्ट्रीय राजकारण :**

प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणाचा प्रभाव त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर होत असल्यामुळे प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणातील विभिन्न पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय संबंध हे राष्ट्रीय राजकारणावर अवलंबून असते. उदा. भारताचे पाकिस्तान बरोबर असलेले संबंध भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यावर तसेच राहणार की नाही याचा ही अभ्यास यात केला जातो.

**११) राष्ट्रीय सत्तेचे आवश्यक घटकः**

राष्ट्रीय सत्तेचे आवश्यक घटक साधारणपणे आर्थिक, साधनसामुग्री, तंत्रशास्त्राची कुशलता, बौद्धीक आणि शैक्षणिक संस्था, भौगोलिक स्थान, कुशल आणि आटोपशीर लोकसंख्या, योग्य संघटन असे राष्ट्रीय सत्तेचे प्रमुख घटक मानले जातात. परराष्ट्र विषयक राजकारणात सत्तेचा वापर नेहमीच दोन कारणासाठीच केला जातो. एक म्हणजे राष्ट्राचे हित व दुसरे म्हणजे राष्ट्राची सुरक्षितता पाहणे. सामर्थ्यशाली असलेले

शत्रू आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभावी ठरते या ही घटकांचा अभ्यास यात केला जातो.

**१२) वेगवेगळ्या सिद्धांताचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध सिद्धांताचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला जातो. या सिद्धांतामुळे राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंधांना विशेष आकार दिला जातो. या सिद्धांतावरच अनेक राष्ट्रांची विचारधारा नावारूपास येत असते. राष्ट्रवाद साम्राज्यवाद, वसाहतवाद नववसाहतवाद आणि आर्थिक साम्राज्यवाद अशा प्रकारच्या अनेक सिद्धांतातून आंतरराष्ट्रीय राजकारणाची ओळख होते.

**१३) राज्याचे नेतृत्वः**

आधुनिक काळात संचार माध्यमाच्या प्रगतीमुळे राजनयाचे महत्त्व कमी होऊन प्रत्यक्ष राजनयाला सुरूवात झाली आहे. राष्ट्राचे नेते हे एकत्र येऊन महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेतात. दुसरे म्हणजे राष्ट्राच्या संदर्भातही विधीमंडळ जनता ही निर्णय निर्धारणात भाग घेत असली तरी प्रत्यक्ष निर्णय राजकीय नेत्याकडूनच घेतले जातात. त्यामुळे अशा महत्त्वाच्या व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व, त्यांच्यावरील प्रभाव, विशिष्ट प्रश्नांसंबंधी त्यांचा दृष्टीकोन अशा सर्व गोष्टीची माहिती करून घेणे आवश्यक आहे. निर्णयवादी दृष्टीकोनाचा विकास याच दृष्टीकोनातून करण्यात आला आहे.

**१४) आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्षः**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जे राजकारणी किंवा मुत्सद्दी निर्णय घेतात त्यांचा परिणाम राजकारणावर होत असतो. त्यामुळे त्याला एक वेगळी दिशा मिळते. राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी पहिल्या महायुद्धात सहभागी होण्याचा घेतलेला निर्णय, रुझवेल्टने दुसऱ्या महायुद्धात सोव्हिएत रशियाला जर्मनीच्या विरोधात उशीरा मदत देण्याचा घेतलेला निर्णय, मिखाईल गोर्बाचेव्ह यांचा ग्लासनोस्त आणि पेरेस्तोईका यांचा निर्णय, अशा निर्णय प्रक्रियांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात निश्चितच महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. यात विधायक स्वरूपाच्या निर्णयाचा ही विचार होतो. उदा. पंडित नेहरू यांचे शांततामय सहजीवन धोरण इ. चा अभ्यास केला जातो.

**१५) आर्थिक संघटनांचा अभ्यास :**

काही आर्थिक संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतात. बड्या राष्ट्रांनी मागास व विकसनशिल राष्ट्रांना केलेली मदत व त्या मदतीचा परराष्ट्र धोरणात होणारा परिणाम यांचाही अभ्यास यात केला जातो. उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना, युरोपियन कॉमन मार्केट, अमेरिकन कॉमन मार्केट इ. आर्थिक संघटनांचा अभ्यास या विषयात केला जातो.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती विस्तृत आणि विश्वव्यापी आहे. जगाला एका छोट्याशा खेड्याचे स्वरूप आल्याने राष्ट्राराष्ट्रातील देवाण-घेवाण आणि परस्पर संबंधात मोठी वाढ होत असल्यामुळे या विषयाची व्याप्ती दिवसेंदिवस व्यापक होत चालली आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

**पुढील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) राष्ट्रीय सत्तेचे आवश्यक घटक सांगा ?

२) परराष्ट्र धोरण म्हणजे काय ?

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रात परस्पर संबंध कसे असतात?

४) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय हिताचे महत्त्व सांगा?

५) आंतरराष्ट्रीय कायदे म्हणजे काय?

### १.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे दृष्टीकोन/सिद्धांत :

आंतरराष्ट्रीय संबंध/राजकारण या विषयाचा विकास विसाव्या शतकातील आहे. आज एक अध्ययनाची स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहिले जाते. अनेक महत्त्वाचे विषय आंतरराष्ट्रीय राजकारणात हाताळले जातात. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनात अभ्यास विषयासंबंधी सर्वात आगोदर एक चौकट तयार केली जाते. त्या चौकटीच्या आधारे अभ्यासक उपयुक्त अशा माहितीचे संकलन आणि विश्लेषण करून निष्कर्ष मांडतात. या पद्धतीचा आधार घेऊन विविध दृष्टीकोन मांडण्याचा प्रयत्न केला जातो. या शास्त्रीय पद्धतीच्या आधारे अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्थापनेबाबत अनेक दृष्टीकोन नावारूपास आणले आहेत.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनात विविध दृष्टीकोनांचा समावेश केला जात असल्यामुळे त्यांचे महत्त्व नाकारता येत नाही. सत्तावादी दृष्टीकोन, वर्तनवादी दृष्टीकोन आणि आदर्शवादी दृष्टीकोन आदिसारख्या दृष्टीकोनाने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनाला एक प्रकारची चालना प्राप्त करून दिली आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय संबंधाकडे अध्ययन केवळ वर्णनात्मक किंवा तत्वज्ञानात्मक न राहता शास्त्रीय स्वरूपाचे झालेले दिसते.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनासाठी अनेक विचारवंतांनी नवीन सिद्धांत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. यात मार्टिन व्हाईट, जेम्स रोझनौ, हॅन्स मॉर्गेथॉ, स्टेनली हॅकमन, ट्रिस्के, निन्से, डेव्हिड टूमन, किर्क पैट्रीक, मार्टिन कॉम्लान, अशा अनेक विचारवंतांनी नवीन आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन या विषयात आणले आहेत. या विचारवंतांनी यात शास्त्रशुध्द दृष्टीकोन निर्माण करुन आंतरराष्ट्रीय अध्ययनाला विकासाची जोड प्राप्त करुन दिली.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनासाठी जे विविध दृष्टीकोन आहेत त्यांचे दोन प्रकार पडतात.

**अ) पारंपारिक दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनात पारंपारिक दृष्टीकोनाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण राहिली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात जे विविध प्रयोग केले जातात त्यांना ऐतिहासिक परंपरांचा आधार असतो. या ऐतिहासिक

परंपराकडे वळून पाहिल्याशिवाय वर्तमानकाळातील निर्णय घेता येत नाहीत. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी भविष्यकालीन अंदाजांनाही ऐतिहासिक आणि पारंपारिक पार्श्वभूमीचा आधार घ्यावा लागतो. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या या पारंपारिक अध्ययनामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक दृष्टीकोन, तात्विक, आदर्शवादी, वैज्ञानिक इ. दृष्टीकोनाचा समावेश होतो.

**ब) आधुनिक दृष्टीकोन :**

आधुनिक दृष्टीकोनांची आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनास एक प्रकारची वास्तविकता प्राप्त करून दिली आहे. आधुनिक दृष्टीकोनाद्वारे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयास शास्त्रीय रूप प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे. आधुनिक प्रकारच्या दृष्टीकोनात सत्तावादी, वर्तनवादी, व्यवस्थावादी आणि सत्तासमतोल दृष्टीकोन इ. चा समावेश होतो. या दृष्टीकोनांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनास शास्त्रीय रूप प्राप्त करून दिले आहे.

**१.२.४.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा आदर्शवादी दृष्टीकोन :**

आदर्शवादी दृष्टीकोनाला अतिप्राचीन इतिहास आहे. निसर्गवाद, व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावाद यांची प्रतिक्रिया या नात्याने हा दृष्टीकोन मांडला गेला आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, रूसो, कान्ट, हेगेल, ग्रीन, बोझांके, ब्रॅडले या विचारवंतांनी राज्याकडे आदर्शवादी दृष्टीकोनातून पाहिले. १८व्या शतकात या दृष्टीकोनास मान्यता प्राप्त झालेली होती. नीतीशास्त्रातून आदर्शवादी तत्त्वज्ञानी प्रेरणा घेतली. पहिल्या महायुद्धानंतर या दृष्टीकोनाला मोठे बळ प्राप्त झाले. या आदर्शवादी दृष्टीकोनाला सामोरे ठेवूनच १० जानेवारी १९२०ला राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी आदर्शवादावर विशेष भर देऊन १४ कलमी योजनेने आदर्शवादी विचारांना मूर्त रूप प्राप्त करून दिले.

आदर्शवादाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस यान स्मट्स, लॉर्ड रॉबर्ट सेसिल, लिओ बुर्ज्वा आदि मुत्सद्यांनी पुढाकार घेऊन मित्र राष्ट्रांची एक संस्था असावी. या कल्पनेचा पुरस्कार केला. वुड्रो विल्सन यांनी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात १९१८ मध्ये १४ कलमी शांतता कार्यक्रम सादर केला. आदर्शवादी सिद्धांताच्या पुरस्कर्त्यामध्ये वुड्रो विल्सन, बट्रॉंड रसेल, रिचर्ड कॉबेन, विल्यम लँड, ॲडलस हक्सल, जॉन केनेडी इ. विचारवंतांचा समावेश होतो.

पहिल्या महायुद्धाने संपूर्ण जगात एक प्रकारचा जीवघेणा संहार निर्माण केला. अशी आपत्ती पुन्हा घडून येऊ नये म्हणून जगभरात शांततेसाठी प्रयत्न सुरू झाले. विड्रो विल्सन यांनी असे म्हटले की, 'जगातील लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी आणि जगातून युद्ध हद्दपार करण्यासाठी आम्ही हे युद्ध लढत आहोत.' अमेरिकन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यवहारात आदर्शवादी दृष्टीकोनाचा केलेला स्वीकार होय. संपूर्ण जागतिक राजकारणाची उभारणी मुलभूत अशा नैतिक मुल्यावर झाली पाहिजे. असे आदर्शवाद मानतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध देशांचे स्वार्थ वेगवेगळे असले तरी विशिष्ट नैतिक मुल्यांचा स्विकार करून राष्ट्राराष्ट्रात शांतता, बंधुभाव या आधारावर नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था अस्तित्वात आणणे सोईचे होईल. असे

मानणारा आदर्शवादी दृष्टीकोन आहे. आदर्शवादी दृष्टीकोनात हिंसेचा आणि दहशतीचा आधार घेऊन शांतता निर्माण करण्याऐवजी माणसाच्या आत्म प्रेरणेला हाक देऊन आणि नैतिकतेला प्राधान्य देऊन शांतता प्रस्थापित करणे हे आदर्शवादाचे ध्येय आहे.

**आदर्शवादी दृष्टीकोनाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे :**

**१) नैतिकता (Morality) :**

यंत्र युगाच्या प्रगतीमुळे संपूर्ण जगाला एका खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. एका राष्ट्राची समस्या आज संपूर्ण जगाची समस्या झाली आहे. त्यामुळे जगातील संपूर्ण मानव जातीचे रक्षण करणे ही सर्वांचीच नैतिक जबाबदारी आहे. मानव जातीने याच पद्धतीने परराष्ट्र संबंध आणि व्यवहार नैतिकतेचा आधार घेऊन केले तर संपूर्ण जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण होऊ शकते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रत्येक राष्ट्राने नैतिक मुल्यांचा आधार घेऊन आपली वाटचाल केली तर जगभर मित्रत्वाचे संबंध निर्माण होतील. जागतिक पातळीवरील सर्व प्रश्न सामंजस्याने सोडविले तर जगाचे कल्याण होऊ शकते.

**२) उदारमतवाद :**

आदर्शवादी दृष्टीकोनाचा मुळ आधार उदारमतवादी विचारधारा आहे. राजकीय दृष्ट्या विचार करता इंग्लंडच्या लोकशाहीचा मुख्य आधार उदारमतवाद आहे. ही उदारमतवादी विचारधारा पाश्चात्य राष्ट्रांमध्ये विकास पावली. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख हा सिद्धांत मांडणाऱ्या बेंथॅम व जे एस. मिल या सारख्या उपयुक्ततावाद्यांनी उदारमतवादाचे समर्थन केले. राजसत्ता व्यक्तीसाठी आहे. व्यक्ती राजसत्तेसाठी नाही या तत्त्वाचा त्यांनी स्वीकार केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर समुहातील एका व्यक्तीच्या सुखाची एकूण बेरीज म्हणजे समुहाचे जास्तीत जास्त सुख असे सांगून बेंथॅमने व्यक्तीच्या सुखालाच प्राधान्य दिले.

**३) हिंसा आणि युद्धापासून अलिप्त :**

आदर्शवादी दृष्टीकोना हिंसेला आणि युद्धाला स्थान नाही. हिंसेमुळे आणि युद्धामुळे जगाचे प्रश्न सुटत नाहीत ते उलट वाढतात. हा आदर्शवादाचा विश्वास आहे. आतापर्यंतचा इतिहास पाहता युद्धामुळे प्रचंड विनाश घडून आला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धामुळे संपूर्ण जग प्रभावित झाले. युद्धाच्या झळा कमी अधिक प्रमाणात सर्वच राष्ट्रांना भोगाव्या लागल्या. म्हणून हिंसा आणि युद्ध थांबविण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे असे आदर्शवादी मानतात. शांततेचा मार्ग जगातील सर्वच राष्ट्रांनी अवलंबिला तर आंतरराष्ट्रीय हिंसा आणि युद्ध टाळता येतील असा विचार आदर्शवादी विचारवंत मांडतात.

**४) मानवी आदर्श :**

आदर्शवादी दृष्टीकोन व्यक्तीच्या आदर्शावर विशेष भर देतो. मनुष्य हा निसर्गतः चांगला आहे. त्याच्या अंगी चांगले गुण आहेत. आजपर्यंत मानवाचा आदर्शवत कार्यामुळेच मानवी संस्कृती टिकून आहे. मानवाने समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी आजपर्यंत निःस्वार्थपणे कार्य केले आहे. त्यांचे हे योगदान विसरण्यासारखे

नाही. याच पद्धतीचा विचार मानवाविषयी रूसो, जॉन लॉक या विचारवंतांनी मांडले आहेत. आदर्शवादी विचारवंत व्यक्तीच्या परस्पर सहकार्याच्या वागण्यावर विशेष भर देतात.

**आदर्शवादी सिद्धांताचे मुल्यमापन :**

**आदर्शवादी दृष्टीकोनाचे/सिद्धांताचे दोष पुढीलप्रमाणे :**

**१) आदर्शवादी दृष्टीकोन कालबाह्य ठरला :**

पहिल्या महायुद्धानंतर आदर्शवादी दृष्टीकोन उदयास आला. युद्धाने आणि हिंसेने जगाचे कल्याण होणार नाही. यासाठी आदर्शवाद हा मोठा पर्याय ठरू शकतो. हा विचार झपाट्याने वृद्धींगत झाला. अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी १४ कलमी आदर्शाची योजना आखून शांतता परस्पर सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. याचे फलित म्हणजे शांतता आणि सुरक्षितता अस्तित्वात आणण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पण वीस वर्षातच राष्ट्रसंघ संपुष्टात आला. आदर्शवादी तत्त्वांच्या आधारावर उदयास आलेला हा दृष्टीकोन दुसरे महायुद्ध सुरू झाल्याबरोबर इतिहासजमा झाला.

**२) प्रश्नांचे निराकरण होत नाही :**

ज्या-ज्या राष्ट्रांनी शांततेचा आणि आदर्शवादाचा पुरस्कार केला त्या राष्ट्रांना नेहमीच अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहे. एक काळ असा होता की, इंग्लंडवर आक्रमण करण्याची सहजासहजी कोणी हिंमत करत नव्हते. भारताने शांततेचा आणि आदर्शवादाचा पुरस्कार करून देखील अनेक परकीय आक्रमणांना तोंड द्यावे लागले आहे म्हणूनच असे म्हटले जाते की, शांततेने आणि आदर्शवादाने जगाचे प्रश्न सुटत नाहीत आज अमेरिकेसारख्या देशाकडे जगाचे नेतृत्व आले आहे ते केवळ आदर्शवादी विचाराने नव्हे तर अमेरिकेचे सामर्थ्य आणि दहशत त्याला कारणीभूत आहे. साम,दाम,दंड,भेद आणि नीती या तत्त्वांचा आधार घेऊन अमेरिका जगाचे प्रश्न आपल्या सोईनुसार सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे ही आदर्शवादी दृष्टीकोनाची पिछेहाट आहे.

**३) स्वप्नाळू जगाची निर्मिती :**

शांततेच्या मार्गाने आंतरराष्ट्रीय समुहासमोर चांगले आदर्श ठेवून राष्ट्रा-राष्ट्रात सलोखा निर्माण करणे आजपर्यंत शक्य झाले नाही. भारताने चीनसमोर पंचशील तत्त्वे ठेवून भारत-चीन भाई-भाई असा नारा दिला. पण काही काळातच चीनने भारतावर आक्रमण करून हा आदर्श मोडीत काढला. या विचाराने स्वप्नाळू जगाची निर्मिती केली हे आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्ध झाले आहे.

**४) नैतिक मुल्यांचा ऱ्हास :**

आदर्शवादाचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांनी नैतिकता संपूर्ण जगासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. ज्या राष्ट्रांनी नैतिकतेचा आधार घेतला ती राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणात अपयशी ठरली आणि ज्या राष्ट्रांनी नैतिकतेचा त्याग केला ती राष्ट्रे आज जगावर राज्य करीत आहेत. ज्या राष्ट्रांनी नैतिकतेची झालर पांघरली त्यांना

नेहमीच अपयशाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे आदर्शवादी दृष्टीकोनातील नैतिकतेची शिकवण जगाला रुचली नाही.

**आदर्शवादी दृष्टीकोनाचे गुण पुढीलप्रमाणे :**

**१) आदर्शवादी दृष्टीकोनाचे महत्त्व नाकारता येत नाही.**

आधुनिक युगात आदर्शवादी दृष्टीकोनात काही दोष निर्माण झाले असले तरी त्यांचे महत्त्व नाकारता येण्यासारखे नाही. मानवाला सुख आणि शांती ही आदर्शवादी विचारानेच प्राप्त होते. हे सत्य नाकारता येण़ार नाही. आज प्रत्येक आंतरराष्ट्रीय व्यवहार आदर्शवादी मूल्यांच्या नावाने चालतो. म्हणजेच आदर्शवादी दृष्टीकोनाचे अस्तित्व संपले असे म्हणने धाडसाचे होणार आहे. आजही आंतरराष्ट्रीय स्तरावर आदर्शवादाचे महत्त्व टिकून आहे.

**२) नैतिक मुल्यांवरच आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकून आहे :**

आधुनिक युगात मानवाने नवनवीन शोध लावले आहेत. त्यामुळे जग खूप लहान झाले आहे. एका राष्ट्राची समस्या संपूर्ण जगाची समस्या झाली आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्ग नियम पायदळी तुडविले आहेत. ही बाब मानवास परिचित आहे. यासाठी मानवाला नैतिक मुल्ये विसरून चालणार नाही. नैतिक मुल्यांच्या आधारावरच आज आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकून आहे. आदर्शाचे पालन झालेच नसते तर जगाचा केव्हाच विनाश झाला असता तर तिसरे महायुद्ध घडून आले असते.

**३) शांतता आणि सुरक्षितता :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आदर्शवादी दृष्टीकोनाच्या माध्यमातून शांतता आणि सुरक्षितता निर्माण करता येत नाही. काही राष्ट्रांच्या स्वार्थी नितीमुळे आंतरराष्ट्रीय शांततेला, सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. ज्या-ज्या वेळेस विनाश घडून आला त्या-त्या वेळेस आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततेसाठी सामुहिक प्रयत्न झाले आहेत. त्या सामुहिक प्रयत्नांना वेळोवेळी यश देखील प्राप्त झाले आहे. हे आदर्शवादाचे यश आहे.

**४) आशावादावर जग सुरक्षित :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात आदर्शवादी दृष्टीकोनावर स्वप्नाळू आशावाद म्हणून नेहमीच टीका होत असते. जसा माणूस आशेवर जीवन जगत असतो. तेच तत्त्व जगाला देखील लागू पडते. संपूर्ण जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण होईल हा आशावाद आदर्शवादी दृष्टीकोनामुळे विकसित होतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरक्षिततेची भावना वृद्धींगत होते.

**५) आदर्शवादाची आवश्यकता :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आज खरी आदर्शवादाची आवश्यकता निर्माण झाली आहे. मानवाच्या भौतिक प्रगतीने विनाशाची बीजे निसर्गात पेरली गेली आहेत हे सत्य नाकारता येत नाही. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर

सामुहिक समस्यांनी थैमान घातले आहे. नैसर्गिक आपत्ती केव्हा उद्‌भवेल याची शाश्वती नाही. मानवाने अशी काही शस्त्रास्त्रे निर्माण केली आहेत की ती संपूर्ण जगाचा विनाश घडवून आणू शकतात. ही भीती देखील मानव जातीस सतावत आहे. त्यामुळे जगाच्या संरक्षणासाठी आदर्शवादापेक्षा दुसरा कोणता मार्ग नाही हा विचार दिवसेंदिवस बळावत आहे.

वरीलप्रमाणे आदर्शवादी दृष्टीकोनाचे मुल्यमापन होत असले तरी हा दृष्टीकोन जागतिक शांततेचा पुरस्कर्ता असल्यामुळे जगाला युद्धापासून वाचविण्यासाठी आदर्शवाद्यांनी पुढील उपाय सूचविले आहेत.

१) आजपर्यंतचा संघर्ष हा नेहमीच लोकशाही विरुद्ध हुकूमशाही असा राहिला असल्यामुळे लोकशाहीला विरोधी अशी व्यवस्था समाप्त करावी.

२) नैतिकतेला महत्त्व देणाऱ्या राष्ट्रांनी परंपरागत सत्तेला महत्त्व न देता नैतिक सिद्धांताचे पालन करावे आणि परंपरागत सत्ता ही राजकारणापासून अलिप्त ठेवावी.

३) आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करून तिच्या माध्यमातून सत्तेच्या नीतीच्या धोरणाचा अंत करावा.

अशा प्रकारे प्रत्येक राष्ट्रांनी परस्परांच्या हिताची काळजी घेऊन सामंजस्याचा दृष्टीकोन स्विकारल्यास युद्धाची शक्यताच जगात राहणार नाही.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) आदर्शवादी दृष्टीकोन अतिप्राचीन आहे.

२) अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या पुढाकाराने राष्ट्रसंघ ही संघटना स्थापन झाली.

३) आदर्शवादी दृष्टीकोन हा पारंपारिक दृष्टीकोन आहे.

४) राष्ट्रसंघ ही संघटना जगातील दुसरी आहे.

५) आदर्शवाद हा स्वप्नाळू दृष्टीकोन नाही.

### १.२.४.२ वास्तववादी दृष्टीकोन (Realist Theory) :

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तववादी दृष्टीकोनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. वास्तववादी दृष्टीकोनाला ससत्तावादी दृष्टीकोन असेही म्हणतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात या दृष्टीकोनावर १८व्या आणि १९व्या शतकात चर्चा झालेली असली तरी हा दृष्टीकोन अतिशय प्राचीन आहे. प्राचीन चिनी विचारवंत 'सुन झुंच्या' आर्ट ऑफ वॉर (Art of War) या ग्रंथात, कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आणि थुसिडाईडसच्या (History of the penoponnesian war) या ग्रंथात ही वास्तवादी दृष्टीकोनावर भाष्य करण्यात आले आहे. मॅकियाव्हेलीचे लिखान ही या दृष्टीकोनावर भरपूर आहे, ते म्हणतात,– ''मनुष्य शस्त्र, धन आणि भाकरी ही युद्धाची शक्ती आहे. परंतु या चारमध्ये सुरुवातीचे दोन सूत्रे अधिक महत्त्वपूर्ण आहेत. कारण मनुष्य आणि

शस्त्र, धन आणि भाकरी प्राप्त करू शकतात, परंतु भाकरी आणि धन, मनुष्य आणि शस्त्र प्राप्त करू शकत नाहीत.''

आधुनिक काळात वास्तववादी दृष्टीकोनाची सुत्रबद्ध मांडणी हॅन्स मॉर्गेथॉ यांनी केली आहे. या दृष्टीकोनात जॉर्ज केतन, राइस नॉल्ड, श्वेत्झनबर्जर, डॉ. हेन्री किसिंजर त्याचबरोबर निश्के, ट्रिश्के, ट्रिश्के, हेरॉल्ड लासवेल, क्वीन्सी राईट, ई. एच.कार, क्लॉवूड आणि शुमन इ. विचारवंतांनी या दृष्टीकोनास वास्तविकता प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे.

**वास्तववादी दृष्टीकोनाची तत्त्वे :**

१) आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय हिताची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नाची पराकाष्टा करते. तेथे नैतिकतेला आणि आदर्शाला कोणतेच स्थान दिले जात नाही. मार्ग कोणता का असेना उद्दिष्ट मात्र एकच असते ते म्हणजे राष्ट्रीय हित साधने हे होय.

२) बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्राची निती बदलून राष्ट्रीय हिताचा अधिक विचार करणे. राष्ट्राचे हित हेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्वपूर्ण ध्येय मानले जाते. सत्तेचा वापर करताना कोणत्याही नीती नियमांचा विचार केला जात नाही. सत्य हेच अंतिम सत्य असते.

३) सत्तेचा वापर करताना आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिस्थितीचा अभ्यास करून एखाद्या राजकीय घटनेची परिणामकारकता तपासली जाते. राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी सत्तेचा वापर नीतिमत्तेपेक्षा महत्त्वाचा मानला जातो. वास्तववादी दृष्टीकोनात सत्ता हीच श्रेष्ठ मानली जाते.

४) एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर सत्ता स्थापन करणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात नैतिक मुल्य आणि आदर्श आपला प्रभाव निर्माण करीत नाही. तर सत्ता आपला प्रभाव निर्माण करते. हा आजपर्यंतचा इतिहास आहे. म्हणूनच वास्तववादी दृष्टीकोनास प्रभाव निर्माण करणारा दृष्टीकोन म्हणतात.

५) वास्तववादी सिद्धांताचा पुरस्कार करणारे विचारवंत आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यवहारात सत्ता हेच मुख्य ध्येय व उद्दिष्ट मानतात. सत्तेशिवाय दुसरी कोणतीच यंत्रणा नाही असा त्याचा विचार आहे.

६) आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्तेसाठी चाललेला एक खेळ आहे. इतरांवर सत्ता गाजविणे ही मानवाची प्रवृत्ती आहे आणि त्या आधारावर आंतरराष्ट्रीय संबंधाची रचना कायम आहे.

७) आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्ष अटळ असतात. हे संघर्ष सत्तेचा आधार घेवून जी राष्ट्रे सोडविण्याचा प्रयत्न करतात ती राष्ट्रे सत्तेच्या माध्यमातून आपले वर्चस्व स्थापित करतात.

**हॅन्स मार्गेंथ्रॉचा वास्तववादी दृष्टीकोन :**

अमेरिकन विचारवंत हॅन्स मॉर्गेंथ्रॉने वास्तववादी सिद्धांताचा पाया रचला. १९३० नंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर सत्तेला आतोनात महत्त्व प्राप्त झाले. मॉर्गेंथ्रॉ यांनी 'पॉलिटिक्स अमंग नेशन्स' (Politics Among Nations)

या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून मांडणी केली. हॅन्स मॉर्गेंथ्रॉच्या वास्तववादी दृष्टीकोनाची सहा मुलतत्त्वे पुढीलप्रमाणे :

**१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वास्तविक नियमाद्वारे नियंत्रण :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तविक नियमांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणताही निर्णय घेत असताना वास्तविकतेला धरून घ्यावा लागतो. मॉर्गेंथ्रॉच्या मते, 'समाजामध्ये सामाजिक नियंत्रणासाठी जसे अनेक नियम असतात त्याचप्रमाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नियंत्रण करण्यासाठी काही नियम, तत्त्वे वेगवेगळी असतात. या तत्त्वांचा आधार घेऊन आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वास्तविक नियमाद्वारे निर्णय घ्यावे लागतात.'

**२) राष्ट्रीय हिताच्या प्राप्तीसाठी शक्तीचा उपयोग :**

मॉर्गेंथ्रॉ यांनी राष्ट्रीय हितासाठी शक्ती किंवा सत्ता हा शब्द वापरला आहे. मॉर्गेंथॉच्या मते शक्ती किंवा सत्ता म्हणजे एका व्यक्तीचे अन्य व्यक्तीच्या मन आणि कृतीवर नियंत्रण प्रस्थापित करणे होय. या सिद्धांतानुसार राजकीय नेत्यांना नैतिक आणि अनैतिक या गोष्टींचा विचार न करता राष्ट्रांच्या हितानुसार विचार आणि कार्य करावे लागते. परिणामतः कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे त्या राष्ट्राचे हित, आवश्यकता यानुसारच निश्चित केले जाते.

**३) राष्ट्रीय हितात परिस्थितीनुसार परिवर्तन होते : :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय हित हे कायम नसून त्यात परिस्थितीनुसार परिवर्तन घडत असते. मॉर्गेंथ्रॉ यांच्या मते परिस्थिती राजकीय राष्ट्रीय हित निर्धारक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावीत असते. तसेच त्या हिताच्या अनुषंगानेच राजकीय व्यवहार निश्चित होत असतात. याच करणामुळे बदलती परिस्थिती लक्षात घेऊन राजकीय नेतृत्वाला राष्ट्रीय शक्तीचा विचार करून परराष्ट्रीय धोरण निश्चित करावे लागते.

**४) नैतिकतेला गौण स्थान :**

नैतिकता, नीती, नियम या बाबींना वास्तववादाचा विरोध नसला तरी ही आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राचे हित, आवश्यकता, परिस्थिती लक्षात घेऊनच नीतिनियमांचा उपयोग करावा लागतो. गरज भासलीच तर अनैतिक मार्गाच्या विचाराचा अवलंब करून राष्ट्रहिताचे संरक्षण करावे यावर वास्तववादाचा भर आहे. वास्तववादानुसार राजकारणात विवेक आणि दूरदर्शीपणा या गोष्टींना सर्वात अधिक महत्त्व आहे.

**५) राष्ट्रीय नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यात समन्वय अभाव :**

मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादाचा पुरस्कार करताना राष्ट्रीय नैतिकता, नीतिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यांच्यात कोणत्याच प्रकारचा संबंध किंवा समन्वय मान्य केलेला नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्राचे

स्वतंत्र राजकीय व्यक्तीमत्त्व असून स्वतःच्या हिताची पूर्ती करणे हेच त्याचे प्रमुख कार्य असल्यामुळे नैतिकतेचे नियम यांच्यावर बंधनकारक नसतात.

**६) राजकीय क्षेत्रात स्वाययत्ता :**

वास्तववादाचा भर राजकीय क्षेत्रात स्वाययत्ता प्रस्थापित करण्यावर असल्यामुळे त्याने राजकीय विचारांना राष्ट्रीय हित, राष्ट्रीय सत्ता आणि संघर्ष यांना अग्रक्रम देवून वैज्ञानिक किंवा नैतिक दृष्टीकोन पूर्णतः नाकारला आहे. सत्तेचा विचार करताना राजकीय विचारांचा संदर्भ कधीकधी येत असला तरी त्याचे स्थान हे दुय्यम प्रकारचे ठेवले आहे.

मॉर्गेथॉने वरीलप्रमाणे वास्तववादी दृष्टीकोनाची सहा प्रमुख तत्त्वे सांगितली आहेत त्या तत्त्वांचे विश्लेषण केल्यास तो पुढील गोष्टींवर भर देत असल्याचे स्पष्ट होते.

**मॉर्गेथॉचे वास्तववादी दृष्टीकोनाबद्दलचे विचार :**

मॉर्गेथॉचा वास्तवादी दृष्टीकोन तीन गृहीत तत्त्वावर आधारलेला आहे.

१) राजकीय व्यक्तींची आपल्या राष्ट्राचे हित साध्य करण्याची इच्छा.

२) कोणत्याही राष्ट्राचे हित हे त्या राष्ट्राच्या सीमेसंबंधी तसेच आर्थिक राजकीय आणि सांस्कृतिक प्रभाव वाढविण्याशी संबंधित असते.

३) राष्ट्रीय हिताच्या रक्षणासाठी राज्य शक्तीचा वापर करीत असतात.

मॉर्गेथॉ म्हणतात, 'जग हे परस्परविरोधी हितसंबंधाच्या संघर्षाचे जग होय.' मॉर्गेथॉच्या मते राजकीय नियम हे मनुष्य स्वभावाचा परिणाम असून संपूर्ण विश्व हे मानवी स्वभावाची प्रतिकृती आहे. ते म्हणतात, हे जग चांगले वाईट, आरोग्य अनारोग्य, जीवन मृत्यू तसेच युद्ध आणि शांतता यामधील सतत संघर्षाचे नाव होय. स्वार्थ आणि सत्तेची लालसा मनुष्य स्वभावात नेहमीच महत्त्वाची ठरत असल्यामुळे वाईट आणि संघर्ष यांचा मनुष्य स्वभावाचे गुण म्हणून स्वीकार करावा लागतो. मॉर्गेथॉ म्हणतात कोणत्याही प्रकारचे राजकारण असो त्यात सत्तेसाठी सतत संघर्ष चालू असतो. प्रत्येक राजकीय क्रिया ही १) सत्ता प्राप्त करणे तसेच ती कायम ठेवणे २) सत्तेत वाढ करणे ३) सत्तेचे प्रदर्शन करणे, यावरच आधारित असते.

प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हिताला महत्त्व देऊ लागले तर संघर्ष अनिवार्य बनतो मग अशा स्थितीत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने मॉर्गेथॉनी पुढील तीन मार्ग सुचविले आहेत,

१) सत्ता नियंत्रित करणे - निःशस्त्रीकरण शांतता करार इ. ने

२) सत्ता हस्तांतरीत करणे - विश्वराज्याची निर्मिती

३) करार करून -राजनय पद्धतीचा स्वीकार.

मॉर्गेथ्रॉ यांनी राजनयाद्वारे शांतता प्रस्थापित करता येईल असे म्हटले आहे. त्यांच्या मते राजनय प्रत्यक्ष

आणि अप्रत्यक्ष असे दोन प्रकारचे कार्य करतो प्रत्यक्ष कार्याद्वारे राजनय संघर्षाचे स्वरूप मर्यादित करतो आणि अप्रत्यक्ष कार्याद्वारे विश्वसमाजाच्या विकासास सहाय्य करीत असतो. अशा प्रकारे मॉर्गेंथॉनी राष्ट्रीय हित आणि सत्ता प्राप्तीच्या विभिन्न सिद्धांताचा आंतरराष्ट्रीय राजकारणात वापर करून त्यांना सैद्धांतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

**वास्तववादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तवादी दृष्टीकोनास अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मॉर्गेंथॉ यांनी वास्तवादी दृष्टीकोनाची शास्त्रशुद्ध मांडणी करून या सिद्धांतास मोठा नावलौकिक मिळवून दिला आहे. हा दृष्टीकोन वास्तविकतेला धरून असला तरी ही यात काही दोष आढळून येतात. ते पुढीलप्रमाणे :

**१) सत्ता हेच अंतिम सत्य नाही :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेला अतिशय महत्त्व आहे. पण दुसऱ्या बाजूने विचार केल्यास सत्ता हीच मानवी जीवनाचे अंतिम सत्य होवू शकत नाही. मनुष्य हा पूर्णपणे राजकीय प्राणी होऊ शकत नाही. राजकीय इच्छेसाठीच मनुष्य धावपळ करू लागला तर त्याच्या इच्छा पूर्ण होऊ शकत नाहीत. मानवाकडे राजकीय अंगाऐवजी इतरही अंगे महत्त्वाचे असतात. त्यांना बाजूला सारून मानवी संस्कृतीस पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे सत्ता हेच अंतिम सत्य नाही.

**२) सत्तेपेक्षा इतरही घटक महत्त्वाचे :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर जसे सत्तेला महत्त्व आहे तसे इतर घटकांनाही महत्त्व आहे. सत्ती हीच सर्वश्रेष्ठ असू शकत नाही. सत्तेबरोबर लोकमत, जनतेची अधिमान्यता, राजकीय नेत्यांची मुत्सद्देगिरी, आदर्शवाद यांचाही आंतरराष्ट्रीय संबंधावर परिणाम होत असतो म्हणजे केवळ सत्तेभोवतीच आंतरराष्ट्रीय राजकारण फिरत असते. असे म्हणणे संयुक्तिक असू शकत नाही.

**३) राष्ट्रीय हिताची कल्पना अनाकलनीय :**

वास्तववादी विचारवंतांनी राष्ट्रीय हितास मोठे प्राधान्य दिले आहे परंतु या विचारवंतामध्ये राष्ट्रीय हितासंदर्भात एकमत दिसून येत नाही. त्यामुळे राष्ट्रीय हिताची कल्पना अनाकलनीय आणि अस्पष्ट स्वरूपाची वाटते.

**४) युद्धास पोषक वातावरण :**

वास्तववादी विचारवंतांनी सत्तेस अवास्तव महत्त्व दिल्यामुळे राष्ट्राराष्ट्रात सत्तेसाठी मोठे संघर्ष आणि स्पर्धा निर्माण झाली. या जगात सत्तेपेक्षा दुसरी कोणतीच बाब श्रेष्ठ नाही अशी एकांगी विचारधारा पुढे आल्याने युद्धास पोषक वातावरण निर्माण झाले.

**५) विचारधारेकडे दुर्लक्ष :**

जगातील प्रत्येक राष्ट्राची एक वेगळी विचारधारा आहे. त्यावर कोणतीही कोणी ही बंधने घालू शकत नाहीत. प्रत्येक देशाची विचारधारा दुसऱ्या राष्ट्राबरोबर जुळेल हे म्हणणे संयुक्तीक होणार नाही याकडे वास्तववाद्यांनी दुर्लक्ष केले.

**६) मानवी स्वभावाचा एकांगी विचार :**

मॉर्गेंथॉच्या मते 'प्रत्येक माणूस सत्ताभिलाषी आहे. म्हणूनच तो आक्रमक व सत्तापिपासू आहे हे गृहितधरून त्यांनी वास्तववादी दृष्टीकोनाची मांडणी केली पण या जगात काही लोक निःस्वार्थी तर काही लोक स्वार्थी आहेत. त्यामुळे सर्वांना स्वार्थी अथवा निःस्वार्थी म्हणणे बरोबर नाही. म्हणजेच हा विचार मानवी स्वभावासाठी एकांगी स्वरूपाचा आहे.'

वरीलप्रमाणे वास्तववादी दृष्टीकोनामध्ये काही दोष, त्रूटी आढळत असल्या तरी या दृष्टीकोनाचे काही गुण ही विचारात घेण्यासारखे आहेत.

**वास्तववादी दृष्टीकोनाचे गुण :**

आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयातील हा एक शास्त्रीय व महत्त्वपूर्ण दृष्टीकोन आहे. या दृष्टीकोनाचे गुण पुढीलप्रमाणे :

**१) शास्त्रीय दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संकल्पनेला केंद्रबिंदू मानून वास्तववादी दृष्टीकोनाची शास्त्रीय मांडणी करून मॉर्गेंथॉ, ओदेगार्द, व्ही.ओ.की, जॉर्ज कॅटलीन यांनी वास्तववादी दृष्टीकोनाचा अवलंब करून राजकीय जीवनाचे विश्लेषण केले आहे. मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादी दृष्टीकोनाला शास्त्रीय स्वरूपाची जोड देऊन वास्तववादाचा शास्त्रशुद्ध पाया रचला.

**२) सत्तेचे महत्त्व :**

आंतरराष्ट्रीय संबंधात सत्तेला अत्यंत महत्त्व आहे. या सत्तेचे महत्त्व त्रिकालाबाधित स्वरूपाचे आहे. आज सत्तेच्या जोरावरच अमेरिकेने आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःचे वर्चस्व निर्माण केले आहे.

**३) व्यावहारिक दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर वास्तववादी दृष्टीकोनावर टिका होत असली तरी हा सिद्धांत अनेक पातळ्यांवर वास्तविक व व्यावहारिक ठरला आहे. व्यवस्थावादी सिद्धांताच्या निर्मितीमुळे या सिद्धांताची काही बाबतीत पिछेहाट झाली आहे हे मान्य करावे लागते पण आंतरराष्ट्रीय समस्यांचे आकलन व निराकरण केवळ नैतिकतेला आणि आदर्शवादाला ग्राह्य मानून होत नाही. राजकारणात आदर्शवादी विचारवंतांना स्वप्नाळू जगाच्या बाहेर काढण्याचे काम वास्तववादी दृष्टीकोनाने केले आहे म्हणूनच या दृष्टीकोनात व्यावहारिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

वरीलप्रमाणे वास्तववादी सिद्धांतात काही दोष आणि गुण असले तरी आज सत्तेसाठी संघर्ष चालूच

आहे. आंतरराष्ट्रीय संघर्ष नष्ट झालेला नाही. म्हणून आज ही मॉर्गेंथॉ यांच्या वास्तववादी सिद्धांताचे महत्त्व आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५ :**

**पुढील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी कोणत्या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोन मांडला ?

२) थुसिडाईड्स यांनी कोणत्या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनावर भाष्य केले ?

३) वास्तववादी दृष्टीकोनाचा प्रमुख उद्‌गाता म्हणून कोणास ओळखले जाते ?

४) वास्तववादी दृष्टीकोनाचे गुण सांगा .

५) वास्तववादी दृष्टीकोन नैतिकतेचे महत्त्व नाकारतो.

## १.३ सारांश : (Summary)

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप – या घटकात आपण अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती यांचा अभ्यास करून पामर आणि परकिन्स, हॅन्स जे मॉर्गेंथॉ, केनेथ डब्ल्यू थॉम्पसन चार्ल्स इलायचर लेलिस्क ग्रॉस, क्विन्सी राईट, पेडल फोर्ड आणि लिंकन यांच्या व्याख्या विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिद्धांत यामध्ये आदर्शवादी आणि वास्तववादी सिद्धांताचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप :**

१) आंतरराष्ट्रीय राजकारण – एक सामाजिक शास्त्र

२) आंतरराष्ट्रीय राजकारण – एक स्वतंत्र अभ्यास विषय

३) आंतरराष्ट्रीय राजकारण – एक  कला आणि तत्त्वज्ञान आहे.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आंतरराष्ट्रीय स्वरूप.

५) संघर्ष आणि समन्वयाचे शास्त्र.

**१)  आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरूप :**

१) नवीन सार्वभौम राज्यांचा उदय

२) लोकतांत्रिक शासनाचा उदय

३) वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक प्रगती

४) आंतरराष्ट्रीय संघटनांचा उदय

५) विचारप्रणाली परिवर्तन

६) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नवीन शास्त्रीय व सैद्धांतिक पद्धतीनुसार अध्ययन.

७) साम्यवादीची पिछेहाट

८) लष्करी सत्तेतील बदल

९) तेलाच्या राजनयाचा परिणाम

**२) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती :**

१) राष्ट्रांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास

२) राष्ट्राराष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचे अध्ययन

३) आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास

४) आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास

५) विचारप्रणालींचा अभ्यास

६) आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्ष

७) राजनयाचा अभ्यास

८) नियंत्रक व्यवस्थेचा अभ्यास

९) आंतरराष्ट्रीय नियम/कायदा

१०) राष्ट्रीय राजकारण

११) राष्ट्रीय सत्तेचे आवश्यक घटक

१२) वेगवेगळ्या सिद्धांताचा अभ्यास

१३) राज्याचे नेतृत्व

१४) मानवी वर्तनाचा अभ्यास

१५) आर्थिक संघटनांचा अभ्यास.

**३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिद्धांत/दृष्टीकोन.**

**१) आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा आदर्शवादी दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आदर्शवादी दृष्टीकोन अतिप्राचीन आहे. आदर्शवादाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी यान स्मट्स लॉर्ड रॉबर्ट सेसिल लिआँ बुइर्चा यांनी पुरस्कार केला. आदर्शवादी सिद्धांताचे पुरस्कर्त्यामध्ये वुड्रो विल्सन, बर्ट्रांड रसेल, रिचर्ड कॉबेन, विल्यम लँड, ॲडलस हक्सल, जॉन केनेडी इ. चा समावेश होता. विशिष्ट नैतिक मुल्यांचा स्विकार करून राष्ट्राराष्ट्रात शांतता, बंधुभाव या आधारावर नवी आंतरराष्ट्रीय

व्यवस्था अस्तित्वात आणणे सोईचे होईल असे मानणारा हा दृष्टीकोन आहे.

**आदर्शवादी दृष्टीकोन :**

१) नैतिकता

२) उदारमतवाद

३) हिंसा आणि युद्धापासून अलिप्त

४) मानवी आदर्श.

**आदर्शवादी सिद्धांतातील दोष :**

१) आदर्शवादी दृष्टीकोन कालबाह्य ठरला.

२) प्रश्नांचे निराकरण होत नाही.

३) स्वप्नाळू जगाची निर्मिती

४) नैतिक मुल्यांचा ऱ्हास.

**आदर्शवादी सिद्धांत/ दृष्टीकोनाचे गुण :**

१) आदर्शवादी दृष्टीकोनाचे महत्त्व नाकारता येत नाही.

२) नैतिक मुल्यांवरच आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकून आहे.

३) शांतता आणि सुरक्षितता

४) आशावादावर जग सुरक्षित

५) आदर्शवादाची आवश्यकता.

**२) वास्तववादी दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात १९३० नंतर वास्तववादी दृष्टीकोनाचा स्वीकार करण्यात आला. प्राचीन चिनी विचारवंत 'सुन झूंच्या' 'आर्ट ऑफ वॉर' या ग्रंथात आणि युसिडाइडसच्या History of the penoponnesian war) या ग्रंथात वास्तववादी सिद्धांतावर भाष्य करण्यात आले आहे. आधुनिक काळात हॅन्स मॉर्गेंथॉ यांनी या वास्तववादी सिद्धांताची सुत्रबद्ध मांडणी केली तसेच जॉर्ज केतन, राइस नॉल्ड, श्वेत्झनबर्जर, डॉ. हेन्री किसिंजर, निश्ले, ट्रिश्के, हेरॉल्ड लासवेल, क्विन्सी राईट, ई. एच, कार, क्लॉवुड, शुमन इ. नी या सिद्धांतास वास्तविकता प्राप्त करून देण्याचे कार्य केले.

**वास्तववादी दृष्टीकोनाची तत्त्वे :**

**मॉर्गेंथ्रॉच्या वास्तववादी दृष्टीकोनाची सहा मुलतत्त्वे :**

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वास्तविक नियमाद्वारे नियंत्रण.

२) राष्ट्रीय हिताच्या प्राप्तीसाठी शक्तीचा उपयोग.

३) राष्ट्रीय हितात परिस्थितीनुसार परिवर्तन होते.

४) नैतिकतेला गौण स्थान.

५) राष्ट्रीय नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यात समन्वयाचा अभाव.

६) राजकीय क्षेत्रात स्वाययत्ता.

**मॉर्गेंथ्रॉच्या वास्तववादी दृष्टीकोनाबद्दल विचार :**

**वास्तववादी दृष्टीकोनाचे मुल्यमापन :**

**दोष :**

१) सत्ता हेच अंतिम सत्य.

२) सत्तेपेक्षा इतर ही घटक महत्त्वाचे.

३) राष्ट्रीय हिताची कल्पना अनाकलनीय.

४) युद्धास पोषक वातावरण

५) विचारधारेकडे दुर्लक्ष

६) मानवी स्वभावाचा एकांगी विचार.

**गुण :**

१) शास्त्रीय दृष्टीकोन

२) सत्तेचे महत्त्व

३) व्यावहारिक दृष्टीकोन

वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप, व्याप्ती आणि अभ्यासासाठी असलेले आदर्शवादी दृष्टीकोन आणि वास्तववादी दृष्टीकोन याविषयीची सविस्तर मांडणी प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेली आहे. परंतु सारांश रूपाने आपणास असे म्हणता येईल की आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय गतीमान असल्यामुळे त्याचे स्वरूप ही गतीशील आहे असेच म्हणता येईल.

**१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ** (Terms to Remember) :

आंतरराष्ट्रीय राजकारण – राष्ट्रांच्या शासन पद्धतीचा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील अभ्यास.

आंतरराष्ट्रीय संबंध –राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंध

कुटनिती – व्युहरचना

करार – तह, संधी

सत्ता – अन्य व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पाडण्याची क्षमता.

परराष्ट्र धोरण – एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्विकारलेले धोरण

राष्ट्रीय हित – एखाद्या राष्ट्राद्वारे सैद्धांतिक दृष्ट्या निश्चित केलेले ध्येय.

सार्वभौम– राज्याची सर्वश्रेष्ठ सत्ता, प्रभूसत्ता

राजनय – वाटाघाटी म्हणून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे.

सत्तेचे द्विध्रुवीकरण – दोन राष्ट्रात सत्ता वाटप

बदल – परिवर्तन

**१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ –उत्तरे**

१) आंतरराष्ट्रीय हा शब्दप्रयोग प्रथम जेरेमी बेंथम यांनी केला.

२) आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर पहिले पुस्तक पॉल एस. रिश यांनी लिहिले.

३) पामर आणि परकिन्स यांच्या मते 'आंतरराष्ट्रीय राजकारण' म्हणजे राष्ट्राच्या शासनपद्धतीचा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील अभ्यास होय.

४) अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी चौदा कलमी योजनेच्या आधारे राष्ट्रसंघ या संघटनेची स्थापना केली.

५) आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेसाठी सतत संघर्ष असतो.

६) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा मानले आहे.

७) फेलिक्स ग्रॉस यांच्या मते, 'राष्ट्राराष्ट्राच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास होय.'

८) सुन झुं यांनी 'आर्ट ऑफ वॉर' हा ग्रंथ लिहिला आहे.

९) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादी दृष्टीकोन मांडला.

१०) हॅन्स जे मॉर्गेथॉ यांनी (Politics Among Nations) या ग्रंथात आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी वास्तववादी सिद्धांत मांडला.

**स्वयं अध्ययन प्रश्न - २ -उत्तरे**

१) दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली लोकशाही राष्ट्रे आणि सोव्हिएत रशियाच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्रे अशी जगाची विभागणी होऊन त्यांच्यात सत्तेचे द्विध्रुवीकरण झाले. दोन गटात सत्ता विभागली.

२) नवीन सार्वभौम राज्यांचा उदय, लोकतांत्रिक शासनाचा उदय, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञनात्मक प्रगती, आंतरराष्ट्रीय संघटनांचा उदय विचारप्रणाली परिवर्तन, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नवीन शास्त्रीय सैद्धांतिक पद्धतीनुसार अध्ययन यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले.

३) जगाला युद्धापासून वाचविण्यासाठी आदर्शवाद्यांनी पुढील मार्ग सांगितला.

१) आजपर्यंतचा संघर्ष हा नेहमीच लोकशाही विरुद्ध हुकूमशाही असा राहिला असल्यामुळे लोकशाहीला विरोधी अशी व्यवस्था समाप्त करावी. २) नैतिकतेला महत्त्व देणाऱ्या राष्ट्रांनी परंपरागत सत्तेला महत्त्व न देता नैतिक सिद्धांताचे पालन करावे आणि परंपरागत सत्ताही राजकारणापासून अलिप्त ठेवावी. ३) आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करून तिच्या माध्यमातून सत्तेच्या नीतीच्या धोरणाचा अंत करावा. ४) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या शीत युद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले. मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी रशियाची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी आणि रशियाला आर्थिक संकटातून वाचविण्यासाठी 'ग्लासनोस्त' आणि 'पेरेस्त्रोईका' हे धोरण जाहिर केले. त्या धोरणाचा विपरीत परिणाम होऊन रशियाचे विघटन झाले. विघटनाचाच परिणाम साम्यवादी राष्ट्रावर होऊन साम्यवादाची पीछेहाट झाली. ५) दुसऱ्या महायुद्धानंतर जगात एका नव्या युगाची पहाट झाली. आशिया, आफ्रिका, आणि लॅटिन अमेरिका या खंडातील पारतंत्रात असणाऱ्या राष्ट्रामध्ये स्वातंत्र्यासाठी चळवळी सुरू झाल्या. आणि त्या चळवळीतून अनेक नवोदित सार्वभौम स्वतंत्र राज्ये उदयास आली. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर जगात साम्राज्यवादाचा आणि वसाहतवादाचा अस्त होऊ लागला.

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३ उत्तरे**

१) आर्थिक साधनसामुग्री, तंत्रशास्त्राची कुशलता, बौद्धिक आणि शैक्षणिक संस्था, भौगोलिक स्थान, कुशल आणि आटोपशीर लोकसंख्या, योग्य संघटन इ. राष्ट्रीय सत्तेचे महत्त्वाचे घटक आहेत.

२) एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण किंवा केलेला व्यवहार होय.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांचे संबंध परस्परात दोन प्रकारचे असतात. ते म्हणजे मित्रत्वाचे आणि शत्रूत्वाचे संबंध. मित्रत्वाच्या संबंधात परस्पर सहकार्य व मदतीची भावना असते. तर शत्रूत्वाच्या संबंधामध्ये राष्ट्रांचे संबंध हे संघर्षाचे किंवा युद्ध सदृश्य असतात.

४) आधुनिक काळात जगातील प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देते. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्याही राष्ट्राकडून राष्ट्रीय हित साध्य करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच परराष्ट्र धोरणाची जडण-घडण होत असते.

५) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे अस्तित्वच मुळी केंद्रीय सत्तेचा अभाव असलेला आंतरराष्ट्रीय समाज असल्यामुळे राष्ट्राराष्ट्रांनी परस्पर संबंधाबाबतच्या काही नियमांना मान्यता दिलेली असते. त्यांनाच आंतरराष्ट्रीय कायदे म्हणतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न - ४ -उत्तरे**

१) बरोबर

२) बरोबर

३) बरोबर

४) चूक

५) चूक

**स्वयं अध्ययन प्रश्न - ५ -उत्तरे**

१) हॅन्स जे मॉर्गेंथ्रॉ यांनी (Politics Among Nations) या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोन मांडला आहे.

२) थुसिडाईड्स यांनी (History of the penoponnesian War) या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनावर भाष्य केले आहे.

३) हॅन्स मॉर्गेंथ्रॉ यांना वास्तववादी दृष्टीकोनाचा उद्गाता म्हणून ओळखले जाते.

४) शास्त्रीय दृष्टीकोन, सत्तेचे महत्त्व, व्यावहारिक दृष्टीकोन हे वास्तववादी दृष्टीकोनाचे गुण सांगता येतात.

५) वास्तववादी दृष्टीकोन राजकारणात बुद्धी आणि विवेक याला प्राधान्य देतो. या सिद्धांतात नैतिकतेला गौण स्थान असते. परिस्थितीनुसार नीतिनियमांचा उपयोग केला जातो.

**१.६ सरावासाठी स्वाध्याय**

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आदर्शवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

### १.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ ( Reference for further study)

१) डॉ. रायपूरकर, वसंत (२००१) आंतरराष्ट्रीय संबंध, नागपूर : मंगेश प्रकाशन.

२) डॉ. नलावडे पंडित (२०१४) आंतरराष्ट्रीय संबंध, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन्स.

३) डॉ. भोगले, शांताराम. (२००१) आंतरराष्ट्रीय संबंध, नागपूर : विद्या प्रकाशन

४) डोळे, ना.य. (१९९८) आंतरराष्ट्रीय संबंध, औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स.

५) डॉ. जोशी, सुधाकर गं. (१९९२) आंतरराष्ट्रीय संबंध, परभणी : गोमटेश प्रकाशन.

६) डॉ. दाते, सुनील (१९९८) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स.

७) डॉ. रासम, वासंती आणि डॉ. खापरे, करिअप्पा (२००७) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

८) प्रा. कुलकर्णी, सुधाकर (२००५) आंतरराष्ट्रीय संबंध, लातूर : विद्याभारती प्रकाशन.

९) प्रा. वराडकर, रघुनंदन घ. (१९९१) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, नागपूर : विद्या प्रकाशन.

१०) डॉ. बाचल, वि. मा. आणि डॉ. टोनप, ललिता. (१९९६) आंतरराष्ट्रीय राजकारण, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

११) प्रा. कुलकर्णी, बी. वाय. आणि प्रा. नाईकवाडे, अशोक. (२००४) आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांत आणि व्यवहार, पुणे : श्री विद्या प्रकाशन.

१२) ( Jayapalan, N. (1999) International Relations, New Delhi : Atlantic Publishers)

१३) मॉर्गेंथ्रॉ हॅन्स जे - पॉलिटिक्स अमंग द नेशन्स.

●●●

# सत्र ५ : घटक २

# राष्ट्रसत्ता

२.० उद्दिष्टये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या

२.२.२ राष्ट्रसत्तेचे घटक

२.२.२.१ अ) स्थायी घटक

१) भौगोलिक घटक

२) लोकसंख्या

३) नैसर्गिक साधनसंपत्ती

४) तंत्रज्ञान

ब) अस्थायी घटक

१) विचारधारा

२) नेतृत्त्व

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**२.० उद्दिष्ट्ये :**

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१) राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना समजून घेता येईल.

२) राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करता येईल.

३) राष्ट्रसत्तेच्या प्रमुख घटकांची भूगोल, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, तंत्रज्ञान, विचारप्रणाली व राजकीय नेतृत्व माहिती घेता येईल.

**२.१ प्रास्ताविक :**

राष्ट्रीय सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील मध्यवर्ती संकल्पना मानली जाते. 'सत्ता' हा राजकारणाचा पाया आहे. सत्ता ही राष्ट्रीय संरक्षण आणि हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन आहे. आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये कोणत्याही राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावर, सत्तेवर अवलंबून असतो. परिणामी प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता, सामर्थ्य वाढविण्याच्या प्रयत्नात असते त्यातूनच राष्ट्राराष्ट्रामध्ये स्पर्धा निर्माण होते. कारण त्यावरच राष्ट्राचे अस्तित्व, त्याचे सार्वभौमत्व व त्याच्या हितसंबंधाची जपणूक अवलंबून असते. अशा या राष्ट्रीय सत्तेची जोपासना ही त्या देशाचे भौगोलिक स्थान, समाजरचना, नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक क्षमता, तंत्रज्ञान, राजकीय व्यवस्था, राष्ट्रीय मनोधैर्य, लष्करी सामर्थ्य, नेतृत्व या घटकांवर अवलंबून असते. म्हणूनच राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना विचारात घेताना त्याचा अर्थ आणि विविध घटक समजून घेण्याची आवश्यकता आहे.

**२.२ विषय विवेचन :**

सत्तेची संकल्पना ही जरी युरोपमध्ये १६व्या शतकात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेच्या उदयाबरोबर विकसित झाली असली तरी त्याच्या कितीतरी भारत व चीन सारख्या देशामध्ये विचारवंशतांनी आपल्या विचारात व साहित्यात केंद्रस्थान दिले होते. त्यांनी सत्ता ही राजकारणाचा केंद्रबिंदू आहे असे म्हटले आहे. प्रत्येक देशाच्या सत्ता सामर्थ्यावर परराष्ट्र धोरण ठरत असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये राष्ट्रीय सत्तेचा अर्थ आणि त्याचे घटक याचा विचार करावयाचा आहे. सुरवातीला आपण राष्ट्रसत्तेचा अर्थ विचारात घेणार आहोत.

**२.२.१ राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या :**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय सत्तेचा, सामर्थ्याचा प्रामुख्याने विचार केला जातो.

राष्ट्रसत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख संकल्पना आहे. मॉर्गेन्था यांच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रात चाललेला सत्ता-संघर्ष होय. त्यांच्या मते जग हे परस्परविरोधी हितसंबंधांच्या संघर्षाचे जग आहे. जगात चांगले-वाईट, आरोग्य व रोगराई, शांतता व युद्ध यांच्यामध्ये कधीही न संपणारा संघर्ष सदैव चालू असतो. सत्तालालसा ही मनुष्य मात्रात महत्त्वाची असते. ही लालसा राजकारणाचा

केंद्रबिंदू असते सत्ता हे राष्ट्रहित साध्य करण्याचे साधन होय. राष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ राष्ट्रीय सत्तेवर अवलंबून असतो. राष्ट्रीय सत्तेचा विचार १६व्या शतकात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेच्या उदयाबरोबर विकसित झालेला असला तरी त्याच्या कितीतरी आधी भारत चीनसारख्या देशात काही विचारवंतांनी सत्तेचा विचार केलेला मनुस्मृतीत परराष्ट्रसंबंध आणि युद्धविषयक विचारात सत्ता सामर्थ्यालाच महत्त्व दिले आहे. महाभारतातील शांतीपर्वात सत्तेला महत्त्व दिले आहे. कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात सत्तेच्या बाबतीत महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. चीनी विचारवंत सन त्स्यू (Sun Tzu)याने आपल्या 'आर्ट ऑफ वॉर' या ग्रंथात सत्तेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत.

मध्ययुगात मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्स, हेगेल यांनी राष्ट्रीय सत्तेचा विचार केला होता. २०व्या शतकात मॉर्गेन्थॉ, लॉसवेल, डाईक इ. विचारवंतांनी सत्तेचा विचार केला होता. सत्तेचे स्वरूप सतत बदलत असते त्यामुळे जागतिक राजकारण हे परिवर्तनशील आढळते. १९व्या शतकात इंग्लंड हे महासत्ता होते. तर आज अमेरिका हे राष्ट्र प्रमुख महासत्ता बनले आहे. दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेले जपान हे छोटे राष्ट्र आज जागतिक आर्थिक महासत्ता बनत आहे. भारत-चीन सारखी राष्ट्रे महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण समजून घेण्यासाठी सत्तेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.''

**राष्ट्रीय सत्तेची व्याख्या :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता (National Power)हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. सत्तेवर राष्ट्र टिकते व सामर्थ्यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. सत्ता राष्ट्राचा सर्व व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला जातो. म्हणूनच राष्ट्राचे परराष्ट्र धोरण सत्तेच्या संकल्पनेभोवती फिरत असते.

काही विचारवंतांनी राष्ट्रीय सत्तेची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

**१) हॅन्स जे. मार्गेन्थॉ यांच्या मते ,**

''सत्ता म्हणजे एका माणसाचे दुसऱ्या माणसाच्या मन व कृतींवर नियंत्रण होय.''

**२) जॉर्ज श्वेत्झनबर्जरच्या मतानुसार,**

''आपली इच्छा इतरांवर थोपवण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला तर तो विरोध मोडून इच्छा लादण्याची परिणामकारक शक्ती म्हणजे सत्ता होय.''

**३) लॉसवेल आणि अब्राहम यांच्या मते,**

''निर्णय प्रक्रियेतील सहभाग म्हणजे राष्ट्रसत्ता होय.''

**४) ऑर्गेस्कीच्या मते,**

''आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी दुसऱ्या राष्ट्राच्या व्यवहाराला प्रभावित करण्याची क्षमता म्हणजे

राष्ट्रीय शक्ती होय.''

**५) फेडलफोर्ड आणि लिंकन यांच्या मते,**

''आर्थिक, मानसिक, नैतिक, लष्करी आणि राजकीय घटकापासून बनलेले आणि राष्ट्रहिताच्या संवर्धनासाठी यशस्वीपणे वापरले जाणारे राष्ट्राचे सामर्थ्य म्हणजे राष्ट्रशक्ती होय.''

वरील व्याख्यांचा आशय लक्षात घेता आधुनिक राज्यव्यवस्थेत सत्ता ही संकल्पना महत्त्वाची आहे. एका राष्ट्राने किंवा व्यक्तीने दुसऱ्या राष्ट्रावर अथवा व्यक्तीवर नियंत्रण ठेवणे व आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्यास प्रवृत्त करणे किंवा दुसऱ्या राष्ट्रास मनाप्रमाणे व्यवहार करण्यापासून रोखण्याची एका राष्ट्रची योग्यता म्हणजे 'राष्ट्रीय सत्ता' होय.

**२.२.२ राष्ट्रसत्तेचे घटक :**

राष्ट्रीय सत्तेचा, सामर्थ्याचा आंतराष्ट्रीय राजकारणावर परिणाम होत असतो. प्रत्येक राष्ट्राजवळ कमी-अधिक प्रमाणात सत्ता असते. राष्ट्राची सत्ता ज्या घटकामुळे निश्चित होते त्याला राष्ट्रसत्तेचे घटक असे म्हणतात. यातील काही घटक मूर्त स्वरूपात दिसतात तर काही अमूर्त असतात. तसेच काही स्थायी तर काही अस्थायी असतात अशा सर्वच घटकांची मिळून राष्ट्रसत्ता निर्धारित होते असते. सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. जगातील सर्व संघर्ष सत्तेसाठीच चाललेले असतात. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपली शक्ती अथवा सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळे हे सामर्थ्य अथवा शक्ती ज्या घटकावर अवलंबून असते त्या राष्ट्रसत्तेच्या घटकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

**२.२.२.१ अ) स्थायी घटक - :**

यामध्ये

१) भौगोलिक घटक - यामध्ये नकाशे, सीमा, हवामान, आकार, स्थिती अथवा स्थान, स्थलाकृती इ.

२) लोकसंख्या

३) नैसर्गिक साधनसंपत्ती

**ब) अस्थायी घटक - :**

यामध्ये १) तंत्रज्ञान २) विचारधारा ३) नेतृत्व ४) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य

**२.२.२.१ भौगोलिक घटक :**

भूगोल हा एखाद्या देशाशी सत्ता निर्माण करणारा अथवा सबल करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक होय. देशाचे परराष्ट्र धोरण त्याचा भूगोल ठरवितो असे नेपोलियनने म्हटले आहे. राज्यशास्त्रासंदर्भातील भूगोलाच्या अभ्यासाला भूराज्यशास्त्र असे म्हणतात. मॅकिंडर, स्पाईकमन, रूडॉल्फ जेलेन चीनी या पद्धतीचा अभ्यास केला.

प्रत्येक देशाच्या अंतर्गत व बाह्य राजकारणावर त्या देशाच्या भौगोलिक स्थितीचा परिणाम होत असतो. कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणातील इतर घटक बदलू शकतात परंतु देशाला लाभलेली भूमी बदलू शकत नाही म्हणून भौगोलिक घटकांचा राष्ट्राच्या सत्तेवर व सामर्थ्यावर निश्चित परिणाम होत असतो. या घटकाला पुढील घटक समाविष्ट होतात.

**अ) नकाशे (Maps) :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी विविध प्रकारचे नकाशे अत्यंत उपयुक्त ठरतात. नकाशाच्या माध्यमातून एकूण क्षेत्रफळ, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिज द्रव्यांचे साठे, त्या देशातील महत्त्वाची ठिकाणे, युद्धस्थळे इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. या नकाशांचा उपयोग शेजारी राष्ट्रंशी निर्माण झालेले सीमावाद सोडविण्यासाठी करण्यात येतो. युद्धकाळात तर नकाशांना फारच महत्त्व प्राप्त होते. कारण त्याद्वारे शत्रूंची स्थळे, त्यांच्या हालचाली यांचे सखोल ज्ञान प्राप्त होते. काही देश तर स्वतःच्या देशाचे नकाशे नवीन पद्धतीने तयार करून त्यात आपल्या जवळच्या राष्ट्राचा भाग आपला म्हणून दाखवितात. उदा.- चीन व पाकिस्तान. चीनने भारताचा बराच भाग व स्थळे आपल्या नकाशात दाखविला आहे. तर पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग आपल्या नकाशात दाखविला आहे. याच कारणामुळे चीन व पाकिस्तानबरोबर भारताचा संघर्ष सुरू आहे. एकंदरीला नकाशा हा भौगोलिक घटकातील महत्त्वाचा घटक मानला जातो.

**ब) क्षेत्रफळ-आकार (Size) :**

राष्ट्रसत्तेचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे त्या देशाचे आकारमान होय. कोणत्याही देशाचा आकार, क्षेत्रफळ किंवा विस्तार त्या देशाची सत्ता किंवा शक्ती निर्धारित करतो. जगाच्या नकाशावरून नजर फिरविल्यास असे दिसते की काही राज्ये लहान तर काही राज्ये आकार विस्ताराने खूप मोठी असलेली दिसतात. सर्वात लहान राज्य व्हॅटीकन तर सर्वात मोठे रशिया हे आहे. देशाचे क्षेत्रफळ मोठे, जमीन सुपीक असेल तर त्या राष्ट्राची शक्ती नेहमी वाढत राहते. मोठा भूप्रदेश लाभलेल्या देशात जास्त लोकसंख्या राहू शकते शिवाय युद्धप्रसंगी शत्रू अशा देशावर कब्जा करू शकत नाही. रशिया, चीन, कॅनडा यांचा आकार मोठा असल्याने त्यांना इतर राज्ये जिंकू शकत नाहीत. आपल्या मोठ्या आकारामुळेच रशिया नेपोलियन व हिटलरचा पराभव करू शकला. मोठ्या देशाचा काही भाग शत्रू राष्ट्राने जिंकला तरी त्यावरचा ताबा फार काळ ठेवू शकत नाही. उदा. जपानने अनेक वेळा चीनचा प्रदेश जिंकला परंतु नंतर त्याला तो भाग सोडून द्यावा लागला. याउलट आकाराने लहान असलेल्या उदा. समालिया, बल्गेरिया, बेल्जियम, झेकोस्लाव्हिया, व ग्रीस या राज्यांना अनेक वेळा पराभव स्वीकारावा लागला.

अर्थात आकार व क्षेत्रफळाच्या संदर्भात काही राज्ये अपवाद आहेत उदा. इंग्लंड व जपान यांचा आकार लहान असूनही त्यांचे फारसे नुकसान झालेले नाही. उलट आकार मोठा असून, तेथील जमीन सुपीक नसली, तेथे खनिज संपत्तीचा अभाव असला तर त्या ठिकाणी औद्योगिक प्रगती होऊ शकत नाही.

एकंदरीत देशाचा आकार हा संरक्षण व आक्रमणात्मक युद्धासाठी उपयोगी ठरू शकतो परंतु राष्ट्रीय सत्तेचे तेच एक निर्णायक तत्त्व ठरू शकत नाही कारण मोठ्या आकाराच्या देशांना सीमेचे संरक्षण व अंतर्गत सुरक्षा यावर खूप खर्च करावा लागतो. थोडक्यात आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानामुळे लहान राष्ट्रांनासुद्धा आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले आहे. तरी आजही देशाचा आकार हा भौगोलिक घटकातील महत्त्वाचा घटक मानला जातो.

**क) हवामान (Climate) :**

कोणत्याही देशाच्या राष्ट्रसत्तेवर पर्यायाने त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावर हवामानाचा मोठा परिणाम होत असतो. राष्ट्रसत्तेवर पर्यायाने त्या देशाच्या भौगोलिक स्थिती अथवा स्थानावर त्या देशाचे हवामान अवलंबून असते. देशाचे हवामान अती उष्ण किंवा अती थंड हवामान, रोगट व दमट हवामान तसेच सतत पाऊस असू नये. त्यामुळे त्या देशाच्या माणसांच्या कार्यशक्ती व उत्साहावर परिणाम करतात. त्यामुळे श्रम व शक्ती यांचा उत्पादन क्षेत्रात पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. राष्ट्राचे उत्पादन घटते पर्यायाने त्याचा राष्ट्राच्या शक्तीवर विपरीत परिणाम होतो. याउलट समशीतोष्ण हवामान असणारे देश प्रगती करू शकतात. उत्साहवर्धक हवामानात लोक उत्साहाने काम करतात, त्यांची कार्यशक्ती उद्योगशीलता वाढते. अती उष्ण हवामानात लोक वर्षभर श्रम करू शकत नाहीत. त्यांच्यात निरूत्साह व आळस निर्माण होतो. त्याचप्रमाणे अती थंड प्रदेशातील लोक फार काम करू शकत नाहीत कारण सतत बर्फ पडत असतो. देशाचे पर्जन्यमान, अक्षांश, वाऱ्याची दिशा यावरूनही हवामान ठरत असते. प्रचंड पाऊस व वाळवंट असलेले प्रदेश मानवी वस्तीला उपयोगी ठरत नाहीत.

हवामानाच्या परराष्ट्रधोरण व राष्ट्रशक्तीवर फार परिणाम होतो. अमेरिका, रशिया, जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांच्या उत्तम हवामानामुळे त्यांची जागतिक प्रतिष्ठा वाढलेली दिसते. याच्याउलट दक्षिण व दक्षिण पूर्वेकडील देशांना पावसावर अवलंबून रहावे लागते. तसेच ह्या भागातील हवामान उष्ण आहे. उदा. भारत, इंडोनेशिया, मलाया इ. त्यामुळे या देशांची विशेष प्रगती झालेली नाही. हवामानाचा राष्ट्राच्या सामर्थ्यावर पर्यायाने परराष्ट्रधोरणावर सकारात्मक अथवा नकारात्मक परिणाम होत असतो. त्यामुळेच अलीकडील काळात राष्ट्रांना हवामानावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करावे लागत आहेत.

**ड ) स्थिती किंवा स्थान (Location) :**

देशाच्या आकारापेक्षा महत्त्वाचे तत्त्व म्हणजे त्या देशाचे स्थान किंवा स्थिती होय. याचा राष्ट्राच्या सामर्थ्यावर परिणाम होत असतो. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्व तसेच आर्थिक विकास व संरक्षण हे या घटकावर अवलंबून असते. भौगोलिक स्थानाचा परराष्ट्र धोरणाशी निकटचा संबंध आहे. इंग्लंड व जपान या देशांच्या विशिष्ट स्थानामुळे त्यांना जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अमेरिका युरोप खंडापासून अटलांटिक महासागरामुळे पृथक झाली असल्यामुळे युरोपच्या राजकारणापासून स्वतंत्र राहू शकली व आज जागतिक महासत्ता म्हणून कार्यरत आहे. तसेच इंग्लंडसुद्धा युरोपिय देशापासून पृथक असल्यामुळे ते अडीच शतके सत्तासंतुलनाचे कार्य करू शकले. आल्पस पर्वतामुळे इटलीचे अनेक वेळा रक्षण झाले आहे. याच पर्वतामुळे मध्यपूर्वेकडील देशाकडून इटलीवर क्वचितच आक्रमण झालेले दिसते. हाँगकाँग, माल्टा, एडन, सिंगापूर या बंदरांचा त्यांच्या विशिष्ट

स्थितीमुळे विकास झाला आहे. आर्थिक व्यवस्थेशी देखील स्थितीचा संबंध असतो. उदा. मासेमारी, शिकार, पशुपालन, शेती इ. व्यवसाय राज्याच्या स्थितीवर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय वायुमार्ग व जलमार्ग विकसित झालेल्या मार्गावरील राज्यांचा विकास होतो. भारताच्या बाबतीत उत्तरेस हिमालय, दक्षिणेस हिंदी महासागर, पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस बंगालचा उपसागर या नैसर्गिक स्थानामुळे भारताचे संरक्षण झालेले आहे. त्याचप्रमाणे स्वित्झर्लंड, नॉर्वे व स्वीडन ही राष्ट्रे आपल्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे युरोपच्या राजकारणापासून स्वतंत्र राहिलेली आढळतात. थोडक्यात राष्ट्राची भौगोलिक स्थिती किंवा स्थान राष्ट्राचे सामर्थ्य प्रभावित करीत असते.

**इ ) स्थलाकृती (Topography) :**

नैसर्गिक सीमा असलेल्या राज्यास आक्रमणापासून बचाव करता येतो. सीमेवरील मोठेमोठे पर्वत राज्याचे रक्षण करीत असतात. त्याचप्रमाणे राज्यात वाहणाऱ्या नद्या तसेच समुद्र यांचाही संरक्षणासाठी उपयोग होतो. युरोपीय राज्यांची स्थलाकृती उत्तम असल्यामुळे तेथे चांगली बंदरे निर्माण झाली आहेत. या बंदरांमुळे उर्वरीत जगाशी संपर्क येऊन विकास करता येतो. याउलट आफ्रिकेला उत्तम स्थलाकृतीच्या अभावी विकास करता आलेला नाही. मोठमोठ्या नद्यामुळे सर्वदूर स्वस्तात वाहतूक होऊ शकते. व व्यापार व्यवसाय वाढू शकतो. उत्तम स्थलाकृतीमुळे भरपूर पाऊस पडतो. हवा चांगली राहते व त्याचा राज्याच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळते. उत्तर व्हिएतनाम व द. व्हिएतनाम संघर्षात उत्तर व्हिएतनामध्ये दाट जंगल असल्यामुळे व्हिएटकाँग सैन्याला गमिनी काव्याने द. व्हिएतनामशी लढता आले. अमेरिकेने हे जंगल बाँब टाकून नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना त्यात यश आले नाही. त्याचप्रमाणे शेकडो वर्षापासून उत्तरेकडे हिमालय, दक्षिणेकडे समुद्र अशा वैशिष्ट्यपूर्ण स्थलाकृतीमुळे भारताचे रक्षण झाले आहे.

**फ ) सीमा (Boundaries) :**

देशाच्या सीमा नैसर्गिक अथवा कृत्रिमही असतात. समुद्रकिनारा, पर्वत, नद्या ह्या त्या देशाच्या नैसर्गिक सीमा ठरतात. त्याचप्रमाणे काही देशाच्या सीमा कृत्रिमरित्या आखलेल्या असतात. त्यांच्या सीमारेषात बदल होऊ शकतो. उदा. जर्मनी व फ्रान्स यांच्या सीमा कृत्रिम असल्याने त्यांच्यात अनेक वेळा युद्धे झालेली आहेत. तसेच जर्मनी व ऑस्ट्रिया, चीन व भारत, चीन व रशिया, भारत व पाकिस्तान, अरब-इस्राइल, इराण व इराक यांच्यामध्ये सीमा संघर्ष चालू असतात. म्हणूनच सीमा ह्या नैसर्गिक असतील तर शेजारील राष्ट्राबरोबर शांतता प्रस्थापित करायला, संरक्षणावरील खर्च कमी करायला मदत होते. परंतु सीमेवरून संघर्ष असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते.

राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून आज भौगोलिक घटकाचे महत्त्व कमी झाले आहे असे वाटते. आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून भौगोलिक स्थितीचे महत्त्वकमी होत आहे. आकार, स्थलाकृती, स्थिती या घटकांना विज्ञानाच्या युगात फारसे महत्त्व राहिले नाही असे समजले जाते. आकाराने लहान असणारी राष्ट्रे उदा. जपान, इंग्लंड यांनी आपले उत्तम आरमार, कुटनीती, सुयोग्य नेतृत्व यांच्या जीवावर आपली प्रगती केलेली आहे. ब्रिटनने तर अर्ध्या जगावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. भौगोलिक

घटकांचे महत्त्व आज कमी झाले असले तरी उत्तम भौगोलिक स्थितीच्या राज्यास निश्चित लाभ होत असतो. म्हणून भौगोलिक स्थितीचे महत्त्व आजही आहे हे मान्य करावे लागेल.

**भूराज्यशास्त्राचे विज्ञान (Science of Geo-politics) :**

आधुनिक काळात 'भूराजनीती'(Geo-politics) ही नवी अभ्यासशाखा उदयाला आली आहे. देशाच्या भौगोलिक स्थितीचा राजकारणावर परिणाम होतो तसेच त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावरही परिणाम होत असतो. भूगोलाचा राजकारणावर होणारा परिणाम लक्षात घेऊन अनेक विचारवंतांनी भूराज्यशास्त्राची निर्मिती केली आहे. मॅकिंडर, कार्ल हौशफर व रॅटझेल, स्पाईकमन, रुडाल्फ जेलेन इत्यादींचा उल्लेख भूराज्यशास्त्रज्ञ म्हणून करता येतो.

मॅकिंडर ह्या लेखकाने 'Heart Land Theory' हा सिद्धांत मांडला. हार्ट लँडचा थोडक्यात अर्थ असा कि, होलगा नदी, आर्क्टिक समुद्र, यांगत्सी नदी व हिमालय हे जगाला भौगोलिक दृष्ट्या व राजकीय दृष्ट्या नियंत्रित करू शकतात. जी राज्ये पूर्व युरोपावर नियंत्रण ठेवू शकतील तीच हार्ट लँड नियंत्रित करू शकतात. म्हणूनच जर्मनी व रशिया मिळून हार्ट लँडला म्हणजेच जगाला नियंत्रित करू शकतात. भारताच्या भौगोलिक स्थानाचा विचार करून मकिंडर यांनी असे म्हटले आहे की, 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे.'

या सिद्धांतानुसार हिटलरच्या नाझी राजवटीत म्युनिक येथे एक 'भूराज्यशास्त्र संस्था' स्थापन केली. हौशफर च्या नेतृत्वाखाली जर्मनीच्या विस्ताराच्या व विजयाचा एक फार मोठा आराखडा तयार करण्यात आला होता. एकंदरीत भूगोलाचा राजकारणावर व परराष्ट्र धोरणावर फार मोठा प्रभाव या सिद्धांतातून स्पष्ट होतो.

**२.२.२.१ अ) २) लोकसंख्या (Population) :**

देशाची लोकसंख्या हा राष्ट्रसत्तेचा आधार मानला जातो. पूर्वी जास्त लोकसंख्येवरून राष्ट्राचे सामर्थ्य ठरायचे. मात्र लोकसंख्येचे प्रमाण किती असावे हे निश्चित करता येत नसले तरी संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या त्याचे निश्चित महत्त्व आहे. प्राचीन काळी प्लेटोने ५०४० तर ॲरिस्टॉटलने १०,००० लोकसंख्या आदर्श राज्यासाठी असावी असे मत व्यक्त केले आहे. राष्ट्राचे चारित्र्य, राष्ट्रीय नीतिमत्ता आणि शासनाचा दर्जा या घटकावर लोकसंख्येचे गुणात्मक मुल्यमापन अवलंबून असते.

जास्त लोकसंख्येमुळे देश शक्तीशाली बनतो म्हणून त्याचे समर्थन केले जाते. शेती, उद्योग, व्यापार, सेवाक्षेत्रे, लष्कर, विमानदल, नौदल यामध्ये काम करण्यासाठी लोकांची गरज असते. यातून राष्ट्राची शक्ती वाढते. जादा लोकसंख्यामुळे देशातील मालाला स्वतःची बाजारपेठ उपलब्ध होते. शत्रूला सहजासहजी राज्य विकता येत नाही. लोकसंख्येमध्ये स्त्री-पुरुषांचे प्रमाण योग्य असले पाहिजे. १८ ते ४५ वयोगटातील लोक जास्त असले पाहिजेत त्यांचा सैन्य व उद्योगधंद्यासाठी उपयोग होतो. अर्थात राष्ट्राची लोकसंख्या केवळ संख्येने जास्त असून चालणार नाही तर तेथील जनता कष्टाळू, कार्यक्षम व चारित्र्यसंपन्न असावी. तशी ती नसेल तर ते राष्ट्र प्रगती करू शकत नाही. अशा अतिरिक्त लोकसंख्येमुळे अन्नधान्य, बेरोजगारी, दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण,

उपासमार इत्यादी समस्या निर्माण होणे, विषमता वाढणे, राहणीमानाचा दर्जा खालावतो, समाजात गुन्हेगारी वाढते या सर्वांचा परिणाम राष्ट्राच्या सामर्थ्यावर होतो.

राज्याची कमी लोकसंख्या असल्यास राष्ट्राच्या शक्तीवर त्याचा परिणाम होतो. विविध क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी मनुष्यबळ कमी पड़ते. अमेरिकेची विशाल व सुपीक जमीन कसण्यासाठी मनुष्यबळ कमी पडू लागल्यानंतर अफ्रिकन निग्रो लोकांना आणून कामाला लावले. इंग्लंडचा वसाहतवाद अशा लोकाच्या श्रमावरच पोसला होता. औद्योगिक उत्पादनासाठीही श्रमिक लोकांची आवश्यकता असते. जगातील प्रत्येक देशाची लोकसंख्या वाढते अथवा कमी होत असते. काही देशात ती स्थिर असते. उदा. भारत, पाकिस्तान, बांगला देश यासारख्या आशियातील देशांची लोकसंख्या वाढत असल्याचे दिसते तर रशिया, जर्मनी, फ्रान्स या पाश्चिमात्य देशात ती घटत चाललेली दिसते. जपानची लोकसंख्या भारत व चीनच्या तुलनेत कमी आहे पण जपानचा समावेश जगातील पहिल्या पाच श्रीमंत राष्ट्राच्या यादीत झाला आहे. जपानी माणूस कष्टाळू, कार्यक्षम व देशभक्त म्हणून ओळखला जातो.

सारांश कोणत्याही देशाची लोकसंख्या फार कमी किंवा फार जास्त नसावी. लोकसंख्या ही गुणवत्तेवर आधारलेली असावी शिक्षण, मनोधैर्य, विचार, चारित्र्य, शिक्षण इ. ने संपन्न असावी. जनतेने आधुनिकीकरण, यांत्रिकता, संगणक, भौतिकवादी, वैज्ञानिक दृष्टिकोण बाळगणारी असावी. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इ. साधनांचा वापर लोकांनी कुशलतेने करावा.रूढी, जुन्या चालीरिती अंधश्रद्धा, वाईट सवयी इ. त्याग करून आदर्श लोकसंख्या देशाची प्रगती पर्याचाने राष्ट्रशक्ती वाढवत असते.

**३) नैसर्गिक साधनसंपत्ती** (Natural Resources):

राष्ट्रसत्तेत वाढ करणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्ती होय. नैसर्गिक संपत्ती हा राष्ट्रसत्तेचा स्थिर घटक आहे. नैसर्गिक संपत्ती ही कायम स्वरूपात असते. आणि राष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी ती आवश्यक असते. नैसर्गिक साधनसंपत्ती, अन्नधान्य व खनिज द्रव्ये यांच्या उपलब्धतेवर त्या राष्ट्राचे सामर्थ्य ठरत असते.

मॉर्गेन्था यांच्या मते नैसर्गिक साधने दोन प्रकारची असतात १) अन्नधान्य २) कच्चा माल.

पामर आणि पर्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची विभागणी चार भागात केली आहे. १) कच्चा माल २) खनिज पदार्थ ३) औद्योगिक शक्तीची साधने ४) अन्नधान्य व कृषी उत्पादन. ढोबळमानाने आपण अन्नधान्य व खनिज द्रव्यांचा विचार करणार आहोत.

**अ) अन्नधान्य (Food Stuffs):**

प्रत्येक देशाने आपल्या लोकसंख्येला पुरेल अशा पुरेशा प्रमाणात अन्नधान्य उत्पादन केले तरच तो देश सर्व क्षेत्रात प्रगती करू शकतो. अन्नधान्याच्या बाबतीत जो देश समृद्ध असतो त्याचे राष्ट्रीय सामर्थ्य आपोआपच वाढते. अन्नधान्याचे उत्पादन जर पुरेशा प्रमाणात राष्ट्र करू शकले नाही तर त्याला बाहेरील

देशाकडून आयात करावे लागते. त्याचे परावलंबित्व वाढते. राष्ट्रीय उत्पन्न कमी होऊन राष्ट्रशक्ती कमी होते. आज अमेरिका, अर्जेंटिना, कॅनडा, जपान, ऑस्ट्रेलिया हे देश अन्नधान्याच्या बाबतीत आघाडीवर आहेत. अमेरिका आज इतर राष्ट्रांना अन्नधान्याचा पुरवठा करते परंतु त्याचबरोबर काही नियंत्रणेही लादते. भारतात अन्नधान्य टंचाई होती आता नाही. मॉर्गेन्थॉ यांनी भारताच्या अन्नधान्यावच्या परावलंबित्वास 'परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा' असे म्हटले होते. अलिकडील काळात भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत आहे. इंग्लंडला अन्नधान्याच्या बाबतीत कायमच परावलंबित्वाला तोंड द्यावे लागते. इंग्लंड आपल्या एकूण गरजेच्या ३०% च धान्य उत्पादित करतो. अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबी असणाऱ्या देशाच्या राष्ट्राच्या शक्तीवर मर्यादा येते. प्रसंगी अन्नधान्याच्या टंचाईमुळे देशात क्रांती होऊ शकते किंवा त्याला गुलामगिरी स्वीकारावी लागते. युद्ध काळात तर अन्नधान्याची आवश्यकता फार असते म्हणूनच अन्नधान्य महत्त्वाचा घटक ठरतो.

**ब) खनिजद्रव्ये (Minerals):**

राष्ट्राच्या विकासासाठी खनिजद्रव्ये आवश्यक असतात. ती राष्ट्राच्या शक्तीमध्ये भर घालतात. ज्या देशाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असते ते देश सामर्थ्यवान बनतात. आज अमेरिका व रशिया याबाबतीत स्वयंपूर्ण आहेत. अत्यंत महत्त्वाच्या २७ खनिजद्रव्यापैकी पंधरा अमेरिकेत तर तेरा रशियात आहेत त्यामुळेच या दोन राष्ट्रांनी प्रचंड प्रगती करून महासत्ता म्हणून मान्यता मिळविली. याउलट नैसर्गिक साधनांच्या अभावी काही राज्यांना इतर राज्यांवर अवलंबून राहावे लागते. उदा. भारताला पेट्रोलसाठी अरब राष्ट्रावर अवलंबून राहावे लागत आहे. आज भारताला तेलासाठी करोडो रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळेच आज अरब राष्ट्रे शक्तीशाली बनली आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पूर्णपणे वापर केल्यास ते राष्ट्र औद्योगिक दृष्ट्या प्रगत होते. औद्योगिककरणासाठी कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करण्यासाठी कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करण्यासाठी कोळसा, लोह, खनिज, ॲल्युमिनिअम, बॉक्साईट, अभ्रक, तांबे, जस्त, मँगेनीज, चुनखडी, शिसे, सोने, युरेनियम, गंधक, नैसर्गिक वायू इ. खनिजद्रव्ये राष्ट्राकडे असतील तर त्या राष्ट्राची शक्ती प्रचंड प्रमाणात वाढते. आज अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रांनी आपल्या सत्ता निर्माण केल्या. इंग्लंडने तर साम्राज्य निर्माण केले.

अर्थात खनिजसंपत्तीची विपुलता हा दोष सुद्धा ठरतो. अनेकवेळा खनिजसंपत्तीची विपुलता असेल तर दुसऱ्या राष्ट्रांच्या वर्चस्वाला बळी पडावे लागते. अमेरिका पाश्चात्यांच्या नियंत्रणाखाली त्यामुळेच बराच काळ राहिले तर भारतास ब्रिटिशांचे वर्चस्व सहन करावे लागले तसेच तेलाच्या विपुलतेमुळेच इराण, इराक, सौदी अरेबियासारखी राष्ट्रे बड्या राष्ट्रांच्या राजकारणाला बळी पडत आहेत त्यालाच आपण तेलाची राजनीती म्हणतो. असे असले तरी केवळ नैसर्गिक साधनसंपत्ती असून उपयोगी नाही. त्या संपत्तीचा वापर करता आला पाहिजे. ते करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाची, कुशल कामगार व भांडवलाची आवश्यकता असते. ब्राझीलमधील लोखंडाचे साठे अमेरिकेच्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शोधून काढता आले हे विसरता येत नाही. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्ती राष्ट्राची शक्ती वाढविते अथवा कमी करते.

**स्वयं अध्ययन प्रश्न –१**

अ) स्थायी घटक : खालील प्रश्नांची एक दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१. राष्ट्रीय सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

२. राष्ट्रीय सत्तेचा अर्थ स्पष्ट करा.

३. भू–राज्यशास्त्र (Geo-politics) म्हणजे काय ?

४. भारताच्या नैसर्गिक सीमा स्पष्ट करा.

५. आधुनिक काळात भौगोलिक घटकांचे महत्त्व का कमी झाले आहे ?

६. 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे' असे कोणी म्हटले आहे ?

७. भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्वास परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा असे कोणी म्हटले आहे ?

८. आज अरब राष्ट्रे कशामुळे शक्तीशाली बनली आहेत ?

९. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी नकाशे कसे उपयुक्त ठरतात ?

१०. पाथर आणि पार्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची कोणत्या चार भागात विभागणी केली आहे ?

**२.२.२.१ ब) अस्थायी घटक –** यामध्ये,

१) तंत्रज्ञान

२) विचारधारा

३) नेतृत्व

४) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य या घटकांचा समावेश होतो.

**२.२.२.१ ब)**

### १) तंत्रज्ञान (Technology) :

तंत्रज्ञान ही एक व्यापक संकल्पना आहे. साधारपणपणे तंत्रज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान. जीवनाच्या विविध क्षेत्रात कृषी, उद्योग, आरोग्य, प्रशासन, शिक्षण, दळणवळण, आर्थिक व्यवहार अशा अनेक क्षेत्राच्या विकासासाठी वापरण्यात आलेले संघटित वैज्ञानिक ज्ञान. एका अर्थाने विज्ञानाचे उपयोजन म्हणजे तंत्रज्ञान. तंत्रज्ञान हे राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचा मुख्य आधार आहे. आजच्या युगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या महाक्रांतीमुळे जगाचा चेहरामोहराच बदललेला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन लागणाऱ्या शोधामुळे संपूर्ण मानवी जीवन बदलून टाकत शक्ती

व सामर्थ्यामध्ये प्रचंड वाढ होत आहे. तंत्रज्ञानामुळे उत्पादन वाढते, आर्थिक विकास होतो, अर्थव्यवस्था मजबूत होते. युद्ध, अवकाश संशोधन, संगणक, दळणवळण या क्षेत्रातील तंत्रज्ञानात एखाद्या राष्ट्राने घडवून आणलेल्या प्रगतीवरून त्या राष्ट्राची सत्ता ठरवली जाते.

आधुनिक तंत्रविज्ञानामुळे युद्धतंत्रात आमुलाग्र बदल झालेला आहे. लष्करी तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पाश्चात्य राष्ट्रांनी साम्राज्यवाद व वसाहती स्थापन केल्या. दुसऱ्या महायुद्धात आधुनिक शस्त्रास्त्रे व अणुनिर्मितीमुळे युद्धाचे स्वरूपच बदलले आहे. आज अण्वस्त्रामुळे जग नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. क्षेपणास्त्रे, अंतराळ यान, उपग्रहांची निर्मिती केल्यामुळे अमेरिका महासत्ता बनली आहे. भारतानेही चंद्रयान मोहीम यशस्वी करून अवकाश संशोधनात टाकलेले पाऊल महत्त्वाचे व देशाचे सामर्थ्य ठरविणारे आहे. अवकाश संशोधन, क्षेपणास्त्रे अणुचाचण्या, महासंगणक इ. क्षेत्रात भारताने उज्ज्वल कामगिरी केल्यामुळे भारताचे महत्त्व वाढत चालले आहे.

आज तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दळणवळण अधिक सुलभ झाले आहे. जग अगदी लहान होत चालले आहे. आज रेडिओ, दूरदर्शन, विमान, बस वाहतूक, आगगाड्या, वायरलेस, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट सुविधा ही प्रमुख दळणवळणाची व प्रचाराची प्रभावी साधने वापरली जाऊ लागली आहेत. या साधनामुळे राजदूतांच्या कार्यावरही परिणाम झाला आहे. राजदूत पूर्वी स्वतंत्र निर्णय घेत असत परंतु आज दळणवळणातील साधनांचा विकास झाल्यामुळे त्यांना आपल्या शासनाच्या आदेशाची वाट पहावी लागते. आज जगातील प्रमुख बड्या राष्ट्रांनी संहारक शस्त्रे निर्माण केल्यामुळे निशस्त्रीकरणावर भर दिला जात आहे. तसेच आज दोन राष्ट्रात किंवा विविध राष्ट्रात संपर्क साधने सहज शक्य झाल्यामुळे युद्ध टाळणे किंवा शांतता स्थापन करणे शक्य झाले आहे.

आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नैसर्गिक साधन सामग्रीचा विकास करणे शक्य झाले आहे. केवळ नैसर्गिक साधन संपत्ती असून चालत नाही तर तिचा उपयोग करून राष्ट्रंच्या संपत्तीत प्रत्यक्ष रूपांतर करण्याची क्षमता असणारी राष्ट्रेच बलवान ठरतात. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या विकासाशिवाय राष्ट्राचे सामर्थ्य वाढू शकत नाही किंबहुना राष्ट्राचे भवितव्य तंत्रज्ञानाच्या विकासावरतीच अवलंबून असते.

### २) विचारधारा (Ideology) :

आंतरराष्ट्रीय संबंधात 'विचारधारा' हा शब्द सतत वापरला जातो. विचारधारा ही एक विश्वासाची पद्धती आहे. ती राजकीय किंवा अराजकीय स्वरूपाची असू शकते. विचारधारा प्रत्येक शतकात निर्माण होत असल्यातरी २०व्या शतकात विचारधारेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. विचारधारा राष्ट्रास मनोबल पुरविते, विचारधारा नागरिकात एकता व शक्ती निर्माण करतात. साम्यवादी विचारधारेमुळे रशिया व चीन महाशक्ती बनल्या. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी व इटली ही राष्ट्रे नाझी व फॅशिझम या विचारसरणीमुळेच शक्तीशाली बनला. ज्या देशात विविध विचारधारेचे लोक राहतात तेथे एकतेचा अभाव असतो ते राष्ट्र प्रगती करू शकत नाही. भारताने धर्मनिरपेक्षता स्वीकारल्यामुळे भारतात विविधतेत एकात्मता दिसून येते. विचारधारेमुळे राष्ट्र एकसंघ राहून आपला प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण करू शकते. म्हणूनच विचारधारा हा राष्ट्रसत्तेचा महत्त्वाचा घटक मानला जातो.

विचारधारेचा माणसाच्या कार्यावर आणि विचारावर प्रभाव पडत असतो. मनुष्य आपल्या धार्मिक, सामाजिक

आणि राजकीय विचारांच्या आधारावर काही आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो अशा आदर्शांनाच आधुनिक युगात विचारधारा असे म्हणतात. विचारधारेच्या आधारावरच राष्ट्राराष्ट्रात मतभेद आणि संघर्ष होतात.

**व्याख्या** - १) नॉर्मल पेडलफोर्ड आणि जॉर्ज लिंकन यांच्या मते, ''विचारप्रणाली म्हणजे आर्थिक, सामाजिक ाणि राजकीय मूल्ये आणि उद्दिष्ट्ये यांच्याशी संबंधित अशा विचारांचा समूह की जो उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी कार्यात्मक योजना तयार करीत असतो.''

२) स्नायडर आणि विल्सन यांच्या मते, ''विचारधारा म्हणजे जीवन, समाज व शासनाशी संबंधित विचारांचा असा समूह की जो प्रामुख्याने सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय घोषवाक्यांनी किंवा युद्धातील घोषवाक्यांनी निर्माण होतो. तसेच त्याचा सतत प्रयोग केल्याने तेथील समाजाचा किंवा राष्ट्राचा मुख्य विश्वासप्रिय सिद्धांत बनतो.''

३) स्ट्राईचर यांच्या मते ''विचारधारा व्यक्तींच्या अमूर्त विचाराची अशी व्यवस्था आहे की त्याद्वारे वास्तविकता आणि मूल्याधिष्ठित उद्दीष्ट्ये स्पष्ट होतात. तसेच त्यांच्या आधारावर निश्चित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा किंवा ती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.''

थोडक्यात विचारधारांचा प्रभाव त्या त्या राष्ट्रातील लोकांच्या मनावर, कार्यक्षमतेवर व चारित्र्यावर पडत असतो. विचारधारेचे स्वरूप आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक, भांडवलशाही, साम्राज्यवादी, समाजवादी, असू शकते. उदा. भांडवलशाही विरुद्ध साम्यवादी विचारसरणीने अमेरिका विरुद्ध रशिया संघर्षाचे रूपांतर जागतिक शीतयुद्धात झाले. या शीतयुद्धामुळे तिसरे महायुद्ध होते काय अशी भीती निर्माण झाली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या जगातील नव्याने उदयाला आलेल्या राष्ट्रांनी विविध विचारप्रणालींचा पुरस्कार केला. विचारप्रणालींच्या आधाराने साम्यवादी राष्ट्रे, लोकशाही राष्ट्रे, धर्माधिष्ठित राष्ट्रे असे गट निर्माण झाले. साम्यवाद, समाजवाद, उदारमतवादी लोकशाही, राष्ट्रवाद, वसाहतवाद व साम्राज्यवाद विरोध अशा प्रकारच्या विचारप्रणाली लोकांना प्रभावित करू लागल्या.

विचारप्रणालीत भेद हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्षाचे प्रमुख उगमस्थान आहे. कारण राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष, तंटे शांततामय मार्गाने सोडविण्याच्या मार्गात अनेक प्रसंगी विचारधारा अडथळा निर्माण करतात. मॉर्गेन्था यांनी विचारधारेचे तीन प्रकार स्पष्ट केलेले आहेत. अ) यथास्थिती विचारधारा (Ideology of statusquo) ब) साम्राज्यवादी विचारधारा (Ideology of Imerialism) क) संदिग्ध किंवा अनिश्चित विचारधारा (Imbiguous Ideology)

यथास्थिती विचारधारा म्हणजे जैसे थे वादी विचारसरणी, अशी विचारधारा शक्तिमान राष्ट्रांनी स्वीकारलेली असते. कारण त्यांना बदलातून काहीही साध्य करायचे नसते. विकसनशील राष्ट्रांना प्रगतीसाठी स्थैर्य हवे असते म्हणून तेही याचा पुरस्कार करतात.

साम्राज्यवादी राष्ट्रांना विचारधारेची जास्त आवश्यकता असते. कारण विजेत्या राष्ट्रांना आपल्या आक्रमणाचे

समर्थन करण्यासाठी विचारधारेचा आधार घेता येतो. ब्रिटनने वसाहतवाद व साम्राज्यवादाचे समर्थन 'व्हाईट मॅन्सबर्डन' 'गोऱ्या माणसाचे कर्तव्य' या गोंडस सिद्धांताखाली केले तसेच ब्रिटनने –'National Mission' 'राष्ट्रीय कर्तव्य' 'Sacred trust' 'पवित्र विश्वास' अशी बिरूदावली त्यांनी लावली. अमेरिकेने फिलिपाईन्सवर विजय मिळविताना 'मानवतेच्या रक्षणासाठी' असे कारण दिले होते.

तिसरी विचारधारा म्हणजे संदिग्ध विचारधारा अशी विचारधारा संदिग्ध असते कारण ती दोन्ही अर्थांनी वापरली जाते. आक्रमणाकरीता आणि यथास्थिती रक्षणासाठी केला जातो. उदा. अमेरिकेने साम्यवाद रोखण्यासाठी आक्रमणे केली तर इंग्लंड सत्ता समतोलाचा विचार साम्राज्यवादी आक्रमणासाठी वापरला. वुड्रो विल्सन यांनी शस्त्रनियंत्रणाचे तत्त्व मांडले त्यामागेही संदिग्ध विचारसरणी होती. त्यामुळे वास्तव परिस्थिती लपविण्यासाठी किंवा राजकीय नेत्यांचे खरे हेतु गुप्त ठेवण्यासाठी विचारधारांचा आश्रय घेतला जातो.

अशा रीतीने विचारधारा एखाद्या देशाची सत्ता निर्माण करते व परराष्ट्र धोरणाला आकार देते. भिन्न विचारधारा असणाऱ्या राष्ट्रांनी जागतिक तणावांना जन्म दिला. आपल्या विचारधारेचे जगावर साम्राज्य निर्माण व्हावे असे प्रत्येक राष्ट्रांना वाटायला लागले तर जागतिक तणावांना अंतच राहणार नाही. विचारधारांना युद्धाचे माध्यम बनवायचे काय हे राष्ट्रांनी निश्चित केले पाहिजे परंतु क्विन्सी राईट सारख्या लेखकांना असे वाटते की, उदारमतवाद, मानवतावाद, व्यवहारवाद या विचारसरणी आज आधुनिक संस्कृतीच्या भाग बनत आहे त्यातून एक सर्व संमत एक जागतिक विचारसरणी निर्माण झाली तर जगातील सर्व समस्या सुटून सत्ता नियंत्रित स्वरूपाची बनेल व राष्ट्राराष्ट्राप्रमाणेच अंतरराष्ट्रवाद ही विचारधारा जागतिक कल्याणासाठी उपयोगी पडेल.

**२.२.२.१ ब)**

### ३) नेतृत्व (Leadership) :

राष्ट्रीय शक्तीच्या घटकात नेतृत्वाला विशेष महत्त्व आहे. उत्तम नेतृत्वाच्या अभावी राष्ट्रसत्तेत वाढ होत नाही. राष्ट्राच्या सर्वांगिण प्रगतीसाठी योग्य नेतृत्व आवश्यक असते. नेतृत्वामुळे लोकांचे मनोबल वाढते. नेतृत्वामुळे राष्ट्राचे ऐक्य टिकून राहते. नेतृत्वाचे आदर्श गुण राष्ट्रास शक्तिशाली बनवितात. राष्टांचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण नेतृत्व ठरवित असते. शांततेच्या काळात योग्य परराष्ट्र धोरण व राजनयाच्या माध्यमातून राष्ट्राचा सन्मान वाढविण्याचे कार्य नेतृत्वावर अवलंबून असते. युद्धकाळात तर नेतृत्वच राष्ट्राचे प्रतीक समजले जाते. युद्धातील विजय, पराभव नेतृत्वावर अवलंबून असतो. आजच्या सर्वस्पर्शी युद्धाच्या काळात नेतृत्वाची जबाबदारी वाढली आहे. अन्नधान्य, वाहतुक, संपर्क, आरोग्य, मनोधैर्य, सैन्यव्यवस्था ह्या सर्व क्षेत्रात कुशल नेतृत्वाची गरज असते. राजकीय नेतृत्वाबरोबरच इतर क्षेत्रातही योग्य नेतृत्वाची गरज असते. कुशल राजदूत, सैन्यातील पायदल, वायुदल, नाविकादलासाठी कार्यक्षम नेतृत्वाची गरज असते. औद्योगिक क्षेत्रात योग्य मजूर पुढारी, उत्तम वक्ते व शिक्षणतज्ञांचीही गरज असते.

राज्याची प्रगती, राज्याचे सामर्थ्य नेतृत्वाच्या दर्जावरून मोजले जाते. नेतृत्व म्हणजे नेते किंवा नेत्यांच्या गटाद्वारे उपलब्ध करून दिलेले असे साधन की ज्याद्वारे भौगोलिक व आर्थिक तत्त्वे लोकसंख्या, तंत्रविकास,

विचारधारा, मनोधैर्य या सर्व घटकांचा राष्ट्राच्या उद्देशपूर्तीसाठी योग्यपणे उपयोग करून घेतला जातो. राष्ट्रसत्तेच्या सर्व घटकांचे यशापयश नेतृत्वावर अवलंबून असते. राष्ट्रसत्तेचे सर्व घटक अस्तित्वात असूनही चांगले नेतृत्व नसेल तर ते कुचकामी ठरते. आपल्या भाषणातून लिखाणातून राष्ट्राला वेळोवेळी दिलेल्या संदेशातून नेतृत्वाने राष्ट्रीय मनोबल उंचावल्याचे आढळते. नेत्यांच्या प्रभावाने संकटकाळात राष्ट्रात चैतन्य निर्माण होते. उदा. भारत-चीन युद्धावेळी लाल बहादूर शास्त्रींनी दिलेल्या संदेशामुळे भारतीय जनतेचे मनोबल उंचावले होते. दुसऱ्या महायुद्धकाळात चर्चिल यांच्या दमदार राजकीय व सैनिकी नेतृत्वामुळे पराजयाच्या सीमेवरून विजयश्रीची माळ इंग्लंडला मिळाली. मेटरनिक व टेलीरॅड यांच्या राजकीय नेतृत्वामुळे ऑस्ट्रिया, फ्रान्सच्या राष्ट्रसत्तेत वाढ झाली होती. केमालपाशा यांच्या नेतृत्वामुळे तुर्कस्तानमध्ये राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली. त्याचप्रमाणे नेपोलियन, हिटलर, मुसोलिनी, रुझवेल्ट, लेनिन, माओ-लो-तुंग जोसेफकेनेडी, जनरल द गॉल, पं. नेहरू, इंदिरा गांधी यांनी देशास कुशल नेतृत्व दिले व आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या राष्ट्रास प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य नेतृत्वाने केले.

**२.२.२.१ ब)**

**४) जनतेचे मनोबल किंवा नीतिमत्ता (Morale) :**

राष्ट्रातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सामर्थ्य आणि सत्तेच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय मनोबल म्हणजे राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग करण्याची, राष्ट्रासाठी परिश्रम घेण्याची त्यांची तयारी, प्रसंगी राष्ट्रासाठी प्राण देण्याची मानसिक तयारी, निर्धार ही एक अशी कार्यशक्ती आहे जी नागरिकांना राष्ट्रीय प्रगतीसाठी कार्यास प्रवृत्त करते. युद्ध व संकटकाळात ती राज्यव्यवस्थेच्या पाठीशी ठामपणे उभी राहते. अशा काळात धर्म, जात, भाषा अशी कृत्रीम बंधने बाजूला सारून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविते.

पामर आणि पर्किन्सच्या मते, ''मनोधैर्यामुळे स्त्री-पुरुष अधिक कार्य करून त्याग करण्यासाठी व संघर्षासाठी तयार होत असतात. मनोधैर्य त्यांचे व्यक्तिगत मतभेद दूर करून स्वेच्छेने राष्ट्रसेवा करण्यासाठी जास्तीत-जास्त बलिदान करण्यास त्यास प्रवृत्त करीत असते. त्यामुळे विजयाची पक्की खात्री तयार होते.''

मनोबल अथवा नीतिमत्तेचा विकास चारित्र्यामुळे होत असतो. मनोधैर्य हे राष्ट्रवादाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. त्याला देशभक्ती किंवा राष्ट्रप्रेमाच्या नावाने देखील संबोधले जाते. युद्धकाळात मनोधैर्याची कसोटी लागते. मनोधैर्यामुळेच सैनिक दुसऱ्या राष्ट्रावर तुटून पडतात व विजयी होतात. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचे आक्रमण परतवून लावताना रशिया व फ्रान्सच्या जनतेच्या मनोबलाचे यथार्थदर्शन साऱ्या जगाला झाले. तसेच भारत-पाक, भारत-चीन युद्धात भारतीय जनता एक दिलाने सरकारच्या पाठीशी उभी राहिलेली दिसते.

शांततेच्या काळातही मनोधैर्य आवश्यक असते. त्यामुळे स्वार्थी वृत्तीला तिलांजली दिली जाते. स्वार्थत्याग, परिश्रम यातून मोठी आर्थिक प्रगती देश आपल्या जनतेच्या मनोबलावरच करू शकते. त्याचे उत्तम उदाहरण

म्हणजे जपानी जनता आज जपान पहिल्या पाच श्रीमंत राष्ट्रांपैकी एक आहे. हे जपानी जनतेच्या अपूर्व त्यागातून हे शक्य झाले आहे.

जनतेचे मनोबल देशातील नेतृत्वावर देखील अवलंबून आहे. राजकीय नेतृत्वाकडून जनतेचे मनोबल उंचावण्याचे प्रयत्न सातत्याने केले जातात त्यासाठी विचारसरणी, प्रचारतंत्राचा वापर केला जातो. राष्ट्रीय नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांनी व त्यांच्या प्रभावी भाषणांनी प्रभावित होऊन राष्ट्रासाठी प्राणाची आहुती देण्यास लोक तयार होतात.

स्वयं अध्ययन प्रश्न -२

१. आधुनिक तंत्रज्ञानामुळे युद्धतंत्रात अमुलाग्र बदल झाला आहे.

२. तंत्रज्ञानामुळे दळणवळणाच्या क्षेत्रात काय प्रगती झाली ?

३. तंत्रज्ञानामुळे राजदूतांच्या कार्यावर कोणता परिणाम झाला आहे ?

४. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे राष्ट्र कसे सामर्थ्यवान बनले ?

५. विचारधारा म्हणजे काय ?

६. मॉर्गेन्यॉ यांनी विचारधारेचे कोणते तीन प्रकार सांगितले आहेत ?

७. विचारधारांना जागतिक राजकारणात कसे महत्त्व प्राप्त होते ?

८. राष्ट्राची शक्ती निर्धारणातील नेतृत्त्वाची भूमिका सांगा.

९. आदर्श व चांगले नेतृत्त्व नसेल तर त्याचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

१०. भारतातील आदर्श व प्रभावी नेतृत्त्वाची उदाहरणे सांगा.

११. राष्ट्रीय मनोबल म्हणजे काय ?

**२.३ सारांश :**

आधुनिक आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता ही मध्यवर्ती संकल्पना ठरली आहे. 'सत्ता' राजकारणातील मुलभूत घटक आहे. राष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ राष्ट्रीय सत्तेवर अवलंबून आहे. राष्ट्रीय सत्तेचा विचार प्लेटो, ॲरिस्टॉटल, कौटिल्य यासारख्या प्राचीन राजकीय विचारवंतांनीही केला होता. मध्ययुगात मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्ज, हेगेल यांनी राष्ट्रसत्तेचा विचार केला होता. २०व्या शतकात मॉगेन्थॉ, हेरॉल्ड लॉसवेल, डाईक विचारवंतानी राष्ट्रीय सत्तेचा विचार केला आहे.

राष्ट्रीय सत्ता या घटकात आपण हॅन्स जे मॉर्गेन्थॉ, जॉर्ज श्वेत्झर्नबर्जर, लॉसवेल आणि अब्राहम, ऑग्रेस्की, फेडलफोर्ड आणि लिंकन यांच्या व्याख्या विचारात घेतल्या आहेत.

**राष्ट्रसत्तेचे घटक**

अ) स्थायी घटक - यामध्ये

१) भौगोलिक घटक - नकाशे, आकार किंवा विस्तार, हवामान, स्थिती किंवा स्थान, स्थलाकृती, सीमा इत्यादी.

२) लोकसंख्या - गुणदोष

३) नैसर्गिक साधनसंपत्ती अ) लोकसंख्या ब) खनिजद्रव्ये इ.

४) तंत्रज्ञान

ब) अस्थायी घटक - यामध्ये

१) विचारधारा

२) नेतृत्व

३) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य

अशा प्रकारे राष्ट्रसत्तेच्या घटकांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की वरील घटकापैकी कोणत्याही एका घटकामुळे राष्ट्रसत्तेत वाढ होऊ शकत नाही तर त्यासाठी वरील सर्व घटकात समन्वय व संतुलन प्रस्थापित करूनच राष्ट्रीय शक्तीत वाढ करता येते. राष्ट्रसत्तेच्या संदर्भात लक्षात ठेवण्याजोगी दुसरी गोष्ट म्हणजे सापेक्षता. याचा अर्थ एका राष्ट्राच्या शक्तीचा अभ्यास हा आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेणाऱ्या दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात केला पाहिजे. कारण राष्ट्राच्या शक्तीला कोणतीच सीमा नाही. राष्ट्रसत्तेच्या विविध घटकांचे महत्त्व परिस्थितीनुसार, काळानुसार बदलत असते हे परिवर्तन लक्षात घेऊनच त्याचा विचार केला पाहिजे.

**२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :**

सत्ता : शक्ती

भू-राज्यनीती : भौगौलिक राजनीती (भूगोल आणि राज्यशास्त्र यांच्या सहयोगातून उदयास आलेली नवी अभ्यास शाखा)

आकार : विस्तार

स्थिती : स्थान

सीमा : मर्यादा, हद्द

खनिज द्रव्य : खाणीतील, भूगर्भातील खनिज धातु.

तंत्रज्ञान : औद्योगिक कलाशास्त्र, तंत्र विज्ञान

विचारधारा : विचारप्रणाली, विचारसरणी

नेतृत्त्व : पुढारीपणा.

**२.५ स्वयं अध्ययन प्रश्न – १**

रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.

१. ................ ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील मध्यवर्ती कल्पना आहे.

२. ................ यांच्या मते, 'सत्ता म्हणजे एका माणसाचे दुसऱ्या माणसाच्या मन व कृतींवर नियंत्रण होय.'

३. राज्यशास्त्राच्या संदर्भात भूगोलाच्या अभ्यासाला ................ म्हणतात.

४. क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान देश ................ व सर्वात मोठा देश ................ आहे.

५. 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे' असे ................ यांनी म्हटले आहे.

६. नैसर्गिक साधनसंपत्ती हा राष्ट्रसत्तेचा ................ घटक मानला जातो.

७. इंग्लंड हा देश आपल्या एकूण गरजेच्या ................ टक्के अन्नधान्य उत्पादित करतो.

८. अत्यंत महत्त्वाच्या २७ खनिज द्रव्यांपैकी अमेरिकेत ................ व रशियात ................ खनिज द्रव्ये सापडतात.

९. अरब राष्ट्रे ................ या नैसर्गिक साधनामुळे शक्तीशाली बनली आहेत.

१०. आधुनिक काळात ................ विकासामुळे भौगोलिक घटकांचे महत्त्व कमी झाले आहे.

११. ................ यांनी भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्त्वास 'परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा' असे म्हटले आहे.

१२. ................ या विचारवंताने 'Heart Land Theory' हा सिद्धांत मांडला.

**२.५ स्वयं अध्ययन प्रश्न – २**

रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.

१. ................ विचारधारेमुळे रशिया व चीन महाशक्ती बनल्या.

२. ................ विचारधारा म्हणजे जैसे थे वादी विचारधारा होय.

३. ................ राष्ट्रांना विचारधारेची जास्त आवश्यकता असते.

४. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात ................ क्रमांक लागतो.

५. दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्लंडला ................ यांचे कुशल नेतृत्त्व लाभले.

६. ................ यांच्या नेतृत्त्वामुळे तुर्कस्तानमध्ये राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली.

७. ................ हे राष्ट्रवादाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

८. ब्रिटनने आपल्या वसाहतवाद व साम्राज्यवादाचे समर्थन ................ या गोंडस सिद्धांताखाली केले.

९. विज्ञानाचे उपयोजन म्हणजे ................ होय.

१०. भारताने ................ ही मोहिम यशस्वी करुन अवकाश संशोधनात महत्त्वाचे पाऊल टाकले.

११. प्लेटोने आदर्श राज्याची लोकसंख्या ................ असावी असे म्हटले आहे.

**२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे - १**

खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता ही मध्यवर्ती संकल्पना आहे. सत्ता ही राजकारणाचा पाया आहे. राष्ट्रांच्या सर्व व्यवहारांचा तो केंद्रबिंदू आहे. सत्ता ही राष्ट्रीय संरक्षण व हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन आहे.

२. आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी दुसऱ्या राष्ट्रांवर नियंत्रण ठेवणे व आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्या राष्ट्रास व्यवहार करण्यास परावृत्त करणे किंवा दुसऱ्या राष्ट्रास त्याच्या मनाप्रमाणे व्यवहार करण्यापासून रोखण्याची एका राष्ट्राची योग्यता म्हणजे 'राष्ट्रीय सत्ता' होय.

३. आधुनिक काळात भूराजनिती ही नवी अभ्यास शाखा उदयास आली आहे. राज्यशास्त्राच्या संदर्भातील भूगोलाच्या अभ्यासाला भू-राज्यशास्त्र असे म्हणतात.

४. भारताला उत्तरेस हिमालय पर्वत, पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंदी महासागर व पूर्वेला बंगालचा उपसागर अशा नैसर्गिक सीमा लाभल्या आहेत.

५. आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून काही भौगोलिक घटकांचे

महत्त्व कमी झाले आहे.

६. ‘भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे.’ असे जर्मन विचारवंत मॅकिंडर यांनी म्हटले आहे.

७. भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्वास ‘परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा’ असे हॅन्स जे. मॉर्गेन्थाँ यांनी म्हटले आहे.

८. आज अरब राष्ट्रे पेट्रोलच्या उत्पादनामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्तीशाली बनली आहेत. खनिज तेलाच्या या उत्पादनामुळे अरब-राष्ट्रे प्रभावी बनली आहेत. त्यालाच आपण तेलाचा राजनय असे म्हणतो.

९. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी नकाशे अत्यंत उपयुक्त ठरतात. नकाशामुळे एखाद्या राष्ट्राचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, त्या देशातील महत्त्वाची व मोक्याची ठिकाणे, यु द्धस्थळे इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो.

१०. पामर आणि पर्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची १. कच्चा माल २. खनिज पदार्थ ३. औद्योगिक शक्तीची साधने ४. अन्नधान्य व कृषी उत्पादन या चार भागात विभागणी केली आहे.

रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.

१. राष्ट्रीय सत्ता २. मॉर्गेन्थॉ ३. भूराजनीती ४. व्हॅटिकन, रशिया

५. मॅकिंडर ६. स्थायी घटक ७. ३० ८. १५, १३

९. पेट्रोल १०. विज्ञान व तंत्रज्ञान ११. मॉर्गेन्थॉ १२. मॅकिंडर

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा.

१. आधुनिक काळात नवनवीन शस्त्रास्त्रे व अण्वस्त्रामुळे युद्धाचे स्वरूपच बदलुन गेले आहे. आज संपूर्ण जग नष्ट करण्याची शक्ती अणुबाँबच्या निर्मितीमुळे काही राष्ट्रांनी साध्य केलेली आहे. आधुनिक तंत्र-विज्ञानामुळे युद्ध तंत्रात अमुलाग्र बदल झालेला आहे.

२. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दळणवळणाच्या साधनात प्रचंड प्रमाणात विकास झालेला आहे. रेडिओ, दूरदर्शन, रेल्वे, बस वाहतुक, वायरलेस, विमाने, दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट ही दळणवळणाची साधने प्रभावीपणे वापरली जात आहेत.

३. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे परराष्ट्रधोरण निर्धारणातील पारंपरिक दुवा म्हणजे राजदूत होय. राजदूतांच्या कार्यावर याचा परिणाम झाला आहे. राजदूतांना पूर्वी स्वतंत्र निर्णय घेता येत परंतु आज दळणवळणाच्या सुविधामुळे त्यांना आपल्या शासनाच्या आदेशाची वाट पहावी लागते.

४. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नैसर्गिक साधनांचा विकास करणे शक्य झाले आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला

तंत्रज्ञानाच्या विकासावर भर देणे आवश्यक झाले आहे. कृषी औद्योगिक विकास त्यावरच अवलंबुन आहे. तंत्रज्ञानाच्या विकासावरच राष्ट्र सामर्थ्यवान बनते.

५. विचारधारा एक विश्वासाची पद्धती आहे. ऐतिहासिक प्रेरणामूल्ये, परंपरा, नैतिक, धार्मिक विचार इ. च्या माध्यमातून विचारधारा घडत असते. विचारधारेच्या आधारावर भक्कम समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

६. मॉर्गेन्थॉ यांनी १. यथास्थिती विचारप्रणाली २. साम्राज्यवादी विचारप्रणाली ३. संदिग्ध किंवा अस्पष्ट विचारप्रणाली असे तीन प्रकार सांगितले आहेत.

७. कोणत्याही विचारप्रणालीला राष्ट्रीय सत्तेचे पाठबळ असते. त्यामुळे साहजिकच विचारप्रणालींना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त होत असते. सत्तेचे पाठबळ नसेल तर विचारप्रणाली ही कल्पना म्हणून अस्तित्त्वात राहते.

८. नेतृत्त्वामुळे जनतेचे मनोबल वाढते. नेतृत्त्वामुळे राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्माण होते. प्रभावी, आकर्षक व वलयांकित नेतृत्त्व राष्ट्रास शक्तीशाली बनविले.

९. राष्ट्रीय सत्तेच्या इतर घटकांचे यशापयश नेतृत्त्वावर अवलंबून असते. राष्ट्रीय सत्तेचे इतर सर्व घटक अस्तित्वात असूनही चांगले नेतृत्त्व नसेल तर ते निरुपयोगी ठरतात.

१०. महात्मा गांधी, पंडित नेहरु, इंदिरा गांधी ही भारतातील प्रभावी नेतृत्त्वाची उदाहरणे आहेत.

११. राष्ट्रीय मनोबल ही एक मनोवस्था आहे. आपल्या राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थ त्याग करण्याची प्रसंगी राष्ट्रासाठी प्राण देण्याची तयारी म्हणजे मनोबल होय. याच आधारावर राष्ट्र आपले एकात्मतेचे दर्शन घडविते.

रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.

१. साम्यवादी  २. यथास्थिती  ३. साम्राज्यवादी  ४. दुसरा

५. विस्टन चर्चिल ६. केमालपाशा ७. मनोधैर्य  ८. गोऱ्या माणसाचे कर्तव्य

९. तंत्रज्ञान  १०. चांद्रयान  ११. ५०४०

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

### अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

१) राष्ट्रीय सत्ता म्हणजे काय ? राष्ट्रीय सत्तेचे घटक स्पष्ट करा?

२) राष्ट्रसत्तेचे स्थायी घटक म्हणून भौगोलिक परिस्थिती व नैसर्गिक साधन संपत्ती या घटकांचे वर्णन करा.

३) भौगोलिक परिस्थितीचा राष्ट्राच्या शक्तीवर कसा प्रभाव पडतो ते स्पष्ट करा.

४) राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून विचारप्रणालीचे महत्त्व स्पष्ट करा.

५) राष्ट्रसत्तेचे घटक या दृष्टीने लोकसंख्या आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व सांगा.

६) विचारप्रणालीचा अर्थ स्पष्ट करुन आंतरराष्ट्रीय राजकारणातील तिचे महत्त्व स्पष्ट करा.

७) जनतेचे मनोबल (मनोधैर्य) यांचा राष्ट्रीय शक्तीचे घटक या दृष्टिकोनातून परीक्षण करा.

८) 'राष्ट्रसत्तेच्या वृद्धीसाठी केवळ एक किंवा दोन घटक पुरेसे नाहीत' स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा**

१. भौगोलिक घटक

२. विचारप्रणाली

३. जनतेचे मनोधैर्य

४. नेतृत्त्व

५. तंत्रविज्ञान

## २.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ

१) डॉ. वसंत रायपुरकर : आंतरराष्ट्रीय संबंध-श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती : वर्ष प्रतिपदा २००६.

२) डॉ. वि. मा. बाचल : आंतरराष्ट्रीय राजकारण
डॉ ललिता टोनप : कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रकाशन, १५ जुलै १९९६.

३) डॉ. वासंती रासम : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण
डॉ. करिआप्पा खापरे : फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जाने.२००४.

४) प्रा. रघुनंदन घ. वराडकर : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, जून १९९१.

५) डॉ. सुनिल दाते : आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, आवृत्ती - जुलै, १९९८.

६) डॉ. शांताराम भोगले : आंतरराष्ट्रीय संबंध विद्या प्रकाशन, नागपूर, पुनर्मुद्रण -२००१.

७) प्रा. बी. वाय. कुलकर्णी : आंतरराष्ट्रीय संबंध

प्रा. अशोक नाईकवाडे : श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रकाशन काल - २५ नोव्हेंबर २००५.

९) प्रा. बी. वाय. कुलकर्णी : आंतरराष्ट्रीय संबंध विद्या प्रकाशन नागपूर.

प्रथमावृत्ती - १ जून २००५.

१०) Palmer Perkins : International Relations, CBS Publishers Delhi, 1985.

●●●

# सत्र ५ : घटक ३

## राजनय - (Diplomacy)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  २.१ राजनयाची व्याख्या

  २.२ राजनयज्ञाची कार्ये

  २.३ राजनयाचे प्रकार

  २.४ राजनयाचे बदलते स्वरूप

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**३.० उद्दिष्ट्ये :-**

या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला –

* अगदी प्राचीन काळापासून राजनय ही चालत आलेली प्रक्रिया आहे.
* राजनय ही आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेली संपर्क व्यवस्था असते.
* राजनयामुळे देशातील सामाजिक मूल्ये, विचार, श्रद्धा, सांस्कृतिक देवाण घेवाण करणे शक्य असते.
* राजनय परराष्ट्र धोरणाचे एक साधन असते.
* राजनयज्ञांचे व राजनयाचे प्रकार समजून घेता येतील.

### ३.१ प्रास्ताविक :-

राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याचा आराखडा म्हणजे परराष्ट्रीय धोरण आणि परराष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी करण्याचे साधन म्हणजे राजनय. आतंरराष्ट्रीय संघर्ष नियंत्रणाचे महत्वाचे साधन म्हणून राजनय या संकल्पनेकडे पाहिले जाते. राष्ट्राराष्ट्रातील मतभेद अथवा संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी व आपल्या राष्ट्राचे राष्ट्रहीत वाढवण्यासाठी राजनय  पद्धती अंमलात आणण्याची जगातील सर्वच राष्ट्रांचा कल वाढत असल्याचे दिसते. म्हणूनच आज आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात राजनयांच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

### ३.२ विषय विवेचन :-

### ३.२.१ राजनयाची व्याख्या :-

अगदी प्राचीन काळापासून दोन राज्यात परस्पराविषयी सद्भाव निर्माण करण्याकरिता राजा आपला दूत दुसऱ्या राज्याच्या प्रमुखाकडे पाठवित असे. राष्ट्राराष्ट्रातील संबंध राजनयाच्या माध्यमातून प्रस्थापित केले जात होते. आजही राष्ट्राराष्ट्रातील प्रश्न, समस्या यांचे निराकारण, चर्चा, वाटाघाटी, समझोता या सारख्या शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

राजनय (Diplomacy) या इंग्रजी शब्दांचा उदय ग्रीक भाषेतील Diplor (डिप्लोर) पासून निर्माण झाला आहे. त्याचा अर्थ मोडणे किंवा घडी करणे असा आहे. काही राज्यशास्त्रज्ञ 'डिप्लोमसी' हा शब्द लॅटीन भाषेमधून आल्याचे मानतात. लॅटिन भाषेतील Diploma चा अर्थ 'दुहेरी दस्तऐवज' असा होतो. आधुनिक काळात डिप्लोमसी ही संज्ञा प्रथम वर्क या विचारवंतानी मांडली. १८१५ मधील राजनयिक संबंधविषयक व्हिएन्ना परिषदेने आधुनिक राजनयाचे काही सर्वमान्य नियम तयार केले. राजनय हा शब्द कुटनीतीसाठी प्रसिद्ध होता. आजच्या कालखंडात राजनय म्हणजे शांततापूर्ण सहअस्तित्व, सद्भावना, सहकार्य मैत्रीपूर्ण व्यवहार असा अर्थ लावला जातो.

काही प्रमुख विचारवंतानी राजनयाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

- सर अर्नेस्ट सातो ''स्वतंत्र राज्याच्या शासनामधील किंवा अंकित राज्यांच्या अधिकृत संबंधाबाबत उपयोगात आणला जाणारा बुद्धी व चातुर्य यांचे प्रयोग म्हणजे राजनय होय.''
- हॅन्स जे मॉगेन्था ''राजनयाचा प्राथमिक उद्देश शांततापूर्ण मार्गाद्वारे राष्ट्रहिताची वृद्धी करणे हा होय.''
- क्विन्सी राईट ''आंतरराष्ट्रीय वाटाघाटी किंवा व्यवहार यामध्ये बुद्धी व कौशल्याच्या आधारावर आपले राष्ट्रहित साध्य करण्याची कला म्हणजे राजनय होय.''
- के. एम. पन्नीकर ''राजनय ही आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले राष्ट्रहित दुसऱ्या देशाच्या संदर्भात सादर करण्याची कला होय.''
- महेंद्रकुमार '' देशाचे प्रश्न सोडवण्यासाठी करावयाच्या वाटाघाटी, बोलणी म्हणजे राजनय होय.''

- विन्स्टन चर्चिल ''युद्ध टाळण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे राजनय होय.''
- आर्गेन्सकी ''युद्ध किंवा दोनपेक्षा अधिक देशांच्या प्रतिनिधीमध्ये होणारी समझोत्याची प्रक्रिया म्हणजे राजनय होय.''

थोडक्यात राजनयाला काही विचारवंतानी परराष्ट्रीय धोरणाचा भाग मानले. तर काही विचारवंतानी राष्ट्रहित साध्य करण्याचे साधन मानले. राजनय या शब्दातून दोन देशातील संबंध, व्यवस्थापन, संचालन स्थापित होत असतात. या बाबी स्पष्ट होतात.

**स्वयं : अध्ययन प्रश्न – १**

पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

१) राजनयामुळे राष्ट्रहित साध्य होते.

२) १९६१ मध्ये व्हीएन्ना परिषदेने राजनयाचे काही सर्वमान्य नियम तयार केले.

३) राजनयामुळे युद्ध सुरू होते.

**३.२.२ राजनयज्ञाची कार्ये :–**

राजदूताना विविध प्रकारची कार्ये करावी लागतात. त्यांना दोन्ही शासनातर्फे प्रवक्ते किंवा दुभाषी म्हणून कार्य करावे लागते. वाटाघाटी करणे व आपल्या देशाचे व नागरीकांचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे हे त्यांचे मुख्य कार्य असते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपल्या देशाची प्रतिष्ठा व प्रभाव वाढवणे या सारखी महत्वाची कार्ये करावी लागतात. सामान्यत: राजनयज्ञाला पुढील कार्ये करावी लागतात.

**१) प्रतिनिधित्व करणे :–** राजदूताचे सर्वात पहिले आणि महत्वाचे कार्ये म्हणजे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणे होय. दोन देशाचे संबंध जोडताना राजदूतास संबंधीत देशातील प्रतिष्ठित व्यक्ती, महत्वपूर्ण गट व सर्व क्षेत्रातील प्रमुख व्यक्तीशी संबंध प्रस्थापित करावे लागतात. विविध देशाशी केलेले करार, तह किंवा संधी यावर शासनाच्या वतीने स्वाक्षऱ्या करणे, आंतरराष्ट्रीय परिषदामध्ये हजर राहून देशाचे प्रतिनिधित्व करणे इ. कार्ये करावी लागतात.

**२) वाटाघाटी करणे :–** राजनयज्ञ म्हणजे ''वाटाघाटी करणारा'' अशी पारंपारिक व्याख्या केली जाते. हे राजदूताचे पारंपारिकदृष्ट्या महत्वाचे कार्य समजले जाते. राजदूताचे मुख्य कार्य म्हणजे द्विपक्षीय, बहुपक्षीय संधी, करार, तह यासाठी मसुदा तयार करणे. राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इ. प्रकारचे तह, करार व संधी असतात. युद्ध, शांतता, राजकीय प्रश्न संदेशवहन, दळणवळण, तांत्रिक मदत इ. क्षेत्राबाबत वाटाघाटी घडवून आणून तह व करार करणे.

आधुनिक काळात प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे वाटाघाटी करण्याचे राजनयज्ञाचे कार्य मर्यादित होऊ लागले आहे. आजच्या सालात राष्ट्रप्रमुख व परराष्ट्रमंत्री यांच्या मार्फतच तह, करार देवाण घेवाण होत आहेत.

**३) अहवाल आणि निवेदन सादर करणे :-** राजदूत हा आपल्या देशाचे 'कान व डोळे' समजला जातो. ज्या देशात त्याला पाठविण्यात आले असते, तेथील सर्व घटनांचे तो निरीक्षण करतो. व्यापारस्थिती, संधी, लोकमत, शेती, उद्योग, वाणिज्य बाजारपेठा, राजकीय नेतृत्व याचे निरीक्षण करून तो आपला अहवाल स्वदेशाला सादर करणे. याच अहवालावरून राष्ट्राचे परराष्ट्रधोरण ठरवले जाते. त्याने आपल्या अहवालात चूकीची, अर्धवट, दिशाभूल करणारी माहिति दिली असेल तर संबंध बिघडण्याचा धोका असतो.

**४) हितसंबंध सरंक्षण :-** राजदूत आपल्या देशाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे महत्वाचे कार्य करतो. देशाच्या हितसंबंधात येणाऱ्या अडथळ्यांचा, समस्यांचा विचार करून त्याचे निवारण कसे करता येईल याबाबत उपाययोजना, औद्योगिक व वाणिज्य क्षेत्र, कृषी, शिक्षण आरोग्य इ. क्षेत्रातील संरक्षण करणे इ. महत्वाची कार्ये राजदूतास करावी लागतात.

**५) स्वकीय नागरिकांचे सरंक्षण :-** परदेशात वास्तव्याला असताना त्या देशातील आपल्या नागरिकांचे जीवित मालमत्ता आणि इतर हितांचे संरक्षण करणे हे एक राजनयज्ञाचे प्रमुख कार्य आहे. याशिवाय पत्रकार, निर्वासितांचे प्रश्न, अपहरण केलेले नागरिक, पकडून ठेवलेले सैनिक यांच्यावरील अन्यायाची दखल राजनयज्ञाला घ्यावी लागते.

**६) पारपत्राचे वितरण :-** देशाच्या सीमेबाहेर प्रवास करण्याचे अनुमतीपत्र शासनाच्या विदेश मंत्रालयाद्वारे दिले जाते. पारपत्र मिळाल्यानंतर नागरिक ज्या देशाचा प्रवास करू इच्छितो किंवा प्रवासाच्या काळात ज्या देशात निश्चित काळासाठी थांबण्याची त्याची इच्छा असेल तर त्यासाठी त्याला अनुमतीपत्र प्रदान करण्याचे काम त्या देशाच्या राजदूताचे आहे.

**७) अन्य कार्ये :-** राजनयज्ञाला आज बहुविध कार्ये करावी लागतात. त्यामुळे त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढत गेली आहे. अन्नधान्याची आयात-निर्यात करणे, पर्यावरणाचे प्रश्न सोडविणे, अवकाश संशोधनाचे सहकार्य मिळवणे, दूरसंचार आणि दळणवळणा संबंधीची देवाण घेवाण निर्माण करणे, दहशतवाद, अतिरेक्यांचे प्रश्न सामूहीक रीतीने सोडवणे इ. बाबत राजनयज्ञाला काम करावे लागते.

**स्वयं : अध्ययन प्रश्न - २**

१) राजनयज्ञाची कोणतीही दोन कार्ये सांगा.

२) पारपत्रांचे वितरण म्हणजे काय ?

### ३.२.३ राजनयाचे प्रकार -

राजनयाच्या स्वरूपावरून, कार्यावरून आणि ऐतिहासिक दृष्टीकोनातून राजनयाचे विविध प्रकार सांगितले जातात. आजपर्यंत परराष्ट्र संबंधाच्या अभ्यासाच्या विविध कालखंडामध्ये राजनयाच्या विविध प्रकारानी आपला कमी अधिक प्रभाव पाडलेला आहे. राजनयाचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले जातात.

१) जुना आणि नवा राजनय

२) गुप्त आणि प्रकट राजनय

३) लोकतांत्रिक आणि हुकूमशाही राजनय

४) परिषद राजनय

५) संसदीय राजनय

६) व्यक्तिगत किंवा शिखर राजनय

७) प्रतिबंधात्मक राजनय

**१) जुना आणि नवा राजनय :** व्हिएन्ना काँग्रेस ने पहिले महायुद्ध या कालखंडातील एक शतकाचा हा जुन्या राजनयाचा कालखंड म्हणून ओळखला जातो.

**जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये :**

**१) सत्तासंतुलनवादी भूमिका :** या कालखंडात लहान लहान राष्ट्रांचे स्थानिक प्रश्न सोडविण्यास युद्धे होत असत. पण ही युद्धे ठराविक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी होत व उद्दिष्ट पूर्ण होताच पुन्हा पूर्वस्थिती निर्माण करण्याची व सत्तासंतुलन प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती युरोपातील राजनयात होती. या काळात राजनयाचे क्षेत्र फक्त युरोपपुरतेच मर्यादीत असल्यामुळे राजनयात एकता निर्माण करणे शक्य होते.

**२) प्रशिक्षित व कुशल राजनयज्ञ :** या कालखंडात राजनयज्ञ कुशल, प्रशिक्षित व अनुभवी होते. ते कोणतीही तडजोड करण्यास देवाण घेवाणीची प्रवृत्ती ठेवीत असत. तसेच एकमेकांना समजून घेण्याचा व एकमेकांच्या भावना ओळखण्याचा प्रयत्न करीत.

**३) गुप्त करार :** जुना राजनय हा गुप्त राजनय पद्धतीवर आधारलेला होता. राज्याराज्यात ज्या वाटाघाटी, तह, करार संधी होत असत. त्याबाबत गुप्तता राखली जात असे. त्यामुळे त्यातून संशय, अविश्वास आणि त्यांनतर संघर्ष असे राजकारण असे.

**४) प्रतिष्ठानिरपेक्ष राजनय :** या कालखंडात कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा न करता तो फक्त तडजोडीच्या मार्गाने कसा सोडविला जाईल व कोणतीही समस्या व प्रश्न युद्धाकडून शांततेकडे कसा नेता येईल याचा प्रयत्न सर्व राजनयज्ञ सातत्याने करीत होते. त्यात ध्येयवाद, राष्ट्रवाद, स्वार्थ इ. बाबी राजनयज्ञ बाळगत नव्हते.

**५) राजघराण्याशी संबंधीत :** हा राजनय प्रामुख्याने एखाद्या राजघराण्याशी संबंधीत होता. यामध्ये वंशपरंपरेवर आधारलेली राजेशाही पद्धती अस्तित्वात असल्यामुळे राजा हा सर्वाधिकारी असे. त्यामुळे युद्ध व शांततेचे निर्णय हे राजाच घेत असे. म्हणून परराष्ट्र धोरण हे राष्ट्राचे नसून राजघराण्याचे असे. राजाचे वैयक्तिक हितसंबंध सुरक्षित राखणे हा राजनयाचा प्रमुख उद्देश असल्याने राष्ट्रीय हिताला गौणस्थान मिळाले.

**नवा राजनय :** साम्राज्यवादाची स्पर्धा व्यापारी हितसंबंधात निर्माण झालेले तणाव, दळणवळण क्षेत्रातील प्रगती, राजनयात नव्या राष्ट्रांचा प्रवेश लोकतांत्रिक शासनाचा उदय या विविध कारणामुळे राजनयाचे क्षेत्र हे युरोपपुरतेच मर्यादीत न राहता ते जागतिक झाल्यामुळे नव्या राजनयाच्या विकासाची वाटचाल सुरू झाली.

नवीन राजनयाचे श्रेय अमेरिकेचे माझी राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना जाते. १९१९ पासून नव्या राजनयास प्रारंभ झाला व तो अधिक लोकाभिमुख बनला आहे. नव्या राजनयाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) **खुला राजनय :** आधुनिक काळातील राजनय हा खुला राजनय म्हणून ओळखला जातो. आजच्या संसदीय शासन पद्धतीमुळे राजनयिक व्यवहारांची चर्चा कायदे मंडळातून व प्रसारमाध्यमाद्वारे होत असल्यामुळे व यामध्ये जनतेचा सहभाग असल्यामुळे याला खुला राजनय म्हणतात.

२) **प्रशिक्षित राजनयज्ञ :** शिकलेला, प्रशिक्षित, अनुभवी व परराष्ट्र धोरणाचा अभ्यास असणारा तसेच जागतिक सर्व घडामोडीचा अभ्यास असणारा आजचा राजनयज्ञ आहे. राजनय ही कला असल्यामुळे प्रशिक्षित व्यक्तीची निवड स्पर्धा परिक्षेतून केली जाते.

३) **राजनयज्ञांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा :** दळणवळण व संपर्काची साधने वाढल्यामुळे व त्याचा वापर होऊ लागल्यामुळे पूर्वीप्रमाणे राजनयज्ञाना स्वातंत्र्य उरलेले नाही. राजनयज्ञाने केलेले करार, तह यांना त्या त्या देशातील संसदेची मान्यता, अंतिम संमती आवश्यक असते. त्यामुळे प्राचीन राजनयज्ञांप्रमाणे स्वतंत्र व्यवहार करू शकत नाहीत. त्यामुळे नव्या राजनयात राजनयज्ञाच्या स्वातंत्र्यावर मर्यादा पडू लागल्या आहेत. अलिकडे राष्ट्रप्रमुख किंवा विदेशीमंत्रीच संमेलने, परिषदा, करार यात भाग घेत असल्यामुळे राजनयज्ञाची प्रतिष्ठा पूर्वीएवढी राहिली नाही.

४) **लोकशाहीचा स्वीकार :** नवा राजनय हा उघड राजनय असल्यामुळे तज्ञ, विचारवंत, अभ्यासक आणि राजकारणी आपआपले विचार व्यक्त करतात. राज्यकर्ते जनमत विचारात घेवून परराष्ट्र धोरणाची आखणी करतात म्हणून नवा राजनय अधिक लोकाभिमुख बनला आहे.

नवा राजनय किंवा आधुनिक राजनय जुन्या राजनयापेक्षा अधिक गुंतागुंतीचा असलेला आढळतो. नव्या राजनयाचे अधिक लोकशाहीकरण झाल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीबाबत एकवाक्यता आढळत नाही.

## २) गुप्त आणि प्रगट राजनय :

गुप्त राजनय - गुप्त राजनय हे प्राचीन किंवा जुन्या राजनयाचे एक वैशिष्ट मानले जाते. पूर्वी राजनयिक व्यवहार हा केवळ शासनापुरताच मर्यादित असल्यामुळे राजे किंवा प्रतिनिधी आपले राजकीय कार्य साध्य करण्यासाठी अनेक प्रकारचे गुप्त करार करीत असत. त्याची माहिती फक्त राजा व राजनयज्ञानांच असे.

गुप्त राजनयाचे गुण :

१) आपल्या हितसंबंधाची जपणूक करताना इतर राष्ट्रांच्या अडथळ्याची भीती नसते.

२) लोकमताचे दडपण असत नाही.

३) राजनयज्ञाला पूर्ण स्वांतत्र्य मिळते.

४) कुशल, अनुभवी, हुशार राजनयज्ञ तयार होतात.

**गुप्त राजनयाचे दोष :**

१) राजनयिक व्यवहारात जनमताचा विचार केला जात नाही. त्यामुळे त्याचे अनिष्ठ परिणाम लोकानाच भोगावे लागतात.

२) एकाचवेळी दोन वेगवेगळ्या राष्ट्रांशी परस्परविरोधी व्यवहार करून एखाद्या राष्ट्रांची फसवणूक होण्याची शक्यता असते. त्यामुळे दोन राष्ट्रात कायमस्वरूपाचे वितूष्ट निर्माण होऊ शकते.

३) गुप्ततेमुळे कारण नसताना उत्सुकता, अविश्वास, संशय याना प्राधान्य मिळते. राष्ट्रांच्या सहजीवनाचे मूल्य डळमळीत होऊ शकते.

**प्रकट राजनय किंवा खुला राजनय :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात देखील खुलेपणा (पारदर्शिता) असावी असा विचार रूढ झालेला आहे. प्रे. विल्सनने खुल्या राजनयाचे जगाला आव्हाहनच केले होते. प्रत्येक देशानी आपआपले प्रश्न मोकळ्या वातावरणात खुल्या मनाने खुल्या परिषदेत लोकांपासून काहीच न गुप्त ठेवता सोडविण्याच्या पद्धतीला प्रकट किंवा खुला राजनय म्हटले जाते. प्रकट राजनय आधुनिक काळात महत्वाचा मानला जातो. परंतु त्यातही काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

**१) अधिक प्रसिद्धीची हाव :** प्रकट राजनयात जगातील राष्ट्रे आपले आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यास एकत्र येत असली तरी त्यावर खुली चर्चा करीत असली तरी प्रश्न सुटला पाहिजे ही भावना न ठेवता केवळ त्या प्रश्नाला अधिक प्रसिद्धी देणे व आपला प्रभाव इतरावर टाकणे हाच मूळ हेतू असतो.

**२) राष्ट्रहिताला घातक :** प्रकट राजनयात राजकीय व्यवहाराची माहिती देणे व त्यांची मते समजून घेणे याला महत्व दिले जाते. परंतु राष्ट्राची काही गुपिते खुली केली तर ती राष्ट्रहिताला घातक असतात. तसेच परिषदेत होणाऱ्या चर्चा अनेकवेळा गुप्त ठेवाव्या लागतात. कारण त्याचा परिणाम राष्ट्रीय भावना लोकमत विकृत होण्यावर होऊ शकतो.

**३) संधी प्रामाणिकपणे अंमलात न आणणे :** खुल्या राजनयात तह, करार उघडपणे एकत्र येऊन केले जात असल्यामुळे ध्येय धोरणात सातत्य राहत नाही. त्याचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होत असतो.

वरीलप्रमाणे प्रकट राजनयात दोष, अडचणी असल्या तरी आधुनिक काळात बहुतेक राष्ट्रानी या पद्धतीचा अवलंब केला आहे.

**३) लोकतांत्रिक आणि हुकूमशाही राजनय :**

लोकतांत्रिक राजनय : राजनयाचा हा प्रकार पहिल्या महायुद्धानंतर ज्या लोकतांत्रिक व्यवस्था उदयास

आल्या तेव्हापासून सुरवात झाली. त्यामुळे विसावे शतक हे लोकतांत्रिक राजनयाचे शतक म्हणून ओळखले जाते. लोकतांत्रिक राजनयाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **उघड स्वरूप :** जनतेला प्रत्येक संधी, व्यापारीकरण तह याची माहिती प्रसारमाध्यमाद्वारे दिली जाते. दोन किंवा अधिक देशातील करार फक्त त्या देशातील जनतेलाच समजते असे नाही तर जगातील सर्वच जनतेला त्याची माहिती मिळत असते.

२) **लोकमताचा पाठिंबा :** लोकशाही व्यवस्थेत राष्ट्रीय ध्येय धोरण, करार यांना कायदेमंडळाचा पाठिंबा असतो. लोकशाही शासन व्यवस्थेवर जनतेचे नियंत्रण असते. त्यामुळे लोकमताचा विचार करून राष्ट्रप्रमुख परराष्ट्र धोरण ठरवित असतात.

३) **वाटाघाटी, सद्भावना आणि सौजन्यावर विशेष :** लोकतांत्रिक राजनयाचे स्वरूप चर्चा, विचारविनिमय, वाटाघाटी या माध्यमातून ठरत असते. परस्पराविषयी विश्वास निर्माण करून परराष्ट्रीय धोरणाची आखणी केली जाते. शिष्टाचार आणि सद्भावनेच्या वृत्तीतून देशादेशातील मैत्री वृद्धीगंत होत असते.

**३) लोकतांत्रिक राजनयाचे दोष :**

१) **जनतेचे अज्ञान :** सामान्य जनतेला परराष्ट्रातील घडामोडीसंबंधी तसेच अनेक प्रश्नासंबंधी संपूर्ण माहिती नसते. त्यामुळे योग्य निर्णय घेता येत नाहीत. सामान्य जनता कोणत्याही प्रश्नावर गंभीरपणे विचार करीत नाही.

२) **निर्णयाला विलंब :** ही पद्धत असामाधनकारक असून यात बहुल सत्ताधारी असल्यामुळे महत्वपूर्ण वाटाघाटी यशस्वी होत नाहीत. लोकतांत्रिक राजनयात राजनयज्ञ परावलंबी असल्यामुळे आणि कायदे मंडळाच्या मान्यतेच्या आवश्यकतेमुळे निर्णय लवकर होत नाहीत.

३) **अनिश्चित आणि अस्पष्ट :** लोकशाहीत वारंवार निवडणुका होत असल्यामुळे जनमत सतत बदलत असते. त्यामुळे सरकारमध्ये सत्ता पालट झाला की राजनयज्ञही बदलतात.

**हुकूमशाही राजनय :**

हुकूमशाही राजनयाला सर्वकषवादी राजनय म्हटले जाते. विसाव्या शतकात पहिल्या महायुद्धानंतर काही देशामधून हुकूमशाही राजवटी निर्माण झाल्या. यामध्ये प्रामुख्याने इटली, जर्मनी, चीन, रशिया या राज्यांचा उल्लेख करता येतो. या देशानी हुकूमशाही राजनयाची सुरवात केली. एकपक्ष, एकनेता, एकविचार या तत्वानुसार सर्वकषवादी राजनय कार्य करीत असतो.

**वैशिष्ट्ये :**

१) **व्यक्ति स्वातंत्र्याला विरोध :** हुकूमशाही राजनयात व्यक्ति स्वातंत्र्याला महत्व नसते. त्याना राजकीय विरोध मान्य असत नाही. प्रत्येक व्यक्तिने आपल्या नेत्याच्या आदेशाचे पालन केले पाहिजे असा राजनयाचा

दंडक असतो.

**२) व्यक्ति केंद्रीत स्वरूप :** एका व्यक्तिच्या हातात राज्याची सर्वश्रेष्ठ सत्ता केंद्रीत असून तिच्या आदेशानुसारच सर्वानी वर्तन करावे हा हुकूमशाही राजनयाचा दंडक असतो. या व्यवस्थेत प्रसार व प्रचारमाध्यम सरकारच्या मालकीची असतात.

**३) द्वेषावर आधारीत :** सद्भावना, सामंजस्य, आपुलकी, सहकार्य या गोष्टीना फाटा देऊन हा राजनय द्वेषाच्या भावनेवर आधारलेला असतो. कोणतेही प्रश्न लोकशाही मार्गाने न सोडवता सतत बळ, लष्करी शक्ती, युद्ध या मार्गाचा अवलंब केला जातो.

**४) गोपनियता :** हुकूमशाही राजनयात गुप्ततेला अधिक महत्व दिले जाते. त्यामुळे परराष्ट्र धोरणासंबंधी जनतेला विश्वासात घेतले जात नाही. तसेच गुप्तता पाळली जात असल्यामुळे शेजारील राष्ट्रे साशंक बनतात. त्यातून गैरसमज निर्माण होऊन युद्धला आमंत्रण मिळते.

**४) परिषद राजनय :** परिषद राजनय पद्धतीला बहुपक्षीय राजनय पद्धती या नावानेही ओळखले जाते. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ आणि दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघासारख्या जागतिक संघटनाची निर्मिती अशाच राजनयातून झालेली आहे. परिषद राजनयामध्ये राष्ट्रप्रमुख जरी स्वाक्षरी करीत असले तरी निर्णय प्रामाणिकपणे अंमलात आणताना आढळत नाहीत.

**वैशिष्ट्ये :**

१) परिषद राजनयात वाटाघाटी विचारविनिमय वैचारीक देवाण-घेवाण या माध्यमाचा वापर केला जात असल्यामुळे कोणतेही प्रश्न शांततेच्या मार्गातून सोडविले जातात. म्हणून युद्ध टाळण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे परिषद राजनय होय असे मानले जाते.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या भावनेचा विकास होतो व परस्परांच्यात विश्वासाची भावना निर्माण होते.

३) परिषद राजनयात घेतलेले निर्णय अंतिम नसतात, ते परिस्थितीनुसार व गरजेनुसार बदलले जातात त्यामुळे हा राजनय परिवर्तनीय असतो.

**५) संसदीय राजनय :**

संसदीय राजनय हे नाव अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डीन रस्क यांनी दिले आहे. संयुक्त राष्ट्र संघातील कार्यवाहीचे स्वरूप हे एखाद्या देशाच्या कार्यवाहीप्रमाणे असते. संसदेत ज्याप्रमाणे विविध गटाचे व पक्षाचे प्रतिनिधि चर्चा व वादविवादात भाग घेतात त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघामध्ये सदस्य राष्ट्रांचे गट आपल्या हितसंबंधानुसार विचार करून पुढे आलेल्या विषयासंबंधी आपले मत व्यत करीत असतात. अशाप्रकारे राज्यातील कामकाजाप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघातही कार्यवाही होत असते. त्यामुळे डीन रस्क यानी या राजनयात संसदीय राजनय असे म्हटले आहे.

**वैशिष्ट्ये :**

१) संयुक्त राष्ट्रातील बहुमताने निर्णय घेण्याच्या पद्धतीमुळे प्रश्न सुटण्याऐवजी तसाच राहतो.

२) राज्याच्या संसदेत सर्व सभासद राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने विचार करतात. परंतु संयुक्त राष्ट्रात सभासद राष्ट्रे आपआपल्या राष्ट्रीय हिताचा विचार करतात.

**६) शिखर राजनय :**

जेव्हा देशाचे सर्वोच्य प्रमुख राष्ट्राध्यक्ष पंतप्रधान एकत्र येऊन चर्चा व वाटाघाटी करतात. त्यांना शिखर राजनय म्हणतात. २० शतकातील प्रमुख शिखर संमेलन म्हणजे इ. स. १९१९ चे पॅरिस शांतता संमेलन होय. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रप्रमुख पंतप्रधान, राष्ट्राध्यक्षांची शिखर संमेलने मोठ्या प्रमाणात होऊ लागली. या राजनयामुळे नेत्याचे व्यक्तिगत संबंध घनिष्ठ, मैत्रीपूर्ण बनतात व एखाद्या प्रश्नावर निर्णय लवकर घेतले जातात. याचा काही वेळा अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. एखाद्या समस्येबाबत विश्व जनमत जागृत करणे व अधिकाधिक राष्ट्रांचे सहकार्य प्राप्त करून, सामूहिक सुरक्षिततेच्या मार्गानुसार प्रश्न सोडवून जागतिक शांतता वाढविण्यासाठी शिखर राजनय हे एक महत्वाचे साधन आहे.

**७) प्रतिबंधात्मक राजनय :**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध कार्यापैकी प्रतिबंधात्मक राजनय हे महत्वाचे कार्य आहे. प्रतिबंधात्मक राजनय हा १९५६ मधील सुवेझचा प्रसंग, १९६०-६१ कांगोचा प्रश्न, १९६५ मधील अरब इस्त्रायल संघर्ष इत्यादी प्रसंगात वापरण्यात आला. युनोचे सरचिटणीस दाग हॅमरशोल्ड यानी हा शब्दप्रयोग प्रथम केला आहे. नव्या राष्ट्रांना धीर देण्यासाठी, संघर्षाची तीव्रता कमी करणे, प्रसंगी संघर्ष मिटवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाला या प्रकारच्या राजनयाचा वापर करावा लागतो.

**स्वयं : अध्ययन प्रश्न - ३**

पुढील प्रश्नाची एक-दोन वाक्यात उत्तरे द्या.

१) नव्या राजनयाची वैशिष्ट्ये सांगा.

२) हुकूमशाही राजनयाची वैशिष्ट्ये सांगा.

**३.२.४ राजनयाचे बदलते स्वरूप :**

आजच्या काळात राजनयाचे महत्व सतत वाढत असताना दिसते. मात्र राजनयाचे स्वरूप व कार्ये यामध्ये पूर्वीपेक्षा बराच बदल झाला आहे. आजचा राजनय सहअस्तित्वाचा राजनय आहे व या राजनयाने जागतिक शांततेच्या दृष्टीने शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्यात पुढाकार घेतला आहे.

आजची राज्ये परस्परावलंबी असल्याने त्यांच्यात आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात संबंध दिवसेंदिवस वाढत आहत. या सर्व संबंधाना प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याची जबाबदारी आजच्या

राजनयावर येऊन पडली आहे.

जुन्या राजनयाचे स्वरूप नष्ट होत असताना आजचा प्रकट किंवा लोकतांत्रिक राजनय जुन्या राजनयापेक्षा अधिक जबाबदारीचे कार्य पार पाडीत आहे. आज राजनयाची वाणिज्य व आर्थिक राजनय, संमेलनीय राजनय, संसदीय राजनय अशी नवीन रूपे आढळतात. भविष्यकाळातही राजनयाचे महत्व वाढतच जाणार आहे.

**३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.**

| | | |
|---|---|---|
| द्विपक्षीय | : | दोन देशातील |
| बहुपक्षीय | : | अनेक देशांमधील |
| पारपत्र | : | पासपोर्ट |
| अनुमतीपत्र | : | संमतीपत्र |
| विदेश | : | परराष्ट्र |
| स्वदेश | : | स्वराष्ट्र, स्वत:चे राष्ट्र |
| अखंडत्व | : | सलगता |
| सार्वभौमत्व | : | सर्वश्रेष्ठ |
| पक्ष | : | बाजू |
| विदेशमंत्री | : | परराष्ट्र मंत्री |
| मसलती | : | चर्चा |
| सर्वकंश | : | हुकूमशाहीवादी |
| दंडक | : | नियम, कायदा |
| मुक्त | : | स्वातंत्र्य |

**स्वयं : अध्ययन प्रश्न – १**

१) बरोबर

२) बरोबर

३) चूक

**स्वयं : अध्ययन प्रश्न – २**

१) राजनयज्ञाची कार्ये

अ) अहवाल आणि निवेदन सादर करणे.

ब) हितसंबंधाचे संरक्षण करणे.

२) पारपत्राचे विवरण :- देशाच्या सीमेबाहेर प्रवास करणाऱ्याला अनुमती पत्र देणे. अनुमती पत्र हे परराष्ट्रात प्रवास करण्यासाठी काही निश्चित कालावधीत राहण्यासठी दिले जाते.

**स्वयं : अध्यन प्रश्न - ३**

१) नव्या राजनयाची वैशिष्ट्ये

१) खुला राजनय

२) प्रशिक्षित राजनयज्ञ

३) राजनयज्ञाच्या स्वातंत्र्यावर मर्यादा

४) लोकशाहीचा स्वीकार

२) हुकूमशाही राजनयाची वैशिष्ट्ये

१) व्यक्ति स्वांतत्र्याला विरोध

२) व्यक्तिकेंद्रीत स्वरूप

३) द्वेषावर आधारीत

४) गोपनियता

## ३.५ सारांश

या घटकात राजनयाची व्याख्या स्पष्ट केली आहे. शांततामय मार्गाने राष्ट्रहिताची अधिवृद्धी करणे म्हणजे राजनय होय. राजनयज्ञाला देशाचे प्रतिनिधीत्व करत असताना राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षण करावे लागते.

आजपर्यंत राजनयात हळूहळू बदल होत आल्याचे दिसते. आज प्रसारमाध्यमे, दळणवळणाच्या सोयी फार मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. तरीही राजनयाचा मार्ग प्रत्येक राष्ट्राला वापरावा लागतो. राजनय हा प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाचा मुख्य आधार आहे. त्यामुळे राजनयाचे महत्व पुढील कालखंडातही वाढतच राहील.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :-

पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) राजनयज्ञाची कार्ये सांगून त्याचे मूल्यमापन करा.

२) जुन्या व नव्या राजनयातील राजनयज्ञाच्या कार्यातील फरक स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय संघर्ष नियंत्रणाचे एक साधन म्हणून राजनयाचे महत्व विषद करा.

४) दळणवळणाच्या साधनातील प्रगतीमुळे राजनयाच्या प्रक्रियेवरील परिणाम विषद करा.

**टिपा लिहा.**

१) परिषद राजनय

२) शिखर राजनय

३) हुकूमशाही राजनय

४) संसदीय राजनय

५) गुप्त आणि प्रकट राजनय

**३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके**


१) डॉ. बाचल वि. म. - आंतरराष्ट्रीय संबंध

२) डॉ. भो. लि. शांताराम - भारताचे परराष्ट्र धोरण

३) डॉ. रायपूरकर वसंत - आंतरराष्ट्रीय संबंध

४) अरूणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे - आंतरराष्ट्रीय संबंध


●●●

# सत्र ५ : घटक ४
# नवीन जागतिक व्यवस्था

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था

४.२.२ प्रादेशिक संघटना – सार्क, युरोपीय संघ.

४.२.३ आर्थिक संघटना – जागतिक व्यापार संघटना, ब्रिक्स

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**४.० उद्दिष्ट्ये :**

* या घटकांच्या अभ्यासानंतर जागतिक शीतयुद्धाच्या समाप्ती नंतर जी नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था उदयास आली तिचे स्वरूप समजावून घेता येईल.

* प्रादेशिक संघटनांचा उदय त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्व तसेच सार्क, युरोपीय संघ या प्रादेशिक संघटनांचा उदय, उद्दिष्ट्ये व त्यांचे महत्व समजावून घेता येईल.

* आर्थिक संघटनांचा उदय त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्व तसेच जागतिक व्यापारी संघटना, ब्रिक्स या संघटनांच्या उदयाची पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये आणि जागतिक राजकारणातील महत्व अभ्यासता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास हा महत्वाचा समजला जातो. कारण जागतिक राजकारणामध्ये घडत असलेल्या प्रत्येक घटनेचा परिणाम हा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हा घडत असतो. जगामधील आज कोणताही देश किती ही श्रीमंत असला तरी त्याला त्याच्या कोणत्या ना कोणत्या गरजेच्या पुर्ततेसाठी दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून रहावे लागते. आज जगामध्ये प्रत्येक देश स्वावलंबी राहिलेला नसून तो परस्परावलंबी झालेला आहे. त्यातूनच राष्ट्रांराष्ट्रामध्ये संबंध प्रस्थापित होत असतात या संबंधाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये केला जातो.

राष्ट्राराष्ट्रातील संबंधाच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा उदय आणि त्याचे परिणाम अभ्यासने महत्वाचे वाटते. शीत युद्धाला खऱ्या अर्थाने द्वितीय महायुद्धानंतर प्रारंभ झाला. शीत युद्धातील अनेक चढउतार जगाने अनुभवले आहेत. परंतु शीतयुद्धोत्तर जागतिक व्यवस्था वैशिष्ट्ये पूर्ण मानली जाते. जग जसे अनेक बाबतीत मुक्त झाले तसेच अनेक नव्या समस्यांना त्याने जन्मही दिल्याचे दिसते. इ. सन १९९० नंतर विशेषत: मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या रशियातील उदयाबरोबर शित युद्धोत्तर जागतिक घडामोडींना वेगाने चालना मिळाल्याचे दिसते. 'पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त' म्हणजेच पुन:रचना व स्वातंत्र्य या शब्दांनी संपूर्ण जग भाराऊन गेले होते. द्विध्रुवीय जगाचा अंत होऊन एक ध्रुवीय जगाचा उदय झाला, जागतिक राजकारणामध्ये अमेरिकेचे वर्चस्व वाढले. अमेरिका केंद्रित जागतिक राजकारण असे म्हटले गेले. त्यानंतर बहुध्रुवीय राजकारणामध्ये त्याचे रूपांतर झाल्याचे आपणास म्हणावे लागेल. सार्क, आसियान, युरोपीय संघ, तसेच जागतिक व्यापारी संघटना, ब्रिक्स संघ यांचा नव्याने झालेला उदय आणि त्याच्या कार्यामुळे १९९० नंतर जागतिक राजकारणामध्ये होत असलेले बदल यांचा अभ्यास नविन जागतिक व्यवस्था समजून घेण्यासाठी महत्वाचा ठरत आहे.

## ४.२ विषय विवेचन :

### शीत युद्धाचा अर्थ :

द्वितीय महायुद्धाची आग विझते न विझते तोच इ. स. १९४६ मध्ये शित युद्धाला प्रारंभ झाला. त्या वेळेपासून ह्या नवीन स्वरूपाच्या युद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले. आज शीतयुद्ध चालूच आहे परंतू त्याचे स्वरूप मात्र बदलले आहे. शीत युद्धाची मुख्यत्वेकरून सुरूवात द्वितीय महायुद्धानंतर मानली जाते.

''शीतयुद्ध म्हणजे सत्तेसाठी चाललेली स्पर्धा होय.'' शीतयुद्ध हा एक मनोवैज्ञानिक संघर्ष आहे.

''शीतयुद्ध म्हणजे दोन परस्पर विरोधी राजकीय पद्धती किंवा विचारधारांमध्ये चाललेला संघर्ष होय.'' एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकामध्ये शितयुद्धाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. द्वितीय महायुद्धानंतर रशिया व अमेरिका यांच्यात युद्धकाळानंतर मित्रत्वाऐवजी खुले शत्रुत्व निर्माण होऊन जागतिक राजकारणाचे द्विध्रुवीकरण घडवून आणणारी आंतरराष्ट्रीय राजकारणातील अशी स्थिती म्हणजे शीतयुद्ध होय.

**पहिल्या महायुद्धापूर्वीची विश्वरचना :**

पहिल्या महायुद्धापूर्वीची युरोपीय सत्तासमतोलावर आधारित विश्वरचना ही एकोणीसाव्या शतकापासून टिकून होती. नेपोलियन बोनापार्टच्या पराभवानंतर ही विश्वरचना निर्माण झाली. ही युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स बेल्जियम, ऑस्ट्रिया, नेदरलँडस यासारख्या साम्राज्यवादी सत्ताभोवती केंद्रीत होती. या विश्वरचनेचे नेतृत्व इंग्लंडसारख्या महासत्तेकडे होते. इंग्लंडचे आरमार जगभर पसरलेले साम्राज्य या जोरावर एकोणीसाव्या शतकात युरोपीय राजकारणातील सत्ता समतोल टिकवून धरण्याची जबाबदारी इंग्लंडवर होती. ही विश्वरचना युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यवादी हितसंबंधाना पूरक असल्यामुळे ती टिकविण्यासाठी युरोपीय राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न केले. ही जागतिक व्यवस्था पहिल्या महायुद्धापर्यंत टिकून होती.

**पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यानची विश्वरचना :**

दोन महायुद्धांच्या दरम्यान (१९१९-१९३९) युरोप खंडात राजकीय व आर्थिक अस्थिरता निर्माण झाली होती. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी ऑस्ट्रिया, हंगेरी, रशिया, तुर्कस्थान यांची साम्राज्ये संपुष्टात आली. पहिल्या महायुद्धामुळे प्राणहानी व वित्तहानी फार मोठ्या प्रमाणात झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणावरील राष्ट्रसंघाचे नियंत्रण राहिले नाही त्यामुळे युरोप खंडात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. दरम्यान हिटलर, मुसोलिनी या हुकूमशहांनी आक्रमक राष्ट्रवाद आणि साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारल्यामुळे दुसऱ्या महायुद्धाला तोंड द्यावे लागले.

**शीतयुद्धकालीन द्विध्रुवीकरण विश्वरचना :**

ही विश्वरचना दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोविएत रशियादरम्यान जो द्विध्रुवी सत्तासमतोल निर्माण झाला त्यावर आधारित होती. या दोन महासत्तांच्या दरम्यान सुरू झालेले शीतयुद्धाचे राजकारण या विश्वरचनेच्या केंद्रस्थानी होते. साम्यवादाच्या वाढत्या जागतिक प्रसाराला थोपविण्यासाठी अमेरिकेने साम्यवादाच्या परिरोधनाचे धोरण आखले. या धोरणाअंतर्गत युरोप आणि आशिया खंडात सामूहीक सुरक्षिततेच्या तत्वावर आधारित काही लष्करी संघटनांची निर्मिती करण्यात आली. उदा. नाटो, सिटो, सेन्टो, सोविएत रशियानेदेखील लष्करी करार (वार्साकरार) करून आपल्या समर्थक राष्ट्रांची संघटना तयार केली त्यामुळे जागतिक राजकारणाचा ध्रुवीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. आर्थिक आणि लष्करी सामर्थ्यांच्या जोरावर आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी अमेरिका आणि सोविएत रशिया दरम्यानची चढाआढे हे या विश्वरचनेचे महत्वाचे वैशिष्ट होते. या विश्वरचनेत संयुक्त राष्ट्रसंघटना तसेच अलिप्ततावादी राष्ट्रांची संघटना यासारखी इतर सत्ता केंद्रे असली तरी अमेरिका आणि सोविएत रशिया भोवतीच ही विश्वरचना केंद्रीत होती. या विश्वरचनेत नेतृत्व या दोन महासत्तांकडे होते. भांडवलवादी आणि साम्यवादी गटातील परस्पर असहकार्य, अविश्वास, शस्त्रास्त्र स्पर्धा, प्ररोधन, दहशतीचा समतोल ही या विश्वरचनेची आणखी काही वैशिष्टे सांगता येतील यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थैर्य टिकून राहिले. ही विश्वरचना सोविएत रशियाच्या विघटनापर्यंत (१९९१) टिकून होती.

**४.२.१ शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था :-**

सन १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात आमूलाग्र बदल घडून आले. सोविएत रशियाचे विघटन होऊन ४५ वर्षे चाललेल्या शीतयुद्धाचा शेवट घडून आला. द्विध्रुवीकरणावर आधारित शीतयुद्धकालीन

सत्तासमतोलाची व्यवस्था कोसळली. सत्तासमतोल, दहशतीचा समतोल या संकल्पना मागे पडल्या आणि शीतयुद्धकालीन लष्करी संघटनेचे करार (नाटो सोडून) विसर्जित झाले. राजकीय, लष्करी हितसंबंधाचे महत्व कमी होऊन आर्थिक हितसंबंधाच्या संरक्षणाला प्राधान्य प्राप्त झाले. आर्थिक हितसंबंधाच्या सरंक्षणात विभागीय व्यापार संघाची भूमिका वाढली. पश्चिम आणि पूर्वजर्मनीचे एकीकरण घडून आले. उत्तर आणि दक्षिण कोरियाच्या एकीकरणासाठी वाटाघाटी सुरू झाल्या. अफगाणिस्तानमधून सोविएत रशियाने सैन्य काढून घेतल्यामुळे १९९० पर्यंत तसेच इराण-इराक युद्धाचा शेवट घडून आल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्षाचे वातावरण शिथिल होण्यास मदत झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणात लोकशाहीकरण, निशस्त्रीकरण, पर्यावरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण यासाठी चळवळी तीव्र झाल्या.

**नवीन विश्वरचना :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या महत्वपूर्ण बदलामुळे एक नवीन विश्वरचना आकाराला आली. या विश्वरचनेचे स्वरूप कोणते आहे याविषयी अभ्यासकामध्ये एकमत नाही. सोविएत रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेचा एकमेव महासत्ता म्हणून उदय झाल्यामुळे नवीन विश्वरचना एकध्रुवीय आहे असे मत काही अभ्यासकांचे आहे. याउलट अमेरिका जरी लष्करीदृष्ट्या महासत्ता असली तरी आर्थिक क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाला जपान, जर्मनी, युरोपीयन महासंघ, आशियान यासारख्या नवीन सत्ता केंद्रांकडून आव्हान असल्यामुळे नवीन विश्वरचना अनेक सत्ता केंद्राचे अस्तित्व असणारी बहुकेंद्रीय व्यवस्था आहे असे मत काही अभ्यासक मांडतात.

सन १९९१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनियर) यांनी अमेरिकेचे नवीन विश्वरचनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांची नवी विश्वरचना पुढील पाच तत्वावर आधारलेली होती.

१) जागतिक राजकारणाचे नेतृत्व अमेरिकेकडे. अमेरिका हे विश्वरचनेचे केंद्र राहील.

२) आंतरराष्ट्राय कायदा आणि सामूहीक सुरक्षा तत्वाला महत्व.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेची महत्वाची जबाबदारी.

४) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी मोठ्या राष्ट्रामध्ये सहकार्य.

५) अण्वस्त्रांच्या वापराला आळा.

अशाप्रकारे विश्वरचनेची कल्पना प्रथम सन १९४५ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी रूझवेल्ट यांनी मांडली होती. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी रूझवेल्ट यांनी अमेरिका आणि सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या पुढाकारावर भर दिला होता.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आकाराला आलेल्या नवीन विश्वरचनेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी या विश्वरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीप्रमाणे.

१) एक ध्रुवी विश्वरचना :

ज्या विश्वरचनेमध्ये एका राष्ट्राचे प्राबल्य असते. त्याला एक ध्रुवी विश्वरचना असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सुत्र हे त्या बड्या राष्ट्राच्या हाती असते आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडीवर त्या

राष्ट्राचा सर्वाधिक प्रभाव असतो. ते राष्ट्र आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असते. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अशा प्रकारची विश्वरचना निर्माण झाली असून अमेरिका आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी असल्याचा काही अभ्यासक दावा करतात. या अभ्यासकांच्या मते –

१) सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर अमेरिका ही एकमेव महासत्ता ठरली आहे. अमेरिकेची बरोबरी करू शकेल असे दुसरे सत्ता केंद्र अस्तित्वात नाही.

२) लष्करी व आर्थीक सामर्थ्य, विज्ञान–तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीच्या आधारावर जागतिक राजकारणाचे नेतृत्व करण्याची क्षमता फक्त अमेरिकेकडे आहे.

३) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर भांडवलवादी लोकशाही ही जगातील सर्वात प्रभावशाली विचारसरणी बनली असून या विचारसरणीचे प्रतिनिधित्व अमेरिकेकडे आहे.

४) अमेरिकेच्या आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याचा प्रभाव हा स्थानिक किंवा विभागीय नसून तो वैश्विक आहे.

अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज ब्रुश (सिनिअर) यांनी सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर विश्वरचनेची घोषणा केली होती. ही विश्वरचनाा एक ध्रुवी विश्वरचनेच्या कल्पनेवर आधारित आहे. या विश्वरचनेत अमरिकेने जगाचे नेतृत्व करावे. अशी बुश यांना अभिप्रेत होते. याच आधारावर अमेरिकेने आपली धोरणे देखील आखलेली दिसतात. सन १९९१ ते २००६ पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध घडामोडींचा आढावा घेतला तर शीतयुद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवीय असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. या पंधरा वर्षाच्या काळात अमेरिकेची एकाधिकारशाही वाढलेली दिसते. अमेरिकेच्या या वाढत्या एकाधिकारशाहीला शह देण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला अपयश आले आहे. १९९१ च्या खाडी युद्धात इराक–कुवेत संघर्षात इराक विरूद्ध जी लष्करी कारवाई करण्यात आली तिचे नेतृत्व अमेरिकेकडे होते.

बोस्निया आणि सर्बिया येथील वांशिक हिंसाचार थांबवण्यासाठी सन १९९५ व १९९९ मध्ये झालेले लष्करी हल्ले नाटो या अमेरिकेच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या संघटनेनेच केले होते. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्याचा सूत्रधार व अल कायदा या संघटनेचा सर्वेसर्वा आसामा बिन लादेन याला अफगणिस्तानातील तालिबान राजवटीने आश्रय दिल्याच्या संशयावरून अफगाणिस्तानवर अमेरिका व तिच्या मित्रराष्ट्रांनी लष्करी हल्ले केले. २००१ नंतर जागतिक दहशतवादा विरूद्ध अमेरिकेने जे युद्ध पुकारले आहे त्या नावाखाली कोणत्याही सार्वभौम राष्ट्रांचा अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा सपाटा अमेरिकेने सुरु केला आहे.

सन २००३ मध्ये इराकमधून सद्दाम हुसेन यांना सत्तेवरून हटविण्यासाठी केलेली लष्करी कारवाई हा अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा सर्वोच्च नमुना म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेची सध्याची भूमिका ही एखाद्या स्वयंघोषित विश्वरक्षणकर्त्यांची आहे आणि त्यासाठी अण्वस्त्रे बाळगण्याचा अधिकार केवळ आपल्याला व आपल्या मित्र राष्ट्रांना (इंग्लंड फ्रान्स) आहे ही अमेरिकेची भूमिका आहे. या सर्व उदाहरणावरून अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही स्पष्ट होते. अमेरिकेची भूमिका जरी विश्वसंरक्षणकर्त्यांची असली तरी अमेरिकेने केवळ अशाच वेळी हस्तक्षेप केला. ज्यावेळी अमेरिकेचे राष्ट्रीय हितसंबंध गुंतले आहेत किंवा धोक्यात

आले आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराक इत्यादी देशातील आपले लष्कर २०१४ पर्यंत काढून घेऊन तेथे आपल्या नियंत्रणाखाली चालणारी सरकारे आणून आपले राजकीय व आर्थिक वर्चस्व टिकवायचे आहे. यावरून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आणि प्रत्यक्ष कृतीत दुटप्पीपणा आणि विरोधाभास आढळून येतो. यावरून अमेरिकेची एकाधिकारशाहीची धोरणे जागतिक राजकारणातील बहुतेक राष्ट्राच्या लक्षात आलेली आहेत.

### २) बहुध्रुवीय विश्वरचना –

एकध्रुवीय विश्वरचनेचा विचार हा बहुध्रुवीय विश्वरचनेच्या विरोधी आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आकाराला आलेली नवी विश्वरचना ही अमेरिका केंद्रित एक ध्रुवीय नसून सत्तेची अनेक केंद्रे असणारी बहुध्रुवीय विश्वरचना असल्याचे मत अनेक अभ्यासक मांडतात. बहुध्रुवीय विश्वरचनेचे समर्थन भारत, चीन, रशिया यासारखी राष्ट्रे करतात. बहुध्रुवीय विश्वरचनेचे समर्थक पुढीलप्रमाणे आपली मते मांडतात.

१) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर लष्करी सामर्थ्याचे महत्व कमी होऊन आर्थिक सामर्थ्याचे महत्व वाढलेले आहे. लष्करी आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे वर्चस्व मान्य केले तरी आर्थिक सामर्थ्यांचे महत्व वाढलेले आहे. लष्करी आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे वर्चस्व मान्य केले तरी आर्थिक क्षेत्रात अमेरिकेला जपान, जर्मनी, युरोपीयन संघ, आसियान यासारखी राष्ट्रे आणि व्यापार संघाबरोबर स्पर्धा करावी लागत आहे.

२) शीतयुद्धोत्तर जगाची विभागणी अनेक सत्ता केंद्रामध्ये झाली आहे. जपान, जर्मनी, युरोपीयन संघ, आसियान, चीन, भारत ही सत्तेची नवीन केंद्रे उदयास आली.

३) जागतिक राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एकाच राष्ट्राकडे विशेषत: अमेरिकेकडे नसून अमेरिका, जपान, जर्मनी, युरोपीयन महासंघ, चीन, भारत यांचे सामूहिक नेतृत्व उदयास आले आहे. यालाच काही अभ्यासकांनी सामूहिक शक्ती किंवा सत्ता असेही म्हणतात. १९९१ च्या खाडी युद्धाचे नेतृत्व जरी अमेरिकेने केलेले असले तरी इराक विरूद्धची लष्करी मोहिम जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांच्या सहकार्याशिवाय यशस्वी होवू शकली नसती.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी या प्रमुख राष्ट्रामधील आणि व्यापार संघामधील आर्थिक व व्यापारी संबंध असून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे व्यवस्थापन सामूहिकपणे या राष्ट्रांकडून केले जात आहे.

वरील विवेचनावरून नवी विश्वरचना ही एक ध्रुवी नसून बहुध्रुवीय असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

### ३) आर्थिक हितसंबंधांना महत्व –

राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांमध्ये आर्थिक हितसंबंधाना मिळालेले प्राधान्य ही शीतयुद्धोत्तर काळातील महत्वाची घटना आहे. शीतयुद्धाच्या काळात विचारसरणीवर आधारीत राजकारणाला, राजकीय हितसंबंधाला महत्व होते. त्यासाठी आर्थिक हितसंबंधाचा बळी दिला जायचा. साम्यवादाच्या प्रतिरोधासाठी अमेरिकेकडून युरोप, आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्रांना मोठे आर्थिक सहाय्य कर्ज शस्त्रास्त्र पुरवठा केला गेला. मित्रराष्ट्रांना आर्थिक, व्यापारी सवलत सूट दिली गेली याची झळ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला पोहचली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर

विचार सरणीच्या संरक्षणासाठी आणि अस्तित्वासाठी अशा स्वरूपाच्या मदत कालबाह्य झाल्या. अमेरिकेचे पहिले नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य देण्याचे नवे धोरण स्वीकारून जागतिक बाजारपेठेमध्ये अमेरिकेचे आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध जोपासण्याच्या धोरणाला प्राधान्य दिले. त्यासाठी अमेरिकेकडून आर्थिक राजकारणाचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे.

**४) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व वाढले –**

शीतयुद्धोत्तर काळ हा आशिया खंडाचा काळ म्हणून ओळखला जातो. युरोप खंड शीतयुद्धाच्या राजकारणात केंद्रस्थानी असल्यामुळे या काळात युरोपीयन राष्ट्राचे महत्व वाढले होते. तथापि शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र आशिया खंडात स्थलांतरीत झाले. सिंगापूर, मलेशिया, थायलंड, जपान, चीन, भारत या सारख्या आशियाई राष्ट्रांनी झपाट्याने आर्थिक प्रगती केली असून त्यांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका महत्त्वाची आहे. आशियान आणि ओपेकसारख्या आशियाई व्यापार संघाचे महत्व वाढले. त्यामुळे अनेक युरोपीयन राष्ट्रे देखील या व्यापार संघाच्या सदस्यत्वासाठी प्रयत्नशील आहेत. चीन, जपान आणि भारत या २१ शतकातील महासत्ता असून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या नेतृत्वासाठी अमरिकेला त्यांच्याशी स्पर्धा करावी लागणार आहे. शीतयुद्धोत्तर काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार झपाट्याने वाढला असून तो सध्या दहा अब्ज डॉलर्स पेक्षा अधिक आहे.

**५) लोकशाहीला गती –**

शीतयुद्धोत्तर काळातील सकारात्मक घडामोडींमध्ये लोकशाहीचा प्रसार ही महत्वाची घटना होत आहे. शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाही करणाची प्रक्रिया गतीशील बनली आहे. सोविएत रशियाच्या विघटनाबरोबर पोलंड, हंगेरी, रूमानिया, बल्गेरियासारख्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. या राष्ट्रांमध्ये पूर्वी साम्यवादी राजवटी होत्या शीतयुद्धोत्तर काळात भांडवलवाद आणि लोकशाही या विचारसरणीच्या झपाट्याने प्रसार होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भांडवलवादाला चालना दिली आहे. लोकशाहीच्या प्रसारासाठी विशेष प्रयत्न करणे, हे शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. दक्षिण आशियामध्ये देखील काही राष्ट्रांमधून लष्करी हुकूमशाही व राजेशाहीकडून लोकशाहीकडे प्रवास चालू आहे. भूतान, नेपाळ, बांगला देशामधून संसदीय लोकशाही आकाराला येत आहे.

**६) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ –**

नवीन विश्वरचना ही आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या तत्त्वावर आधारित असून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती दिली आहे. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांराष्ट्रामधील परावलंबीत्व वाढले असून या प्रक्रियेपासून अलिप्त राहणे कोणत्याही राष्ट्राला शक्य नाही. आर्थिक सामर्थ्याच्या वाढीला महत्व प्राप्त झाल्यामुळे राजकीय युरोप, अमेरिका–रशिया, रशिया–चीन, अमेरिका–चीन तसेच भारत–पाकिस्तान यांचेतील आर्थिक व व्यापारी संबंध सुधारत आहेत. चीन १५ हुन अधिक राष्ट्राबरोबर सीमावाद होते. पण सहकार्याच्या माध्यमातून बहुतांश सीमावाद चीनने सोडवले आहेत तसेच भारत चीन संबंध सुधारत आहेत.

**७) संयुक्त राष्ट्रसंघाची बदलती भूमिका –**

नवीन विश्व रचनेत बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका देखील बदलत

आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि विकासाची जाणीव जागतिक बनली असून या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी संयुक्त राष्टांकडून सक्रिय आणि सकारात्मक भूमिकेचे स्वरूप २४ ऑक्टोबर १९९१ रोजी युनोचे तत्कालीन सरचिटणीस झेविअर पेरेझ दी क्यूलर यांनी आपल्या संदेशात स्पष्ट केले आहे की राजकीय मुद्यापेक्षा, आर्थिक आणि सामाजिक मुद्यावर युनो अधिक लक्ष केंद्रीत करणार असल्याचे स्पष्ट केले होते. गरीबी, बेकारी निर्मूलन, सामाजिक विषमतेचे निर्मूलन, मूलभूत मानवी हक्काचे संरक्षण, शांतता, लोकशाही आणि राजकीय स्थिरता निर्माण करण्यासाठी आणि ती टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न जागतिकीकरणाबरोबर समतोल आर्थिक विकास, नि:शस्त्रीकरण आणि पर्यावरणाचे संरक्षण, एड्स सारख्या रोगांना आळा घालणे, अंमली पदार्थांच्या व्यापाराला प्रतिबंध या मुद्यांना संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टांमध्ये अग्रक्रम मिळाला या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संयुक्त राष्ट्रांचे 'शांतता सैनिक' महत्वाची भूमिका बजावत आहेत. युनोच्या शांती सैनिकांनी दहाहून अधिक राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला आहे. यालाच मानवीय हस्तक्षेप असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रांच्या बदललेल्या भूमिकेबरोबर युनोच्या लोकशाही करणाची मागणी जोर पकडत आहे. अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीला आळा घालण्यासाठी युनोचे सबलीकरण आणि लोकशाहीकरण आवश्यक आहे.

### ८) नि:शस्त्रीकरणाला गती –

शीतयुद्धोत्तर काळातील नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. शीतयुद्धाच्या काळात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. अण्वस्त्रांचा प्रसार घडून आला. १९७० च्या दशकापर्यंत अमेरिका, सोविएत रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या पाच राष्ट्रांकडे अण्वस्त्रे होती पण पुढे अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या गटामध्ये भारत, पाकिस्तान, इस्त्राईल, उत्तर कोरिया सारख्या राष्ट्रांचा समावेश झाला. याशिवाय इराण, इराक, लिबिया, चिली, क्युबा सिरियासारख्या राष्ट्रांकडे अण्वस्त्रे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अण्वस्त्रांच्या वाढत्या प्रसाराबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली. यावर उपाय म्हणजे संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचा मार्ग, संयुक्त राष्ट्र संघटनेने नि:शस्त्रीकरणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले. शीतयुद्धोत्तर काळामध्ये नि:शस्त्रीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल १९९१ मध्ये अमेरिका आणि रशियामधील द्विपक्षपातळीवरील कराराने पडते. हा करार सामारिक शस्त्रास्त्रांच्या कपातीसाठी होता. जो सामरिक शस्त्रास्त्र कपात करार या नावाने ओळखला जातो. १९९५ मध्ये बहुचर्चित अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला अनिश्चित काळासाठी मुदत वाढ देण्यात आली. १९९९ मध्ये सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार बहुमताने मंजूर करण्यात आला. नि:शस्त्रीकरणाच्या दिशेने झालेले हे महत्वपूर्ण करार होते.

### ९) पर्यावरण संरक्षणाची जागतिक गरज –

पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या ही केवळ एखाद्या राष्ट्राला भेडसावणारी समस्या नसून ती आंतरराष्ट्रीय स्वरूपाची समस्या आहे आणि त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे ही जाणीव शीतयुद्धोत्तर काळात विकसित झाली. या जाणिवेचे पहिले प्रतिबिंब १९९२ च्या ब्राझिलमधील रिओ दि जानिसे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेमध्ये पडले. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा जाहीरनामा तयार करण्यात आला. तो ''रिओ घोषणा'' या नावाने ओळखला जातो. राष्ट्रीय विकास आणि पर्यावरण संरक्षणाची सांगड घालण्याचा प्रयत्न या परिषदेमध्ये करण्यात आला. १९९७ मध्ये जपान मधील क्लोटो इथे दुसरी आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद पार पडली.

**१०) व्यापारी संघाची भूमिका –**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये व्यापार संघाची संख्या आणि भूमिका वाढली. शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांची जागा विभागीय व्यापार संघानी घेतली. विभागीय पातळीवरील आर्थिक विकासासाठी काही नवीन व्यापार संघ अस्तित्वात आले. विभागीय आर्थिक विकास आणि विभागीय आर्थिक एकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापार संघ महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. अनेक राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये विभागीय व्यापार संघाची भूमिका महत्वाची आहे. सार्क, आशियान ओपेक, युरोपीय महासंघ, नाफ्टा, आफ्रिकन महासंघ यासारख्या व्यापारी संघानी राष्ट्रांना विभागीय पातळीवर आर्थिक आणि व्यापारी सहाकार्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

**११) जागतिकीकरण –**

शीतयुद्धोत्तर काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. जागतिकीकरण ही वैश्विक प्रक्रिया असून कोणतेही राष्ट्र यापासून अलिप्त राहू शकत नाही. भांडवलशाहीचा जागतिक पातळीवर झालेला प्रसार, आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते जाळे यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. जागतिकीकरण ही वैश्विक पातळीवर राष्ट्रातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध घनिष्ठ करून एक परस्परावलंबी विश्वाची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. १९९५ मध्ये विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेबरोबर जागतिकीकरणाला गती मिळाली.

**१२) मानवी हक्क संरक्षणाची जाणीव –**

संयुक्त राष्ट्र संघटनेकडून मुलभूत मानवी हक्कांचा जाहिरनामा १९४८ साली घोषित करण्यात आला होता. मात्र शीतयुद्धाच्या राजकारणामुळे मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयी आंतरराष्ट्रीय जनमत गतिशिल बनविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला अपयश आले. शीतयुद्धोत्तर काळात मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिकेची युनोकडून अपेक्षा केली जाऊ लागली. वांशिक हिंसाचारापासून मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतिसेनेने काही राष्ट्रांमध्ये लष्करी हस्तक्षेप केले. भारतामध्ये १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवधिकार संरक्षण कायदा मंजूर करण्यात आला व राष्ट्रीय मानवधिकार आयोग आणि राज्य मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यात आली हे आयोग या अधिकाराचे उल्लंघन करणांना शिक्षा देण्याचे कार्य करतात.

**१३) वंशवाद –**

शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका आणि रशिया यांच्यातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघर्ष संपुष्टात आले असले तरी यातील बहुतांश संघर्ष हे वांशिक भेदभावातून निर्माण झालेले आहेत. अनेक राष्ट्रांमधून वांशिक चळवळीमुळे प्रादेशिक वाद आणि संकुचित वादाची भावना जोपासली जात आह. वांशिक संघर्ष बोस्निया, क्रोएशिया, सर्बिया, श्रीलंका, अफगाणिस्तान, इराक, भूतान, चीन, सायप्रस, इथोपिया, सोमालिया, पूर्व तिमोर इंडोनिया सारख्या राष्ट्रांचा समावेश होतो. या राष्ट्रात वांशिक संघर्ष होऊन त्यांत हजारो निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडत आहेत. रवांडा या देशात हुतू आणि तुत्सी या वांशिक गटाच्या संघर्षात केवळ एका वर्षात पाच लाख लोक मारले गेले. वांशिक संघर्षामुळे केवळ राष्ट्रांतर्गत नाही तर विभागीय पातळीवरील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आलेली आहे. यातून मानवाधिकाराचे होणारे उल्लंघन थांबविणे हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे सर्वात मोठे

आव्हान आहे.

### १४) धार्मिक मूलतत्ववाद –

शीतयुद्धोत्तर काळातील नकारात्मक घडमोडींमध्ये काही राष्ट्रांमधून धार्मिक मूलतत्ववादी चळवळींनी धरलेला जोर ही गंभीर बाब आहे. धार्मिक मूलतत्ववादी चळवळीमधून दहशतवाद, वांशिक हिंसाचाराला चालना मिळत आहे. धार्मिक मूलतत्ववादी चळवळी धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना जोपासण्यासाठी, धर्माचे अस्तित्व किंवा स्वतंत्र्य ओळख टिकवण्यासाठी, धर्माच्या आधारावर लोकांना संघटीत करण्यासाठी सक्रिय झाल्या आहेत. पश्चिम आशियातील आणि आफ्रिकेतील बहुसंख्य राष्ट्रांमधून धार्मिक मूलतत्ववादी चळवळीनी जोर पकडला आहे. अल्जेरिया, इजिप्त, जॉर्डन, अफगाणिस्तान, इराण ही राष्ट्रे धार्मिक मूलतत्ववादाला बळी पडलेली आहेत. १९७९ ची इराणमधील धार्मिक क्रांती तसेच १९९६ मध्ये अफगाणिस्तानमध्ये प्रस्तावित झालेले तालीबान शासन धार्मिक मूलतत्वाने प्रभावित झाले होते. धार्मिक मूलतत्ववादी चळवळीतून आकाराला आलेल्या दहशतवादाने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणली.

### १५) आंतरराष्ट्रीय दहशतवाद –

शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादाने उग्र रूप धारण केले आहे. अमेरिका, रशिया, चीन इंग्लंड, स्पेन, इस्त्रायल, भारत यासारख्या मोठ्या राष्ट्रांच्या सुरक्षेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. शीतयुद्धोत्तर काळातील दहशतवाद हा प्रामख्याने धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रभावित झालेला असून त्याचे मूळ धार्मिक मूलतत्ववादी चळवळीमध्ये आहे. सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणे, गोळीबार, अपहरण, राजकीय नेत्यांचे खून इ. साधनांचा वापर करून दहशतवादी हिंसाचार घडवून आणत आहेत. त्यासाठी आत्मघातकी पथकांचा वापर केला जात आहे. शीतयुद्धोत्तर काळामध्ये भारतातील जम्मू–काश्मीरच्या खोऱ्यात पाकिस्तान सीमापार दहशतवादाने पन्नास हजाराहून अधिक लोकांचा बळी गेला आहे. वाढत्या दहशतवादी कारवायांबरोबर अमली पदार्थांचा व्यापार देखील वाढला आहे. त्याच्यामधून उभा करण्यात आलेला पैसा दहशतवादी संघटनांना आर्थिक साह्य करण्यासाठी वापरला जातो. दहशतवादाच्या समस्येमुळे अण्वस्त्रांचा काळ्या बाजारातील व्यापार देखील वाढला आहे. अल कायदा सारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेकडे अण्वस्त्रे रासायनिक शस्त्रास्त्रे असल्याचा संशय आहे. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर व भारतामध्ये २६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबई शहरावर झालेला दहशतवादी हल्ला नंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या वाढत्या सामर्थ्यांची साक्ष जगाला पटली.

### १६) मानवी सुरक्षेचा प्रश्न –

शीतयुद्धोत्तर काळामध्ये मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवी सुरक्षा म्हणजे सर्व प्रकारचा हिंसाचार, भिती आणि असुरक्षिततेपासून व्यक्तीची मुक्तता शीतयुद्ध कालीन तणाव, परस्पर अविश्वास, संशय आणि भितीचे वातावरण यामुळे मानवी असुरक्षितता वाढली होती. शीतयुद्धोत्तर काळामध्ये विविध प्रकारच्या संघर्षामुळे मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. १९९० च्या दशकामध्ये व आज ही लहान–मोठे सशस्त्र संघर्ष होत आहेत. राजकीय कारणामुळे अंतर्गत यादवी युद्धे वांशिक संघर्षातून वाढणारा, हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादी चळवळी, आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांच्या कारवाया, अण्वस्त्रांचा प्रसार, अमली पदार्थाचा

व्यापार इ. कारणामुळे मानवी असुरक्षितता वाढली आहे.

**स्वयं :- अध्ययन प्रश्न - १**

**रिकाम्या जागा भरा :**

१) --------- नवीन विश्वरचनेचा प्रारंभ सन १९९० नंतर होतो.

२) --------- यांनी १९९१ मध्ये अमेरिकेच्या दृष्टीकोनातून नवीन विश्वरचनेची कल्पना मांडली.

३) दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अमेरिका व ------- या दोन महासत्ताचा उदय झाला.

४) 'पुन: र्रचना' व 'स्वातंत्र्य' या दोन शब्दांचा वापर रशियाच्या संदर्भात ------ यांनी सर्वप्रथम केला.

५) -------- हा एक मनोवैज्ञानिक संघर्ष आहे.

**४.२.२ प्रादेशिक संघटना -**

प्रादेशिक किंवा क्षेत्रिय संघटनांचा अधिक विकास २० व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर अधिक गतीने झाल्याचे दिसते. यापैकी ठळक घटना म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना (२४ ऑक्टोंबर १९४५) होय. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेनंतर संपूर्ण जग दोन परस्पर विरोधी गटात आणि विचारधारांमध्ये विभागले गेले. जगावर वर्चस्व मिळविण्यासाठी या दोन गटांमध्ये चढाओढ सुरू झाली. या संघर्षामुळे शीतयुद्धाला व शस्त्रास्त्र स्पर्धेल प्रारंभ झाला. त्यामुळे प्रत्येक लहान राष्ट्रापुढे त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला. त्यातूनच द्वितीय महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या राष्ट्रांनी परस्परांमध्ये आर्थिक, राजकीय, लष्करी स्वरूपाच्या प्रादेशिक संघटना निर्माण केल्याचे दिसते. या क्षेत्रिय / प्रादेशिक संघटना हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक नवीन प्रयोग आहे. म्हणून या प्रादेशिक संघटनाना संयुक्त राष्ट्रांच्या अभ्यासाइतकेच महत्त्व दिले जाते. आजचे जग स्वावलंबी नाही तर ते परस्परावलंबी आहे. म्हणजेच प्रत्येक राष्ट्राला आपल्या कोणत्या ना कोणत्या गरजेच्या पूर्ततेसाठी दुसऱ्या राष्ट्राची मदत घ्यावी लागते. त्यामुळे सार्वभौम राष्ट्रांनी एकत्र येऊन आपले हेतू पूर्ण करण्यासाठी क्षेत्रिय / प्रादेशिक संघटना स्थापना करणे आवश्यक वाटू लागले आणि या गरजेतून क्षेत्रिय संघटनांचा उदय झाला. शस्त्रास्त्र स्पर्धेच्या आजच्या युगात स्वत:च्या हिताचे संरक्षण एकट्यानेच करणे अशक्य आहे. म्हणून सामूहिकरीत्या राष्ट्रीय हिताची जपणूक करण्याच्या दृष्टिने प्रादेशिक संघटनांचा विकास झाला.

प्रादेशिक संघटना म्हणजे काय ? त्याची स्पष्ट व सर्वसमावेशक अशी व्याख्या सांगता येत नाही. कारण काही राष्ट्रे आपल्या क्षेत्रातून दूर असलेल्या प्रादेशिक संघटनांमध्ये सहभागी झाल्याचे दिसतात. उदा. अमेरिका जगातील पाच संरक्षणात्मक संधीमध्ये सहभागी झालेली आहे. तर दक्षिण पूर्व आशियायी राष्ट्रांच्या संघटनेमध्ये (सिटो) पूर्व आशियातील थायलंड व फिलिपाईन्स या दोन राष्ट्रांच्या व्यतिरिक्त इतर चार राष्ट्रे व अन्य खंडातील आहेत. यावरुन असे म्हणता येईल की, प्रादेशिक संघटनाबाबत निश्चित असा नियम / निकष नाही. नार्मन हील यांनी क्षेत्रिय संघटनाऐवजी 'सीमित आंतरराष्ट्रीय संघटना' असे नाव सुचविले आहे. तरीसुद्धा क्षेत्रीय संघटना म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी राज्याच्या समुदायांनी एकत्र येवून स्थापन केलेले संघटन होय.

प्रादेशिक संघटनाना संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेली असली तरी अशा संघटनांच्या स्वरूप व उद्देशाबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. क्षेत्रीय संघटनांचे समर्थक अशा संघटना संयुक्त राष्ट्रांच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यक आहेत असे मानतात. कारण संयुक्त राष्ट्राद्वारे ज्यावेळी कारवाई होत नाही अशावेळी संयुक्त राष्ट्राच्या घटनेनुसार सामूहिक संरक्षणाचे अधिकार अशा प्रादेशिक क्षेत्रिय संघटनांनी देण्यात येतात. पुढील काही महत्त्वाच्या प्रादेशिक संघटना त्यांच्या अभ्यासाद्वारे आपणास समजून घेता येतील.

**सार्क - SAARC (दक्षिण आशियाई क्षेत्रिय सहकार्य संघटन)**

दक्षिण आशियाई सहकार्य संघटनेची स्थापना १९८५ मध्ये ढाका येथे झाली. १९८० च्या दशकाच्या सुरूवातीला बांगलादेशाने आर्थिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई गरीब राष्ट्रांमध्ये घनिष्ठ संबंध असावेत आणि त्यासाठी आशियान, ओपेकच्या धर्तीवर एक संघटना निर्माण करण्यात आली, या कल्पनेचे स्वागत झाले आणि भारताच्या पुढाकाराने १९८५ मध्ये सार्कची स्थापना झाली. भारत, बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि मालदीव असा सार्क संघटनेचे सात सदस्य आहेत. १९८५ पासून सार्क संघटनेचे सात सदस्य आहेत. १९८५ पासून सार्क राष्ट्रांमध्ये परराष्ट्र सचिव, मंत्री आणि मुक्त व्यापाराच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. दक्षिण आशियायी देशांच्या प्रमुखांची पहिली परिषद बांगलादेशची राजधानी ढाका येथे डिसेंबर १९८५ मध्ये भरली.

सार्कच्या स्थापनेमुळ दक्षिण आशियातील या ७ राष्ट्रांमध्ये सद्भावना, बंधुभाव व सहकार्याचे नवे पर्व सुरू झाले. या सात राज्यांची एकूण लोकसंख्या २०० कोटीहून अधिक आहे. या क्षेत्रात विपूल नैसर्गिक साधनसामुग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात आहे. तरीदेखील अतिरिक्त लोकसंख्या, गरीबी, निरक्षरता, कुपोषण अशा अनेक समस्यांनी ही राष्ट्रे त्रस्त आहेत. मालदीव सोडले तर अन्य सदस्य राष्ट्रे भारतीय उपखंडातील राष्ट्रे आहेत. ही सर्वच राष्ट्रे इतिहास, भूगोल, धर्म व सांस्कृतिक दृष्ट्या परस्परांशी जोडली गेलेली आहेत.

**सार्कची रचना –**

या संघटनेची भारत, बांगलादेश, भूतान, नेपाळ, पाकिस्तान, मालदीव आणि श्रीलंका ही सात सदस्य राष्ट्रे आहेत. संघटनेच्या घटनेनुसार सार्क देश प्रमुखांची दरवर्षी बैठक होईल. मंत्री परिषद ही या संघटनेची धारण ठरविणारी सर्वोच्च्य समिती आहे. या समितीत सर्व सदस्य राष्ट्रांचे परराष्ट्र मंत्री सदस्य असतील आणि त्यांची बैठक सहा महिन्यातून एकदा होईल, असे निश्‍चित करण्यात आले आहे. सार्क संघटनेचे कायम स्वरूपाचे सचिवालय स्थापन करण्यात आले असून ते नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहे. महासचिव हा सचिवालयाचा प्रमुख असतो. त्याचा कार्यकाल दोन वर्षाचा असतो. हे पद क्रमाक्रमाने सदस्य राष्ट्रांना मिळते. सार्क संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी व संघटनेचे कामकाज चालविण्यासाठी सदस्य राष्ट्रांना वार्षिक वर्गणी द्यावी लागते. ती ऐच्छिक स्वरूपाची असते. त्यासाठी एक तांत्रिक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

**सार्कची उद्दिष्टे –**

१. 'सार्क' परिषदेतील राष्ट्रांत प्रादेशिक सहकार्य, विश्‍वास व सामंजस्य निर्माण करणे.

२. 'सार्क' मधील राष्ट्रांतील नागरिकांचे राहणीमान उंचावण्यासाठी कल्याणकारी योजना व कार्यक्रम आयोजित करणे.

३. आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास होण्यासाठी लोकांना संधी देऊन त्यांचा व्यक्तिविकास घडवून आणणे.

४. सार्क सदस्य राष्ट्रांतील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करून त्यांचा आर्थिक विकास घडवून आणणे.

५. सदस्य राष्ट्रांनी परस्परांचे प्रश्न समजावून घेऊन परस्परांत विश्वास, सामूहिक स्वावलंबन आणि सामूहिक स्वयंस्फूर्तता यांना चालना देणे.

६. 'सार्क' संघटनेतील सदस्य राष्ट्रांनी विश्वस्त संस्था स्थापन करून परस्परांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे.

७. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, औद्योगिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात परस्परांना सहकार्य व मदत करून संयुक्तपणे कार्य करणारी व्यवस्था निर्माण करणे.

८. अन्य विकसनशील राष्ट्रांशी सलोख्याचे, सहकार्याचे संबंध ठेवणे.

९. समान ध्येये आणि उद्दिष्ट्ये असणाऱ्या प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्याचे संबंध वाढविणे.

या जाहिरनाम्यामध्ये वरील सर्व क्षेत्रातील सहकार्य हे राष्ट्रीय सार्वभौमत्व, प्रादेशिक एकात्मता, राजकीय स्वातंत्र्य, दुसऱ्या देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे आणि परस्परहीत या तत्त्वावर आधारलेले असेल. तसेच हेही स्पष्ट करण्यात आलेले आहे की, सार्क संघटनेमार्फत होणारे सहकार्य हे या विभागातील देशामध्ये जे द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संबंध आहेत, त्यांना पर्याय नसून ते पूरक आहेत.

**सार्क शिखर परिषद –**

सन १९८५ मध्यें ढाका येथे संपन्न झालेल्या सार्क संघटनेच्या पहिल्या संमेलनानंतर सार्क राष्ट्र प्रमुखांच्या नियमितपणे परिषदा होत असत.

| शिखर परिषद क्रमांक | वर्ष | स्थान | देश |
|---|---|---|---|
| १. | १९८५ | ढाका | बांगलादेश |
| २. | १९८६ | बंगलोर | भारत |
| ३. | १९८७ | काठमांडू | नेपाळ |
| ४. | १९८८ | इस्लामाबाद | पाकिस्तान |
| ५. | १९९० | माले | मालदीव |
| ६. | १९९१ | कोलंबो | श्रीलंका |
| ७. | १९९३ | ढाका | बांगलादेश |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | १९९५ | नवी दिल्ली | भारत |
| ९. | १९९७ | माले | मालदीव |
| १०. | १९९८ | कोलंबो | श्रीलंका |
| ११. | २००२ | काठमांडू | नेपाळ |
| १२. | २००४ | इस्लामाबाद | पाकिस्तान |
| १३. | २००५ | ढाका | बांगलादेश |
| १४. | २००७ | नवी दिल्ली | भारत |
| १५. | २००८ | कोलंबो | श्रीलंका |
| १६. | २०१० | थिम्फू | भूतान |
| १७. | २०११ | ॲड्यू सीटी | मालदीव |
| १८. | २०१४ | काठमांडू | नेपाळ |

**सार्कचे मूल्यमापन –**

सार्क संघटनेला आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि विशेषत: आशिया खंडाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे. परंतु म्यानमार (ब्रह्मदेश) आणि अफगाणिस्तान या विभागातीलच असणाऱ्या या देशांना संघटनेत स्थान न दिल्यामुळे ही संघटना अपूर्ण वाटते. असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. सार्क सभासद राष्ट्रांच्या संरक्षणाच्या दृष्टीने त्यांच्यातील अनेक जुने वाद कायम आहेत. यातील काही सदस्य राष्ट्रांचे संबंध तणावपूर्ण आहेत. तरीदेखील आर्थिक, व्यापारी व सांस्कृतिक क्षेत्रात सहकार्य प्रस्थापित करण्यात या संघटनेला यश मिळालेले आहे. ही बाब निश्चितच नोंद घेण्यासारखी आहे. तरीदेखील एखाद्या लहानशा विस्फोटक परिस्थितीमुळे या संघटनेतील एकता केव्हांही भंग होऊ शकते अशी भिती व्यक्त केली जाते. वस्तूत: पाकिस्तान या संघटनेत असला तरी त्याचा कल इस्लामी संघटनेकडे आहे. नेपाळ कधी चीनकडे झुकलेला असतो तर कधी भारताकडे झुकलेला दिसून येतो.

या संघटनेतील सदस्य राष्ट्रांमध्ये राजकीय व्यवस्था देखील भिन्न भिन्न आहेत. उदा. भूतानमध्ये राजेशाही आहे तर नेपाळमध्ये राजेशाहीचा अंत होऊन नेपाळ लोकशाहीकडे वळला आहे. पाकिस्तानमध्ये अधूनमधून लष्करी राजवट असल्याचे दिसते. भारत, श्रीलंका व मालदीवमध्ये लोकशाही आहे. तसेच बांगलादेशामध्ये देखील अधूनमधून राजकीय व्यवस्थेत बदल होताना दिसतात. काही इस्लामी, काही बौद्ध, एक हिंदु राष्ट्र तर भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. बांगलादेश–भारत व पाकिस्तान–भारत या दोन राष्ट्रांमध्ये अनेक मुद्याबाबत मतभेद आहेत. त्यामुळे या संघटनेची गती अत्यंत धीमी आहे. परस्परावर विश्वास दाखविल्यास, व्यापार वृद्धी केल्यास व परस्परातील प्रश्न शांततेच्या व सामंज्यस्याच्या मार्गाने सोडविल्यास या क्षेत्रातील राष्ट्रांचा विकास निश्चितच घडून येईल.

**युरोपियन महासंघ –**

जगातील सर्वात शक्तिशाली व्यापारसंघ म्हणून युरोपियन महासंघाचा उल्लेख केला जातो. युरोपियन महासंघाचा उदय हा जरी सन १९९१ च्या ऐतिहासिक मॅस्ट्रिश करारातून झालेला असला तरी गेल्या चाळीस वर्षांत युरोपियन राष्ट्रांमध्ये झालेल्या विविध करारांनी या महासंघाची पाश्‍र्वभूमी तयार केली. यापैकी काही प्रमुख करार खालीलप्रमाणे आहेत.

१. पॅरिस करार – १९५१ साली फ्रान्स, पूर्व जर्मनी, बेल्जियम, लक्झेंबर्ग, इटली, हॉलंड इत्यादी राष्ट्रांनी 'युरोपियन कोळसा आणि पोलाद समुदाय' ही संस्था स्थापन केली.

२. रोम करार – १९५७ साली उपरोक्त राष्ट्रांनी 'युरोपियन आर्थिक समुदाय' व 'युरोपियन अणुशक्ती समुदाय' असे दोन संघ स्थापन केले.

३. एकीकृत युरोपियन कायद्यासंबंधीचा करार – १९८६ साली युरोपियन राष्ट्रांनी युरोपियन कायद्यासंबंधीचा करार करून युरोपिय कौन्सिल स्थापन केले.

४. मॅस्ट्रिश करार (१९९१)– मॅस्ट्रिश करारानुसार १९९३ साली युरोपियन संघाची स्थापना झाली. युरोपियन महासंघाचे कार्यालय बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे आहे.

**युरोपियन महासंघाची उद्दिष्टे –**

अ) आर्थिक, व्यापारी, सामाजिक, राजकीय पातळीवरील सहकार्य वाढवण.

आ) आर्थिक, वित्तीय संघ स्थापण्याच्या दिशेने प्रयत्न.

इ) एका चलन व्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न.

ई) युरोपच्या सामूहिक संरक्षण आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न.

उ) संपूर्ण युरोपसाठी एका नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न.

**युरोपियन महासंघाची रचना –**

युरोपियन महासंघाचे सात प्रमुख घटक असून त्यात –

१. युरोपियन परिषद – सात सदस्य राष्ट्रांच्या शासकीय प्रमुखाचा समावेश होतो.

२. युरोपियन संसद – यामध्ये युरोपियन महासंघाच्या १५ सदस्य राष्ट्रांमधून निवडून आलेले ६२६ सदस्यांचा समावेश होतो. या सदस्यांची निवड पाच वर्षांसाठी केली जाते.

३. मंत्री परिषद – यामध्ये १५ सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्याच्या समावेश होतो. सर्व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे कार्यही परिषद करते.

४. युरोपियन आयोग – युरोपियन आयोगाचे कार्य हे कार्यकारी प्रमुखाचे असून युरोपियन महासंघाच्या दैनंदिन प्रशासनाचे कार्य युरोपियन आयोगाकडून होतो.

५. न्यायालय - न्यायालयाचे मुख्यालय लुक्झेंबर्ग येथे असून यात १५ न्यायाधीशांचा समावेश होतो. युरोपियन महासंघाच्या करारातील तरतुदींचा अर्थ लावण्याचे कार्य न्यायालयाकडून होते.

६. लेखापालांचे न्यायालय - युरोपियन महासंघाचा खर्च आणि उत्पन्नाच्या हिशोबाचे कार्य लेखापालांच्या न्यायालयाकडून होते.

७. सल्लागार समित्या - विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी अशा समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. उदा. आर्थिक आणि सामाजिक समिती, क्षेत्रिय समिती इ.

युरोपियन महासंघाकडून सन १९९९ मध्ये एक चलनव्यवस्था सुरू करण्यात आली. ती युरो नावाने ओळखली जाते. सन २००० पर्यंत युरोपियन महासंघाच्या १५ सदस्य राष्ट्रांपैकी ११ राष्ट्रांनी या चलनव्यवस्थेचा स्वीकार केला जातो.

**स्वय :- अध्ययन प्रश्न - २**

रिकाम्या जागा भरा.

१) संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना --------- रोजी झाली.

२) दक्षिण आशियाई सहकार्य संघटनेची स्थापना ---------- मध्ये झाली.

३) दक्षिण आशियाई देशांची पहिली परिषद --------- ची राजधानी ढाका येथे डिसेंबर १९८५ मध्ये झाली.

४) २०१४ ची सार्क शिखर परिषद ही ----------- या देशात भरली.

५) युरोपियन महासंघाची स्थापना --------- साली झाली.

६) युरोपियन महासंघात ---------- सदस्य राष्ट्रे आहेत.

७) युरोपियन महासंघाचे मुख्यालय -------- येथे आहे.

**४.२.३ आर्थिक संघटना -**

**❊ जागतिक व्यापार संघटना - (W.T.O)**

जागतिक राजकारणात व अर्थकारणात आमुलाग्र बदल होत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक व्यवहाराची गुंतागुंत असल्याने त्यात सुलभपणा आणण्यासाठी जागतिक स्तरावर काही कायदे करण्यात आले. याच हेतूने सन १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी एकत्र येवून जकात व व्यापाराबाबतच्या सर्वसामान्य करार करण्यात आला. यालाच 'गॅट करार' या प्रसिद्ध नावाने ओळखले जाते. भारत गॅटचा संस्थापक सदस्य देश आहे. गॅटच्या मार्गदर्शक तत्वानुसार जगात जकात व व्यापार व्यवहार चालत होते. परंतु सन १९८५ नंतर गॅटच्या व्यवहाराबाबत मतभेद निर्माण झाल्याने गॅटचे तत्कालिन अध्यक्ष ऑर्थर डंकेल यांनी एक मसूदा तयार केला. हा मसूदा जगभर 'डंकेल प्रस्ताव' म्हणून ओळखला गेला. डंकेल यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यासाठी

उरूग्वे येथे गॅट राष्ट्रांची परिषद भरली. डंकेल प्रस्तावाला प्रारंभीच्या काळात गरीब व विकसनशील देशांनी जागतिक कामगार संघटनानी मोठा विरोध केला. परंतु अंतिमत: एप्रिल १९९४ मध्ये सर्व सदस्य राष्ट्रांनी डंकेल प्रस्तावाला मान्यता देवून अंतिम कायदा तयार करण्यात आला. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून अनेक विकसनशील देशांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. गॅट कराराची सुधारीत आवृत्ती म्हणजे डंकेल प्रस्ताव होय आणि याच डंकेल प्रस्तावाचे रूपांतर १ जानेवारी १९९५ रोजी 'विश्व व्यापार संघटनेत' झाले.

गॅट हा केवळ कायदेशीर करार होता. तर जागतिक व्यापार संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. हा या दोन्हीमधील मुख्य व महत्त्वाचा फरक आहे. वस्तू व सेवांचा व्यापार, विदेशी गुंतवणूक, बुद्धी संपदेचा अधिकार, राशी पतन विरोधी कायदे वगैरेबाबत लक्ष ठेऊन मुक्त व चांगल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी विश्व व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आलेली आहे. सध्या १५१ राष्ट्रे विश्व व्यापार संघटनेची सदस्य राष्ट्रे असून एकूण जागतिक व्यापारापैकी ९० टक्के व्यापार विश्व व्यापार संघटनेअंतर्गत होतो. विश्वव्यापार संघटनेचे मुख्यालय जिनिव्हा (स्विर्त्झलँड) येथे आहे.

**विश्व व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये –**

विश्व व्यापार संघटनेच्या करारानुसार संघटनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

१. परस्पर सहकार्य आणि समतेच्या तत्त्वावर उदार आणि मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणे.

२. विश्व व्यापार संघटनेच्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक, औद्योगिक विकासासाठी प्रयत्न करणे.

३. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतच्या नियमांचा आढावा व पुनर्विलोकन करणारी यंत्रणा स्थापन करणे.

४. सदस्य राष्ट्रामधील जनतेचे राहणीमान उंचावणे.

५. आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालणे.

६. गरीब, अविकसीत राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करणे.

७. सदस्य राष्ट्रामधील व्यापाराशी निगडीत वाद, तंटे यांची सोडवणूक करणे.

**जागतिक व्यापार संघटनेची रचना –**

विश्व व्यापार संघटनेचे मुख्य दोन घटक आहेत.

अ) मंत्री परिषद    ब) सर्वसाधारण परिषद

**अ) मंत्री परिषद –**

जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीपरिषदेमध्ये सदस्य राष्ट्रांच्या व्यापार मंत्र्यांचा समावेश होतो. मंत्री परिषद ही विश्व व्यापार संघटनेची सर्वोच्च निर्णय घेणारी समिती असून दर दोन वर्षांनी या परिषदेची बैठक होते. बहुपक्षीय व्यापाराबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्याचे कार्य मंत्री परिषद पार पाडत असते. मंत्री परिषदेच्या बैठका आतापर्यंत सिॲटल, दोहा, कॅनकन या ठिकाणी पार पडलेल्या आहेत. मंत्री परिषदेमध्ये होणारे निर्णय सर्वानुमते घेतले जातात. परंतु जेव्हा एखाद्या प्रस्तावाला विरोध होतो तेव्हा त्यावर मतदान घेतले जाते.

**ब) सर्वसाधारण परिषद –**

विश्व व्यापार संघटनेच्या सर्वसाधारण परिषदेत सदस्य राष्ट्रांच्याा व्यापार प्रतिनिधींचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक सुरळीतपणे चालवा, त्यातील गुंतागुंत कमी व्हावी, मतभेद वाढीस लागू नयेत आणि त्यातून संघर्ष निर्माण होवू नये. व्यापाराच्या नियमांमध्ये सुधारणा व संशोधन याबाबत सर्वसाधारण परिषद दक्ष असते. विश्व व्यापार संघटनेच्या रचनेमध्ये आणि तिचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी मंत्री परिषद महत्त्वाची भूमिका बजावत असते.

**विश्व व्यापार संघटनेचा जागतिक स्तरावरील प्रभाव व महत्त्व –**

आज राष्ट्रीय व्यापाराइतकेच आंतरराष्ट्रीय व्यापारालाही महत्त्व प्राप्त झालेले आहे. विकसित देशांच्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांचा आर्थिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव वाढत आहे. त्यामुळे त्याचा परिणाम विकसनशील व गरीब राष्ट्रांवर पडत आहे. आर्थिक शक्तीचा हा दबाव वाढत चालल्यामुळे अनेक देशांना आपली आर्थिक धोरणे इच्छा असो अथवा नसो बदलणे भाग पडत आहे. उदा – भारताने स्वातंत्र्योत्तर काळात मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणांचा पुरस्कार केला होता. परंतु विकसित राष्ट्रांच्या दबावामुळे भारताने आपले आर्थिक धोरण बदलले असून सन १९९०–९१ पासून 'खुल्या' किंवा 'मुक्त' अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. हीच परिस्थिती कमी अधिक प्रमाणात जगभरातील देशांमध्ये आढळते.

विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यांना वेग आला आहे. कोणतेच राष्ट्र या प्रक्रियेपासून स्वत:ला दूर ठेवू शकत नाही. विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून गरीब राष्ट्रांचे शोषण बडी राष्ट्रे करीत आहेत. अशीही टीका होत आहे. त्यामुळेच अनेक देशामध्ये विश्व व्यापार संघटनेच्या धोरणांना लोक विरोध करताना दिसतात. या टीकेत निश्चितच तथ्य आहे. असे असले तरी गरीब व अविकसित राष्ट्रांच्या दृष्टीने विचार केल्यास श्रीमंत राष्ट्रांकडून मिळणारे भांडवल व तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ या साधनांचा वापर गरीब राष्ट्रांना उपलब्ध झाला आहे. जागतिक स्तरावर असणारी व्यापारी बंधने विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून घटवली गेल्यास व जग व्यापारी दृष्ट्या मुक्त झाल्यास जगातील ग्राहक असलेल्या जनतेचा सर्वाधिक फायदा होईल असे म्हटले जाते. थोडक्यात विश्व व्यापार संघटनेचा जागतिक राजकारणांवर व अर्थकारणावर सर्वाधिक प्रभाव असल्याचे आणि तो उत्तरोत्तर वाढत असल्याचे दिसते.

**जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदा**

| मंत्री परिषद | दिनांक | स्थल |
|---|---|---|
| १. | ९ ते १३ डिसेंबर, १९९६ | सिंगापूर |
| २. | १८ ते ते २० मे, १९९८ | जिनीव्हा (स्वित्झर्लंड) |
| ३. | ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर, १९९९ | सिटले (युनायटेड स्टेटस) |
| ४. | ९ ते १४ नोव्हेंबर, २००१ | दोहा (कतार) |
| ५. | १० ते १४ सप्टेंबर, २००३ | कॅनकूर (मेक्सिको) |

| | | |
|---|---|---|
| ६. | १३ ते १८ डिसेंबर, २००५ | हाँगकाँग |
| ७. | ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २००९ | जिनीव्हा (स्वित्झर्लंड) |
| ८. | १५ ते १७ डिसेंबर, २०११ | जिनीव्हा (स्वित्झर्लंड) |
| ९. | ३ ते ६ डिसेंबर, २०१३ | बाली (इंडोनेशिया) |

**ब्रिक्स (BRICS)**

ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका यांच्या समूहाने म्हणजेच 'ब्रिक्स' देशांनी आपली स्वतंत्र बँक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या बँकेचे वर्णन मिनी आय. एम. एफ. असे केले जात आहे. २०१० पर्यंत या संघटनेला 'ब्रिक' असे नाव होते. २०११ साली दक्षिण आफ्रिका या संघटनेत सामील झाल्यानंतर याला 'ब्रिक्स' असे संबोधण्यात येऊ लागले.

**'ब्रिक्स' संघटनेच्या परिषदा**

| बैठक क्र. | तारीख | ठिकाण | यजमान देश |
|---|---|---|---|
| १. | १६ जून २००९ | येकातरिनबर्ग | रशिया |
| २. | १५ एप्रिल २०१० | ब्राझीलिया | ब्राझील |
| ३. | १४ एप्रिल २०११ | सान्या | चीन |
| ४. | २९ मार्च २०१२ | नवी दिल्ली | भारत |
| ५. | २६-२७ मार्च २०१३ | डरबन | दक्षिण आफ्रिका |
| ६. | १४-१६ जुलै २०१४ | फोर्टलिझा | ब्राझील |
| ७. | ८-९ जुलै २०१५ | ऊफा | रशिया |

**ब्रिक्स बँकेची उद्दिष्ट्ये –**

१. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि पर्यायाने अमेरिका आणि अन्य पाश्चात्य राष्ट्रांच्या आर्थिक प्रभावाला आव्हान देण्यासाठी 'ब्रिक्स बँक' स्थापन करणे.

२. विकसनशील राष्ट्रांना विकास कार्यासाठी जागतिक बँक व नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही संस्था अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांच्या प्रभावाखाली कार्य करतात. त्यामुळे अप्रत्यक्षपणे या देशांची मर्जी सांभाळावी लागते. तेव्हा हे आर्थिक वर्चस्व झुगारून देण्यासाठी 'ब्रिक्स' बँकेची स्थापना करणे आवश्यक झाले.

३. ब्रिक्सच्या सदस्य राष्ट्रांतील पायाभूत विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देणे. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते बांधणी, पूल उभारणे, विमानतळ उभारणी यांचा समोवश असेल. आरोग्य, शिक्षण, शेती, नगर विकास, स्वच्छ ऊर्जा या घटकांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

४. ब्रिक्स बँक स्थापन करण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांच्या संसदाकडून तिला मान्यता घेणे आवश्यक आहे.

५. बिगर – ब्रिक्स देशांनाही आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्न केले जातील. उदा. अर्जेंटिना या देशाला आर्थिक मदत करण्याचा आग्रह ब्राझीलचे अध्यक्ष दिलमा रौसेफ यांनी धरला.

६. आफ्रिकेसाठी विभागीय केंद्र दक्षिण आफ्रिकेत स्थापन केले जाईल.

७. ब्रिक्स बँकेतील सर्व सदस्य राष्ट्रांना समान अधिकार असतील.

८. दहशतवादाचा निषेध करून त्याचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न करणे. कोणत्याही प्रकारच्या दहशतवाद्यांना वित्तपुरवठा, प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे यापासून सर्व संस्थांनी दूर राहणे, हे उद्दिष्ट ब्रिक्स बँकेच्या बाबतीत राहील.

**ब्रिक्स बँकचे स्वरूप –**

ब्रिक्स बँकेचे मुख्यालय शांघाय (चीन) येथे राहील. बँकेचे पहिले अध्यक्षपद भारताकडे सहा वर्षे राहील. त्यानंतर अनुक्रमे ब्राझील आणि रशियाकडे प्रत्येकी पाच वर्षे राहील. ब्राझील देशाच्या फोर्टलेझा येथे १४ ते १६ जुलै, २०१४ दरम्यान परिषद होऊन ब्रिक्स बँक स्थापनेचा निर्णय घेण्यात आला.

**ब्रिक्स बँकेचे भागभांडवल –**

ब्रिक्स बँकेचे प्राथमिक भागभांडवल १०० अब्ज डॉलर असेल. सुरूवातीला सर्व सदस्य देश प्रत्येकी १० अब्ज डॉलर निधी देणार आहेत. भारत, रशिया आणि ब्राझील हे देश प्रत्येकी १८ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहेत. दक्षिण आफ्रिका पाच अब्ज डॉलरचे भांडवल देणार आहे. चीनने ब्रिक्स बँकेच्या राखीव निधीसाठी ४१ अब्ज डॉलरची तरतूद केली आहे. ब्रिक्स बँकेचे १०० कोटी डॉलर हे भागभांडवल आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (३०० अब्ज डॉलर) आणि जागतिक बँक (४०० अब्ज डॉलर) यांच्या प्रमाणात फारच कमी आहे. तरीपण भविष्य काळात ब्रिक्सची राष्ट्रे या नव्या विकास बँकेचे भागभांडवल वाढवतील कारण ब्रिक्स देशांमध्ये सर्वाधिक आर्थिक संपन्न असणारा चीन देश ब्रिक्स बँकेत विपुल प्रमाणात भागभांडवल पुरवू शकेल.

**'ब्रिक्स' संघटनेचे महत्त्व –**

'ब्रिक्स बँकेची स्थापना हे जागतिक अर्थव्यवस्थेतील लक्षणीय पाऊल असून सर्व देशांच्या विकासासाठी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार असणारी ही व्यवस्था अत्यंत महत्त्वपूर्ण आहे,' असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्राझील देशातील फोर्टालेझा येथे झालेल्या सहाव्या ब्रिक्स परिषदेत मांडले. 'न्यू डेव्हलपमेन्ट बँक'(N.D.B.) उभारण्यामागचा उद्देश या पाच राष्ट्रांना संकटकालीन आर्थिक तरतूद करण्याचा आहे. विकसित देशांसाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक ही वित्तीय संस्था असल्याने विकसनशील राष्ट्रांकडे निधीसाठी दुर्लक्ष होत असल्याची भारतासह या ब्रिक्स संघटनेतील सदस्य राष्ट्रांची तक्रार होती. या उद्देशानेच या नव्या ब्रिक्स बँकेच्या रूपात समांतर व्यवस्था आकारास येत आहे.

विकसनशील राष्ट्रांना विकास कार्यासाठी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही आर्थिक संघटना अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांच्या प्रभावाखाली काम करतात. या दोन्ही संस्थांच्या नावात जागतिक आणि आंतरराष्ट्रीय असे शब्द असले तरी या दोन्ही संस्था अमेरिका आणि युरोप

खंड यांच्याच प्रभावाखाली चालतात. जागतिक बँकेच्या स्थापनेपासून गेल्या सत्तर वर्षात या बँकेचे प्रमुखपद एकाही बिगर अमेरिकी व्यक्तीस मिळालेले नाही तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संघटनेचे प्रमुखपद कायमपणे युरोपीय व्यक्तीकडेच राहील, अशीच ही व्यवस्था आहे. याचे कारण असे की, या दोन्ही संस्थांच्या स्थापनेत अमेरिका आणि युरोपचा लक्षणीय वाटा आहे. या दोन्ही आर्थिक संस्थांचे भागभांडवल सशक्त, सक्षम आहे. जागतिक बँकेच्या आणि नाणेनिधीच्या भागभांडवलाचा पुरवठा विकसनशील राष्ट्रांना देताना अमेरिका आणि पाश्चात्त्य राष्ट्रांच्या मर्जीप्रमाणे होत असतो. आंतरराष्ट्रीय आर्थिक अनिश्चितता पाहता विकसनशील देशांनाही आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी 'ब्रिक्स' या समांतर आर्थिक संस्थेची आवश्यकता भासू लागली. त्यानुसार २०१४ साली ब्रिक्स देशांच्या परिषदेमध्ये ब्रिक्स बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ब्रिक्स बँकेसाठी राखीव निधी म्हणून ब्रिक्स देशांकडून निधी गोळा केला जाणार आहे. सर्वाधिक निधी (४१०० कोटी डॉलर) चीनकडून येणार आहे. त्यामुळे ब्रिक्सच्या आर्थिक व्यवहारांवर चीनचा प्रभाव वाढेल आणि भारत, रशिया, ब्राझील या देशांना चीनच्या दबावाखाली राहावे लागेल अशी उपरोधिक टीका या आर्थिक संघटनेवर होऊ लागलेली आहे. वास्तविक भविष्यात चीन हा देशच महासत्ता होणार आहे असे म्हणता येणार नाही. ब्रिक्स संघटनेतील सर्वच राष्ट्रे आपल्याला प्रयत्नानुसार प्रगतीपथावर राहणार आहेत. तेव्हा ब्रिक्सवर एकांगी टीका करणे अयोग्य वाटते.

**दहशतवादाला विरोध –**

विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी स्थापन झालेल्या 'ब्रिक्स' देशांच्या परिषदेमध्ये दहशतवादी विरोधातील जाहीरनामा मंजूर करण्यात आला. राजकीय, धार्मिक, वैचारिक अशा कोणत्याही कारणावरून निर्माण झालेल्या दहशतवादाचे समर्थन होऊ शकणार नाही, असे स्पष्ट करतानाच सर्व प्रकारच्या दहशतवादाचा या जाहीरनाम्यात निषेध करण्यात आलेला आहे. या ठरावामुळे भारताच्या भूमिकेला मोठ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून पाठबळ मिळाल्याचे दिसून येते. कोणत्याही प्रकारच्या दहशतवाद्यांना वित्तपुरवठा, प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे यासारख्या कृतीपासून सर्व संस्थांनी दूर राहावे असे सर्व सदस्य राष्ट्रांना आवाहन करण्यात आले. यामध्ये मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याचा आदर राखण्यात यावा असे म्हटले आहे.

**प्रादेशिक / क्षेत्रिय संघटनांचे महत्त्व –**

क्षेत्रिय संघटनावर काही टीकाकार असा आरोप करतात की, या संघटनाची संयुक्त राष्ट्रांचे महत्त्व कमी केले आहे. एवढेच नव्हे तर या संघटनानी संयुक्त राष्ट्रांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण केलेला आहे. परंतु ही टीका चुकीच्या गृहितांवर आधारलेली आहे. कारण संयुक्त राष्ट्र संघटना ज्या स्वरूपाचे काम करते त्याला पुरक असेच काम वरील प्रादेशिक संघटना करीत असल्याचे दिसते. या संघटनांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती संयुक्त राष्ट्रांशी तुलना करता खूपच मर्यादित असल्याचे दिसते. जगातील कोणत्याही विभागातील शेजारील राष्ट्रांनी संघटित होऊन आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट स्वाभाविक आणि योग्य मानली पाहिजे. संघटित झाल्याने आपल्या समस्यांवर ते देश परिणामकारकपणे मात करू शकतात. म्हणजेच एक प्रकारे या क्षेत्रिय संघटना त्यांच्या विभागीय समस्या स्वत:च सोडवून संयुक्त राष्ट्रांवरील कामाचा ताण कमी करतात. असेच म्हटले पाहिजे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांना जागतिक महत्त्वाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करणे शक्य होईल. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे या

क्षेत्रिय संघटनांच्या सहकार्या आढ विचार प्रणालीचा अडसरही येताना दिसत नाही. थोडक्यात संयुक्त राष्ट्रांचे महत्त्व कमी न करता क्षेत्रिय संघटना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. असा निष्कर्ष काढल्यास तो चुकीचा ठरणार नाही.

**स्वयं: अध्ययन प्रश्न – ३**

**पुढील विधाने चुक की बरोबर ते लिहा.**

१) भारत हा गॅटचा संस्थापक सदस्य देश आहे. ( )

२) जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य कार्यालय जिनीव्हा येथे आहे. ( )

३) एकूण जागतिक व्यापारापैकी ९० टक्के व्यापार विश्व व्यापार संघटनेमार्फत होतो. ( )

४) २०१४ साली ब्रिक्स संघटनेची सहावी परिषद ब्राझील देशात झाली. ( )

५) ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका हे 'ब्रिक्स' बँकेचे सदस्य आहेत. ( )

**४.३ सारांश –**

✲ विसाव्या शतकातील आंतरराष्ट्रीय राजकारणाची विभागणी चार व्यवस्थांमध्ये केली जाते. यात पहिल्या महायुद्धापूर्वीची युरोपीयन महासत्तांमधील सत्तासमतोलाची व्यवस्था पहिल्या व दुसऱ्या महायुद्धा दरम्यानची आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्यवस्था.

✲ शीत युद्धाचा अर्थ म्हणजे दोन परस्पर विरोधी राजकीय पद्धती किंवा विचारधारांमध्ये चाललेला संघर्ष होय. शीतयुद्धोत्तर नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था. १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठे बदल झाले. सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारणावरील प्रभुत्व वाढले. एक ध्रुवीय जगाचा उदय, इराण-इराक युद्धाचा शेवट, लोकशाहीकरण, स्पर्धा व आर्थिक संबंधाना महत्व प्राप्त झाले.

✲ नवीन विश्व रचनेची वैशिष्ट्ये – १) एक ध्रुवी विश्वरचना २) बहुध्रुवीय विश्वरचना ३) आर्थिक हितसंबंधाना महत्व ४) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व ५) लोकशाहीला गती ६) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाद ७) संयुक्त राष्ट्राची बदलती भूमिका ८) नि:शस्त्रीकरणाला गती ९) पर्यावरणाची गरज १०) व्यापारी संघाची भूमिका ११) जागतिकीकरण १२) मानवी हक्काचे संरक्षणाची जाणीव १३) वंशवाद १४) धार्मिक मूलतत्ववाद १५) आंतरराष्ट्रीय दहशतवाद १६) मानवी सुरक्षेचा प्रश्न.

✲ प्रादेशिक संघटना म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी राज्यांचा समुदायांनी एकत्र येवून स्थापन केलेले संघटन.

✲ सार्क – बांगला देशचे तत्कालीन अध्यक्ष झिया उर रेहमान यांच्या प्रयत्नामुळे सार्क संघटनेच्या स्थापनेला चालना १९८५ मध्ये सार्क संघटनेची स्थापना. भारत बांगलादेश, भूतान, नेपाळ, पाकिस्तान, मालदिव व श्रीलंका ही सार्कची सदस्य राष्ट्रे असून काठमांडू (नेपाळ) येथे सार्कचे मुख्यालय आहे. सदस्य राष्ट्रांतील परस्पर सहकार्यात वाद, इतर विकसनशील राष्ट्रांशी सहकार्य वाढवणे, एकमेकांच्या समस्यांबद्दल परस्पर विश्वास व समजूतदारपणाची जाणीव ठेवणे हा सार्क मुख्य उद्दिष्टे आहेत.

✼ युरोपियन महासंघ :- मॅस्ट्रिश करारातून १९९३ मध्ये युरोपियन महासंघाचा उदय झाला. ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी इ. १५ राष्ट्रे या संघटनेची सदस्य राष्ट्रे आहेत. युरोपियन महासंघाचे मुख्यालय ब्रुसेल्स (बेल्जियम) येथे आहे. आर्थिक वित्तीय संघ स्थापन करणे. एक चलन व्यवस्था निर्माण करणे, युरोपसाठी एक नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे हे या संघाचे मुख्य उद्देश आहेत.

✼ आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जागतिक पातळीवर आर्थिक संघटनेची निर्मिती झाली. जागतिक व्यापार / विश्व व्यापार संघटना - १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी एकत्र येवून गॅटची स्थापना केली. गॅटचे नवे रूप म्हणजे डब्ल्यू टी. ओ. होय. १ जानेवारी १९९५ रोजी W.T.O ची स्थापना झाली. गॅटचे अध्यक्ष ऑर्थर डंकेल यांनी मांडलेल्या प्रस्तावाला १९९४ मध्ये सर्व सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली आणि विश्व व्यापार संघटनेचा उदय झाला. ९० टक्के व्यापार (W.T.O) अंतर्गत होतो. १) उदार व मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणे २) संघटनेतील सदस्यांच्या आर्थिक औद्योगिक विकासासाठी प्रयत्न करणे ३) सदस्य राष्ट्रांमधील जनतेचे राहणीमान सुधारणे ४) आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालणे इ. या संघटनेची प्रमुख ध्येये आहेत. मंत्री परिषद व सर्वसाधारण परिषद हे दोन प्रमुख घटक या संघटनेच्या रचनेतील आहेत. विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळालेली आहे.

✼ 'ब्रिक्स' या संघटनेविषयी जाणून घेणे अतिशय महत्वाचे ठरते. ब्रिक्स ही संघटना २००९ साली उदयाला आली याचे पाच सदस्य देश असून त्यात भारत, रशिया, ब्राझील, चीन आणि दक्षिण आफ्रिका या राष्ट्राचा समावेश होतो. प्रत्येक देशांच्या आद्य अक्षरावरून 'ब्रिक्स' शब्द तयार झाला असून ही बँक सध्या अस्तित्वात असलेल्या अमेरिकन वर्चस्ववादी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला पर्याय म्हणून स्थापन होत असणारी बँक आहे. पायाभूत सुविधासाठी निधी उभा करून देणे, आफ्रिकेसाठी विभागीय केंद्र स्थापने, ब्रिक्स बँकेतील सर्व सदस्याना समान अधिकार देणे, ब्रिक्स देशांच्या संसदांकडून बँकेला मान्यता घेणे.

जागतिक बँकेच्या आणि नाणेनिधीच्या भागभांडवलाचा पुरवठा विकसनशील राष्ट्रांना देताना अमेरिका आणि पाश्यात्य राष्ट्रांच्या मर्जीप्रमाणे होत असतो हे पाहता विकसनशील देशांनाही आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी ब्रिक्स देशांनी ब्रिक्स बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.**

| | | |
|---|---|---|
| पेरिस्त्रोईका | - | पुनर्रचना |
| ग्लासनोस्त | - | स्वातंत्र्य |
| एक ध्रुविय | - | एक केंद्री |
| युक्तीवाद | - | मत प्रदर्शन |
| मनोवैज्ञानिक | - | मानसिक |
| वैश्विक | - | जागतिक |
| विश्वरचना | - | जगाची रचना, व्यवस्था |
| सर्वेसर्वा | - | प्रमुख, मुख्य सूत्रधार |

| | | |
|---|---|---|
| एकाधिकारशाही | – | हुकूमशाही |
| अग्रक्रम | – | प्राधान्य |
| संवर्धन | – | विकास |
| मानवधिकार | – | मानवाचा हक्क |
| द्विपक्षीय | – | दोन राष्ट्रांमधील |
| बहुपक्षीय | – | दोन किंवा अधिक राष्ट्रांमधील |
| विस्फोटक | – | धोकादायक |
| धीमी | – | संथ |
| तटस्थ | – | अलिप्त |
| मनुष्यबळ | – | मनुष्य शक्ती, कामगार |
| गृहित | – | समजूत |
| प्रभुत्व | – | वर्चस्व |

**४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

स्वयं: अध्ययन प्रश्न – १

१) शीत युद्धोत्तर

२) जॉर्ज बुश (सिनिअर)

२) सोविएत रशिया

४) मिखाईल गोर्बाचेव्ह

५) शीतयुद्ध

**स्वयं : अध्ययन प्रश्न – २**

१) २४ आक्टोंबर १९४५ २) १९८५

३) बांगलादेश

४) नेपाळ (काठमांडू)

५) १९९३

६) १५

७) ब्रुसेल्स (बेल्जियम)

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

१) बरोबर २) बरोबर ३) बरोबर

४) बरोबर ५) बरोबर.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय.

**पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) शीतयुद्ध म्हणजे काय? शीतयुद्धोत्तर जगाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय दहशतवाद व धार्मिक मूलतत्ववाद म्हणजे काय व त्याचे परिणाम स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेच्या भूमिकेची चर्चा करा.

४) जागतिक व्यापार संघटनेचे स्वरूप सांगून तिच्या कार्याचे मूल्यामापन करा.

५) प्रादेशिक संघटनांचा उदय स्पष्ट करून सार्क संघटनेचे यशापयश स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१) सार्क संघटना

२) युरोपीय महासंघ

३) जागतिक व्यापार संघटना

४) एकध्रुवीय विश्वरचना

५) बहुध्रुवीय विश्वरचना

६) ब्रिक्स – आर्थिक संघटना

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके / ग्रंथ


१) डॉ. वसंत रायपूरकर, (२००६) आंतरराष्ट्रीय संबध, मंगेश प्रकाशन

२) डॉ. देवळाणकर शैलेंद्र, (२००५) आंतरराष्ट्रीय संबध, औरंगाबाद, विद्या प्रकाशन

३) डॉ. पेंडसे अरूणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा (२०११), आंतरराष्ट्रीय संबध शितयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, हैद्राबाद, ओरिएंट लॉगमन

४) प्रा. वराडकर र. घ, आंतरराष्ट्रीय संबध आणि राजकारण, विद्या प्रकाशन नागपूर

५) डॉ. भोगले शांताराम, आंतरराष्ट्रीय संबध, नागपूर, विद्या प्रकाशन

६) डॉ. कुलकर्णी बी. वाय, व प्रा. नाईकवाडे अशोक, आंतरराष्ट्रीय . संबध सिद्धांत व्यवहार, पुणे, विद्या प्रकाशन

७) http:/www./org/english : World Trade Organization the wtolei/inbrief/elintrooehtm. (WTO in Brief)

८) डॉ. डोळे ना. य., आंतरराष्ट्रीय संबध, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.

९) Palmer-Perkins, International Relations 1985, New Delhi, C.B.S. Publishers.

१०) डॉ. पाटील वा. भा; आंतरराष्ट्रीय संबध, नागपूर श्री मंगेश प्रकाशन


●●●

## सत्र ६ : घटक १

## परराष्ट्र धोरण (FOREIGN POLICY)


१.० उद्द्ष्टिे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्टे

१.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक

१.२.३ भारतीय परराष्ट्र धोरणाचे मुलतत्वे

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७. अधिक वाचनासाठी पुस्तके


### १.० उद्द्ष्टिे :

१) परराष्ट्र धोरणाचा अर्थ व व्याख्या अभ्यासणार आहोत.

२) परराष्ट्र धोरणांच्या उद्दिष्टांची चर्चा करणार आहोत.

३) भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्धारक घटकांचे विवेचन करणार आहोत.

४) भारतीय परराष्ट्र धोरणांच्या मुलभूत तत्वांचा अभ्यास करणार आहोत.

### १.१ प्रास्ताविक :

मागील सत्रात आपण आंतरराष्ट्रीय संबंध, राष्ट्रीय सत्ता, राजनय, नवीन राजकीय सत्ता या घटकांचा अभ्यास केला आहे. या प्रकरणात आपण परराष्ट्र धोरण व भारताच्या पराराष्ट्र धोरणांची मुलभूत तत्वे अभ्यासणार आहोत. २१ व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला अत्यंत महत्वाचे स्थान

आहे. आधुनिक जगातील कोणतेही राज्य स्वयं: पूर्ण व स्वावलंबी नाही. सर्व राज्यांना आपल्या विकासासाठी परस्परांशी संबंध निश्चित करावे लागतात. हे परस्पर संबंध निश्चीत अशा तत्वावर आधारित ठेवले जातात. राज्य आपली उद्दिष्टये प्राप्त करण्यासाठी असे परस्पर संबंध परराष्ट्र धोरणाच्या आधारानेच निश्चित करीत असतात. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाची 'गुरुकिल्ली' असे परराष्ट्र धोरणाकडे पाहिले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासामध्ये जगातील महत्वाच्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास एक महत्वाचा भाग ठरतो.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्टे :

**परराष्ट्र धोरण अर्थ (Meaning of Foreign Policy)**

जगातील प्रत्येक राष्ट्र आपणास सोईस्कर असलेले वर्तन इतर राष्ट्रांनी करावे, यासाठी आपल्या प्रभावाचा विविध स्वरुपात वापर करुन त्या त्या राज्यातील राज्यकर्त्यांचे मत परिवर्तन करते यालाच ढोबळमानाने परराष्ट्र धोरण म्हटले जाते.

परराष्ट्र धोरण ही एक गतिमान प्रक्रिया असते. कारण अंतर्गत व बाहय अशा अनेक घटकांचा परिणाम होवून परराष्ट्र धोरण आकारला येत असते. परराष्ट्र धोरणाच्या गतिमानतेमुळे कोणतीही एक व्याख्या परिपूर्ण ठरत नाही. तथापि अभ्यासाच्या दृष्टीकोनातून काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) नॉर्मन हिल :**

यांच्यामते एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात आपल्या हिताच्या संवर्धनार्थ केलेल्या प्रयत्नांचे सार म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**२) चार्लर्स बर्टन :**

यांच्यामते, परराष्ट्र धोरण म्हणजे राजसत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावित करण्यासाठी केलेल्या कृतीचा क्रम होय.

**३) राज्यशास्त्र कोष :**

यांच्यामते, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राविषयी स्वीकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**४) जॉर्ज मोडेल्स्की :-**

यांच्या मते, परराष्ट्र धोरण म्हणजे अशी व्यवहार पद्धती होय की, जिच्याद्वारे एक राज्य दुसऱ्या राज्यास आपल्या इच्छेनुसार व्यवहार करण्यास प्रवृत्त करते.

**परराष्ट्रे धोरणांची उद्द्ष्टे : (Objectives of the foreign policy)**

राष्ट्रहित हा परराष्ट्र धोरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण राष्ट्रहिताचा उद्देश पुढे ठेवूनच निर्धारित करीत असते.

## राष्ट्रीय हित : (National Interest)

राष्ट्रहित हा परराष्ट्र धोरणांचा आरंभबिंदू असतो. परराष्ट्र धोरणाचे सार सर्वस्व राष्ट्रहिताशीच निगडीत झालेले असते. राष्ट्रहित साधताना प्रसंगी आंतरराष्ट्रीय हितालाही तिलांजली दिली जाते. राष्ट्रहिताला बगल देणारी ध्येय धोरण स्वीकारुन देशाचे नेतृत्व जन न्यायालयात उभेच राहू शकत नाहीत. बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार राष्ट्रहिताच्या कल्पनेतही बदल होत असतात. उदा. एकलकोंडपणाचा बुरखा पांघरण्याऱ्या जपानने १८५४ नंतर हा बुरखा झुगारुन परदेशांशी व्यापार करण्याचा पायंडा घातला. राष्ट्रहितावर आधारीतच परराष्ट्र धोरण आखावे लागते. इतर राष्ट्रांच्या हिताशी आपल्या राष्ट्रहिताची जुळवणी करवून घ्यावी लागते.

राष्ट्रहितानूसार परराष्ट्र धोरणाच्या उद्‌देशास पुढील तीन वर्गात विभागता येईल.

### १) प्राथमिक उद्दिष्टे : (Primary Objects)

#### (i) देशाचे रक्षण :

परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्वाचे उद्दिष्ट देशाचे रक्षण करणे होय. किंबहुना परराष्ट्र धोरणाचे ते अंतिम ध्येय मानले जाते. प्रत्येक देश आपला भूभाग, नागरीक, संपत्ती याचे जीवाच्या कराराने रक्षण करीत असते. देशाच्या रक्षणबरोबर सांस्कृतिक मूल्ये, विचारसरणी, जीवन पद्धती यांचे रक्षण व प्रसार करण्याचे प्रयत्न होतात. त्यामुळे 'स्वदेश रक्षण' हे कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचे त्रिकालाबाधीत असे सुत्र आहे.

#### (ii) आर्थिक विकास :

कोणत्याही शासनाचा मुख्य उद्देश देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हा असतो. तेच देशाच्या परराष्ट्र धोरणाचे आवश्यक व अपरिहार्य उद्दिष्टयही असते. स्वत:चा आर्थिक विकास साधण्यासाठी देशांतर्गत अनुकूल अशी व्यवस्था स्वीकारणे तर आलेच, पण जागतिक स्तरावरही आपली आर्थिक उन्नती होईल असेच तत्त्वज्ञान इतर देशांना स्वीकारण्यास भाग पाडण्याचे प्रयत्नही धोरणाद्वारे केले जातात.

#### (iii) राष्ट्रसत्तेची वृध्दी :

राष्ट्रीय सत्तेवरच कोणत्याही राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान अवलंबून असते. म्हणून राष्ट्रसत्तेत वाढ करणे, हे ही परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रसत्तेत वाढ करण्याच्या उद्देशाने परराष्ट्र धोरण निश्चिीत करीत असते.

### २) मध्यवर्ती उद्दिष्ट्ये : (Central Objects)

#### (i) राज्यातील दबावगटांचे हितसंबंध सुरक्षित :

परराष्ट्र धोरण निर्धारण करणाऱ्या यंत्रणेवर निरनिराळे दबाव गट प्रभाव पाडीत असतात. त्यामध्ये आर्थिक, शेती, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक आदिंचा समावेश केला जातो. उदा. भारतातील मुस्लिम दबाव गट अंतर्गत आणि बाहय धोरणावर प्रभाव पाडतो.

**(ii) भूविस्तार :**

काही राष्ट्रे आपल्या बळाच्या जोरावर भूमीविस्तार करण्यात मग्न असतात. कधी बाजारपेठा, कधी कच्च्या मालासाठी, कधी राष्ट्रप्रतिष्ठेच्या अट्टाहासापायी भूप्रदेश पादाक्रांत करण्याची चढाओढ अनेक देशात चालू असते. त्यामूळे भूविस्तार करणे हे अनेक देशांच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्टयच असते. उदा. चीनने उदात्तीकरणाने विस्तारवादी धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळेच १९६२ साली भारतावर आक्रमण करुन बराचसा भूप्रदेश त्यांनी मिळविला आहे.

**(iii) राष्ट्रप्रतिष्ठा :**

प्रत्येक राष्ट्राची इच्छा असते की, जगात आपला सन्मान व्हावा, प्रतिष्ठा वाढावी, त्याकरिता सदैव प्रयत्नशील असते. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया यांच्यात अंतराळातील संशोधनातील स्पर्धेमागे जागतिक प्रतिष्ठा मिळविण्याचा उद्‌देश होता.

**(iv) अराजकीय संबंध :**

परराष्ट्र धोरण ठरवित असताना राजनैतिक संबंधाबरोबरच अराजनैतिक संबंध निर्माण केले जातात. त्यामध्ये आर्थिक विकास, समाजकल्याण, संस्कृती, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान संबंधी जी उद्दिष्टये असतात. याचा राजकारणाशी संबंध नसतो. उदा. स्त्रीयांचा प्रश्न, लहान मुलांचा प्रश्न, धर्मपरिषद इ. क्षेत्रातील देवाण घेवाण याचा उल्लेख अशा अराजनैतिक संबंधामध्ये होतो.

**३) जागतिक उद्दिष्टये : (World Objectives)**

काहीवेळा आपल्या राष्ट्राचे हित पाहता जगाच्या कल्याणासाठी जेंव्हा एखादे धोरण ठरविले जाते. तेव्हा त्यास जागतिक उद्दिष्टये असे म्हणतात. अशी उद्दिष्टये प्रामुख्याने जगातील शक्तीशाली राष्ट्र ठरवित असतात. उदा. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन करण्यासाठी अमेरिका, इंग्लड, फ्रान्स अशा शक्तिशाली राष्ट्रांनीच प्रयत्न केलेले दिसून येते. तसेच जागतिक शांततेसाठी (**CTBT**) हा करार उदयास आला. हा करार साध्य करण्यासाठी अमेरिकेचे प्रयत्न कारणीभूत ठरले.

## १.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक (Determinant's of India's Foreign Policy)

देशाचे परराष्ट्र धोरण हे अनेक घटक आणि शक्ती यांचा एकत्रित परिपाक असतो. त्यातील काही घटक चिरस्थायी असतात. काही तात्पुरते असतात. कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण ही एका व्यक्तीच्या अगर गटाच्या इच्छेचा परिणाम नसतो. म्हणून भारताचे परराष्ट्र धोरण निर्धारण करणारे घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१) भौगोलिक स्थिती : (Geographical Situation)**

राष्ट्राची भौगोलिक स्थिती कायम असते. भौगोलिक परिस्थितीचा विचार परराष्ट्र धोरण ठरविताना करावा लागतो. भारताच्या उत्तरेला हिमालय व दक्षिणेला हिंदी महासागर आहे. यामूळे परकियांनी या भागाला लष्करीदृष्टया खूपच महत्व दिले. भारत हा दक्षिण आशियाचा केंद्रबिंदू आहे. पश्चिम आशिया, आग्नेय आशिया आणि

अतिपूर्वेकडील प्रदेश यांना जोडणारा भारत हा महत्वपूर्ण दुवा आहे. म्हणून पंडीत नेहरुंनी भारताला पूर्व व पश्चिम आशिया यामधील सेतू असे म्हटले होते. भारतातील नदया, पर्वतरांगा, सुपीक जमीन या सर्व गोष्टी परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक आहेत.

आजच्या वेगवान हवाई वाहतूकीच्या आणि लष्करी तंत्रज्ञानातील प्रगतीच्या युगात भौगोलिक घटकांचे महत्व कमी झाले आहे. असे म्हटले जाते. परंतू हे पूर्णत: सत्य नाही. अदयापही हा घटक महत्वपूर्ण आहे. उदा. सार्क, आसियान इ. संघटनांची निर्मितीचे मुख्य आधार सदस्य राष्ट्रामधील भौगोलिक जवळीकता हा आहे.

**२) आर्थिक घटक : (Economic Factors)**

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आर्थिक दृष्टीने विचार करता भारताची गणना अप्रगत राष्ट्रामध्ये केली जात होती. एक अप्रगत शेती असलेला देश एवढीच भारताची आर्थिक प्रतिष्ठा होती. भारताचे रशियाशी प्रस्थापित झालेले संबंध औद्योगिक विकासाला सहाय्यक ठरलेले आहेत. भारताने आपल्या विकास योजनांच्या पूर्ततेसाठी विदेशांतून अनिर्बंध मदत घेतलेली आहे. तरी कोणत्याही गटाच्या राजकारणात आपणांस गुंतवून न घेता आपली स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्था निर्धाराने राबविलेली आहे.

**३) नैसर्गिक साधनसंपत्ती : (Natural Resources)**

भारत हा देश अन्नधान्य, खनिज संपत्तीने सुजलाम सुफलाम आहे. औद्योगिकीकरणा बरोबरच देशात शेती विकास आणि हरित क्रांती प्रगतीच्या पथावर आहे. देशात पेट्रोल, तांबे, सोने, युरेनियम, गंधक अशी खनिज साधन संपत्ती देखील देशात आहे. या सर्व बाबी देशाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत. उदा. भारताला मोठ्या प्रमाणात पेट्रोलियम पदार्थासाठी आखाती देशावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे भारतानं नेहमी आखाती देशाबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**४) लोकसंख्या : (Population)**

भारताचा लोकसंख्येबाबत जगात दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये तरुणांचा वाटा मोठा आहे. यामूळेच भारताला तरुणांचा देश म्हणून संबोधण्यात येते. लोकसंख्या हा घटक परराष्ट्र धोरणांवर प्रत्यक्ष परिणाम करणारा घटक आहे. आज अमेरिकेची लोकसंख्या ३० कोटीच्या आसपास आहे. एवढी लोकसंख्या कमी असूनही संपूर्ण जगावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. आज अमेरिकेतील वैद्यक, तंत्रज्ञान, शिक्षण इ. क्षेत्रात मोठया प्रमाणात भारतीय आहेत. भारताला रोजगाराची गरज आहे आणि अमेरिकेला कुशल मनुष्य बळाची गरज आहे. देशाच्या विकासाला आवश्यक असेल तेवढी लोकसंख्या त्याचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होत असतो.

**५) सहनशीलता :**

सहनशीलता भारतीय परराष्ट्र धोरणाचे पारंपारिक साधन आहे. दुसऱ्यांच्या विचारधारेचा आदर करणे हा भारताचा नैतिक गुण आहे. महात्मा गांधीनी असे म्हटले होते की, हिंदु धर्म प्रत्येक व्यक्तीस आपला विश्वास आणि धर्मानुसार ईश्वराची उपासना करण्याचा अधिकार प्राप्त करुन देतो. भारतीय विचारधारा कोणाचाही अनादर

करत नाही. त्यामूळे भारतीय परराष्ट्र धोरणांचा सहनशीलता हा एक घटक आहे.

### ६) ऐतिहासिक घटक : (Historical Factor's)

देशाचे परराष्ट्र धोरण प्रभावित करणारा घटक म्हणून इतिहास या घटकाचीही दखल घ्यावी लागते. भारतीय इतिहासात भारतीयानी भारतीय भूखंडाबाहेर दिग्विजय गाजवून साम्राज्य सत्ता कोणत्याही काळात स्थापन केलेली नाही व परराष्ट्र धोरणात कधीच उपयोग केलेला नाही. भारतातील साम्राज्ये ही भारतीय सीमेपुरती मर्यादित होती. भारत इतिहासातही विदेशांतील साम्राज्यवादापासून अलिप्त होता. इंग्रज आपले शत्रू नसून इंग्रजी साम्राज्यवाद हा आपला शत्रू आहे ही शिकवण भारतीय परंपरेला अनुसरुनच होती.

### ७) विचारप्रणाली : (Ideology)

भारताने आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करताना विचारप्रणालीला महत्व दिले होते. भारताच्या राष्ट्रीय समस्या सत्य व अहिंसात्मक मार्गाने सोडविले जातात. म्हणून आंतरराष्ट्रीय समस्या ही सोडविण्यासाठी भारताने शांततेच्या मार्गाचा स्वीकार केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर भगवान बुध्द, महावीर, महात्मा गांधीजींच्या विचाराचा खोलवर परिणाम झालेले आहे. भारतीय तत्वज्ञानाप्रमाणेच उदारमतवाद, साम्यवाद याही विचारसरणीचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र नीतीवर पडला आहे.

### ८) नेतृत्व : (Leadership)

राष्ट्राचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य शासनाचे पदाधिकारी करीत असतात. त्यामूळे परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात नेतृत्वाची भूमिका महत्वाची असते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या नेतृत्वाची सुत्रे पंडित नेहरु यांच्या हाती आली. देशाचे पंतप्रधान व परराष्ट्र मंत्री पद स्वीकारल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणाला निश्चित आकार देण्याचे कार्य केले. म्हणून पंडित नेहरुंना भारतीय परराष्ट्र धोरणांचे शिल्पकार म्हणतात.

### ९) लष्करी सामर्थ्य : (Military Capacity)

राष्ट्राच्या स्वत:च्या संरक्षण सिध्दतेचा प्रभाव त्याच्या परराष्ट्र धोरणावर पडत असतो. सैनिकी क्षमतेचा विचार न करता जर राष्ट्राने परराष्ट्र धोरणाचे निर्णय घेतले तर ते फलदायी ठरणार नाहीत. उदा. १९६२ भारत-चीन युध्द, १९७१ च्या पाकिस्तान बरोबरच्या युध्दाच्या वेळी रशियाशी २० वर्षाचा संरक्षण करार करावा लागला. संघर्षापेक्षा सहकार्याचे परराष्ट्र धोरण निर्धारित करण्याकडे बहुतेक राष्ट्राचा कल आहे. प्रत्येक राष्ट्राला आपली संरक्षण सिध्दता सैनिक क्षमता वाढवून करावी लागते म्हणून भारत व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी १९९८ मध्ये अणुचाचण्या घडवून आणले व संरक्षण सिध्दतेची चमक दाखविली.

### 10) लोकमत : (Public Opinion)

लोकशाही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण निर्धारित करणारा एक घटक म्हणून लोकमताचे महत्व जाणून घेणे आवश्यक आहे. परराष्ट्र धोरण ठरविणे हे पूर्वीप्रमाणे आता राजकीय नेत्याची मक्तेदारी राहिलेली नाही. जनतेमध्ये त्यावर चर्चा होते. लोक त्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करतात. राज्यकर्त्यांना त्याची दखल घ्यावीच लागते. उदा. भाजप

सरकारने लोकमताचा पाठिंबा लक्षात घेवून अणुस्फोट केला. देशातील अंतर्गत लोकमताचा जसा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडतो तसे जगातील लोकमताच्या दबावामुळे देखील देशांना आपल्या परराष्ट्रीय धोरणात परिवर्तन करणे अपरिहार्य ठरते.

**११) जागतिक परिस्थिती :**

जागतिक परिस्थिती प्रत्येक राष्ट्राचे परस्पर धोरण निर्धारित करत असते. युध्दजन्य परिस्थितीतील परराष्ट्र धोरण शांततेच्या धोरणातील परराष्ट्र धोरणापेक्षा वेगळे असते. शीत युध्दच्या दरम्यान भारताने परराष्ट्र धोरणात अलिप्ततेला महत्व दिले. १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी Look East Policy स्वीकारुन पूर्वेकडील देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**१२) मित्रराष्ट्रे:**

कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात परराष्ट्र धोरणात मित्र राष्ट्रांना खूपच महत्व देण्यात आले आहे. कारण मित्र राष्ट्रांच्या सहकार्यावर देशाची प्रगती अवलंबून असते. जागतिक पातळीवर जे राष्ट्र मित्रराष्ट्र मिळविण्यात यशस्वी होते. ते राष्ट्र सर्वच क्षेत्रात पुढारलेला असतो. उदा. भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रभावी मित्र मिळविण्यात सोव्हिएट रशियांच्या रुपाने यश आले. रशियाने केलेल्या मदतीवर भारताला विकास करणे सोपे गेले.

**१३) कायदेमंडळ :**

परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य हे कार्यकारी मंडळाचे असते. मात्र त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य कायदेमंडळ करीत असते. कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयास कायदेमंडळाने बहुमताने विरोध केला तर कार्यकारी मंडळास धोरणामध्ये बदल करावा लागतो. उदा. १९६२ च्या भारत-चीन युध्दप्रसंगी पं. नेहरुच्या असंलग्नतेच्या धोरणाचे व पंचशील कराराची झालेली असफलता याबाबत संसदेत चर्चा झाली होती.

वरील अनेक घटकांच्या माध्यमातून भारत आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करीत असतो.

**(अ) स्वयं: अध्ययनाची प्रश्ने :**

(1) परराष्ट्र धोरणाचा केंद्र बिंदू कोणता ?

(2) पं. नेहरुंनी कोणाला पूर्व आशिया व पश्चिम आशिया यामधील सेतू म्हटले आहे ?

(3) भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार कोणास म्हणतात ?

(4) कौटिल्याने कोणता ग्रंथ लिहिला आहे ?

(5) भारत - चीन युध्द कोणत्या साली झाले ?

**१.२.३ भारतीय परराष्ट्र धोरणांची मुलतत्वे : (Basic Principals of India's Foreign Policy)**

परस्पर सहकार्यातून सर्वांचा विकास घडवून आणणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्वपूर्ण तत्व राहिले आहे. शेजारील राष्ट्रासोबत सतत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे भारताने वेळोवेळी प्रयत्न केला आहे. त्यामूळे

भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

**१. अलिप्तता : (Non-alignement)**

अलिप्तता याला गटनिरपेक्षतेचे धोरण असेही म्हणतात. भारत जेंव्हा स्वतंत्र झाला तेंव्हा जगाचे दोन गटात विभाजन झाले होते. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवलशाही राष्ट्राचा एक गट तर सोव्हिएत रशियांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्राचा दुसरा गट होता. भारताने मात्र दोन्ही गटांपासून अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यास अलिप्तवाद असे म्हणतात.

अलिप्तवादाचा उद्देश दूसऱ्या एका नवीन गटाची निर्मिती न करता त्या दोन गटांमध्ये समन्वय निर्माण करणे. त्यांच्यातील संघर्ष कमी करुन आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा आहे.

**२. जागतिक शांतता : (World Peace)**

जागतिक स्तरावर शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रमुख तत्व आहे. युध्द आणि संघर्ष स्वतंत्र भारताच्या आर्थिक व राजकीय विकासाच्या विरोधी आहे याची जाणीव भारताला सुरुवातीपासूनच होती. त्यामुळे भारताने शांततेच्या परराष्ट्र धोरणावर भर दिला आहे. आंतरराष्ट्रीय वाद-विवाद, संघर्ष दूर करण्यासाठी भारताने शांततामय साधनांचा म्हणजेच व्दिपक्षीय वार्ता, चर्चा, बोलणी, करार यांचा वापर केलेला आहे. उदा. भारत पाकिस्तान मधील मतभेद दुर करण्यासाठी नेहरु लियाकत अली करार, सिमला करार, आग्रा शिखर परिषद इ. प्रयत्न केले आहेत. युनो सार्क यासारख्या संघटनामध्येही शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारताची भूमिका महत्वाची राहीली आहे.

**३. साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध : (Policy to oppose imperialism and colonialism)**

भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक मुलभूत तत्व म्हणजे साम्राज्यवाद वसाहतवादास विरोध होय. भारताला वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांच्या बंधनातून जावे लागले आहे. त्याच्या दुष्परिणामाची जाणीव भारताने भोगली आहे. त्यामुळे जगातील साम्राज्यवाद संपुष्टात यावा असे भारताचे मत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने जी राष्ट्रे स्वातंत्र्यप्राप्तींसाठी प्रयत्न करीत होती त्यांना पाठिंबा दिला होता. वसाहतवाद व साम्राज्यवाद संपुष्टात आल्याशिवाय जागतिक शांतता प्रस्थापित होणार नाही. म्हणून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात साम्राज्यवादाला विरोध दर्शविला आहे.

**४. वर्णभेद किंवा वंशभेदाला विरोध : (Opposition to Recialism)**

साम्राज्यवाद व वसाहतवादाप्रमाणे भारताने वर्णभेदालाही विरोध केला आहे. ऑस्ट्रेलिया, ऱ्हाडेशिया, दक्षिण अमेरिका, दक्षिण आफ्रिका या देशांतील गोऱ्या सत्ताधारी लोकांनी कृष्णवर्णीय लोकांना अन्यायाची वागणूक दिली. भारताने या राष्ट्राच्या वर्णभेदाला विरोध करुन तो प्रश्न युनो या आंतरराष्ट्रीय संघटनेसमोर मांडला. वर्णभेद संपुष्टात आल्याशिवाय समता प्रस्थापित होवू शकणार नाही म्हणून भारताने सातत्याने आपल्या परराष्ट्रीय धोरणाव्दारे वर्णभेदाचा निषेध चालू ठेवलेला आहे.

## ५. आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांना साहाय्य :

आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांचा सर्वांगीण विकास होवून राजकीय स्थैर्य व शांतता प्रस्थापित व्हावी, या उद्देशाने भारताने अनेक शिखर परिषदा व संम्मेलने आयोजित केले होते. उदा. १९४७ आशियाई राष्ट्रांचे संम्मेलन १९५५ साली वसाहतवादाचा निषेध करुन पंचशील तत्वाच्या स्वीकारण्यासाठी बाडूंग येथे परिषद घेतली. १९६१ बेलग्रेड येथे शिखर परिषद घेवून भारताने अलिप्त राष्ट्रांत ऐक्य व मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता.

## ६. विकसित राष्ट्रांशी सहकार्य :

भारताने अमेरिका, रशिया, इंग्लड, जर्मनी, जपान या विकसीत राष्ट्रांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध ठेवलेले आहेत. या राष्ट्राबरोबर आर्थिक, सांस्कृतिक व व्यापारविषयक संबंध प्रस्थापित केलेले आहे. जगात अमेरिका, रशिया या राष्ट्र गटात सामील न होता, त्याच्या बरोबर सहकार्याचे संबंध प्रस्थापीत केले आहेत. आर्थिकदृष्ट्या विकसित असणारी राष्ट्रे अविकसित राष्ट्रांवर आर्थिक वर्चस्व निर्माण करत आहेत. गॅटसारख्या करारात बहुसंख्य राष्ट्रे सामील झाले आहेत. भारताने या नव्या आर्थिक धोरणाचे स्वागत करुन प्रगत, आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या देशाशी संबंध ठेवण्याचे धोरण स्विकारले आहे.

## ७. पंचशील तत्त्वांचा स्वीकार :

जागतिक क्षेत्रातील संघर्ष, ताणतणाव कमी होवून शांततामय सहजीवन व सहकार्याची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने पं. नेहरु यांनी पंचशील तत्त्वांचा स्वीकार केला. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे पंचशील तत्त्वे ही मुलभूत तत्त्वे आहेत. १९५४ रोजी भारताचे पंतप्रधान पं. नेहरु व चीनचे पंतप्रधान चौ.एन.लाय यांच्यात पंचशील करार झाला. पंचशील तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

अ. परस्परांशी प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्व याबद्दल परस्परांनी आदर बाळगणे.

ब. परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे.

क. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

ड. राष्ट्रीय समानता बाळगून परस्परांचे हित सांभाळणे.

इ. शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्त्वाचा स्वीकार करणे.

वरील भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्त्वे अभ्यासली असता, भारताने आपल्या राष्ट्रीय हिताबरोबरच आंतरराष्ट्रीय हीताचाही विचार केलेला आहे.

## ब. स्वयं: अध्ययनाचे प्रश्न :

१. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली ---------- राष्ट्राचा गट होता.

(साम्यवादी, भांडवलशाही, लोकशाही, हुकूमशाही)

२. भारताने ------ गटाची निर्मिती केली.

(अलिप्ततावादी, लोकशाही, साम्यवादी, भांडवलशाही)

३. १९६१ साली ------- येथे अलिप्त राष्ट्रांचे शिखर परिषद आयोजित केली होती.

(बाडुंग, तेहरान, ताश्कंद, बेलग्रेड)

४. भारतीय परराष्ट्र धोरणांचे शिल्पकार ------- यांना म्हटले जाते.

(म. गांधी, डॉ. आंबेडकर, पं. नेहरु, डॉ. राजेंद्र प्रसाद)

५. --------- साली भारत-चीन यांच्यात पंचशील करार झाला.

(१९४८, १९५४, १९५६, १९६१)

**१.३ सारांश :**

परराष्ट्र धोरण ही एक गतिमान प्रक्रिया असते. कारण अंतर्गत व बाह्य अशा अनेक घटकांचा परिणाम होवून परराष्ट्र धोरण आकारला येत असते.

**परराष्ट्रीय धोरणांची उद्दिष्ट्ये :**

१) प्राथमिक उद्दीष्ट्ये :

i) देशाचे रक्षण ii) आर्थिक विकास iii) राष्ट्रसत्तेची वृध्दी

२) मध्यवर्ती उद्दीष्ट्ये :

i) राज्यातील दबाव गटांचे हितसंबंध सुरक्षित ii) भूविस्तार iii) राष्ट्रप्रतिष्ठा iv) अराजकीय संबंध

३) जागतिक उद्दीष्ट्ये :

- **भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक :**

१) भौगोलिक स्थिती २) नैसर्गिक साधनसंपत्ती ३) आर्थिक घटक

४) लोकसंख्या ५) सहनशीलता ६) ऐतिहासिक घटक

७) विचारप्रणाली ८) नेतृत्व ९) लष्करी सामर्थ्य

१०) लोकमत ११) जागतिक परिस्थिती १२) मित्रराष्ट्रे

१३) कायदेमंडळ

हे वरील घटक भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक आहेत.

- **भारतीय परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्वे :**

  १) अलिप्तता २) जागतिक शांतता ३) साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध

  ४) वर्णभेद किंवा वंशभेदाला विरोध ५) आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांना साहाय्य

  ६) विकसित राष्ट्रांशी सहकार्य ७) पंचशील तत्वांचा स्वीकार

  हे भारतीय परराष्ट्र धोरणांची मूलतत्वे आहेत.

**१.४ पारिभाषिक शब्द :**

१) वसाहतवाद : एका राज्याने दुसऱ्या राज्यावर (व्यापार, युध्द इ. च्या माध्यमातून) अधिपत्य गाजविणे.

२) कृष्णवर्णीय : आफ्रिका व अमेरिका खंडातील एक जमात

३) भांडवलशाही : एक आर्थिक विचारसरणी, उत्पन्नाच्या साधनावर खाजगी मालकी असणारी अर्थव्यवस्था

४) राष्ट्रहीत : प्रत्येक राष्ट्रांचा स्वत:च्या फायदयाचा दृष्टीकोन

५) अलिप्ततावाद : शीतयुध्दाच्या काळात साम्यवादी (सोव्हिएत रशिया) आणि भांडवलशाही (अमेरिका) या दोन महासत्तापासून अंतर ठेवून राहणारी विचारसरणी.

६) वर्णभेद : कृष्णवर्णीय लोकांच्या प्रति गौरवर्णीय लोकांनी दाखविलेली दुजाभाव द. आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांनी गौरवर्णियांच्या दुजाभावाविरुध्द आंदोलनात विकसित झाले.

७) वंशभेद : सर्व वंशाचे लोक एकसमान नाहीत असे मानणारा विचार.

**१.५ स्वयं: अध्ययनांचील उत्तरे :**

अ) १) राष्ट्रहीत

२) भारत

३) पंडीत नेहरु

४) अर्थशास्त्र

५) १९६२ साली

ब) १) भांडवलशाही

२) अलिप्ततावादी

३) बेलग्रेड

४) पंडित नेहरु

५) १९५४

**१.६ सरावासाठी स्वाध्याय :**

१) राष्ट्रहित यावर चर्चा करा ?

२) परराष्ट्र धोरण म्हणजे काय ? परराष्ट्र धोरणांची उद्दिष्टये स्पष्ट करा ?

३) भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक सांगा ?

४) भारताच्या परराष्ट्र धोरणांची मुलभूत तत्वे स्पष्ट करा ?

५) भारतीय परराष्ट्र धोरणाांवर एक निबंध लिहा ?

**१.७ अधिक वाचनांसाठी पुस्तके :**

१) देवलाणकर, शैलेंद्र (२००५), आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स औरंगाबाद

२) के सागर, व्ही. बी. पाटील (२०१०), भारताचे परराष्ट्र धोरण के. सागर पब्लिकेशन्स, पूणे.

३) के. सागर, व्ही. बी. पाटील (२००९), आंतरराष्ट्रीय राजकारण, के. सागर पब्लिकेशन्स, पूणे.

४) डॉ. पंडित नलावडे (२०१४), आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स, औरंगापूरा, औरंगाबाद

५) डॉ. वासंती रासम, डॉ. करिअप्पा खापरे (२०११), आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) प्रा. दि. वा. इन्दापवार (जुन १९७६), प्रचलित विदेशी नीती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

७) प्रा. मनोज बोरगांवकर गोपछडे (१९९८), आंतरराष्ट्रीय संबंध, कल्पना प्रकाशन, नांदेड

८) प्रा. सुधाकर कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

●●●

# सत्र ६ : घटक २

## भारत – अमेरिका संबंध


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.३.१ भारत अमेरिका सुरक्षाविषयक धोरण

२.२.२ भारत अमेरिका अंतराळ सहकार्य आणि सुरक्षा

२.२.३ भारत अमेरिका अणुकरार

२.२.४ भारत अमेरिका संबंधाचे चीनवरील परिणाम

२.२.५ नरेंद्र मोदीचे अमेरिका दौरा

२.२.६ बराक ओबामांची भारत भेट

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७. अधिक वाचनासाठी पुस्तके


२.१ **उद्दिष्टे :**

१) या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला 'भारत व अमेरिका यांच्यातील सुरक्षा विषयक धोरण समजावून घेणार आहोत.'

२) भारत व अमेरिका अंतराळ सहकार्य व सुरक्षा हया संबंधाचा अभ्यास करणार आहोत.

३) भारत व अमेरिका यांच्यातील अणु करार व त्यापुढील आव्हान समजावून घेणार आहोत.

४) अमेरिका – भारत संबंधाचे चीनवरील परिणामांची जाणिव करुन घेणार आहोत.

५) नरेंद्र मोदींचे अमेरिका दौऱ्याचा अभ्यास करणार आहे.

६) बराक ओबामांच्या भारत भेटीची चर्चा करणार आहोत.

**२.१ प्रस्तावना :**

मागील प्रकरणात आपण पराराष्ट्र धोरणाचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलतत्वे ही अभ्यासली आहेत. या प्रकरणात आपण भारत–अमेरिका संबंधाचा अभ्यास करणार आहोत.

भारताच्या स्वातंत्र्यापासून ते शीतयुध्दाच्या शेवटपर्यंत भारत–अमेरिका संबंध तणावपूर्ण राहिले. जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असणारा भारत आणि जगातील सर्वात जुनी व सामर्थ्यवान लोकशाही असलेली अमेरिका या काळात परस्परांचे मित्र ही नव्हते आणि शत्रु ही नव्हते. कारण अमेरिका आणि पाकिस्तान या देशांमध्ये अतिशय जवळचे सामरिक संबंध होते.

इतिहासाने 'करवट बदली है?' --- या उक्तीप्रमाणे काळाची पावले ओळखून वास्तवात चालणारी महामुत्सद्दी प्रयत्न १९९१ पासून केले जात आहेत. भारतासारखी मोठी बाजारपेठ, लोकशाहीवादी व्यवसायपूरक वातावरण अमेरिकेला हवेहवेसच होते. वर्तमान जागतिक व्यवस्थेत अर्थकारणाचे महत्व अनन्यसाधारण आहे आणि ते लष्करी वर्चस्वापेक्षा मोठे यासाठी भारत–अमेरिका संबंध परस्परपूरक असेच आहेत. शीत युध्दोत्तर काळात परिस्थिती झपाटयाने बदलली. आर्थिक हितसंबंधांनी राजकीय हितसंबंधावर मात केली. केवळ विचारसरणीच्या आधारावर एखादया राष्ट्राची उपयुक्तता ठरविण्याची शीतयुध्दकालीन परंपरा शीत युध्दोत्तर काळात धूसर झाली. अनेक क्षेत्रात हितसंबंधाची परस्पर व्यापकता आणि समान राजकीय ध्येय या दोन लोकशाही राष्ट्रांना एकत्र आणण्यात उपयुक्त ठरले. दक्षिण आशियातील बदललेली भू राजकीय समीकरणे, चीनचे वाढते सामर्थ्य, दहशतवादाचे आवाहन आदी घटकांनी भारत–अमेरिका सहकार्याची पाश्‍र्वभूमी तयार केली.

बदलत्या परिस्थितीमध्ये भारत–अमेरिका यांच्यातील सुरक्षा, अंतराळ सहकार्य व सुरक्षा, अणुकरार, भारत अमेरिका संबंधाचे चीनवरील परिणाम, ओबामा व मोदी यांच्यात झालेली वाटाघाटी यासंबंधी अभ्यासपणे आवश्यक ठरले.

**विषय विवेचन**

**२.२.१ भारत अमेरिका सुरक्षा संबंध :**

डॉ. मनमोहन सिंग यांच्या इंग्लड व अमेरिकेच्या भेटीनंतर भारत–अमेरिका यांच्या सुरक्षा विषयक संबंधाला नवीन परिमाण मिळाले आहे. जागतिक व्यवस्थेत एकध्रुवीय सत्तेऐवजी बहुध्रुवीय सत्ता यावी, दहशतवादाचा निपटारा करण्यासाठी दुटप्पी भूमिका न घेता एकत्रित प्रयत्न करावेत. तसेच आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा टिकविण्यासाठी UNO ची पुनर्रचना व्हावी इ. विषयांवर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी आपले विचार UNO मध्ये मांडल्याने

भारत अमेरिका यांच्यातील सुरक्षाविषयक धोरणाला विशेष महत्व प्राप्त झाले.

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका आर्थिक, राजकीय व लष्करीदृष्ट्या प्रबळ होती. या बळावर युनो, डब्लूटीओ, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची निर्मिती केली. शीतयुध्दाच्या काळात भारत, अमेरिका राष्ट्रांतील संबंध नेहमी साशंकतेने होते. पण शीतयुध्दानंतर जागतिक व्यवस्था बदलली आहे. आज भारत अमेरिकेशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करुन आपले राजकीय हीत जपण्याचा प्रयत्न करत आहेत. आज भारत-अमेरिका व्दिपक्षीय आर्थिक वाटाघाटी, आर्थिक विकास, आशिया खंडातील वाढत्या दहशतवादी कारवायांविरुध्द एकत्र लढाई या सारख्या अनेक मुद्यांवर ही राष्ट्रे एकत्र येण्याची प्रयत्न करत आहेत. अमेरिका दक्षिण आशियांत भारताला बलाढय राष्ट्र म्हणून मान्यता देतो, पण जागतिक व्यवस्थेत भारताला स्थान देत नाही. भारताचे आज चीनशीही सलोख्याचे व मैत्रीचे संबंध प्रस्थापीत होत आहेत. सन १९९८ मध्ये आण्विक चाचणी घेवून हिंदी महासागर क्षेत्रात भारत एक महत्वपूर्ण लष्करी सत्ता आहे हे सिद्ध केले आहे.

गेल्या ४ वर्षात भारत-अमेरिका यांच्या संरक्षण विषयक अनेक करार करुन दोन्ही राष्ट्रांच्यामध्ये संयुक्त लष्करी सराव सुरु केले आहे. शिवाय एकत्र नौदल शक्तीचे प्रदर्शन ही झाले आहे. अमेरिकेच्या सामाजिक धोरणानूसार भारतात सैनिकी सहकार्य म्हणजे 'स्थैर्य आशिया' असे होय. फिलीपाईन्स व इंडोनियातील अल कायदयाचे जाळे नेस्तनाबूत करण्यासाठी तसेच दक्षिण चीनवर नजर ठेवण्यासाठी भारताच्या नाविक तळांची गरज अमेरिकेला आहे.

भारताने सद्या मध्य आशियातील राष्ट्राबरोबर तसेच अफगाण, इराण सोबत आपले संबंध प्रस्थापित केले आहेत. भारत व इराण वाढत्या सहकार्यामुळे पूर्णपणे भू-राजकीय पद्धतीत बदल होईल. भारतासाठी इराण हे सामरिकदृष्टया महत्वाचे आहे. भारताने अमेरिका व चीनबरोबर सामरिक मैत्री प्रस्थापित करताना अतिशय दक्ष राहण्याची गरज आहे. अन्यथा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला सुरक्षा विषयक प्रश्नांना विविध पद्धतीनी तोंड दयावे लागेल.

### २.२.२ भारत-अमेरिका अंतराळ सहकार्य :

भारत व अमेरिका यांच्यात २००६ साली सुरक्षा व सामरिकदृष्टया ऐतिहासिक करार झाला. अंतराळ सहकार्य करारावर अमेरिकन विमानविद्या अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख मायकेल ग्रिफिन व भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे प्रमुख अध्यक्ष जी. माधवन नायर यांनी सहया केल्या. या कराराकडे सुरक्षेच्या चौकटीतून बघने गरजेचे आहे.

२००३ मध्ये भारताने 'चांद्रयान' मोहिमेची तयारी केली होती. या मोहिमेचे उद्दिष्टय भारतीय बनावटीच्या तंत्रज्ञानाचे अंतराळ यान वापरुन चंद्राच्या पृष्ठभागाचा संपूर्ण व सर्वांगीण शोध घेणे, चंद्रावरील खनिजे व रसायने या बाबतची माहिती मिळविणे होते. २००८ पर्यंत ही मोहिम राबविण्यासाठी सुमारे ४०० कोटी खर्च केला होता. 'चांद्रयान-१' मोहिमेनुसार भारताच्यावतीने दोन वर्षात मानवरहित अंतराळ यान पाठविण्यात येणार आहे. यासाठी लागणारे 'मिनि सिंथेटीक ॲपर्चर रडार' व 'मून मायनरालॉजी मॅपर' अशी दोन उपकरणे पाठविण्याबाबत अमेरिकेबरोबर करार झाले आहेत. या मोहिमेसाठी अमेरिकेप्रमाणे युरोपियन स्पेस एजन्सीच्या वतीने तीन उपकरणे,

बल्गेरिया देशाकडून एक उपकरण चांद्रयानातून पाठविण्यात येणार आहे.

आज भारताची अंतराळ सिध्दता विकसीत देशांना चकित करुन टाकणारी असली तरी त्यामागे अनेक वर्षाचा प्रयत्न आहे. भारताचा अंतराळ कार्यक्रमाचे दोन टप्पे आहेत. १९७१ ते १९८५ हा पहिला टप्पा, १९८५ ते आत्तापर्यंतचा काळ हा दुसरा टप्पा येतो. पहिल्या टप्प्यात भारताने अमेरिका, जपान, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, सोव्हिएट रशिया या देशाकडुन मदत घेवून अवकाश कार्यक्रमांना एक नवीन दिशा दिली. दुसऱ्या टप्प्यात भारताने दुसऱ्या देशाच्या मदतीवर विसंबून न राहता स्वावलंबाचे धोरण स्विकारले. त्यामुळे स्वदेशी बनावटीचे सुमारे ३२ उपग्रह तयार केले. सन १९८४ मध्ये भारत व अमेरिका यांच्यात एक करार झाला. या करारात सोव्हिएत संघाला संवेदनशील तंत्रज्ञानाबद्दल कोणतीही माहिती तसेच आण्विक तंत्रज्ञानाचे हस्तांतर करु नये इ. अनेक बाबींचा उहापोह करण्यात आला होता. सोव्हिएत रशियांच्या विघटनामुळे जागतिक सुरक्षेचे संदर्भ आणि भू-राजकीय परिस्थितीत बदल झाल्याने अमेरिकेचा भारताकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. मात्र भारताने १९९८ मध्ये पोखरण येथे अणुचाचण्या घेतल्याने अमेरिकेने अण्वस्त्रसारबंदी कायद्याव्दारे भारताच्या अंतराळ कार्यक्रमावर बंधने लादली. पण भारत ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असल्याने काही अटींवर अमेरिका अवकाश, उर्जा, सुरक्षा, औषधे इ. बाबतीत निर्बंध सैल करण्यास राजी झाला. अशा प्रकारचे अमेरिका व भारताचे अंतराळ व सुरक्षाविषयी संबंध आहेत.

**स्वयं : अध्ययनाचे प्रश्न – १**

१) शीतयुध्दाच्या शेवटपर्यंत अमेरिका व भारताचे संबंध कसे होते ?

२) भारताने कोणत्या ठिकाणी अणुचाचणी घेतली ?

३) भारताने 'चांद्रयान' मोहिमेची तयारी कोणत्या सालामध्ये केली ?

४) भारताने स्वदेशी बनावटीचे किती उपग्रह तयार केले आहेत ?

५) भारताने कोणत्या साली अणुचाचण्या घेतल्या ?

**२.२.३ भारत-अमेरिका आण्विक संबंध :**

एकीकडे युध्दाच्या आधारे शांतता निर्माण होवू शकते तर दुसरीकडे कायमस्वरुपी संघर्ष सोडवू शकत नाही. अशी धारणा जागतिक पातळीवर निर्माण झाल्यामुळे अणुशक्तीच्या वापराबाबत विविध विचारप्रवाह आपणांस पाहावयास मिळतात.

**भारत-अमेरिका अणुकरार :**

अणुकरारासाठी भारताला जशी अमेरिकेची गरज आहे. तशी अमेरिकेलाही भारताची गरज आहे. या करारामध्ये काही महत्वाचे मुद्दे डोळयासमोर ठेवून भारताला अणुइंधन देण्यासाठी अमेरिका तयार झालेली आहे. ती खालीलप्रमाणे,

१) चीनच्या वाढत्या लष्करी आणि आर्थिक शक्तीला शह

२) आशिया खंडात आपले लष्करी आणि आर्थिक वर्चस्व

३) भारतीय बाजारपेठेवर नियंत्रण

**कलम १२३ :**

१९५४ साली अमेरिकेने केलेल्या अणुउर्जा कायद्यातील हे एक कलम आहे. यातील तरतूदीप्रमाणे आण्विक इंधनाचा पुर्नवापर, भविष्यात अणुचाचण्या असताना भारत-अमेरिका अणुकराराविषयी सर्व बाबींची सर्वकंष चर्चा होणे गरजेचे आहे.

अमेरिकेच्या लष्करी सहकार्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होणार आहे. अशी भूमिका काही राजकीय पक्ष मांडतात. अणुकरार हा ४० वर्षाच्या मुदतीसाठी आहे. पुढे आणखी १० वर्षासाठी तो वाढविता येईल. जर हा करार मोडावयाचा असेल तर १ वर्ष अगोदर दोन्ही राष्ट्रांनी एकमेकांना नोटीस दयावे लागेल अशी तरतूद आहे. या कराराने भारतातील २२ पैकी १४ अणुभट्ट्या अमेरिकेच्या देखरेखीखाली येणार आहेत. तसेच भारत युरेनियमचा वापर शस्त्रास्त्र निर्मीतीसाठी करु शकतो.

**कराराचे महत्व :-**

भारताने १९७४ व १९९८ मध्ये अणुचाचणी घेतल्याने लादलेली आण्विक अस्पृश्यता संपणार आहे. येत्या १० वर्षात एक उर्जा निर्मितीच्या १०% उर्जा अणुउर्जेपासून मिळविण्याचे उद्दिष्टय पूर्ण करण्यास मदत होणार आहे. अणुतंत्रज्ञानाचा औषधनिर्मिती, हवामानाचा अंदाज वर्तविण्यासाठी संशोधन आणि संरक्षण क्षेत्रासाठी दुहेरी वापर करता येणे शक्य आहे.

**भारताच्या मागण्या :-**

१) अणुप्रक्रीया इंधनाच्या पुर्नवापराचा अधिकार

२) अणुचाचण्या करण्याचा अधिकार

३) अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर स्वाक्षरी नाही.

भारताने वरील तीनही मागण्या पुढे ठेवून हा करार करण्यास समती दिलेली आहे. हा करार भारताला जागतिक सहावी अणुसत्ता म्हणून मान्यता मिळण्यास उपयुक्त ठरणार आहे.

सद्या या करारासाठी भारत सरकारने राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीवर एक समिती नेमली आहे. त्या समितीच्या शिफारशीनुसार या कराराची अंमलबजावणी होणार आहे.

**२.२.४ भारत-अमेरिका संबंधाचे चीनवरील परिणाम :**

भारत-अमेरिका सामरिक संबंधाचे परिणाम पाकिस्तान, चीन, रशियावर होणार आहे. चीनची आर्थिक व

लष्करी ताकद वाढल्यानंतर चीन बाहय जगाशी कसा वागतो, त्यावर सुरक्षेचे सर्व प्रश्न ठरणार आहेत. अमेरिका आणि चीनमध्ये सध्या व्यापारी दृष्टीने सलोख्याचे संबंध आहेत पण धोरणे वेगवेगळी आहेत. तैवान आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांवर या देशामध्ये विवाद होण्याची चिन्हे आहेत. आज अमेरिका जागतिक पातळीवर आर्थिक व लष्करी बाबतीत बलाढय राष्ट्र आहे. भारत आणि चीन आशिया खंडातील प्रबळ राष्ट्रे म्हणून उदयास येत आहेत. दोन्ही देश लोकसंख्या, आण्विक शस्त्रे, आर्थिक विकास, मनुष्यबळ विकासाची साधने याबाबतीत वरचढ असल्यामुळे २१ व्या शतकात दोन्ही राष्ट्रांना उज्ज्वल भविष्य आहे. दोन्ही राष्ट्रे आपापल्या विभागात प्रबळ आहेत, पण आंतरराष्ट्रीय संस्थाबाबत उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या बाबत दोन्ही राष्ट्रे प्रबळ देशाची बरोबरी करुच शकत नाहीत. म्हणून आंतरराष्ट्रीय सुरक्षेचे प्रश्न गुंतागुंतीचे होत असताना दिसतात.

### २.२.५ नरेंद्र मोदीचा अमेरिका दौरा :

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीचा २०१४ सालच्या अमेरिका दौऱ्यात अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्यातील चर्चेनंतर दोन्ही देशांतील संबंधाना एक नवे परिणाम लाभला, आर्थिक, व्यापारी, सामरिक आणि सांस्कृतिक सहकार्य दृढ करण्याचे उभय नेत्यानी ठरविली आहे.

**- जागतिक सुरक्षेसाठी सहकार्याची पर्व :**

दहशतवादाविरोधात गुप्तचर यंत्रणांच्या माहितीची देवाण-घेवाण करारात जागतिक सुरक्षेच्या संदर्भात भागीदार होण्याची भूमिका दोन्ही देशाच्या नेत्यांनी मांडली, दक्षिण आणि पुर्व चिनी समुद्रातील शेजारी देशांशी असलेल्या वादांमध्ये चीनने, ताकदीचे प्रयोग करण्यास सुरुवात करत आहे. त्या पार्श्वभूमीवर भारत अमेरिका यांनी समुद्रातून कायदेशीर व्यापाराचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी एक प्रयत्न करण्याचे दोन्ही देशांच्या नेत्यांनी मान्य केले आहे. व्यापार, गुंतवणूक आणि तंत्रज्ञानामध्ये दोन्ही देशांना फायदा होईल अशा स्वरुपाचे मार्ग शोधण्यासाठी गरज आहे. अत्यंत सक्रिय असलेले अमेरिकी भारतीय समुदाय दोन्ही देशांमधील संबंधात पुल ठरला आहे.

### २.२.६ बराक ओबामांचा भारत भेट :

भारताचे जागतिक राजकारणातील वाढते महत्व लक्षात घेवून तब्बल २२ वर्षे भारताकडे न फिरकणाऱ्या अमेरिकी राष्ट्राध्यक्षांची गैरहजेरीची भरपाई करण्यासाठी बराक ओबामांनी दोनदा भारताला भेट दिली. अलीकडे २६ जानेवारी २०१५ च्या कार्यक्रमाचे बराक ओबामांना प्रमुख पाहुणा म्हणून दुसऱ्यांदा भारत भेट दिली. आता अमेरिका भारताला इतके महत्व का देतो आहे. त्याचे काही महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

**१) बाजारपेठ :**

नजरेच्या वेगाने विस्तारणारी भारतीय बाजारपेठ हे अमेरिकेचे आकर्षण आहे. तर भारताला पायाभूत सेवा सुविधांचा विकास करण्याकरिता परकीय मदतीची आवश्यकता आहे. अमेरिकेला कुशल कामगारांची गरज आहे. तर भारताला आपल्या देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी अमेरिकी उदयोग क्षेत्राची गरज आहे. म्हणून सद्याचे मोदी सरकारने विमाविषयक, उदयोगांसाठी भू-संपादन, कामगार कायदे, करप्रणाली अशा अमेरिकेला

अभिप्रेत असणाऱ्या कायदयामध्ये बदल करुन ‘मेक इन इंडिया’ च्या माध्यमातून गुंतवणूकीसाठी अमेरिकेला साद घातली आहे.

**२) संरक्षण :**

स्वातंत्र्यानंतर आपण शस्त्रास्त्रे व संरक्षण साहित्य रशियाकडुन खरेदी करत होतो. परंतु सध्या सर्वात जास्त शस्त्रास्त्रे अमेरिकेकडुन खरेदी करतो. तंत्रज्ञान हस्तांतरणातून शस्त्रास्त्रे भारतात बनविण्याचा प्रस्ताव आहे. अर्थात भारत अमेरिकेचा सर्वात मोठा ग्राहक आहे. म्हणून भारत-अमेरिका संबंधांना महत्त्व आहे.

**३) तंत्रज्ञान हस्तांतरण :**

वातावरणाचे संरक्षण, सायबर तंत्रज्ञान, संरक्षण सामुग्री, कृषी याबाबत प्रगत अमेरिकी तंत्रज्ञानाची गरज भारताला आहे. हे तंत्रज्ञान तीन टप्प्यात हस्तांतरण होणार आहे. अमेरिकेत असलेल्या श्रीमंत भारतीय समाज, वेगाने विकसीत होणारी अर्थव्यवस्था, जागतिक राजकारणातील भारताचा वाढता प्रभाव, भारत अजुनही रशियाकडे झुकतो की काय अशी अमेरिकेची शंका तर अणुकरार, संरक्षण, शस्त्रास्त्रे, अमेरिकेची पाकिस्तान बाबतची भूमिका आणि भारताकडुन अपेक्षा अशा अनेक मुद्दयाभोवती भारत-अमेरिका संबंध गुंफले जात आहेत.

**४) जागतिक राजकारणाच्या दृष्टीने :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका प्रभावी ठरत आहे. भारत, जपान, रशिया, चीन, आसियान, जी-२०, ब्रिक्स अशा परिषदांमधून हा प्रभाव दिसून येतो. अफगाणिस्तानमध्ये अमेरिकेला भारताच्या सहकार्याची अपेक्षा आहे. तर पाकिस्तानला शिस्त लावण्यासाठी, दहशत विरोधात लढण्यासाठी युनोच्या कायम सदस्यत्वासाठी भारताला अमेरिकेची गरज आहे.

**स्वयं : अध्ययनाचे प्रश्न - २**

१) अणुकरार किती वर्षाच्या मुदतीसाठी आहे ?

२) भारत-अमेरिका यांच्यात अणु करार कधी झाला आहे ?

३) भारताने कोणत्या साली अणुचाचणी घेतली ?

४) भारतात किती अणुभट्ट्या आहेत ?

५) १९८६ नंतर भारताच्या २ वेळा भेट देणारा अमेरिकेचा अध्यक्ष कोण ?

**२.३ सारांश :**

भविष्यातील नियोजनाकरिता व वर्तमानात चालण्याकरिता इतिहासाचा आधार प्रेरणादायी ठरतो. भारत-अमेरिका संबंधाच्या इतिहासावर प्रकाश टाकल्यास खूप चांगले असल्याचे दिसून येत नाही.

**भारत–अमेरिका सुरक्षाविषयक धोरण :**

डॉ. मनमोहन सिंग यांनी अमेरिकेच्या भेटीनंतर भारत–अमेरिका संबंधाला नवीन परिणाम मिळाले. शीतयुध्दाच्या काळात भारत–अमेरिका संबंध साशंकतेचे होते. पण शीत युध्दानंतर जागतिक व्यवस्था बदलली. आज भारत अमेरिकेशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करुन राजकीय हित जपण्याचा प्रयत्न करत आहे.

– **भारत–अमेरिका अंतराळ सहकार्य :**

भारत व अमेरिका यांच्यात २००६ साली सुरक्षा व सामरिकदृष्ट्या ऐतिहासिक करार झाला. भारताचे अंतराळ कार्यक्रमाचे दोन टप्पे आहेत. दुसऱ्या टप्प्यात दुसऱ्या देशाच्या मदतीवर विसंबून न राहता स्वावलंबनाचे धोरण स्वीकारले.

**बराक ओबामांचा भारत भेट :**

१) बाजार पेठ

२) संरक्षण

३) तंत्रज्ञान हस्तांतरण

४) जागतिक राजकारणाच्या दृष्टीने बराक ओबामांचा भारत भेट वरील घटकांच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो.

**२.४ पारिभाषिक शब्द :**

१) सामरिक : दोन देशांमधील सैन्य व सैन्यविषयक संबंध.

२) भू–राजकीय : भौगोलिक घटकांच्या आधारे देशाचे राजकारण निर्धारित होणे.

३) एकध्रुवीय : रशियांच्या विघटनानंतर निर्माण झालेली जागतिक व्यवस्था

४) बहुध्रुवीय : जी–२० ब्रिक्स, आसियान या प्रादेशिक संघटना निर्माण झाल्यानंतरची जागतिक व्यवस्था.

**२.५ स्वयं : अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**प्रश्न १**

१) तणावपूर्ण

२) पोखरण

३) २००३

४) १९३२

५) १९९८

**प्रश्न २**

१) ४० वर्षे

२) २००८

३) १९७४, १९९८

४) २२

५) बराक ओबामा.

**२.६ स्वाध्यायासाठी प्रश्ने :**

१) अमेरिका-भारत संरक्षण विषयक धोरण स्पष्ट करा ?

२) भारत-अमेरिकेतील अंतराळ विषयक सहकार्य व सुरक्षा धोरण स्पष्ट करा?

३) भारत अमेरिका अणू कराराचे विवेचन करा ?

**२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :**

१) भारताचे परराष्ट्र धोरण : सातत्य व स्थित्यंतर : डॉ. शैलेंद्र देवळाणकर

२) जागतिक राजकारणात भारत : के सागर व डॉ. विजय खरे

३) समकालीन जागतिक राजकारण : डॉ. शैलेंद्र देवळाणकर

४) चाणक्य मंडळ (नोव्हेंबर २०१४, फेब्रुवारी २०१५, मार्च २०१५) अविनाश धर्माधिकारी

●●●

## सत्र ६ : घटक ३

## भारत – रशिया संबंध


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ भारत – रशिया संबंधाची पार्श्वभूमी

३.२.२ भारत – रशिया स्वातंत्र्यपुर्व काळातील संबंध

३.२.३ भारत– रशिया स्वातंत्र्योत्तर संबंध/शीतयुद्ध कालीन

३.२.४ भारत – रशिया संबंध शीतयुद्धानंतर

३.३ सारांश

३.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं: अध्ययनासाठी उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


**३.० उद्दिष्टे :**

भारत व रशिया या दोन देशांचे परस्परांशी असणारे संबंध जाणून घेणे खालील कारणाने अवश्य आहे.

अ) ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला समाजातील इतर व्यक्तीच्या मदतीची आणि सहाय्याची आवश्यकता असते तसेच स्वतंत्र राज्यांच्या समुहामध्ये प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या मदतीची आवश्यकता असते.

ब) राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने प्रत्येक राष्ट्र आपले इतर अथवा शेजारच्या राष्ट्राशी बदलते संबंध कसे निर्धारित करतात याचा अभ्यास करणे.

क) प्रत्येक देशाच्या भौतिक, तात्विक, वैज्ञानिक विकासात शेजारच्या राष्ट्राचा व त्याच्या धोरणाचा काय परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

ड) परराष्ट्रीय धोरणाच्या माध्यमातुन विविध राष्ट्रांचे राष्ट्र आणि व्यक्ती विकासाच्या विविध कल्पनांचा विचारांचा अभ्यास करणे.

**३.१ प्रास्ताविक :**

भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा विचार व अभ्यास करताना परराष्ट्रीय धोरण म्हणजे ''एखाद्या स्वतंत्र राष्ट्राने आपल्या सीमेच्या बाहेरील देशांच्या बरोबर प्रस्थापित करावयाच्या संबंधाबाबत जे धोरण निर्धारीत केले जाते त्याला परराष्ट्रीय धोरण असे म्हणतात.''

म्हणजेच स्वतंत्र राष्ट्रांच्या बरोबर राष्ट्रीय हित स्थापण्याच्या दृष्टीने मित्रत्वाचे, शत्रुत्वाचे अथवा तटस्थततेचे धोरण निर्धारीत केले जाते. त्याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. कोणत्याही एखाद्या राष्ट्राचे दुसऱ्या अथवा शेजारच्या राष्ट्रांबरोबर एकसारखे संबंध असतील असे नाही. स्वत:च्या राष्ट्रीय हित संवर्धनासाठी विविध प्रकारचे संबंध असू शकतात.

भारताने जगातील महासत्तांच्या बरोबर ज्याप्रकारचे संबंध स्थापन केले त्याचे विवेचन करणे गरजेचे असते. भारताचे अमेरिकेसारख्या महाशक्ती राष्ट्राबरोबर कशा प्रकारचे संबंध आहेत हे जेव्हा मागील घटकामध्ये अभ्यासले त्याच बरोबर महासत्ता असलेल्या सुप्रिम सोव्हिएट रशिया बरोबर कशा प्रकारचे संबंध स्थापन केले याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

भारताच्या तीन बाजुने समुद्र आहे आणि उत्तर, उत्तर पूर्व, पश्चिम या बाजूने पाकिस्तान, चीन, श्रीलंका, रशिया हे देश सीमेलगतचे शेजारी राष्ट्रे आहेत. भारताचे या सीमेलगतच्या राष्ट्रांच्या बरोबर असणारे संबंध याला एक ऐतिहासीक पार्श्वभूमी आहे. प्रत्येक राष्ट्राची भारताशी असणारी ऐतिहासीक पार्श्वभूमी भिन्न भिन्न प्रकारची आहे. या पार्श्वभूमीत भौगोलिक, सामाजिक, वांशीक, धार्मिक आणि तात्वीक, आर्थीक घटकांचा समावेश होतो. भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा अभ्यास करताना जगातील रशिया व अमेरिका या दोन महाशक्ती देशांच्या बरोबर कशा प्रकारचे संबंध प्रस्थापित केले आणि झाले त्यावर त्यांच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुल्यमापन होणार आहे. म्हणूनच रशिया-भारत परराष्ट्रीय संबंधाचे विश्लेषण महत्वाचे ठरते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारताकडे पहाण्याचा रशियाचा दृष्टीकोन सुरवातीपासून आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार बदलत गेला आणि अनेक प्रसंगानंतर रशियाचा भारताबद्दलचा दृष्टीकोन स्थीर झाला की भारत हा राष्ट्रीय हित जपत जागतीक हिताचासुद्धा विचार करतो. मानवतावादाचे अलिप्तता वादाचे समर्थन करतो म्हणूनच १९७३ मध्ये भारत-रशिया मैत्रीचे दिर्घकालीन करार झाला.

**३.२ विषय विवेचन :**

**३.२.१ भारत - रशिया संबंधाची पार्श्वभूमी :**

चीन, नेपाळ, श्रीलंका या देशांचे भारताशी ऐतिहासीक संबंध होते तसे भारत रशियाचे संबंध नव्हते तरी भारताच्या उत्तरेला युरोप आणि आशिया या दोन्ही खंडात पसरलेला अवाढव्य विस्तार असणारा देश म्हणजे रशिया होय. रशियाचे क्षेत्रफळ २,२४,०२,२०० चौरस कि.मी. आहे व जगातील सर्वात मोठा देश म्हणून त्याचे स्थान प्रथम क्रमांकावर होते. रशियाच्या राजकीय इतिहासात १९१७ ची साम्यवादी क्रांती ही फार महत्त्वाची ठरली. या

क्रांती पुर्वी रशियामध्ये रोमानाव्ह घराण्याची सत्ता होती. त्यालाच झारशाही म्हणतात. झारशाहीत हा देश कृषीप्रधान आणि मागासलेला होता. दारिद्र्य, मागासलेपणा त्यामुळे येथे साम्यवादी विचार लवकरच रुजला. रशियाच्या झारशाहीची विदेश नीती तीन मुख्य आधारावर उभी होती.

१. रशियाला सतत समुद्रकिनारा आणि त्यावरील बंदरे रशियाला मिळाल्या पाहिजे हे त्यांना शक्य झाले.

२. आग्नेय युरोप पूर्व आणि दक्षिण व मध्य आशिया क्षेत्रावर सर्वोच्च प्रभाव प्रस्थापित करणे.

३. स्लाव वंशाच्या लोकांचे नेतृत्व करण्याची आकांक्षा व चर्चचा एकात्मतेसाठी वापर.

१९१७ च्या रशियातील क्रांतीपुर्वी झारशाहीला पहिले सोडले तर दुसरी उद्दीष्ट सफल करता आली नाहीत. त्यामुळे साम्यवादी विचाराला पोषक वातावरण प्राप्त झाले. भारत-रशियाच्या संबंधांना १९२७ मध्ये ब्रुसेल्स संम्मेलनाला पं. नेहरू रशियात गेले तेव्हापासून विचाराची सुरवात झाली पण संबंध निर्मिती मात्र नंतर झाली.

### ३.२.२ भारत-रशिया (१९४७ पुर्वीचे) स्वातंत्र्यपुर्व संबंध :

भारताच्या स्वातंत्र्यापुर्वी भारताचे इतर राष्ट्रांशी असणारे संबंध ब्रिटीश बादशहा निश्चित करीत असे तसे भारतीय (हिंदुस्थानातील) नेत्याशी परराष्ट्रीय धोरणासंबंधी फारसा विचार विनिमय केला जात नव्हता. उदा. पहिले व दुसरे महायुद्ध यात भारतीय सैन्याचा सहभाग हा निर्णय ब्रिटीश बादशहानी घेतला मात्र पं. नेहरूंचा राजकारणात प्रवेश झाल्यानंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे आणि विदेशी नीतीकडे एक विशिष्ट दृष्टीने पाहण्यास सुरवात केली. यामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर लेनीनच्या नेतृत्वाखाली रशियात साम्यवादी क्रांती झाली. झारशाही उलथुन टाकली याकडे नेहरूंचे लक्ष एक वेगळ्या अर्थाने व कुतुहल, उत्सुकता आणि क्रांती शक्य आहे का ? असे अनेक विचार त्यांचे मनात होते. १९२३ मध्ये ब्रुसेल्स संम्मेलनात भाग घेण्यासाठी रशियात गेले तेथील वातावरणाने प्रभावित होवून रशियाशी मैत्री असावी असा विचार त्यांचे मनात आला. रशियाला सुद्धा भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याबद्दल आस्था, सहानुभूती होती. कारण भारतीय आणि रशियन यांना साम्राज्यवादाला विरोध, भांडवलशाहीला विरोध या बाबत एक वाक्यता होती. त्यामुळेच जरी एकात्मतेची भावना निर्माण होण्यास सुरवात झाली मात्र साम्यवादी हा सुद्धा वैचारीक साम्राज्यवादाचा प्रकार नेहरूंना वाटला त्यांचे मनात असेही आले की भविष्यकाळात आशिया खंडातील राष्ट्रांच्या शांतता व स्वातंत्र्याला धोका निर्माण होऊ शकतो.

लेनिनच्या मते शोषक विरुद्ध शोषित राष्ट्रे यांचेतील संघर्ष म्हणजेच साम्यवादीचा भांडवलशाही विरुद्ध लढा आणि हि क्रांती जगभर चालणे आवश्यक आहे. लेनिनच्या एक जेष्ठ सहकारी लिओ ट्राटस्की याने या भूमिकेचे समर्थन केले पण लेनिनचा दुसरा सहकारी जोसेफ स्टॅलिन याला हे मान्य नव्हते. म्हणूनच स्टॅलिनने संघर्षवादाऐवजी सहकार्यवादाचा यथाशक्ती पुरस्कार करणे आणि रशियाची शक्ती वाढविणे या धोरणाचा पुरस्कार केला.

### ३.२.३ भारत-रशिया शीतयुद्ध काळातील संबंध :

दुसऱ्या महायुद्धाची १९४५ मध्ये समाप्ती झाली. युद्धाचे दरम्यान ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, रशिया या मित्रराष्ट्रांनी एकत्र येवून नाझी/जर्मन व फॉसिस्ट/इटालियु हुकुमशाहीला चोख उत्तर दिले आणि याच वेळी दुसऱ्या बाजुला जग

पुन्हा महायुद्धांच्या खाईत लोटले जावू नये यासाठी जागतीक पातळीवरील नेत्यांनी युनो सारखी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात यश मिळवले. २४ ऑक्टो. १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात आला आणि जागतीक शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्याला सुरवात झाली. हे कार्य करीत असताना जागतीक महासत्तेचे नेते अमेरिकेचे रुझवेल्ट, रशियाचे स्टॅलिन यासारख्या नेत्यांनी स्वतःच्या राष्ट्रीय हिताची जोपासना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील सत्तासंतुलन साध्य करण्यासाठी अनेक राष्ट्रांच्या समस्यांच्यामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हस्तक्षेप करुन पुन्हा एकदा शीतयुद्धाचे वातावरण निर्माण केले, त्यामुळे जागतीक पातळीवरील राजकीय व्यवस्थेमध्ये आणि रचनेमध्ये फार मोठे बदल झाले. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांनी प्रस्थापित आणि नवोदीत स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्याचे सत्तेचे राजकारण सुरु केले, अनेक वेळा नवोदीत राष्ट्रांच्यामधील प्रादेशिक पातळीवरील संघर्ष कसे वाढतील याचा प्रयत्न होऊ लागला. दोन राष्ट्रांचे मधील सीमावाद, पाणी, नियंत्रण/प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रश्न यावरुन सतत युद्धे आणि तणावाचे वातावरण चालू कसे – राहील याची पद्धतशीर रचना व व्यवस्था अमेरिका, रशिया यांनी केली. त्यामध्ये चीन, कोरिया, व्हिएटनाम, इराक, इराण, सुएझ कालवा यासारख्या प्रश्नांचे वेळी अशी स्थिती निर्माण झाली की आता तिसऱ्या महायुद्धाला सुरवात होते काय ? या मधुनच नाटो, सिएटो, सिंटो, वार्सा यासारखे गटसंरक्षणात्मक करार अस्तित्वात आले व मग तणावाचे/शीत युद्धाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी अनेक स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. पैकी भारताला १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांनी भांडवलशाही आणि साम्यवादी विचारसरणीच्या राष्ट्रांचे स्वनेतृत्वाखाली दोन गट निर्माण केले स्वाभाविक स्वतंत्र भारतासारखे नवीन राष्ट्र आपल्या गटामध्ये सहभागी व्हावे या दृष्टीने भारत-अमेरिका आणि भारत-रशिया या दोन राष्ट्रांशी परराष्ट्रीय संबंध निर्माण झाले. त्यामध्ये भारताची परराष्ट्रीय नीती या दोन्ही गटामध्ये सहभागी होण्याची नसल्यामुळे महाशक्तींचा भारताकडे पहाण्याचा दृष्टीकोन सातत्याने बदलत गेला. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या संदर्भात जेव्हा अमेरिका समर्थन करते तेव्हा रशिया विरोध करीत होता व त्या माध्यमातुन दोन्ही महाशक्ती भारताला आपल्या गटामध्ये सामिल करण्याचा प्रयत्न करीत होता. काळाच्या ओघात प्रत्येक महाशक्तीच्या सत्तास्थानातील व्यक्ती बदलत गेल्यानंतर भारताशी असणाऱ्या संबंधाबाबत बदल होत गेले. भारत-रशियाचे संबंधात रशियाचा पंतप्रधान बदलताच बदल होत होते मात्र शीतयुद्धाच्या काळात रशियाची भारताबद्दलची भूमिका विरोधी होती पण काळाच्या ओघात भारताची भूमिका रशियन नेतृत्वाच्या लक्षात आल्यामुळे भारत-रशियाचा मैत्रीकरार झाला तसा प्रदीर्घ काळाचा मैत्रीकरार दुसऱ्या महाशक्तीबरोबर झाला नाही. भारत-रशिया संबंधाचे विवेचन रशियन सत्तप्रमुखांच्या सत्ता कालखंडानुसार पुढील प्रमाणे करता येईल.

### ३.२.३.१ स्टॅलिन कालखंड :

दुसऱ्या महायुद्धामध्ये स्टॅलिन नेतृत्वाने हुकुमशाही आणि साम्राज्यवादी शक्तीचे पतन केले मात्र महायुद्ध समाप्तीनंतर अमेरिका रशिया या गटामध्ये शीतयुद्ध सुरु झाले. स्वाभाविकच भारताबद्दलचा रशियाचा दृष्टीकोन असा होती की भारत, अमेरिका, इंग्लंड यांच्या प्रभावाखालील राष्ट्र आहे. त्यामुळे भारत साम्यवादी राष्ट्रांच्या गटामध्ये सहभागी होणार नाही. पं. नेहरूंनी रशियन राज्यक्रांती आणि तेथील घडामोडी बद्दलचे कुतुहल म्हणून १९२७ मध्ये भेट दिली होती. रशियाचा नियोजनाचा प्रयोग भारतात वापरावा असे नेहरूंना वाटत होते. १९४६ च्या ७ सप्टेंबर मध्ये पं. नेहरूंनी पंतप्रधान झाल्यानंतर नभोवाणीवर केलेल्या भाषणात रशियाचा गौरवास्पद उल्लेख केला

होता. २८ सप्टें. १९४६ रशियाचे विदेशी मंत्री मोलोटोव्ह आणि कृष्ण मेनन यांची पॅरिस येथे भेट झाली व भारताने रशियाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. पुढे जेव्हा दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना दिल्या जाणाऱ्या पक्षपाती वागणुकीचा प्रश्न युनोमध्ये उपस्थित केला. तेव्हा रशियाने भारताचे समर्थन केले. २५ जून १९४७ मध्ये विजयालक्ष्मी पंडीत यांना भारताचे रशियातील राजदूत म्हणून नियुक्त केले. भारत अद्याप स्वतंत्र झाला नव्हता. तरी भारत-रशिया संबंध औपचारिक सुरु झाले होते. साम्यवादी पक्षाच्या भारतातील सशस्त्र उठाव आणि चळवळीबद्दल रशिया विषयी भारताच्या मनामध्ये साशंकता होती पण पाकिस्ताला १४ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले त्याला अभिनंदन पाठवण्याचा औपचारीकपणासुद्धा रशियाने दाखविला नाही. त्यामुळे रशियाबद्दल दृष्टीकोन बदलण्यास सुरवात झाली. १९४७ च्या पाकच्या काश्मीरवरील आक्रमणाबाबत रशियाला असे वाटत होते परस्पर वाटाघाटीने हा प्रश्न सोडवावा एवढेच नव्हे नंतर भविष्यात या प्रश्नाबाबत जेव्हा जेव्हा पाकची बाजु अमेरिकेने घेतली त्या त्या वेळी रशिया भारताच्या बाजुने युनोमध्ये सुद्धा उभा राहिला. १९४९ मध्ये पंडीत नेहरूंनी अमेरिकेला सदिच्छा भेट दिली त्यामुळे रशियाने पाकच्या पंतप्रधानांना रशिया भेटीचे निमंत्रण दिले पण सुरवातीला पाकने निमंत्रण स्विकारले मात्र नंतर फेटाळले आणि अमेरिकेला भेट दिली त्यामुळे रशियाने पाकच्या विरोधी नेहमीच भूमिका घेतली. पुढे चीन राजनयीक मान्यता, जपान शांतता तह, कोरियन युद्ध, सिएटो करारात भारताला सहभागी करण्याचा आग्रह इ. बाबतीत पं. नेहरू आणि अमेरिका नेतृत्व यांचेमध्ये मतभिन्नता निर्माण झाली. त्याचे रशियाने स्वागत केले भारताला युनोमधील विविध समित्यांच्या सदस्यत्वासाठी नेहमी आग्रही भूमिका स्विकारली.

१९५२ मध्ये दुसरी जागतीक पातळीवरील अतिशय महत्त्वाची घटना घडली ती म्हणजे ''स्टॅलिनने शेवट पर्यंत साम्यवादी राष्ट्रांच्या व्यतीरिक्त कोणत्याही राष्ट्राच्या राष्ट्रप्रमुखाला कधीच भेट दिली नाही. मात्र तत्कालीन भारताचे राजदूत डॉ. राधाकृष्णन यांना मात्र भेट दिली ही गैरसाम्यवादी राष्ट्रप्रतिनिधींना दिलेली पहिली भेट एवढेच नव्हे तर डॉ. राधाकृष्णन यांनी असेही स्पष्ट केले की ''भारताने रशियन गटात सहभागी व्हावे अशी सुद्धा इच्छा व्यक्त केली नाही'' याचा अर्थ भारताच्या स्वातंत्र्योत्तर धोरणाबद्दल वेगळा विश्वास होता यालाच भारत-रशिया संबंध सुधारल्यास सुरवात झाली एवढेच नव्हे तर स्टॅलिनने त्यांचे मृत्युच्या अगोदर १५ दिवस भारताचे राजदूत के. पी. एस. मेनन यांना भेट दिली त्यामुळे या संबंधांना बळकटी आली.

### ३.२.३.२ ख्रुश्चेव्ह कालखंड :

स्टॅलिनच्या मृत्युनंतर रशियाची सुत्रे ख्रुचेव्ह आणि बुलगानीन यांचेकडे आली. जून १९५३ मध्ये इंदिरा गांधींनी अनौपचारीक भेट रशियाला दिली. त्यावेळी रशिया-भारत पहिला व्यापारी करार झाला. १९५४ मध्ये ''अग्नेय आशीया लष्करी संघटना'' (सिएटो) अमेरिका नेतृत्वाखाली स्थापन झाला आणि शीतयुद्धाला वेगळीच धाट आली. १९५५ मध्ये ''मध्य व पश्चिम आशिया'' करार अमेरिकेच्या नेतृत्वाखाली झाला. पाकिस्तान त्याचा सदस्य झाला त्याला सेन्टो करार म्हणतात. परिणाम अमेरिका रशिया शीतयुद्ध भारताच्या सीमेवर पोहचले त्यामुळे भारत-तिबेट करार, भारत-चीन पंचशील करार आणि १९५५ मधील ऑफ्रो आशिया राष्ट्रांची बाडुंगा परिषद झाली. रशियाचा भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला त्यामधुन भिलाई येथील पोलाद कारखाना उभारणीसाठी

१०५ कोटीची रशियाने मदत केली. याच वातावरणात भारताचे पंतप्रधान आणि रशियाचे पंतप्रधान व रशियन साम्यवादी पक्षाचे महासचिव यांनी परस्परांच्या देशांना भेटी देवून मित्रत्वाच्या संबंधाला मजबुती मिळाली. साम्राज्यवाद, वसाहतवाद, जातीय भेदभाव यांना विरोध यावर दोन्ही देशांचा एकच दृष्टीकोन होता. त्यातुन दोन्ही देशांचे आर्थिक संबंध सुधारण्यात चांगली स्थिती निर्माण झाली. या मैत्रीपूर्ण संबंधामुळेच भारत-पाक यांच्या युनोतील प्रश्नावर, संघर्षामध्ये रशियाने नेहमीच भारताचे समर्थन केले.

१९६२ च्या चीन-भारत युद्धाचे वेळी मात्र भारत-रशिया यांच्या मैत्रिचा कसोटीचा कालखंड होता. कारण यावेळी रशियाने भारताची बाजु न घेता मौन स्विकारले त्यामुळे भारतासाठी हे मौन निरासजन होते तरी पं. नेहरू म्हणाले की, ''जरी रशियाने आम्हाला शस्त्रास्त्राची मदत नाही केली तरी त्यांची सदिच्छा आणि सदभावना आमचेबरोबर होती हि गोष्ट फार मोठी आनंदाची आहे. पुढे चीनचा खोटारडेपणा रशियाला कळल्यानंतर चीन आक्रमणाची ख्रुश्चेव्ह यांनी चीनची निंदा केली आणि भारताला शस्त्रास्त्रे दिली. मिग विमानाचा कारखाना भारतात चालु करण्यास मदतच केली.

### ३.२.३.३ ब्रेझनेव्ह-कोसिजीन कालखंड :

ख्रुश्चेव्ह यांचे पतन झाल्यानंतर रशियाची सत्ता ब्रेझनेव्ह आणि कोसिजिन यांचेकडे आली त्यांनी भारताशी असणारे पुर्वीचे नाते तसेच चालु राहिल असे घोषित केले. भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री रशियाला भेट देण्यास गेले आणि मैत्रीच्या नात्याला उजाळा आणि जादा भक्कमपणा आला. कारण १९६५ मध्ये भारत-पाक युद्धामध्ये पाकच्या बाजूने अमेरिकेच्या हस्तक्षेपामुळे रशियाने सर्व राष्ट्रांना ताकीद दिली की कोणी राष्ट्राने या युद्धात हस्तक्षेप करु नये आणि युनोच्या सुरक्षा परिषदेत युद्धविरामाचा ठराव रशियाने मांडून भारताचे समर्थन केले व पाठिंबा दिला. या युद्धानंतर १९६६ मध्ये भारत-पाक ताश्कंद करार रशियाचे कोसिजीन यांचे साक्षीने झाला. करारावर सह्या झाल्यानंतर रात्री लाल बहादूर शास्त्री यांचे देहावसन झाले. त्या मृतदेहाबरोबर कोसिजीन भारतात आले आणि पुढे भारत-रशिया संबंध जास्तच मजबूत बनले.

१९६८ मध्ये रशिया-झेकोस्लाव्हिया युद्धात भारताने आपल्या परराष्ट्रीय धोरणाच्या तत्वानुसार रशियाबद्दल खेद व्यक्त केला आणि युनोच्या सुरक्षापरिषदेच्या रशिया विरुद्धच्या मतदानात भाग घेतला नाही त्यामुळे जरी रशिया विरुद्ध कृती वाटली तरी रशियाचा भारताकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाला नवीन आधार मिळाला. त्याचा परिणाम इंदिरा गांधीच्या रशिया भेटीमध्ये रशियाकडून प्रगाढ मैत्रीचे भारताला आश्वासन मिळाले. १९६७ मध्ये पाकने रशियाला भारताला होत असणारी शस्त्रास्त्र मदत थांबवावी अशी विनंती केली पण रशियाने या विनंतीला धुडकावुन लावले. एवढेच नव्हे तर अरब-इस्त्राईल युद्धाचे संदर्भात पाकने मौन धारण केले. भारताने मात्र अरब राष्ट्रांचे समर्थन करुन रशियाच्या धोरणाला पुष्टी दिली. १९६९ मध्ये रशिया-चीन संर्घषाला उघड सुरवात झाली. साम्यवादी राष्ट्रांच्यामधील या वैचारीक मतभेदाला सुरवात झाली. रशिया-पाक आर्थिक-शस्त्रास्त्र करार समाप्ती झाली. नुतनीकरणाला रशियाने नकार दिला. भारताकडे मात्र सर्व मदतीचा ओघ वाढविला. त्यामध्येच भारत-अमेरिका यांची त्यांचे धोरणविषयक प्रश्नावर एका संयुक्त अभ्यास गटाची स्थापना झाली. याची आंतरराष्ट्रीय राजकारणाला दखल घ्यावीच लागली.

१९७० पासून भारत-पाक संबंधात प्रचंड तणाव निर्माण झाला. रशियाकडून आर्थिक आणि शस्त्रास्त्राची खुप मोठी मदत भारताला प्राप्त झाली. पाक-चीन संबंध तोडण्याचा अमेरिकेचा प्रयत्न अयशस्वी झाला. त्यामुळे रशियाने भारताच्या पाठीशी आपली सर्व शक्ती उभी केली.

१९७० च्या पाकिस्तानच्या सार्वत्रिक निवडणूकीत पूर्व पाकिस्तानातील अवामी लिगला संसदेतील निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. परिणामी पश्चिम पाकिस्तानमधील सत्ताधारी वर्गाला हे मान्य नव्हते. म्हणूनच पूर्व पाकिस्तानात प्रचंड लष्करी कायदा पुकारुन यायह्या खान या लष्कर प्रमुखाचे नेतृत्वाखाली कतल, बलात्कार, अत्याचाराचे सत्र सुरु केले परिणामी पुर्व पाकिस्तानमधील अनेक लोकांनी भारतात आश्रय घेतला. एकुण ९० हजार निर्वासीतांच्या उदरनिर्वाहाची आणि पालन पोषणाची जबाबदारी भारतीय अर्थव्यवस्थेवर पडली. याकडे दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. भारताने पाक बरोबर वाटाघाटी, चर्चा करण्याचा प्रयत्न केला पण पाकिस्तानने त्याला प्रतिसाद न दिल्याने १९७१ चे भारत-पाक युद्ध सुरु झाले. या युद्धामध्ये पाकला मदत करण्यासाठी अमेरिकेने सैन्य दल व आरमार ढाक्याच्या दिशेने पाठविला. त्याला प्रत्युत्तर म्हणून रशियाने आपले आरमार भारताच्या बाजूने पाठविले. दरम्यान १६ डिसेंबरला सैन्यदलाने ढाक्का येथे संपूर्ण शरणागती पत्करली. भारताला रशियाने पाठिंबा दिल्यामुळे युद्ध समस्या मिटली आणि स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती होवुन राजकारणाला भविष्यामध्ये वेगळे वळण लागले.

**भारत-रशिया मैत्री करार :**

भारत-पाक युद्धापुर्वी ९ ऑगस्ट १९७१ मध्ये भारत-रशिया २० वर्षाचा मैत्री करार झाला त्यामुळेच या युद्धातील चीन आणि अमेरिकेचा हस्तक्षेप टळला. या करारावर ९ ऑगस्ट १९७१ रोजी भारतातर्फे परराष्ट्र मंत्री श्री स्वर्णसिंग आणि रशिया तर्फे ग्रोमिको यांच्या सह्या झाल्या त्यामधील कलमे सारांश रुपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. भारत-रशिया यांच्या गणतंत्र व्यवस्थेचा प्रादेशिक अखंडतेचा आणि परस्पर अहस्तक्षेपाच्या धोरणाचा मान व सन्मान ठेवणे.

२. दोघांनी दोन्ही देशाच्या सुरक्षीततेची काळजी घेतली पाहिजे.

३. जात, धर्म, वसाहतवाद हे भेद नष्ट करुन सर्व राष्ट्रांच्या जनतेला समानतेची वागणुक दिली पाहिजे.

४. आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन्ही देश विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी, राष्ट्रीय हितसंबंध संवर्धन करण्यासाठी शांततेच्या राजनयिक मार्गाचा वापर करतील.

५. विज्ञान, कला, साहित्य, शिक्षण इ. विविध क्षेत्रात दृढ संबंध ठेवणे.

६. दोन्ही देशामध्ये आर्थिक, वैज्ञानिक, व्यापार इ. संदर्भात योग्य स्वातंत्र्य आणि संचार सवलती दिल्या जातील.

७. उभयतांनी परस्पर घातक लष्करी गटात सहभागी न होणे.

८. उभय राष्ट्रांनी परस्परांच्या शत्रुराष्ट्रांना मदत करावयाची नाही.

९. उभय राष्ट्रांनी इतर कोणत्याही राष्ट्रांशी गुप्त करार करावयाचे नाहीत.

१०. हा करार संपण्यापुर्वी १ वर्ष अगोदर संपण्याची सुचना न दिल्यास अजुन ५ वर्ष हा करार चालु राहील मुदत वाढ उभय राष्ट्रांच्या इच्छेवर अवलंबून असेल.

वरील करारावर काही राष्ट्रांच्या व नेत्यांच्या प्रतिक्रिया के. पी. मेनन यांनी असे म्हटले की, ''भारत-रशिया करार दुसऱ्या देशाच्या विदेशनीतीची प्रतिक्रिया नव्हे तर भारताच्या रशिया बाबतच्या धोरणाचे प्रतिबिंब आहे.'' त्यांचे मते, ''हा करार एक शांती आणि अनाक्रमणाची संधी आहे. यामुळे आपल्या गट निरपेक्षता धोरणाला बळ मिळते.'' यशवंतराव चव्हाण यांचे मते, ''दोन्ही राष्ट्रांची राष्ट्रीय हितसंबंधी भूमिका परस्पराशी समन्वय साधणारी होती म्हणूनच ते एकत्र आले असे चव्हाण म्हणतात.''

या करारावर असा आक्षेप घेतला गेला की भारताने आपल्या विदेशी नीतीमधील गटनिरपेक्षतेच्या तत्वाचा भंग केला परंतु इंदिरा गांधींनी असे स्पष्टीकरण दिले की, ''रशियाने भारताच्या असलग्नतेच्या नीतीला कोणतीही शर्त न लादता मान्यता दिली आहे.'' याचा अर्थ भारताच्या रशियाशी झालेल्या कराराने परराष्ट्रीय धोरणातील दूरदर्शी दृष्टीकोन स्पष्ट होत आहे.

पुढे भारत-पाक युद्धानंतर १९७३ नोव्हेंबर मध्ये ब्रेझनेव्ह चार दिवसासाठी भारताच्या दौऱ्यावर आले त्यावेळी इंदिरा गांधी बरोबर व्यापक चर्चा झाली. भारत-रशिया मैत्रीची दृढता वाढली म्हणूनच ब्रेझनेव्ह म्हणाले की, ''आमची परस्पर मैत्री पर्वतरोहनाप्रमाणे आहे. जितके वर जावे तितकी मैत्रीची दालने उघडली जात आहेत.'' या भेटीमध्ये तीन महत्त्वाचे करार झाले.

१. व्यापारी व आर्थिक सहयोग वाढवणे.

२. योजना आयोगात घनिष्ठ संबंध प्रस्थापित करणे.

३. दोन्ही देशाच्या शासकीय प्रतिनिधीला विशेष सवलती देणे.

पुढे १८ मे १९७४ ला भारताने अणूस्फोट चाचणी घेतली. जगातील अनेक राष्ट्रांनी भारताच्या शांतता सहयोगी धोरणावर टिका केली. मात्र रशियाने टिका केली नाही. अंतरिक्ष अनुसंधान कृषी व जीव विज्ञान इ. क्षेत्रातील प्रगतीसाठी त्यांचा मदतीचा करार सुद्धा झाला. सारांशाने असे म्हणता येईल, की भारताला आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा विकास करण्यासाठी गती वाढवण्यासाठी रशिया-सारखे महाशक्तीचे राष्ट्र मित्रराष्ट्र म्हणून लाभले हे फार महत्त्वाचे पर्व ठरले.

मार्च १९७७ ते १९७९ या कालखंडात भारतातील राजकीय सत्तांतर झाले. इंदिरा गांधी आणि त्यांच्या काँग्रेस पक्षाचा पराभव झाला व मोरारजी देसाई यांचे नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी मोरारजी देसाई यांनी घोषणा केली की जर भारत-रशिया करार भारताला इतर देशाबरोबर संबंध ठेवण्यास बाधक ठरत असेल तर त्या धोरणाचा व तहाचा पुनर्विचार केला जाईल. या वेळी भारताचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी होती. रशिया बाबत वरील भूमिका घेण्याची कारणे म्हणजे १. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये कोणताच बदल झाला नव्हता त्यामुळे या राष्ट्रांच्या समान भूमिकेत बदल होणे शक्य नाही. २. भारत जड उद्योगाचे संदर्भात पूर्णपणे

रशियावर अवलंबून होता.

या काळात चीनचा प्रभाव वाढत होता आणि चीन ने पाकिस्तान आणि बांगलादेश यांना शस्त्रास्त्रे, लढाऊ विमाने व त्यासाठीचे प्रशिक्षण देण्याचे मान्य केले ही भारताला चिंतेची बाब होती. रशियासाठीसुद्धा चिंतेची बाब होती. त्यामुळे स्वाभाविक भारत–रशिया यांचे संबंध अधिक दृढ होणे गरजेचे होते. याच दरम्यान मोरारजी देसाई अटलबिहारी वाजपेयी यांची रशिया भेट महत्त्वाची ठरली नंतर पुढे १९७८ ते १९७९ या कालखंडात रशियाची १४० भारतात तर भारताची ११० प्रतिनिधीक मंडळे परस्परांच्या भेटीसाठी गेली आणि हे संबंध जास्त मैत्रीचे आणि जवळीकतेचे राहिले. भारताच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जनता पक्षाच्या हाती देशाची सत्ता आल्यानंतर सुरवातीला मोरारजी देसाईंच्या वक्तव्यावरुन असे वाटले होते की भारत–रशिया संबंधामध्ये कदाचित दुरावा निर्माण होईल परंतु चीनच्या धोरणामुळे भारत–रशिया संबंध खुप मजबुत झाले आणि या दोन देशाच्या २० वर्षाच्या मैत्री कराराला भक्कमपणा आला.

### ३.२.३.४ ब्रेझनेव्ह–तिरवोनोब कालखंड :

रशियामध्ये कोसिजीन अधिकार पदावरुन दूर झाले आणि त्या जागी तिरवोनोब आले. या वेळी १९८० मध्ये भारतात सत्तांतर झाले जनता पक्षाच्या ऐवजी पुन्हा सत्ता काँग्रेस पक्षाला प्राप्त झाली आणि इंदिरा गांधींच्या काळात भारत–रशिया मैत्री संबंधात वाढ झाली. व्यापार, विज्ञान, शिक्षण, संस्कृती, आरोग्य आणि औषधे या क्षेत्रात रशियाच्या मदतीची भर पडणारे करार झाले. १६ नोव्हेंबर १९८१ मध्ये भारत–रशिया यांचेमध्ये वरील अनुषंगाने करार झाला. एवढेच नव्हे तर १९८३ मध्ये ५०० कोटी रुपयाची सामुग्री भारताला प्राप्त झाली. १९८३ मध्येच राजीव गांधी यांना महामंत्री म्हणून रशियाला पाठविले त्यावेळी रशियाने भारताला ३५ लाख टन तेल निर्मितीचे आश्वासन दिले.

### ३.२.३.५ गोर्बाचोव्ह कालखंड :

८ फेब्रुवारी १९८४ मध्ये आन्द्रेपाव्ह यांचा मृत्यू झाला व त्यांचे जागी गोर्बाचोव्ह आले आणि रशियाच्या धोरणात्मक बदलाने मोठा वेग घेतला. ऑक्टोबर १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली व राजीव गांधींनी पंतप्रधानपदाची सुत्रे हाती घेतली. त्यांनी जून १९८५ ला अमेरिका आणि नोव्हेंबर १९८५ ला रशिया भेट देवून दोन्ही महाशक्ती बरोबर वेगळ्या दृष्टीने संबंध स्थापन करण्यास सुरवात केली. गोर्बाचोव्ह यांनी अमेरिका चीन यांचेशी संबंध सुधारण्याचे धोरण आखले आणि चीन बरोबर भारताने संबंध सुधारावेत असे सुचित केले आणि भारताला २२५० कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्यास मान्यता दिली. मे १९८५ च्या राजीव गांधींच्या रशिया दौऱ्यात अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली. उदा. अण्वस्त्रे नष्ट करणे, हिंदी महासागरातील लष्करी तळ हलविणे, सैनिकीकरण थांबवणे, पॅलेस्टाईन व नामेबियाला स्वातंत्र्य देणे इ. संदर्भात दोन्ही राष्ट्रांचे संयुक्त पत्रक प्रसिद्ध केले. १९८६ मध्ये दिल्ली येथे गोर्बाचोव्ह यांनी चार सुत्री ''दिल्ली घोषणायन'' प्रसिद्ध केले.

१. रशिया–अमेरिका यांनी हिंदी महासागरातील नावीक शक्ती कमी करावी.

२. हिंदी महासागराचा उपयोग करणाऱ्या सर्व राष्ट्रांचे सम्मेलन घ्यावे आणि समुद्र तटवर्ती देशांना संरक्षण व

प्रभुत्व सत्तेची हमी द्यावी.

३. हिंदी महासागरातील हवाई वहातुक संरक्षण आणि आतंकवाद समाप्तीसाठी बहुपक्षीय करार करावा.

वरील प्रमाणे ''दिल्ली घोषणापत्र'' प्रसिद्ध झाल्यानंतर भारतामध्ये आंतरराष्ट्रीय आंतरिक्ष केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला. सर्व मदत देण्याचे मान्य केले त्यांचे मते तिसऱ्या जगातील देशांच्या अंतरिक्ष यात्रींना प्रशिक्षण मिळाले पाहिजे. १९८६-८७ मध्ये भारताला आधुनिक शस्त्रास्त्रे आणि कॅम्प्युटर प्रणाली देण्याचे मान्य केले.

गोर्बाचोव्ह सत्तेवर आल्यानंतर युरोपीय राष्ट्रांच्या बरोबरच्या संबंधातील तणाव कमी झाला. मात्र गोर्बाचोव्ह यांनी १९८९ ला चीनला भेट दिली. चीन-रशिया संबंधात वितुष्ट येण्यास सुरवात झाली. रशियाचा भारताकडे पहाण्याचा दृष्टीकोन फार चांगला झाला. १९८९ च्या भारताच्या सार्वत्रिक निवडणुकी सत्तांतर झाले. विश्वनाथ प्रतापसिंह यांचे जनतादल आघाडीचे सरकार अस्तित्वात आले. मात्र भारताच्या अंतर्गत बदलाला रशियन नेतृत्वाने महत्त्व दिले नाही. तर आपले भारताबद्दलचे धोरण सातत्याने तेच चालू ठेवले. हे भारताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे पाऊल ठरले.

### ३.२.४ भारत-रशिया संबंध शीतयुद्धानंतर :

१९८५ ला रशियामध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर नेतृत्वात बदल झाला. १९८४ मध्ये आन्द्रे पाव्ह यांचे मृत्यूनंतर चेरनेन्को सत्तेवर आले त्यांना आन्देपाव्ह यांचे धोरण मान्य नव्हते तरी धोरणात बदल केला नाही. मात्र १९८५ मध्ये त्यांचे जागी गोर्बाचोव्ह आल्यानंतर मात्र रशियाच्या परराष्ट्रीय धोरणात वेगाने धोरणात्मक सुधारणा होवू लागल्या व त्याची अंमलबजावणी सुरु झाली. अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांच्या बरोबरीच्या संबंधात त्यांनी बदल केला आणि अमेरिका, चीन यांचे बरोबरचे तणावाचे धोरण शिथिल केले. पाश्चात्य राष्ट्रे आणि जपान बरोबरचे आर्थिक संबंध वाढविण्याचे धोरण स्विकारले. याचा परिणाम सुप्रिम सोव्हिएटच्या अंतर्गत राजकीय घडामोडीवर आणि आंतरराष्ट्रीय घडामोडीवर परिणाम झाला. जागतिक पातळीवरील दोन महाशक्ती मधील शीतयुद्धांच्या समाप्तीची सुरवात झाली.

अमेरिका चीन यांचेशी स्विकारलेल्या धोरणामुळे रशियाच्या महासंघातील इस्टोनिया, लॅटव्हिया व लिथ्युआनिया या तीन घटक गणराज्यांनी उठाव करुन स्वत:चे स्वातंत्र्य घोषित केले. ही तीन घटकराज्ये सोडून इतर बारा घटकराज्यांनी एक राष्ट्रकुल स्थापन करण्याचा प्रयत्न केला पण त्यांचे मधील अंतर्गत मतभेदाने त्यांचा संघ स्थापन समस्या निर्माण झाली. हा मतभेद सैन्य विभागणी अण्वस्त्रे व प्रक्षेपणा विषयक विचार त्यांचे एककेंद्री नियंत्रण यामुळे तीव्र मतभेद होते. रशियामधील राजकीय उलथापालथीने अटळ असणारे रशियाचे विभाजन झाले. स्वाभाविक भारत आणि सेव्हिएट महासंघाचे संबंध समाप्त झाले. पण तरी सोव्हीएट राष्ट्रकुलात सहभागी झालेल्या - युक्रेन, बायलोरशिया, मोल्दव्हिया, जॉर्जीया, अमेनिया, अझरबैजान, कझाखास्तान, तुर्कमेजिस्तान, उझगेगिस्थान, ताकिगिस्थान, किरगिझीया व रशिया यांचे निर्णयानुसार या नव्या रशियाच्या महासंघास रशियाचा उत्तराधिकारी म्हणून मान्यता प्राप्त झाली. त्याला इतर राष्ट्रांशी संबंध आणि दुसऱ्या राष्ट्रामध्ये दुतालय स्थापन करण्यास परवानगी मिळाली. युनो मधील सदस्यत्व आणि नकाराधिकार सुद्धा प्राप्त झाला आणि यातील नऊ राज्यांना UNO सदस्यत्व प्राप्त करावे असे ठरले. या महासंघातील मूळ १५ घटकराज्यांपैकी फक्त रशिया बरोबर भारताचे दूतसंबंध आहेत आणि १९९२

मध्ये कझाझस्तान बरोबर भारताचे संबंध प्रस्थापित करण्याचे ठरले. भारताच्या सीमेशेजारचा कझाझस्तान याला आता महत्त्व प्राप्त झाले आहे. तरी भारताच्या सीमेपासून खुप दूर असणाऱ्या रशिया बरोबरचे संबंध मात्र जुने आधार गृहीत धरुनच मागच्या आणि अपेक्षा व्यक्त होतात त्यामुळे भारत रशिया संबंधाला ऐतिहासीक वारस्याचा आधार मिळाला आहे. १९९१ च्या सुप्रिम सोव्हिएट रशियाच्या या पार्श्व भूमिवर भारताचे त्यानंतर संबंध निर्माण आणि विकसीत होऊ लागले.

रशियाच्या विघटनानंतर भारत-रशिया यांच्या संबंधाचे दृष्टीकोन बदलले आहेत. कारण आता रशिया महाशक्ती राहिला नाही अशी भारताची भूमिका झाली आणि रशियाचा तोच दृष्टीकोन झाला. नंतरच्या काळात जरी संबंध वेगाने गतिमान झाले नसले तरी रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन यांनी २००० मध्ये भारताला भेट दिली आणि भारताचे व रशियाचे संबंध पुन्हा योग्य दिशेने सुरु झाले आणि भारत व रशियन संघ यांच्यामधील धोरणात्मकतेबाबत निर्णय झाला. भारत आर्थिकदृष्ट्या प्रगतीपथावरील राष्ट्र म्हणून ओळखले जाऊ लागले. २००७ च्या भारताच्या प्रजासत्ताक दिनासाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना निमंत्रित केले आणि भारत रशिया यांचेमध्ये अवकाश संशोधन व उपग्रह प्रक्षेपण या संदर्भात महत्त्वाचा भागिदारी करार झाला. यातुनच चांद्रयाण-२ हे नियोजित कार्यक्रम आणि ISRO यांचे RKA संयुक्त विद्यमाने घोषित केला. (ISRO - Indian Space Research Organisation, RKA - Russian federal space Agency)

मार्च २०१० मध्ये पुतिन यांनी पुन्हा भारताला भेट दिली. पंतप्रधान मनमोहन सिंग, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी यांचेशी चर्चा केली आणि दोन्ही देशांच्या मधील महत्त्वाचे पाच करार झाले. यामध्ये अणूशक्ती, संरक्षण आणि अंतराळ सहकार्य, दहशतवाद या विरोधीची नीती इ. बाबतीत करार झाले. त्यामध्ये अफगाणिस्थान मधील दहशतवादी कारवाई थांबवण्याच्या दृष्टीने सखोल चर्चा झाली.

भारत रशिया यांचेमधील व्यापारी आणि गुंतवणुक या बाबतीत २००७ मध्ये पहिली वाटाघाटी झाली. २०१२ मध्ये व्यापार, गुंतवणुक त्याला पोषक वातावरण परस्पर आर्थिक सहकार्य या बाबतीत ११ बिलीयन यु.एस. डॉलर्स पर्यंत गुंतवणुक अपेक्षीत केली.

रशिया-भारत संबंधाच्या संदर्भात ''पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतीक केंद्राची'' निर्मिती रशियामध्ये केली आहे. त्या द्वारे २० रशियन संस्थांच्यामधून १५०० रशियन विद्यार्थी हिंदी विषयाचे अध्ययन करीत आहे. हे भारत रशियाच्या पारंपारिक संबंधाचे फलीत आहे. त्यापुढे जावुन भारत-रशिया मैत्री संबंध जास्त घट्ट झाले. कारण २००८ हे वर्ष रशिया वर्ष म्हणून भारतात तर २००९ भारत वर्ष म्हणून रशियात साजरे केले. मात्र या मैत्रीच्या संबंधामध्ये एक थोडी अस्पष्ट अशी शंका आहे की १९९८ मध्ये रशियन पंतप्रधान प्रीमाकोव्ह यांनी असे सुचित केले की रशिया-चीन-भारत यांचेमध्ये धोरणात्मक मतभेद असू नयेत. भारत शस्त्रांच्या संदर्भात रशियावर जरी अवलंबून असला तरी प्रीमाकोव्हा यांच्या मताचा विचार करणे शक्य वाटत नाही. कारण तिन्ही देशांचा कोणत्याही मुद्द्यावर एकमत होवू शकत नाही आणि भारताच्या २०२० च्या वाटचालीसाठी अडसर आहे कारण प्रत्येक देश स्वत:चे हित महत्त्वाचे मानतो.

भारत-रशिया द्विपक्षीय कार्यक्रम जाहीर केला सप्टेंबर २०१२ मध्ये मास्को येथे या संदर्भात चर्चा होवून नवीन

आर्थिक आणि व्यापारी संबंधाबाबत, भारत रशिया सैन्य व तांत्रिक सहकार्याच्या संबंधाचा, सांस्कृतीक आणि तंत्रज्ञान विषय सहकार्य, प्रादेशिक आणि जागतीक समस्या सोडवण्या संदर्भात सहकार्य करण्याचा करार झाला तो या RIAC नावाने २०१३ मध्ये मास्कोत सादर केला.

२००४ मध्ये ॲमिरल गोर्शकोव्हा ही युद्ध नौका रशियाकडून खरेदी करण्यावरुन तणाव निर्माण झाला होता. २००९ मध्ये रशियाकडून अण्वस्त्रधारी पाणबुडी खरेदी केली मात्र नौदलात ती २०११ मध्ये दाखल झाली आणि ॲमिरल गोर्शकोव्हा युद्ध नौका २०१३ मध्ये भारताला देणार होता. २-जी स्पेक्ट्रम प्रकरणात भारतीय सर्वोच्च न्यायालयाने १२२ कंपन्यांचे परवाने रद्द केले. त्यामध्ये रशियाची एक कंपनी आहे, तामिळनाडूमधील कुडानुकुलम येथील अणुप्रकल्प रशियाच्या मदतीने सुरु होता त्याला जनतेचा प्रचंड विरोध आहे. त्यामुळे रशियाने भारताला सूचना दिली की जर यामध्ये काही अपयश आले तर रशिया या प्रकल्पातुन बाहेर पडेल. भारताने अमेरिका, फ्रान्स, स्वीडनकडून संरक्षण विषयक सामग्री खरेदी करण्यास सुरवात केली. त्या पार्श्वभूमिवर दोन्ही देशांच्या संबंधावर एक वेगळे सावट आहेच. आज भारतीय जनतापक्षाचे पंतप्रधान मोदी नेतृत्वाने रशिया, अमेरिका यासारख्या राष्ट्रांच्याशी समतोल साधुन संबंध प्रस्थापित करणे हे कौशल्य आहे. त्या कौशल्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतील.

### ३.३ सारांश :

स्वतंत्र भारताचे परराष्ट्रीय धोरण निर्धारीत करताना त्यावेळच्या अमेरिका व रशिया या महाशक्तींना एकाच वेळी देशहिताचा विचार करुन संबंध प्रस्थापित करणे अवघड होते. तरी भारताला लाभलेल्या समर्थ, दुरदर्शी नेतृत्वाने हे काम यशस्वी पार पाडीत आणले आहे. त्याच बरोबर भारतीय परराष्ट्रीय धोरणांच्या मुलभूत तत्त्वांना (पंचशील) अबाधित ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामध्ये रशियाबरोबर संबंध प्रस्थापित करताना मित्र राष्ट्र म्हणून २०-२० वर्षाचा दोन करार करुन एक समर्थ आणि भक्कम पाठबळ मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. आज भारताने २०२० कडे वाटचाल सुरु केली आहे. अशा परिस्थितीत प्रस्थापित मोठ्या राष्ट्रांनी आपली भूमिका पटवून देवुन योग्य मदत मिळवण्याचा यशस्वी प्रयत्न चालला आहे.

### ३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. भारत-रशिया यांचे स्वातंत्र्यपुर्व काळातील संबंध स्पष्ट करा.

२. १९२७ मध्ये पंडीत नेहरू रशियातील कोणत्या संम्मेलनाला गेले होते ?

३. रशियामध्ये १९१७ च्या साम्यवादी क्रांतीपुर्वी कोणती/कोणाची सत्ता होती ?

४. रशियाच्या स्टॅलिन या नेतृत्वाची भारताच्या कोणत्या राष्ट्रपतींनी भेट घेतली ?

५. १९६५ च्या भारत-पाक युद्धात रशियाने कोणाची बाजू घेतली ?

६. भारत-रशिया २० वर्षाचा मैत्री करार कधी झाला ?

७. १९७७ ते १९७९ या काळात भारताचे परराष्ट्र मंत्री कोण होते ?

८. सुप्रिम सोव्हीएट रशियाचे विघटन कधी झाले ?

९. राष्ट्रकुल सोव्हीएट संघात एकुण किती घटक गणराज्यांचा समावेश झाला ?

१०. भारताने रशियाकडून घेतलेल्या युद्ध नौकेचे नांव काय ?

**३. ५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१. स्वातंत्र्यपुर्व काळात भारत-रशिया संबंध रशियाच्या नियोजनाचे कौतुक, कुतुहल वाटत होते. स्वतंत्र संबंध नव्हते.

२. १९२७ मध्ये रशियातील ब्रुसेल्स सम्मेलनात पं. नेहरु गेले होते.

३. १९१७ च्या रशियन साम्यवादी क्रांतीपुर्वी रशियात झारशाही होती.

४. रशियन नेते स्टॅलीन यांची भेट डॉ. राधाकृष्णन यांनी घेतली होती.

५. १९६५ भारत-पाक युद्धात रशियाने भारताची बाजू घेतली.

६. भारत-रशिया मैत्री करार ९ ऑगस्ट १९७१ मध्ये झाला.

७. १९७७ ते १९७९ या काळात अटल बिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री होते.

८. सुप्रिम सोव्हिएट रशियाचे विघटन १९९१ मध्ये झाले.

९. राष्ट्रकुल सोव्हिएट संघात एकूण १२ रशियन घटक गणराज्यांचा समावेश होता.

१०. भारताने रशियाकडून घेतलेल्या युद्ध नौकेचे नाव ''ॲमिरल गोर्शकोव्ह'' होते.

**३.६ सरावासाठी स्वाध्याय**

१. भारतीय स्वातंत्र्यापुर्वीच्या भारत रशिया संबंधाचे वर्णन करा.

२. भारत-रशिया शीत युद्धकाळातील संबंध स्पष्ट करा.

३. भारत-रशिया मैत्री करार स्पष्ट करा.

४. १९९१ नंतरचे भारत-रशिया संबंध स्पष्ट करा.

**३.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ**


१. डॉ. चंद्रशेखर दिवान : भारताची विदेशी नीती

२. प्रा. श्रीकांत देशपांडे : भारताची विदेशी नीती

३. इंदा पवार-हाशम : प्रचलीत विदेशी नीती

४. इंटरनेट : Realation between Indians & Russia

५. इंटरनेट : भारत-रशिया मैत्रीचे बदलते स्वरूप

## सत्र ६ : घटक ४

## भारत आणि भारताचे शेजारी


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ भारत-पाकिस्तान संबंध

भारत-पाकिस्तान संबंधातील वादग्रस्त प्रश्न

अ) काश्मीर

ब) दहशतवाद

भारत-पाकिस्तान संबंधातील सुधारणा

रिकाम्या जागा भरा.

४.२.२ भारत-चीन संबंध

भारत-चीन संबंधातील वादग्रस्त प्रश्न

अ) तिबेट

ब) अरुणाचल प्रदेश

क) १९६२ चे युद्ध

भारत-चीन संबंधातील सुधारणा

४.३ सारांश

४.४ गाळलेल्या जागा भरा.

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ स्वाध्यायासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

१. या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला भारत-पाकिस्तान संबंधातील वादग्रस्त प्रश्न समजतील.

२. या घटकाच्या अभ्यासानंतर भारत-पाक संबंध समजतील.

३. या घटकाच्या अभ्यासानंतर भारत-चीन संबंध समजतील.

## ४.१ प्रस्तावना :

भारत आणि भारताचे शेजारी म्हणजे प्रामुख्याने हिमालयाच्या दक्षिणेकडील राष्ट्रे होय. यामध्ये पाकिस्तान, नेपाळ, भुतान, बांग्लादेश, श्रीलंका आणि मालदिव या राष्ट्रांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर या राष्ट्रांच्या प्रदेशाला 'दक्षिण आशिया' या नावाने ओळखले जाते. दक्षिण आशिया हा वैभवशाली इतिहासाचा, प्राचीन संस्कृती आणि सभ्यतेचा प्रदेश आहे. या प्रदेशाचा भुभाग भौगोलिक दृष्ट्या विस्तीर्ण आहे. त्यामुळेच या प्रदेशात नैसर्गीक साधन संपत्तीची समृद्धता आहे. तसेच या प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतीक वैविध्य असले तरी सामाजिक संरचना, व्यवस्था व मुल्ये या संकल्पना टिकून आहेत. देशाचे परराष्ट्र धोरण, अंतर्गत सुरक्षा, राष्ट्राची सर्वांगीन एकात्मता यांचा विचार करताना भारतासमोर सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील विविध आव्हानांबरोबर सीमे पलीकडील सीमा संघर्ष, दहशतवाद आणि काश्मीरचा प्रश्न इत्यादी आव्हाने निर्माण झालेली आहेत. एकूणच भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना भारत-पाकिस्तान, भारत-नेपाळ, भारत-बांग्लादेश, भुतान आणि चीन यांचा संबंधांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ४.२ विषय विवेचन :

भौगोलीक, सांस्कृतीक आणि ऐतिहासिक असे समान घटक भारत आणि पाकिस्तान या दोन देशादरम्यान असुन सुद्धा भारत द्वेष व धार्मिक विरोधातून किंवा विद्वेषातून १९४७ साली अखंड हिंदूस्थानची फाळणी होऊन अनुक्रमे १४ ऑगस्ट १९४७ व १५ ऑगस्ट १९४७ ला पाकिस्तान व भारत देशाची निर्मिती झाली. भारतीय स्वातंत्र्यापूर्वी भारत व पाकिस्तान हा राजकिय आणि भौगोलीक दृष्ट्या एकच प्रदेश होता. १९४७ साली पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासून या दोन देशातील संबंध बहुतेक काळ तणावपूर्ण व संघर्षपुर्ण राहिले आहेत. या दोन देशामध्ये फाळणी होताना मालमत्तेचा हक्कांचा निर्माण झालेला प्रश्न, नदींच्या पाणी वाटपाचा प्रश्न आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सीमावाद किंवा काश्मीरचा प्रश्न यासारख्या अनेक प्रश्नावरुन या दोन्ही देशामध्ये संघर्ष वाढत गेले आहेत. त्यादृष्टीने पाकिस्तानचे भारताशी संबंध कोणत्या प्रकारचे आजपर्यंत राहिले आहेत त्याची आपण थोडक्यात माहिती घेऊ.

### ४.२.१ भारत-पाकिस्तान संबंध :

भारत स्वतंत्र झाल्यापासुन भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध तणावाचेच राहिले आहेत. पाकिस्तानच्या निर्मीतीच्या कल्पनेची औपचारीक मांडणी प्रथम १९४० साली मुस्लीम लिगच्या लाहोर

अधिवेशनात झाली. त्यानंतर अवघ्या कांही वर्षातच म्हणजेच १९४७ साली पाकिस्तानची कल्पना मुर्त स्वरुपात अवतरली. पाकिस्तानची निर्मिती ही भारतीय उपखंडातील मुस्लीम समाजाच्या स्वयंनिर्णयाच्या व मुस्लीम समाजाच्या अनुयायांच्या हितसंबंधाची जपणूक या दोन तत्त्वावर आधारलेली होती. या दोन देशामध्ये प्रथमपासुनच पाण्याचे वाटप, मालमत्तेचा अधिकार आणि काश्मिर समस्या यासारख्या प्रश्नावरुन तणाव निर्माण झाले. काश्मिर प्रश्न वगळता इतर प्रश्नांबाबत वाटाघाटीद्वारे मार्ग शोधुन काढण्यात या दोन्ही देशांना यश आले असले तरी पाकिस्तानातून निर्माण करणारा दहशतवाद आणि काश्मिर प्रश्न हे आज आग्रहाचे किंवा तणाव कायम ठेवण्याचे मुद्दे आहेत. त्यातला कोणीही आपली बाजु सोडून चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याच्या तयारीत नाहीत.

**अ) काश्मिर प्रश्न : आणि भारत-पाक संबंध :**

भारत-पाकिस्तान या दोन्ही देशामध्ये तणाव निर्माण करणारा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'काश्मिरचा प्रश्न' होय. मालमत्तेचा अधिकार व नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न या दोन्ही देशांनी तातडीने आपापसात करार करुन सोडवण्यात आला आहे. पण भारत पाक संबंधात काश्मिरचा प्रश्न हा सततचा वादाचा प्रश्न राहिलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघासमोरही प्रथमपासून हा प्रश्न आहे. पण त्याबाबत आजपर्यंत कोणतीही तडजोड होऊ शकलेली नाही. फाळणीपूर्वी राजा हरीसिंग यांना भारत किंवा पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांत सामिल न होता काश्मिर संस्थान स्वतंत्र रहावे यासाठी प्रयत्न केला. दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांशी हरिसिंगांनी 'जैसे थे' चा करारही केला. पण मुस्लीम बहुसंख्य असलेला प्रदेश अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानात न आल्याने आणि भारताने काश्मिरबाबत ३७० च्या कलमाअंतर्गत विशेष घटक राज्याचा दर्जा देऊन कायेदशीरदृष्ट्या संघराज्यात विलीनीकरण केल्यामुळे आजपर्यंत काश्मिरचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो.

शीतयुद्धाचा फायदा घेऊन पाकिस्तानने बड्या राष्ट्रांच्या लष्करी संघटनेमध्ये सहभागी होऊन अमेरिका, चीन या राष्ट्रांच्याकडून आर्थिक मदतीबरोबरच शस्त्रास्त्रे मिळवली. या शस्त्रास्त्रांच्या बळावर १९६५ साली पाकिस्तानचे राष्ट्रपती आयुब खान यांनी भारतावर आक्रमण व घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना माघार घ्यावी लागली. इ.स. १९६५ च्या युद्धांत पाकिस्तानचा पराभव झाला तेव्हा सोव्हिएत संघामार्फत मध्यस्थी करण्यात येऊन भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार करण्यात आला.

१९६५ च्या युद्धकाळात भारत-पाक शस्त्रसंधीचे आणि ताश्कंद कराराचे पालन पाकिस्तानकडून केले गेले नाही. याच दरम्यान पाकिस्तानमध्ये सीया व सुन्नी या प्रथांच्या नेतृत्वावरुन बांग्लादेशाचा प्रश्न निर्माण झाला. या पाकिस्तानातील अंतर्गत संघर्षामुळे भारतामध्ये बांग्लादेशी निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला. पाकिस्तानने याच काळात म्हणजे १९७१ मध्ये पुन्हा आक्रमण केले. या युद्धातही पाकिस्तानचा दोन्ही आघाड्यावर पराभव झाला व स्वतंत्र बांग्लादेशाची निर्मीती झाली. या युद्धांनंतर भारत व पाकिस्तानमध्ये शांतता व सहकार्य नांदावे यासाठी भारताने पुढाकार घेऊन पाकिस्तान बरोबर 'सिमला करार' घडवुन आणला. भारताने या युद्धात मिळवलेला भुप्रदेश व युद्ध कैदी या पाकिस्तानच्या ताब्यात दिले. या कराराने भारत-पाक संबंधात नवा अध्याय सुरु झाला. या करारानुसार या दोन राष्ट्रांमधील प्रश्न परस्परांत वाटाघाटी करुन शांततामय

मार्गाने सोडवण्याचे मान्य करण्यात आले. दोन्ही राष्ट्रांत शांततामय सहजीवनावर व दुसऱ्या देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याच्या तत्त्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला. त्यानंतर दळणवळण, सांस्कृतिक, वैज्ञानिक व आर्थिक क्षेत्रात परस्पर सहकार्य करण्याचे अनेक नवीन करार करण्यात आले. सिमला करारामुळे दोन्ही देशातील संबंधामध्ये फारसा फरक पडला नाही पण पुढील २० वर्षाच्या काळात या दोन्ही देशामध्ये युद्धासारखा प्रसंग उद्भवला नाही. म्हणजेच या दरम्यानच्या काळात दोन्ही देशातील तणाव कमी होता.

काश्मिरबाबत आक्रमक धोरण स्विकारण्याची संधी पाकिस्तानला १९९० नंतर मिळाली. कारण या काळात सोव्हियत रशियाचे विघटन झाले होते. अरब राष्ट्रांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत केली, अफगाणीस्तानात पाकिस्तानच्या मदतीने अमेरिकेने तालिबान राजवटीस प्रोत्साहन दिले होते. महत्त्वाचे म्हणजे काश्मिरमध्ये फारुक अब्दुला सरकार विरोधात निदर्शने केली. या तणावाचा किंवा संघर्षाचा फायदा पाकिस्तानने उठवण्यासाठी प्रयत्न सुरु केला. त्यामध्ये प्रामुख्याने आत्मघातकी व कडव्या दहशतवाद्यांना पाठवुन तेथील स्थानिकामध्ये अस्वस्थता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काश्मिर मधील फुटीरतावादी संघटनांच्या चळवळींना पाठींबा देऊन त्याला शस्त्रास्त्रे पुरविण्यात येवू लागले. अशा संघटनामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन भारत विरोधी गटांना संघटीत करणे. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या व त्याच्या आधारे काश्मिरी जनतेसाठी जगभरातील लोकांचा व विशेषत: इस्लामी देशातील लोकांचा पाठींबा मिळविणे इत्यादी प्रयत्न पाकिस्तानने सुरु केले. या सर्वांसाठी पाकिस्तानने छुप्या युद्धाचा, दहशतवादाचा, आत्मघातकी हल्ल्याचा व भारतीय अर्थव्यवस्था खच्ची करण्याचा प्रयत्न सुरु केला. थोडक्यात १९९० नंतर पाकिस्तानने प्रत्यक्ष युद्धाचा प्रयत्न न करता छुप्या युद्धाचा किंवा दहशतवादाचा पाकिस्तान भारताविरुद्ध वापर करीत आहे./केला आहे.

**ब) दहशतवाद आणि भारत-पाक संबंध :**

भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये उग्र स्वरुप धारण केलेला संबंध किंवा प्रश्न म्हणजे दहशतवाद होय. दहशतवाद म्हणजे अमुलाग्र राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी/आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराचा अवलंब होय. थोडक्यात सरळसरळ शस्त्रास्त्र न स्विकारता किंवा सैन्याशी युद्ध न करता सामान्य नागरिकात हल्ले व दहशत पसरवुन आपल्या हिताची जोपासना करणारी संघटना किंवा सक्रिय गट म्हणजे दहशतवाद होय. भारत-पाकिस्तान संबंधामध्ये तणाव निर्माण करणारा घटक म्हणजे दहशतवाद होय. धार्मिक मूलतत्त्व वादातून दहशतवाद ही संकल्पना उदयास आली. भारत-पाक यांच्यामध्ये १९६५ व १९७१ या साली दोन मोठी युद्धे लढली गेली. या युद्धामध्ये लाखो सैनिक सामील झाले व हजारो सैनिक मृत्यूमुखी पडले. या युद्धातून पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला. याची सल पाकिस्तानमध्ये होती आणि याच दरम्यान पाकिस्तानमध्ये लष्करांनी आपली सत्ता स्थापन केली होती. त्यातून या पराभवाचा वचपा काढण्यासाठी भारतात दहशतवादी कारवाया करण्यास सुरुवात केली. त्यातून १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट पासुन सुरुवात होऊन २००१ मध्ये संसदेवरील दहशतवादी हल्ल्यापर्यंत आणि २००८ च्या ताज हॉटेलवरील हल्ल्यापर्यंत मजल मारली. २००१ मधील अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ल्यामुळे तर जागतिक स्तरावर दहशतवादाचे भयावह रुप जगासमोर आले. पाकिस्तानचे आय.एस.आय.

संघटनेच्या माध्यमातून अनेक दहशतवादी संघटना स्थापून उदाहरणार्थ, लष्कर-ए-तोएबा, हिजबुल मुज्जाहीद्दन भारतामध्ये दहशतवादी कारवाया सुरुवात केली. त्यामुळे भारत पाकिस्तानमध्ये तणाव किंवा संघर्ष निर्माण होण्यास दहशतवाद कारणीभूत ठरत आहे.

**भारत-पाकिस्तान संबंधात सुधारणा :**

१९९० नंतर भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. भारत-पाकिस्तानमध्ये संबंध सुधारण्यासाठी १९९० च्या जुलै महिन्यात इस्लामाबाद येथे भारत-पाक परराष्ट्र सचिवाची बैठक झाली आणि सीमेवरील लष्करी हलचालीबाबत माहिती देण्याचे मान्य करण्यात आले. त्यानंतर वाजपेयी यांनी १९९९ मध्ये लाहोर यात्रा केली. लाहोर बसयात्रा सुरु केली आणि संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. यामध्ये वाजपेयींची भुमिका अशी होती की या बसयात्रेच्या माध्यमातून भारत-पाकिस्तानातील लोकांच्या मध्ये दळणवळण वाढेल त्यांच्यामध्ये संवाद सुरु होईल आणि दोन्ही देशातील जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. पण पाकिस्तानने याचा गैरवापर केला आणि कारगील वर आक्रमण केले. या युद्धात वाजपेयी यांनी 'विणय ऑपरेशन' च्या माध्यमातून पाकिस्तानचा पराभव केला आणि यातून पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. त्यामध्येच पाकिस्तानने कंदहार येथे भारताचे विमान अपहरण केले. त्यामधील प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी काही भयानक दहशतवाद्यांना सोडावे लागले. त्यानंतर भारत-पाक संबंधात तणाव निर्माण झाला.

२००१ नंतर मात्र जगाच्या राजकारणात बदल झाला. २००१ च्या अमेरिकेतील 'दहशतवादी' हल्लानंतर अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध मोहीम उघडली. त्यामुळे पाकिस्तानसमोर धर्मसंकट उभे राहिले व अमेरिकेकडून पाकिस्तानला मिळणारी मदत कमी झाली आणि भारत-पाक संबंधामध्ये सुधारणा होण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानवर दबाव आणण्यास सुरुवात केली. त्यातूनच मुशर्रफ व वाजपेयी यांच्यात आग्रा परीषद झाली. पण ही परिषद अयशस्वी झाली. पुढे वाजपेयी सरकारने जम्मु-काश्मिरमध्ये युद्ध विरामाची घोषणा केली. हुरीयत कॉन्फरन्स या फुटीरतावादी संघटनेशी चर्चा करण्याचे धोरण स्वीकारले. २००४ मध्ये डॉ. मनमोहन सिंग सरकारने ही वाजपेयी यांनी शेजाऱ्याशी शांतता प्रस्थापीत करण्याचे जे धोरण अवलंबिले होते त्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे ठरविले. त्यानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री नटवरसिंग पाकिस्तान दौऱ्यावर गेले. त्यांनी श्रीनगर मुझप्पराबाद बससेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला पण त्याचवेळी काही दहशतवादी संघटनांनी श्रीनगर येथील टुरिस्ट सेंटरवर हल्ला केला. तरीसुद्धा पंतप्रधानांनी बससेवा सुरु ठेवली. त्यानंतर सचिव पातळीवर अनेक चर्चेच्या फेऱ्या पार पडल्या. त्यातून शांतता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. तसेच परवेझ मुशर्रफ यांनीही भारत-पाक संबंध सुधारण्यासाठी अनेक पावले उचलली. त्यातूनच मुशर्रफ-मनमोहन सिंग यांच्यात शिखर परीषद झाली. त्याच्यात अनेक विषयावर चर्चा झाली. या चर्चेबाबत दोन्ही नेत्यांनी चर्चेबाबत समाधान व्यक्त केले. त्याचवेळी पाकिस्तान मधुन मुशर्रफ यांची पंतप्रधान पदावरुन यांची हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर भारत-पाक संबंधात काही प्रमाणात सुधारणा झाली. थोडक्यात मनमोहन सिंग यांनी भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याचा व दोन्ही देशात शांतता प्रस्थापित होण्यासाठीचे प्रयत्न केले. पण पाकिस्तानकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळता दहशतवादी कारवाया सुरु राहिल्या.

मोदी सरकार सत्तेवर आल्यापासुन भारत-पाकिस्तान संवाद प्रक्रिया पुन्हा सुरु होण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. या सरकारने सत्ता स्थापन केल्यापासून परराष्ट्र धोरणावर अधिक भर दिला आहे. कारण या सरकारला परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधायचा आहे आणि आर्थिक विकास साधताना देशात शांतता व सहकार्य हवे. त्यामुळे मोदी सरकारने दक्षिण आशियाई देशांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी या देशांना आपल्या शपथविधी सोहळ्याला आमंत्रित केले होते. त्यावेळी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ हजर होते. त्यानंतर त्यांनी पाकिस्तानबरोबर संवाद साधुन द्विपक्षीय समस्या सोडवण्याचे त्यांनी पाकिस्तानला आवाहन केले होते. त्या आवाहनानुसार पहिली सचिव पातळीवरची बैठक आयोजित केली होती पण ती निष्फळ ठरली. आता सुषमा स्वराज पाकिस्तान दौऱ्यावर जाऊन अनेक बाबतीत करार करुन संबंध सुधारण्याचा प्रयत्न करत आहेत. शरीफ व मोदी यांची सार्क परीषद, पॅरीस परीषद या माध्यमातून भेट होत आहे. त्यातुन संवाद साधण्याचे व भारत-पाक संबंध सुधारण्यावर भर देत आहेत. एकूणच दोन्ही देशामध्ये सकारात्मक चर्चा होत आहे. येत्या काळात दोन्ही देशा दरम्यान पुन्हा संवाद प्रक्रिया सुरु होण्याची शक्यता आहे आणि ते आवश्यकही आहे. कारण हे दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत तसेच दोन्ही देशांच्या सिमा परस्परांना भिडलेल्या आहेत अशा स्थितीत परस्परांशी संवाद नसणे या दोन देशासाठी नव्हे तर दक्षिण आशिया देशासाठी धोकादायक आहे.

**४.१.६ गाळलेल्या जागा भरा.**

१. पाकिस्तानची निर्मिती .................... साली झाली.

२. भारत-पाकिस्तान सीमारेषा निश्चीत करणारी ................... ही लाईन आहे.

३. भारत व पाकिस्तान यांच्यातील ............... हे वादग्रस्त मुद्दे आहेत.

४. ............... साली प्रथम भारतावर पाकिस्तानने आक्रमण केले.

५. ............... यांनी आपल्या शपथविधी सोहळ्याच्या समारंभास दक्षिण आशिआई देशांना आमंत्रित केले होते.

**४.२.२ भारत-चीन संबंध :**

आज भारत व चीन यांच्याकडे जग २१ व्या शतकातील महासत्ता म्हणून बघत आहेत. कारण या देशात जगातील जवळजवळ १/३ लोक राहतात. उभय देशामध्ये उभयतांचे आर्थिक सामर्थ्य व बाजारपेठा मोठ्या आहेत. या देशात राहणाऱ्या लोकांच्यामध्ये सांस्कृतीक व शैक्षणिक, ऐतिहासिक अव्वलपणा दिसून येतो. कारण दोन्ही देशामध्ये सर्वत्र बौद्ध धर्माचा प्रसार झालेला आहे. त्यामुळे चीनमधील बौद्ध धर्माचे उपासक किंवा अभ्यासक ज्ञानोपासनेसाठी भारतात येतात असे असले तरी भारत-चीन संबंधाला तणाव व संघर्षाची किनार आहे. अशा या दोन प्रचंड क्षमता असणाऱ्या महाकाय देशांमध्ये संबंध कशा प्रकारचे आहेत याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**भारत–चीन संबंध ऐतिहासिक आढावा :**

१९११ साली डॉ. सन–ऐन–सेन यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये पहिली लोकशाही क्रांती झाली. नंतर सत्ता लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात गेली. पण त्या सत्तेस इ.स. १९४९ नंतर माओ–त्से–तुंग यांनी आव्हान दिले आणि चीनमध्ये लालक्रांती घडवुन आणली. चीनमध्ये १९४९ ला कम्युनिस्ट पक्षाचे राज्य स्थापन झाले. भारताने या क्रांतीला पाठींबा देवून चीनला एक साम्यवादी राष्ट्र म्हणून मान्यता दिली आणि चीनच्या संयुक्त राष्ट्रामधील प्रवेशासाठी प्रयत्न केला. या काळात भारत–चीन यांचे संबंध जवळचे होते. चीन स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या सार्वभौम राष्ट्राच्या सीमारेषा निश्‍चित करण्यावर त्याने भर दिला. सर्वसाधारण चीनच्या सर्व भागावर कम्युनिस्ट पक्षाची सत्ता स्थापन झाली होती. 'तिबेट' त्यापासून स्वतंत्र होता. त्या तिबेटवर चीनने लष्करी कारवाई करुन आपली सत्ता स्थापन केली. भारत सरकारने यामध्ये हस्तक्षेप न करता 'तिबेट' हा चीनचा स्वायत्त भाग असल्याचे मान्य केले आणि तिबेटच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करण्याचे जे अधिकार होते ते भारताने स्वेच्छेने सोडले. त्यानंतर भारत चीन भाई–भाई चे पर्व सुरु झाले. १९५५ साली 'बांडूग' येथे भरलेल्या 'आफ्रो–आशियाई' राष्ट्राच्या पहिल्या परीषदेत उभय देशामध्ये 'पंचशील करार' करण्यात आला. ही पाच तत्त्वे म्हणजे १. परस्परांच्या प्रादेशिक अस्मितेबद्दल आणि सार्वभौमत्वाबद्दल आदर २. अनाक्रमन ३. अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे ४. राष्ट्रीय समानता आणि परस्पर हीत ५. शांततामय सहजीवन. पण भारत–चीन यांच्यातील मैत्रिचे संबंध हळूहळू बिघडावयास सुरुवात झाली. कारण भारताच्या मैत्रिपेक्षा आपल्या भु–राजकिय हितसंबंधाचे रक्षण करणे चीनला महत्त्वाचे वाटू लागले. भारत व तिबेट यांच्यामधील 'मॅकमोहन रेषेस' अमान्य करुन भारतीय प्रदेशातील पश्‍चिम सिमेवरील काश्मिर–तिबेट सिमेवर असणाऱ्या अक्साई चीनवर चीनने आपला दावा सांगितला.

**४.२.१ भारत–चीन संबंधातील वादग्रस्त प्रश्‍न :**

**अ) तिबेटचा प्रश्‍न :**

भारत व चीन यांच्यातील संबंध हे तिबेटवर अवलंबून आहेत. भारत व तिबेट यांचे जवळचे संबंध होते आणि ब्रिटीश काळापासून भारताचे ल्हासा येथे कार्यालय होते व त्याबाबत भारतास काही अधिकार होते. पुढे भारत–तिबेट यांच्यातील सीमारेषा मॅकमोहन नावाच्या अधिकाऱ्याने आखली होती. ती 'मॅकमोहन लाईन' म्हणून ओळखली जाते. पण ही रेषा तिबेट जनतेला व चीनला ही मान्य नव्हती. त्यातून तिबेट चा प्रश्‍न हा भारत–चीन संबंधात सीमावाद म्हणून पुढे आला. त्यातूनच १९६२ चे युद्ध झाले आणि चीनने तिबेटवर ताबा केला आणि भारतानेही तिबेटहा चीनचा स्वायत्त भाग असल्याचे मान्य केले. तिबेट हा चीनचा 'स्वायत्त व स्वंशासित प्रदेश' आहे अशी चीनची भुमिका आहे/होती. याबाबत तिबेट जनताही सहमत होती. त्यांचे असे मत होते कि आपणास चीनपासुन तिबेटचे सार्वभौम व स्वतंत्र राष्ट्र स्थापन करावयाचे नाही. आपण चीनचे सार्वभौमत्त्व मान्य करण्यास तयार आहोत. मात्र परराष्ट्र, संरक्षण व संचार या तीन बाबी वगळता तिबेटला अंतर्गत प्रशासनात चीनने पुर्ण स्वायत्तता दिली पाहिजे. पण याबाबत चीन कोणत्याही परिस्थितीत तयार नव्हता. म्हणून 'दलाई लामा' नी याबाबत कणखर भूमिका घेवुन चीनशी संघर्ष पुकारला. त्याबाबत आंतरराष्ट्रीय भूमिका

तयार करण्यास सुरुवात केली. दलाई लामा यांना भारताचा पाठींबा आहे आणि त्यांच्या चळवळीस भारत पाठींबा देत आहे. त्यांना आश्रय देत आहे म्हणून भारत-चीन संघर्षाला सुरुवात झाली आहे. भारत-तिबेट-चीन असा सीमासंघर्ष आजपर्यंत चालू आहे.

**ब) अरुणाचल प्रदेश :**

'अरुणाचल प्रदेश' हा भारतीय संघराज्याचा अविभाज्य घटक असताना चीनने 'अरुणाचलवर' आपला दावा केला आणि चीनच्या नकाशामध्ये अरुणाचल प्रदेश चीनचा भाग असल्याचे दर्शवण्यात आले. त्यावेळेपासुन भारत-चीन सीमावादाला सुरुवात झाली. अरुणाचल प्रदेशातील 'तावागया भाग' आपला असल्याचा दावा केला होता. अरुणाचल प्रदेशातील तावागया भुभाग खुप महत्त्वाचा आहे. कारण या भागात बौद्धांचे महत्त्वाचे मठ आहेत. या भागात नैसर्गिक साधन संपत्ती भरपुर प्रमाणात आहेत. तसेच भारत-चीन व्यापार वृद्धीसाठी दळणवळण मार्ग तयार करण्यासाठी हा भाग चीनला महत्त्वाचा वाटतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे दलाई लामांचा प्रभाव रोखण्यासाठी तावांग भागातील मठांवर आपले नियंत्रण हवे होते. म्हणून चीनने १९६२ साली भारतावर आक्रमण केले. १९६२ च्या युद्धांत हा भाग चीनने जिंकला होता पण युद्ध विरामानंतर हा भाग परत भारताच्या ताब्यात देण्यात आला. आज हा सर्व प्रदेश भारताच्या ताब्यात आहे.

**क) १९६२ चे भारत-चीन युद्ध :**

मॅकमोहन लाईन, तिबेट, अरुणाचल प्रदेश आणि चीनचे धार्मिक नेते दलाई लामा यांना भारतात राजकिय आश्रय या इतर कृत्यामुळे भारत-चीन यांचे संघर्ष निकोपाला गेले. त्यातून चीनने २० ऑक्टोंबर १९६२ रोजी भारतावर आक्रमण केले आणि बेसावध भारतीय सैन्याचा पराभव केला. नेफा, लडाख भागात त्यांनी अक्साई चीनवर ताबा स्थापन केला आणि पुर्व भागात भारतीय सैन्याचा पराभव करुन संपूर्ण नेफा भाग आणि आजचा अरुणाचल प्रदेश ताब्यात घेतला. भारताचे लष्करी नेतृत्त्व पुर्व तयारीत किंवा बेसावध असल्यामुळे भारताचा एकतर्फी पराभव झाला. २० नोव्हेंबर १९६२ मध्ये चीनने एकतर्फी युद्धविरामाची घोषणा केली आणि अक्साई चीन व त्यांनी आपला ताबा ठेवुन अरुणाचल प्रदेश भारताकडे देण्यात आला. १९४७ पुर्वी जम्मु-काश्मिर राज्याचा एक लाख चौरस भुभागापैकी २७ हजार चौरस कि.मी. चा भुभाग आज चीन आणि पाकिस्तानकडे आहे. चीनी आक्रमणापाठीमागे प्रामुख्याने पुढील कारणे होती.

१. दक्षिण आशियाचे नेतृत्त्व आपल्याकडे घेणे म्हणजे प. नेहरुंनी 'बाडूंग परीषद' च्या माध्यमातून आपले नेतृत्त्व सिद्ध केले होते. त्याला धक्का देणे.

२. मॅकमोहन लाईन जी भारत-तिबेट-चीन यांच्या सीमा रेषा स्पष्ट करते ती अमान्य आहे हे सिद्ध करणे.

३. भारताचे लष्कारी सामर्थ्य खच्चीकरण करणे.

४. भारताचे मनोधैर्य खच्चीकरण. ही होती.

या युद्धामुळे मात्र भारताच्या राजकिय नेतृत्त्वाला जागतिक राजकारणांची वास्तविक परिस्थितीची जाणीव

झाली आणि त्यातून भारताने धडा घेऊन लष्करी सामर्थ्य वाढवण्यास सुरुवात केली. अतिक्रमणाच्या लहान मोठ्या घटना घडल्या. त्यामध्येच तिबेटचे धार्मिक नेते दलाई लामा त्यांच्या हजारो अनुयायांसह भारतात आले. अशा अनेक कारणांमुळे १९६२ च्या ऑक्टोंबर महिन्यात भारताच्या नेफा (सध्याचा अरुणाचल प्रदेश) आणि लडाख या प्रदेशावर चीनने व्यापक स्वरूपात आक्रमण केले आणि भारत-चीन युद्धाला प्रारंभ झाला. चीनने नेफा आणि लडाखच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशावर ताबा मिळवला आणि एकतर्फी युद्ध विराम करुन चीनने आपले सैन्य माघारी घेतले तरी आजही लडाखचा बराच मोठा भु-प्रदेश चीनने बळकावला आहे.

### ४.२.२ भारत-चीन संबंधात सुधारणा :

१९६२-१९८८ या काळात भारत-चीन यांच्यातील संबंध संघर्षाचे व तणावाचे राहिले. पण चीनसारख्या प्रबळ राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे भारताचे/भारताच्या हिताचे असे भारतीय नेत्यांना वाटले. मध्यंतरी/या काळात वाजपेयी यांनी परराष्ट्र मंत्री असताना संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, पण चीनने व्हिएतनामवर हल्ला केल्यामुळे तो अयशस्वी ठरला. १९८८ साली राजीव गांधी चीनला गेले आणि त्यानंतर भारत-चीन संबंधात सुधारणा व्हावयास सुरुवात झाली. नंतरच्या काळात नरसिंहराव यांनी चीनशी संबंध सुधारण्याबाबत सकारात्मक भुमिका स्वीकारली. सीमेबाबत वाटाघाटीस सुरुवात झाली. आर्थिक क्षेत्रात व व्यापारात उभयतात देवाणघेवाण सुरु झाली. या काळात चीनची भुमिका ही की चीनला भारताची प्रचंड बाजारपेठ हवी होती. त्याचबरोबर वित्तीय संस्थांचे व्यवस्थापन, रोखे व्यवहार व्यवस्थापन, संगणकातील सॉफ्टवेअर आणि उच्च शिक्षण याबाबत चीनला सहकार्य हवे होते. त्यामुळे आता भारतात संबंध सुधारण्यास चीन तयार होता. १९९६ साली चीनचे राष्ट्रपती व कम्युनिस्ट पक्षाचे नेते जि. झियांग यांनी भारताचा दौरा केला. यावेळी भारत चीन यांच्यात सीमा प्रश्नाबाबत चर्चा झाली. व्यापार व सांस्कृतिक देवाण घेवाण यांना सुरुवात झाली. त्यानंतर चीनचे पंतप्रधान वान जियाबाओ भारतात आले. मनमोहन सिंग आणि जियाबाओ यांच्यामध्ये चर्चा झाली व अनेक महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेण्यात आले. भारताचा सिक्कीमबाबतचा दावा चीनने मान्य केला. थोडक्यात जियाबाओ यांची भारतभेट अत्यंत यशस्वी ठरली. जाताना त्यांनी 'हिंदीचिनी भाई भाई' अशी घोषणा करुन ५० वर्षापुर्वीचे 'पंचशीलत्त्व' किंवा बाडूंग स्पिरीट जागृत करण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोन्ही पक्षांना मान्य होईल अशा प्रकारे सीमाप्रश्न सोडवण्यासाठी परस्पर सहकार्य करण्याचे व सीमा प्रश्न सोडवण्यासाठी एक संयुक्त मंडळ तसेच आर्थिक व वैज्ञानिक देवाण घेवाणीसाठी दुसरे एक संयुक्त मंडळ स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. या भेटीनंतर भारत-चीन संबंधात सुधारणा होऊन या दोन्ही देशातील व्यापार वाढला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता हाती घेतल्यापासुन दक्षिण आशियाई राष्ट्रांशी संबंध बळकट करण्यावर भर दिला आहे. आशियाई पॅसिफीक भागात त्यांनी मित्र जोडण्यावर भर दिला. कारण चीनच्या आक्रमक विस्तारवादाला भारताला रोखवण्याचे काम करावयाचे आहे. त्यासाठी दक्षिण आशियाई समुद्रातील चीनच्या वाढत्या वावराला आळा घालण्यासाठी अमेरिका, जपान, फ्रान्स, जर्मनी आणि फिलीपाईन्स इत्यादी राष्ट्रांशी युती करत आहेत. त्याचबरोबर चीनशी मैत्रि करुन आर्थिक विकास साधायचा आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी चीनशी भेट देवुन नैसर्गिक वायू, तेलपुरवठा, आयात-निर्यात, सांस्कृतिक देवाण घेवाण करण्याचे करार करण्यात आले

आहेत. थोडक्यात भारत-चीन संबंध सुधारण्यास सुरुवात झाली आहे. याचे कारण म्हणजे भारताचा आर्थिक विकासाचा दर वाढला आहे. आर्थिकदृष्ट्या भारताची ताकद वाढू लागली आहे. भारताने संगणक व माहीती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठा टप्पा गाठला आहे. तसेच भारत-अमेरिका यांच्यात जवळचे संबंध प्रस्थापित होत आहेत आणि विशेष म्हणजे भारताची विस्तृत अशी बाजारपेठ चीनला खुणावू लागली आहे. त्यामुळे भारत-चीन संबंध सुधारण्याच्या वळणावर येवुन ठेवली आहे.

**४.२.३ गाळलेल्या जागा भरा.**

१. ............. साली चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली.

२. भारत-चीन संबंधातील .............. हा महत्त्वाचा दुवा होता.

३. ............... साली भारत-चीन युद्ध झाले.

४. ................ हे पंतप्रधान यांनी चीनला प्रत्यक्ष भेट दिली.

५. ................ हे भारत-चीन संबंधातील वादग्रस्त प्रश्न आहेत.

**४.२.४ सारांश :**

भारत, चीन आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधात आज २१ व्या शतकात सुधारणा होत आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील काश्मिर प्रश्न व दहशतवादाचा प्रश्न आजही या दोन मुद्द्यावर किंवा प्रश्नावर तोडगा निघालेला नाही. दहशतवादाच्या माध्यमातून आजही भारताला त्रास होत आहे. पण देशाचा विकास करावयाचा असेल तर या दोन्ही देशामध्ये संवाद आणि शांतता प्रक्रिया सुरु राहिली पाहिजे. तसेच भारत-चीन यांच्यातील संबंधात सीमाविवाद व तिबेटचा प्रश्न हे दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. आज भारत व चीन यांच्याकडे सगळे जग महासत्ता म्हणून पाहात असताना या दोन्ही देशांमधील सीमाप्रश्न सुटले पाहिजेत. या दोन्ही देशामध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात जर देवाणघेवाण सुरु झाली तर जगाचे चित्र बदलू शकते.

**४.२.५ प्रश्नांची उत्तरे :**

१.१.६ १) १४ ऑगस्ट १९४७ २) रॅडकिल्फ लाईन

३) काश्मिर व दहशतवाद ४) १९६५ ५) नरेंद्र मोदी

१.२.३ अ) १९४९ ब) बौद्धधर्म क) १९६२ ड) राजीव गांधी

४) तिबेट व अरुणाचल प्रदेश

**४.३ विद्यापीठ स्वरूपाचे प्रश्न**

१. भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंधाची चर्चा करा.

२. भारत-चीन संबंधाची चर्चा करा.

**३. टिपा लिहा.**

अ) तिबेटचा प्रश्न  ब) काश्मिर प्रश्न

क) दहशतवाद  ड) अरुणाचल प्रदेश प्रश्न

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. International Relations : Ralmar & Parkins

२. आंतरराष्ट्रीय संबंध : डॉ. शैलेंद्र देव

३. भारत आणि भारताचे शेजारी : संपादक मनिषा टिकेकर

४. जागतिक राजकारणात भारत : डॉ. विजय खरे

५. प्रबोधन प्रकाशन ज्योती : मे २००५

६. प्रबोधन प्रकाशन ज्योती : जाने. २००७

७. समाज प्रबोधन प्रत्रिका : जुलै – सप्टेंबर – २०१२


●●●